१६५७८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0008216

REFBK-0008216

म. ग्रं. सं. ठाणें
विषय = चरित्र
सं. क्र. १६८९

१५-८९

बाकीच्या साऱ्या संतांनीं देशाचें अपरि- ड्यांचा या संबंधांतील स्थूल निर्णय असून [illegible]थाचा अनुवाद विशेष उत्कट भाषेनें केला आहे. या दोन्ही व्यक्तींचीं मतें बिनचूक असें मानून इतर पुष्कळांनीं त्यांचीच री ओढली आहे. या मतांविरुद्ध तुकोबांची तरफदारी कांहीं लेखकांनी केली असली तरी अशापैकी जे लेखक ब्राह्मण होते त्यांचा जातिविषयक अहं-काराचा दर्प त्यांच्या विवेचनांत अधूनमधून उसळत असल्यानें त्यांचा विस्मय व तिरस्कार वाटावा हें स्वाभाविक आहे. श्री. पां. बा. कवडे यांनीं लिहिलेल्या या नवीन चरित्रामध्यें पूर्वोक्त लेखकांच्या दुष्ट विधा-नांचें यथामति परीक्षण केलेलें असून हेंच या चरित्राचें वेगळें महत्त्व म्हणतां येईल व त्या दृष्टीनें या चरित्राची वाचनीयता नाकारतां येणारी नाहीं.

तुकोबांचा जन्म इ. स. १६०८ मध्यें झाला व इ. स. १६५० मध्यें त्यांचें जीवन कालोदरांत विलीन पावलें. त्यांचें जीवनवृत्त अवघें ४२ वर्षांचें आहे. यांत एकवीस एकवीस वर्षांचे दोन विभाग स्पष्ट पडलेले दिसतात. पहिल्या एकवीस वर्षांचा विभाग सामान्य स्वरूपाचा आहे तर दुसरा विभाग असामान्य पारमार्थिक उत्कर्षाचा आहे. पहिल्या विभागानंतर ते परमार्थाकडे इतक्या आवेशानें व दृढनिश्चयानें वळलें कीं, थोडयाच अव-काशांत त्यांचा गौरव महाराष्ट्रांत पसरला. इतर संतांच्या जीवनांत नस-लेल्या सर्व उणीवा तुकोबांच्या चरित्रांत पहायला सांपडतात. पहिली उणीव जातीची, दुसरी उणीव गुरूची. ज्ञानेश्वर हे जातीनें ब्राह्मण, व त्यांचा गुरू म्हणजे सख्खा थोरला भाऊच. नामदेव जातीनें अब्राह्मण असले तरी त्यांना ज्ञानेश्वरांचा सहवास लाभला होता. ज्ञानेश्वरांच्या साक्षात् प्रभावकाळीं माळी, कुंभार, महार. याप्रमाणें समाजाच्या सर्व थरांमध्यें संत होऊन गेले. पण पुढें सुमारें दोनशें वर्षें ही परंपरा रोडावली होती. एकनाथ हे दोनशें वर्षांनीं या रोडावलेल्या परंपरेची धुरा अंगावर घेतात, पण ते जातीनें ब्राह्मण, त्यांना जनार्दन स्वामीसारखा थोर अधिकाराचा गुरु लाभला तोहि ब्राह्मणच हें येथें विसरता येत नाहीं.

ब्राह्मण जातीचा निर्देश येथें तिचें वर्चस्व सुचविण्याकरितां केलेला नाहीं. ब्राह्मणांच्या संस्कारांचा बोध होण्याकरतां तो शब्द येथें उपयोगांत आणलेला आहे. विद्येचा संस्कार हा ब्राह्मणाचा प्रमुख संस्कार असल्यानें

त्याच्या बळावर तो कुठल्याहि कार्यक्षेत्रांत इतरांच्या मानानें सहज सरसावू शकतो. इतर जातींना विद्येच्या संस्कारांचा अभाव थोडाफार ज्ञानाखेरीज रहात नाहीं. तुकोबांना पहिली अडचण जातीची होती. ज्ञानेश्वरांनी भक्तिमार्ग सर्व जातींसाठीं मोकळा केला खरा, पण मध्यंतरी त्यांच्या परंपरेला पडलेला खंड तुकोबांकडे पहातांना ध्यानांत ठेवावा लागतो. तुकोबा पैठण, पंढरपूर या गांवांचे किंवा त्या गांवांच्या परिसरांतले असते तर त्यांना या गांवाच्या भक्तिक्षेत्राचें वारें लागून ते भक्तिमार्गांत शिरले असें म्हणतां आलें असतें. परंतु तुकोबांचा देहू हा गांव पैठणपंढरपुराच्या रहाळांतला नाहीं. तो मावळांत वरील भक्तिक्षेत्रापासून बराच दूर आहे. देहूनजीक असलेलें ज्ञानेश्वरांच्या समाधीनें प्रख्यातीस चढलेलें आळंदी हें ठिकाण मात्र भक्तिमार्गाच्या विचारांत तुकोबांच्या संदर्भानें डोळ्यांत भरणारें आहे. त्याचा तुकोबांच्या जन्मापूर्वी एकनाथांनीं जीर्णोद्धार केल्यामुळें त्या ठिकाणाचा व त्यावरोबरच एकनाथांचा जयजयकार तुकोबांच्या कानीं जन्मापासून पडत असल्यास नवल नाहीं. नव्या महाराष्ट्राचें उत्थान मावळ खोऱ्यांत होणार असल्याचें भविष्य ओळखूनच जणूं काय ज्ञानेश्वरांनीं आळंदीस–अर्थात् मावळच्या टापूंत समाधि घेतली व भक्तिमार्गाचें तेथें बीजारोपण केलें. याची एकनाथांच्या हातून मेहनत–मशागत होतांच त्याचें फळ तुकोबांच्या रूपानें देहूस प्रगटलें.

तुकोबांना कोणी प्रत्यक्ष गुरु मिळाला नाहीं. परमार्थाचा निदिध्यास लागल्यावर स्वप्नांत त्यांना गुरूनें भेट दिली व परमार्थाचा 'राम कृष्ण हरि हा सोपा मंत्र सांगितला अशा अर्थाची साक्ष तुकोबांच्या एका अभंगांत आहे. त्यांना गुरु स्वप्नांत भेटतो व मंत्र सांगतो हा प्रसंग कांहीं क्षणाचा आहे. पूर्वीच्या संतांना गुरूची सेवा, गुरूच्या देखरेखीखालीं परमार्थाचा अभ्यास, परमार्थांतील गूढांचा उकल वगैरे गोष्टी साधल्या. तुकोबांनीं या साऱ्या गोष्टी स्वतःच्या खडतर प्रयत्नानें शेवटास नेल्या व परमार्थाचें अत्युच्च स्थानीं ते कायमचे चढून बसले. ज्ञानेश्वरांनीं ज्या इमारतीचा पाया भरला, त्या इमारतीच्या कळसाचा श्रेष्ठ मान तुकोबांना दिला जातो, या स्थितीची मीमांसा करूं लागल्यास इतर संतांना जो अडथळा नव्हता त्याचें विघ्न स्वतःच्या परमार्थनिष्ठ दृढोद्योगानें पिटाळून लावून तुकोबांनीं आपलें ध्येय सिद्धीस नेलें, हा तुकोबांचा विक्रम उठावदारपणानें मनासमोर आल्याशिवाय रहात नाहीं.

तुकोबांच्या कर्तृत्वावर आक्षेप घेणारांपुढें मुसलमानांच्या आक्रमण काळांतील अत्याचारांचा वृत्तांत प्राय: प्रामुख्यानें असतो व त्याच्या आधारें आक्षेपक असें भासवूं पहातात कीं, मुसलमानांच्या अत्याचाराबद्दल आपल्या अभंगांत चकार देखील न उच्चारणारे तुकोबा हे दुबळ्या मनोवृत्तीचे प्रतिनिधि होत. या आक्षेपाचा विचार करतांना हें प्रथम लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, तुकोबांच्या काळांत मुसलमानांची दक्षिणेंतील राज्यें हिंदु प्रजेवर धर्मदृष्ट्या उठल्या सुटल्या जुलूम करण्यासारख्या बळकट अवस्थेंत नव्हतीं, ज्या जुलमांचा तुकोबांना परिचय नव्हता, त्याचा कड-कडून निषेध करण्याची स्फूर्ति तुकोबांना होऊं नये यांत त्यांची नालस्ती करण्याजोगें काय आहे ? तुकोबांना आपल्या देवाधर्माचा अभिमान होता. देवाधर्मासंबंधांत अनुभवास येणाऱ्या भ्रष्ट आचारविचारांचा त्यांना तिटकारा होता. आपल्या देवाधर्माचा निरतिशय अभिमान हा परमार्थाचा अप्रत्यक्ष निषेधच ठरतो. आपल्या अलिकडच्या इतिहासांतील एक उदाहरण घ्यावयाचें म्हटल्यास ‘ स्वदेशी ’च्या (स्वदेशी माल कटाक्षानें वापरण्याच्या) व्रताच्या चळवळीचें घेण्याला हरकत नाहीं. प्रथम स्वदेशीचा प्रारंभ झाला तेव्हां त्याच्या जोडीला परदेशी मालाचा बहिष्कार नव्हता. गैरसोय झाली तरी ती सोसून शक्य तोंवर किंबहुना सर्वस्वीं स्वदेशी मालच वापरावयाचा या निश्चयाच्या पोटांत परदेशी मालाच्या बहिष्काराचें तत्त्व वसत असल्याचें दिसून येईल. तसाच प्रकार आपल्या देवाधर्माच्या अभिमानाचा आहे. अशा तीव्र अभिमानांत परधर्माचा निषेध, प्रतिकार इत्यादि भावनांचा अंतर्भाव असतो. आज सुद्धां जे कोणी इस्लामचा द्वेष बाळगतात ते इस्लामची अष्टौप्रहर निंदा ओकून स्वधर्माचा अभिमान व्यक्त करतात, असें आढळत नाहीं. इंग्रजी राजवटीच्या शेवटच्या तीस चाळीस वर्षांत मुसलमानांनीं जे भीषण अत्याचार चालविले होते व चालू स्वराज्याच्या आरंभीं त्यांनीं जो आततायीपणा केला, त्यासारखे अत्याचार तुकोबांच्या काळांत वारंवार घडत असल्याचा दाखला इतिहासांत नसल्यामुळें तुकोबांना त्याचा तिरस्कारानें उघड निषेध करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु त्यांना देवधर्माच्या अभिमानाची आंच होती. हिंदु समाज मुसलमानी राज्यकर्तृत्वाच्या प्रभावामुळें स्वत्वापासून दुरावत असल्याची चीड तुकोबांना होती. ही आंच व चीड त्यांच्या अभंगांतून ग्रथित झालेली आहे.

रामदासांच्या तुलनेनें तुकोबांना खालच्या पायरीवर बसविणारांना मुसलमानी अत्याचारांचे दाखले जमेस घेऊन जर रामदासांच्या विस्तीर्ण उपदेशांत इस्लामच्या निषेधाचा कितीसा भाग आहे म्हणून प्रश्न केला तर त्याचें उत्तर देण्याला 'म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुता दिसांचें माजलें बंड।' या अर्ध्या ओवीपेक्षां जास्त पुरावा सांपडणार नाहीं. रामदासांनीं केलेला दावलमलकाचा निर्देश एकनाथांच्या ग्रंथ-रचनेंत अधिक विस्तारानें असल्यामुळें तो रामदासासंबंधांत पुनरुक्तिपर म्हणून बाद करावा लागतो. सारांश रामदासांच्या उपदेशांतसुद्धां तुकोबांच्या प्रमाणेंच देवाधर्माच्या अभिमानाचा विषय दृष्टीस पडतो. 'मऱ्हाष्ट धर्म' किंवा 'मऱ्हाट धर्म' असे शब्द वापरतांना रामदासासमोर मराठ्यांचा अथवा महाराष्ट्र नांवाच्या देशांतील हिंदूंचा धर्म होता, त्या हिंदूंचें स्वराज्य नव्हतें किंवा त्याचा अभिमानहि नव्हता. शिवाजीच्या गुरुत्वाचा योग व 'राजकारण' शब्दाचा केलेला प्रयोग, यांवर विसंबून रामदासांनीं शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यकर्तृत्वाला बराच मोठा हातभार लावला असला पाहिजे. या निराधार दुराग्रहाच्या परिणामीं रामदासांना श्रेष्ठ व तुकोबांना त्या मानानें कनिष्ठ लेखण्याचा वाद उद्भवला आहे. प्रस्तुतः या दोघा समकालीन महापुरुषांच्या शिकवणीचा रोख एकाच पारमार्थिक दिशेचा आहे. तुकोबांनीं गृहप्रपंच सोडला नाहीं तर रामदासांच्या विचारसरणींत एकदां 'निःस्पृहानें मठ करूं नये' असें धोरण असतां मठांचा, शिष्य-परिवाराचा व देव-देवळांचा प्रपंच जन्मभर केला. तुकोबा ज्याप्रमाणें गृहप्रपंचाच्या आसक्तीविरुद्ध होते तसेंच रामदासहि तशा आसक्तीविरुद्ध होते. प्रपंचाची आसक्ती नसावी असें म्हणणें व तसा प्रपंच साफ सोडून द्यावा असें म्हणणें यांतील फरक पुष्कळदां डोळ्याआड होऊन संतांविषयीं भलभलत्या कल्पना पसरलेल्या आहेत. पण तुकोबा रामदासांची शिकवण समोर ठेवून नीट तपासणी केल्यास दोघांच्या शिकवणींत जेवढें साम्य पहायला सांपडते तेवढें वैषम्य आढळत नाहीं. ज्ञानेश्वर एकनाथांच्या शिकवणीचा प्रभाव जसा तुकोबांवर पडला, तसाच तो रामदासांवर पडलेला असल्याचें दाखवणें कठिण नाहीं. ज्ञानेश्वर एकनाथांच्या शिकवणीचा उगम गीता भागवत हे दोन ग्रंथ आहेत. रामदास ज्ञानेश्वर, एकनाथांचें नांव उच्चारीत नसले तरी गीता भागवताचें नांव घेतात. यावरून शिकवणीची एकवाक्यता लक्षांत येण्याला हरकत नाहीं.

श्री. कवडे यांनीं आपल्या चरित्र लेखनांत पूर्वीं लिहिल्या गेलेल्या तुकाराम चरित्रांतील विवाद्य भागाचा परामर्ष योग्य प्रकारें घेतला आहे व राजवाडे किंवा भावे यांच्या तुकारामविषयक विधानांच्या विपरित स्वरूपाकडे पहातां श्री. कवडे यांची खंडनपर सौम्यता कौतुकास्पद वाटल्याशिवाय रहात नाहीं. तुकोबा जातीनें अब्राह्मण असले तरी त्यांच्या पारमार्थिक श्रेष्ठतेसमोर त्यांच्या हयातीमध्येंच अनेक ब्राह्मणांनीं लोटांगणें घातल्याच्या आख्यायिका आहेत व आजच्या काळांतसुद्धां तुकोबाविषयीं नितांत आदर बाळगणारे शेंकडो ब्राह्मण महाराष्ट्रांत आहेत. परंतु ज्यांनीं इतर संतांना हिणावून रामदासांच्या श्रेष्ठतेचा ध्वज उभारण्याचें कंकण हातीं बांधलें, त्यांनीं तुकोबांच्या सिद्धावस्थेंत व्यंगें काढण्याकरितां कोणत्या युक्त्या योजल्या त्यांची किंचित् ओळख करून देण्याला हरकत नाहीं. एका रामदास भक्तानें त्यास सांपडलेल्या अभंगांतील पाठभेदाच्या शब्दावरून तुकोबा स्त्रियांच्या संबंधांत ढिले असावे, असा तर्क सादर केला आहे. 'परस्त्री आपल्या दृष्टीला रुक्मिणी मातेसमान दिसते' या अर्थाच्या अभंगांत सदर संशोधकाच्या हातीं पडलेल्या लिखाणामध्यें 'आतां' हा शद्व आढळला व तो शद्व तुकोबांच्या चारित्र्याला चावा घेण्याला पुरेसा आहे असें ठरवून त्यानें पुढील आशयाचें भाष्य रचलें. 'आतां' म्हणजे या क्षणापासून पुढें 'परस्त्री मातेसमान' असें तुकोबा म्हणतात; तेव्हां त्या क्षणापूर्वींच्या सर्व आयुष्यांत परस्त्रियाशीं तुकोबा मातेच्या भावनेनें वागत नव्हतें, असा त्या भाष्याचा इत्यर्थ आहे. 'आतां' या शद्बावरून त्या संशोधकाला मनसोक्त तर्क लढवावा लागला, परंतु रामदासांच्या चरित्रांत शिष्यिणी संबंधानें अपवाद उद्भवल्याची जी कथा प्रसिद्ध आहे तिच्याकडे दृष्टिक्षेप करण्याचें या तुकोबाच्या निंदकांना धैर्य होत नाहीं. रामदासी चरित्रांतील ही कथा खरी असें येथें ध्वनित करावयाचें नाहीं. ही कथा निर्माण करण्याचा बाष्कळपणा रामदासांच्या चरित्रलेखक शिष्यांचा आहे. त्या शिष्यांना आपल्या गुरुभक्तीच्या भरांत आपण गुरुच्या गौरवाला काळिमा चोपडीत आहों, याचें भान नसल्यामुळें असल्या घाणेरड्या आख्यायिकांना जन्म देण्याची खंत त्यांना वाटली नाहीं. रामदासांच्या ब्रह्मचर्याचा कडकडीतपणा इतका व्यापक आहे कीं ज्यांनीं तो आपल्या वाणीच्या व्यवहारांत देखील कसोशीनें पाळल्याचा

अनुभव येतो. परंतु चरित्र लेखक शिष्यांना गुरुच्या प्रखर ब्रह्मचर्याचा बोध नसल्यानें त्या शिष्यांची नादान माहिती खरेपणाच्या नात्यानें स्वीकारून तुकोबांच्या संबंधांत 'आतां' या शब्दाधारें काढलें जाणारें अनुमान रामदासांवर उलटवितां येतें, हें तुकोबांच्या रामदासी टीकाकारांच्या गळीं उतरविण्याकरितां येथें किंचित् खल केला आहे. रामदासांच्या एकनिष्ठ भक्तांप्रमाणें तुकोबांचेहि महाराष्ट्रांत अनन्यनिष्ठ भक्त हजारोंनीं मोजतां येतील. तुकोबांच्या भक्तांना बेमुर्वतपणानें दुखविण्याचा हक्क जर रामदासभक्तांना असेल तर त्या स्वयंमान्य अधिकारानें तुकोबांचे भक्त रामदासांच्या हृदयाला दुखवूं शकतील, याचा लहानसा मासला म्हणून हा खल केला आहे. वस्तुत: एखाद्या शब्दावरून किंवा बऱ्याचशा आख्यायिकांवरून या दोघांच्या चारित्र्याची तुलना करणें हें अत्यंत अनुचित व घातक आहे. रामदासांचे भक्त साधारणपणें बहुसंख्येनें ब्राह्मण असल्यामुळें त्यांच्या द्वारें होणारी तुकोबांची निंदा ब्राह्मणब्राह्मणेतर या जातवारीच्या वादाला जागविणारी ठरते, एवढें तात्पर्य जरी श्री. कवडे यांनीं लिहिलेल्या प्रस्तुत तुकाराम चरित्रानें ब्राह्मण वाचकांना पटलें तरी ह्या पुस्तकाचें लेखन सार्थकी लागलें, असें निश्चितपणें म्हणतां येईल.

श्री. कवडे हें नाशिक जिल्ह्यांतील एक साधे शेतकरी असून ते पद्धतशीर शिक्षणाच्या संस्कारांतून गेलेले नाहींत. परंतु त्यांच्याशीं थोडासा संबंध आला तरी ते आजच्या एकंदर सामाजिक व राजकीय परिस्थितीचें योग्य ज्ञान संपादन करण्याच्या आस्थेचे चौकस गृहस्थ आहेत, हें कळण्याला उशीर लागत नाहीं. संत साहित्याचा, त्यांतल्या त्यांत तुकोबांच्या उपदेशाचा त्यांचा अभ्यास केवळ भाविकपणाचा नसून चिकित्सेचा असल्यामुळें त्यांना आपले विचार योग्य प्रकारें मांडण्याची हातोटी साधली आहे याविषयीं या पुस्तकाच्या परिशीलनानें वाचकांची खात्री पटावी असा भरंवसा आहे. तुकोबांच्या प्रस्तुत चरित्राची भूमिका थोडीशी वादाची आहे, परंतु वाद विवेचनांत तुकोबांच्या चरित्राचीं अनेक अंगें युक्तायुक्ततेच्या साधनानें उकलून दाखविण्याचा यत्न असल्यामुळें त्याचें निराळें महत्त्व मानण्याला हरकत नाहीं.

नवी भटवाडी, मुंबई, न. र. फाटक
ता. ७–५–१९५४

# नामदार भाऊसाहेब हिरे पाटील

( निंबगांव, जि. नाशिक )

**महसूलमंत्री, मुंबई सरकार.**



**' जनी जनार्दन । संत बोलती वचन ॥ '**—( तुकाराम )

जनसेवेतच ईश्वर सेवा ! हें भागवत धर्माचें सर्वश्रेष्ठ तत्व आपल्या ठिकाणीं स्पष्ट दिसत आहे.

—लेखक.

...ठाणे. ...
...... दि: ...
... ५८ नों दि. २२।६।५०

# अभिप्राय

संतसेवक श्री. पांडुरंग बाळाजी कवडे यांनीं लिहिलेल्या श्री. तुकाराम महाराजांच्या चरित्रावर अभिप्राय देण्याबद्दल त्यांनीं केलेल्या विनंतीचा स्वीकार मी साशंक मनानेंच केला. कारण संतवाङमयावर अधिकारी वाणीनें बोलण्याइतका संतवाङमयाचा माझा व्यासंग नाहीं. परंतु महाराष्ट्रांत संतांनीं केलेल्या कार्यास ऐतिहासिक महत्त्व असल्या कारणानें त्या दृष्टीनेंच त्यांच्या वाङमयाकडे मी पहात आलों आहे. याच मर्यादित दृष्टिकोनांतून श्री. तुकाराम महाराजांच्या प्रस्तुत चरित्रासंबंधीं पुढील चार शब्द लिहिण्यास श्री. कवडे यांनीं विनंति केल्यामुळें (?) उद्युक्त झालों.

श्री. पांडुरंग बाळाजी कवडे यांच्या श्री. तुकाराम महाराजांच्या चरित्राची ही दुसरी आवृत्ति. पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाल्यापासून अवघ्या दोनच महिन्यांत संपल्यामुळें त्यांना ही दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग लाभला आहे, श्री. तुकाराम महाराजांच्या चरित्रासंबंधी जनतेंत किती औत्सुक्य आहे हें या पुस्तकाच्या लोकप्रियतेवरून सिद्ध होतें. संत तुकाराममहाराज ज्या काळांत होऊन गेले तो काळ इतिहासांतील अत्यंत आणीबाणीचा काळ होता. त्यावेळची महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक व धार्मिक घडी पूर्णपणें विस्कळीत झाली होती. आपसांतील दुहीमुळें परकीयांचे चांगलेच फावले होते. व त्यांच्या जाचाखालीं सर्वसामान्य जनता पिळवटून निघत होती. कर्मठपणाच्या नांवाखालीं समाजांतील खालच्या वर्गावर अन्याय होत होता. स्वधर्मीयांच्या जाचाला कंटाळून अनेकांनीं याच काळांत धर्मांतर केलें. या अंधःकारमय व नैराश्यपूर्ण परिस्थितींत आपल्या "समता" धर्माच्या शिकवणीनें जनतेला "जीवनामृत" देणारी संत मालिका महाराष्ट्रांत निर्माण झाली. धर्माच्या नांवाखालीं होणारी विषमता नष्ट व्हावी म्हणून श्री. संत नामदेव महाराजांनीं समता धर्माची म्हणजेच भागवतधर्माची स्थापना केली व तत्कालीन अनेक संतांनीं या 'समता' धर्माच्या तत्त्वांचा अनेक ग्रंथांतून व कीर्तनांतून

समाजाच्या सर्व थरांमध्यें प्रसार केला. या सर्व संतामध्यें श्री. तुकाराम महाराज यांची कामगिरी विशेष नजरेंत भरण्यासारखी आहे. त्यांनीं आपल्या भक्तिपूर्ण, रसाळ व सोप्या परंतु अर्थपूर्ण अभंगांतून जनतेमध्यें जागृति निर्माण केली व मृतवत पडलेल्या महाराष्ट्राला अभंगरूपी संजीवनी देऊन त्यांच्यांत नवचैतन्य निर्माण केलें. हें कार्य त्यांना बिकट परिस्थितींत करावें लागलें. कर्मठ मंडळींचा विरोध त्यांना सहन करावा लागला व अनेक आपत्तीशीं झगडावे लागलें. परंतु शेवटीं त्यांचे कट्टर विरोधक त्यांचे चहाते बनले व 'समता' तत्त्वाचा विजय झाला. महाराजांच्या या अुपकारांचें ऋण अितिहास विसरणार नाहीं.

श्री. तुकाराम महाराजांनीं केलेल्या या कामगिरीचें महत्त्व त्यांच्या कांहीं चरित्रकारांना न पटल्यामुळें त्यांनीं घेतलेल्या आक्षेपांचा श्री. कवडे यांनीं प्रस्तुत चरित्रांत योग्य परामर्ष घेतला आहे. संत वाङमयाच्या व्यासंगी विद्वान मंडळींना माझी अशी नम्र विनंति आहे कीं महाराजांच्या चरित्रामधील जी "शंकास्थानें" आहेत त्यांचा त्यांनीं अुहापोह करून महाराजांसंबंधी खरी माहिती जनतेला अुपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा म्हणजे श्री. कवडे यांनीं या दृष्टीनें हातीं घेतलेल्या कार्यास अधिक चालना मिळेल. त्याचप्रमाणें महाराजांच्या अभंगांसंबंधीहि बरेंच मतप्रवाह आहेत. चरित्र लेखक श्री. कवडे यांनीं या संबंधी चरित्रांत चर्चा केलेली आहे. सध्यां प्रचारांत असलेले अभंग हे मूळचेच आहेत किंवा काय ह्याचीसुद्धां तपासणी होणें जरूर आहे त्यासाठीं महाराजांच्या अभंगांच्या हस्तलिखित वह्या ज्यांच्यापाशीं असतील त्यांनीं या बाबतींत संत वाङमयाच्या व्यासंगीं मंडळींना सहाय्य करणें जरूर आहे. शेवटीं संतसेवक श्री. कवडे यांनीं तुकाराम महाराजांचें हें चरित्र जनतेपुढें आणल्याबद्दल त्यांचें मी अभिनंदन करतों. त्यांच्याकडून अशीच वाङमयसेवा घडो अशी सदिच्छा व्यक्त करून श्री. तुकाराम महाराजासारख्या संत श्रेष्ठाच्या चरित्राबद्दल हे चार शब्द लिहिण्याची त्यांनीं मला संधि दिली ह्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों.

सेक्रेटरिअेट् मुंबअी
२९-६-५४

**यशवंतराव चव्हाण.**
स्थानिक-स्वराज्य व जंगलखात्याचे मंत्री मुंबईराज्य

*

पंढरपूरच्या वारकऱ्यांचे एक पुढारी हरिभक्तिपरायण श्री. कवडे यांनीं तुकाराम चरित्र लिहून वारकरी सांप्रदायाच्या वाङ्मयांतच नव्हे तर चिकित्सक वाचकांच्या वाङ्मयांतहि मोठी भर घातली आहे. तुकाराम महाराज हे स्वतः फक्त ईश्वरभक्त होते असें नव्हे, तर दुःखितांचें दुःख दूर करण्याचा संदेश जनतेला त्यांनीं दिला, समाजांत समता स्थापण्याचा त्यांनीं पुरस्कार केला आणि सदाचार व परोपकार हाच खरा धर्म असून ईश्वरपूजा त्यांतच येते असे उपदेशिलें. बहुसंख्य समाजाला अगदीं सोप्या भाषेंत तुकाराममहाराजांनीं ही संस्कृति देऊन त्यांना सांस्कृतिक उत्कर्षाच्या मार्गास लावलें. कवडे यांच्या या ग्रंथावरून तुकाराम चरित्रांतला हा बोध फार चांगला कळतो.

मुंबई
मे १९५४.

**पां. वा. गाडगीळ**
(लोकमान्य या सुप्रसिद्ध दैनिकाचे संपादक)

★

संतसेवक कवडे नांदगांव यांस, मला आवडलें आपलें पुस्तक. संतांचीं चरित्रें लिहितांना काय, वाचतांना काय, अेक प्रकारचा भाव असावा लागतो. बुद्धीनें काम करायला पाहिजेच. परंतु अंतःकरणहि उघडें असायला पाहिजे. अशा चरित्रांचा हेतु नुसता ज्ञानांत भर घालण्याचा नसतो, तर अंतःकरणावर परिणाम व्हायला लागतो. आपलें पुस्तक त्या दृष्टीनें लिहिलेलें मला वाटलें म्हणून मला तें अधिक आवडलें.

संताचें चरित्र म्हणजे त्या त्या कालचा एक सांस्कृतिक इतिहास असतो. सांस्कृतिक विचारांचा झगडा असतो. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा कालखंड अशाच झगड्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे, महाराष्ट्राच्या इतिहासांत दुसरा कालखंड अेवढा परिणामकारक नाहीं, असें मला वाटतें. महाराष्ट्राचे संत हे महाराष्ट्रांतील बहुजन समाजाचे जीवन घडवणारे द्रष्टे आहेत, असें मी मानतों. न्या. रानडे यांनीं केलेली चिकित्सा ही अगदी बिनचूक आहे.

मला असें वाटतें कीं आजच्या समाजाच्या, किंबहुना, देशाच्या परिस्थितींत ज्ञानदेव, नामदेव तुकाराम गौतमबुद्ध यांच्या मानवता वादाची अत्यंत आवश्यकता आहे. मानवी बुद्धि अेव्हरेस्टवर जाअून पोंचली आहे. अंतःकरणाची कळी खुलत नाहीं, ती करपूं लागत आहे.

आपल्या पुस्तकासारखीं पुस्तकें प्रसिद्ध व्हायला पाहिजेत. बहुजन समाजाच्या हातांत पडायला पाहिजेत. जगाच्या पाठीवरील कोणत्याहि देशाचा अितिहास अेवडा दैदिप्यमान नसेल कीं, सहा-सातशें वर्षे संतांच्या नांवाचा जयघोष करीत लाखों बहुजनसमाज प्रतिवर्षी तल्लीन होअून अेका पताकाखालीं गोळा होत असतील ! महाराष्ट्राचा हा थोर अितिहास आहे. अती थोर ही परंपरा आहे. हा अितिहास घडविणारांपैकीं संतश्रेष्ठ श्री. तुकाराममहाराज ही एक महान् व्यक्ति आहे ! बहुजन समाजाला ज्ञानाचीं कोठारें खुलीं करणारे हे संत ! शतशः नमन अशा महान विभूतींना !

आपलें मी या ' चरित्रा 'बद्दल अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो.

मो. वा. दोंदे (प्रिन्सिपाल)
(अखिल भारतीय प्राथमिक शिक्षण संघाचे अध्यक्ष)

श्री. पांडुरंग बाळाजी कवडे हे नांदगांवचे शेतकरी आहेत. मराठी शाळेपलीकडे त्यांचें शिक्षण झालेलें नाहीं. तथापि, गाडगेबाबांच्या कृपेनें त्यांचें लक्ष संतवाङमयाच्या अभ्यासाकडे आणि समाजसेवेकडे वळलें. त्यांची मूळची बुद्धि कुशाग्र आणि चिकित्सक असल्यानें जवळजवळ दोन तपांच्या व्यासंगानें आणि निदिध्यासानें संतांच्या जीवनाचें आणि वाणीचें रहस्य आकलन करण्याचा अधिकार त्यांनीं प्राप्त करून घेतला आहे आणि ह्या अधिकाराच्या बळावर एकोणचाळीस सालीं गाडगेमहाराजांचे आणि बावन्न सालीं संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांचे असे दोन उत्कृष्ठ चरित्रग्रंथ ते निर्माण करूं शकले. तुकोबांच्या चरित्राची ही दुसरी आवृत्ति थोडीशी वाढवून ते आतां प्रसिद्ध करीत आहेत. तुकोबांना जाऊन आतां तीन शतकें पूर्ण होऊन गेलीं. तथापि; मराठी माणसाच्या जिभेवर तुकोबा अजून नाचताहेत. जनतेच्या भाषेवरील आणि जीवनावरील त्यांचें वर्चस्व अद्यापि आहे तसेंच कायम आहे. महाराष्ट्रांतली तुकोबांची एवढी अमर्याद लोकप्रियता लक्षांत घेतली म्हणजे त्यांच्या अभंगांचें आणि चरित्राचें जेवढें विवेचक संशोधन व्हावयाला पाहिजे होतें तेवढें आजपर्यन्त झालेलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे.

तुकोबांचे खरे अभंग कोणते आणि किती हें अद्यापि निश्चित झालेलें नाहीं. तुकोबांच्या चरित्रांतील कित्येक गोष्टी चमत्कारांच्या सदरांत सामील झाल्यानें आधुनिक दृष्टीनें त्यांचा उलगडा करणें दुरापास्त झालेलें आहे. अशा परिस्थितींत तुकोबांचें अधिकृत चरित्र लिहिणें किंवा त्यांच्या अभंगांमधील वादस्थळांची सुसंगति लावणें ही गोष्ट कठीण आहे. तुकोबांच्या चरित्रावर आणि तत्त्वज्ञानावर आजपर्यंत मराठींत पुष्कळच ग्रंथ रचले गेले आहेत. तथापि, ज्या बहुजन समाजाला तुकोबा आपले वाटतात त्या समाजाच्या दृष्टीनें पण विवेचक बुद्धीनें लिहिलेलें तुकोबांचें हें पहिलेंच चरित्र होय असें मला वाटतें. पांगारकर, भावे आणि राजवाडे हे मोठे अधिकारी आणि व्यासंगी पुरुष खरे, पण त्यांनीं तुकोबांच्या बाबतींत जो अन्याय केला तो श्री. कवडे ह्यांनीं महाराष्ट्राच्या वेशीवर टांगून फारच मोठी कामगिरी बजावली आहे ह्यांत कांहीं शंका नाहीं. भावे आणि राजवाडे ह्यांनीं तुकोबाविरुद्ध घेतलेले कित्येक आक्षेप इतके किळसवाणे आहेत कीं, त्यांच्यासारख्यांनीं असें हीन लिखाण कसें करावें ह्याचेंच आश्चर्य वाटते. कवडे ह्यांनीं हें लिखाण उजेडांत आणीपर्यंत महाराष्ट्रामधल्या एकाहि टीकाकाराचें त्यांकडे कसें लक्ष गेलें नाहीं ह्याचा अचंबा वाटतो.

ज्ञानेश्वरांची समाधि आणि तुकोबांचें निर्याण ह्यांबाबतची श्री. कवडे ह्यांनीं जी उपपत्ति लावलेली आहे ती विचारवंतांना मान्य होण्यासारखी नाहीं. 'कार्तिक मासांत म्हणजे दक्षिणायनांत कोणीहि योगी पुरुष समाधि घेणार नाहीं' या वि. स. वाकसकरांच्या आक्षेपाला सोनोपंत दांडेकर ह्यांनीं समर्पक उत्तर दिलें आहे. 'अर्चिरादि मार्ग व धूम्रमार्ग, दक्षिणायन व उत्तरायण हे भेद जे साधक योगी आहेत, त्यांच्याकरितां आहेत. साधन करून जे येथेंच सोहंसिद्ध झाले त्यांना नाहीत असें ज्ञानदेवानींच आठव्या अध्यायांत सांगितलें आहे' धुळवडीच्या धामधुमींत नदीकांठीं प्रातर्विधीसाठीं तुकोबा गेले असतांना त्यांच्या शत्रूंनीं त्यांना इंद्रायणींत ढकलून दिलें आणि मग तुकोबा सदेह वैकुंठाला गेले असा भाविकांचा त्यांनीं समज करून दिला, ह्या श्री. कवडे ह्यांच्या कल्पनेला आधार देणारा यत्किंचितहि पुरावा गेल्या तीनशें वर्षांमध्यें उपलब्ध

आपल्या पुस्तकासारखीं पुस्तकें प्रसिद्ध व्हायला पाहिजेत. बहुजन समाजाच्या हातांत पडायला पाहिजेत. जगाच्या पाठीवरील कोणत्याहि देशाचा अितिहास अेवढा दैदिप्यमान नसेल कीं, सहा–सातशें वर्षे संतांच्या नांवाचा जयघोष करीत लाखों बहुजनसमाज प्रतिवर्षी तल्लीन होअून अेका पताकाखालीं गोळा होत असतील ! महाराष्ट्राचा हा थोर अितिहास आहे. अती थोर ही परंपरा आहे. हा अितिहास घडविणारांपैकीं संतश्रेष्ठ श्री. तुकाराममहाराज ही एक महान् व्यक्ति आहे ! बहुजन समाजाला ज्ञानाचीं कोठारें खुलीं करणारे हे संत ! शतशः नमन अशा महान विभूतींना !

आपलें मी या 'चरित्रा'बद्दल अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो.

मो. वा. दोंदे (प्रिन्सिपाल)
(अखिल भारतीय प्राथमिक शिक्षण संघाचे अध्यक्ष)

*

श्री. पांडुरंग बाळाजी कवडे हे नांदगांवचे शेतकरी आहेत. मराठी शाळेपलीकडे त्यांचें शिक्षण झालेलें नाहीं. तथापि, गाडगेबाबांच्या कृपेनें त्यांचें लक्ष संतवाङ्मयाच्या अभ्यासाकडे आणि समाजसेवेकडे वळलें. त्यांची मूळची बुद्धि कुशाग्र आणि चिकित्सक असल्यानें जवळजवळ दोन तपांच्या व्यासंगानें आणि निदिध्यासानें संतांच्या जीवनाचें आणि वाणीचें रहस्य आकलन करण्याचा अधिकार त्यांनीं प्राप्त करून घेतला आहे आणि ह्या अधिकाराच्या बळावर एकोणचाळीस सालीं गाडगेमहाराजांचे आणि बावन्न सालीं संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांचे असे दोन उत्कृष्ठ चरित्रग्रंथ ते निर्माण करूं शकले. तुकोबांच्या चरित्राची ही दुसरी आवृत्ति थोडीशी वाढवून ते आतां प्रसिद्ध करीत आहेत. तुकोबांना जाऊन आतां तीन शतकें पूर्ण होऊन गेलीं. तथापि, मराठी माणसाच्या जिभेवर तुकोबा अजून नाचताहेत. जनतेच्या भाषेवरील आणि जीवनावरील त्यांचें वर्चस्व अद्यापि आहे तसेंच कायम आहे. महाराष्ट्रांतली तुकोबांची एवढी अमर्याद लोकप्रियता लक्षांत घेतली म्हणजे त्यांच्या अभंगांचें आणि चरित्राचें जेवढें विवेचक संशोधन व्हावयाला पाहिजे होतें तेवढें आजपर्यंत झालेलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे.

तुकोबांचे खरे अभंग कोणते आणि किती हें अद्यापि निश्चित झालेलें नाहीं. तुकोबांच्या चरित्रांतील कित्येक गोष्टी चमत्कारांच्या सदरांत सामील झाल्यानें आधुनिक दृष्टीनें त्यांचा उलगडा करणें दुरापास्त झालेलें आहे. अशा परिस्थितींत तुकोबांचें अधिकृत चरित्र लिहिणें किंवा त्यांच्या अभंगांमधील वादस्थळांची सुसंगति लावणें ही गोष्ट कठीण आहे. तुकोबांच्या चरित्रावर आणि तत्त्वज्ञानावर आजपर्यंत मराठींत पुष्कळच ग्रंथ रचले गेले आहेत. तथापि, ज्या बहुजन समाजाला तुकोबा आपले वाटतात त्या समाजाच्या दृष्टीनें पण विवेचक बुद्धीनें लिहिलेलें तुकोबांचें हें पहिलेंच चरित्र होय असें मला वाटतें. पांगारकर, भावे आणि राजवाडे हे मोठे अधिकारी आणि व्यासंगी पुरुष खरे, पण त्यांनीं तुकोबांच्या बाबतींत जो अन्याय केला तो श्री. कवडे ह्यांनीं महाराष्ट्राच्या वेशीवर टांगून फारच मोठी कामगिरी बजावली आहे ह्यांत कांहीं शंका नाहीं. भावे आणि राजवाडे ह्यांनीं तुकोबाविरुद्ध घेतलेले कित्येक आक्षेप इतके किळसवाणे आहेत कीं, त्यांच्यासारख्यांनीं असें हीन लिखाण कसें करावें ह्याचेंच आश्चर्य वाटते. कवडे ह्यांनीं हें लिखाण उजेडांत आणीपर्यंत महाराष्ट्रामधल्या एकाहि टीकाकाराचें त्यांकडे कसें लक्ष गेलें नाहीं ह्याचा अचंबा वाटतो.

ज्ञानेश्वरांची समाधि आणि तुकोबांचें निर्याण ह्यांबाबतची श्री. कवडे ह्यांनीं जी उपपत्ति लावलेली आहे ती विचारवंतांना मान्य होण्यासारखी नाहीं. 'कार्तिक मासांत म्हणजे दक्षिणायनांत कोणीहि योगी पुरुष समाधि घेणार नाहीं' या वि. स. वाकसकरांच्या आक्षेपाला सोनोपंत दांडेकर ह्यांनीं समर्पक उत्तर दिलें आहे. 'अर्चिरादि मार्ग व धूम्रमार्ग, दक्षिणायन व उत्तरायण हे भेद जे साधक योगी आहेत, त्यांच्याकरितां आहेत. साधन करून जे येथेंच सोहंसिद्ध झाले त्यांना नाहींत असें ज्ञानदेवांनींच आठव्या अध्यायांत सांगितलें आहे' धुळवडीच्या धामधुमींत नदीकांठीं प्रातर्विधीसाठीं तुकोबा गेले असतांना त्यांच्या शत्रूंनीं त्यांना इंद्रायणींत ढकलून दिलें आणि मग तुकोबा सदेह वैकुंठाला गेले असा भाविकांचा त्यांनीं समज करून दिला, ह्या श्री. कवडे ह्यांच्या कल्पनेला आधार देणारा यत्किंचितहि पुरावा गेल्या तीनशें वर्षांमध्यें उपलब्ध

झालेला नाहीं. एवढ्या अलौकिक पुरुषाची हत्या झाली असें म्हटलें तर त्याची गंधवार्तादेखील आजपर्यंत कुणाला लागू नये हें कसें संभवनीय आहे? तुकोबा 'कुडीसहित गुप्त झाले' ह्यांत मुळींच संशय नाहीं. योग सामर्थ्या-वर ज्यांचा विश्वास असेल त्यांना 'काया ब्रह्म' करणें म्हणजे काय हें सांगावयाला नको. त्यांना तुकोबांच्या सदेह वैकुंठ गमनाचें कोडें वाटणार नाहीं.

श्री. कवडे ह्यांच्याशीं अशा तऱ्हेचे कांहीं प्रामाणिक मतभेद होण्याची शक्यता असली तरी तुकोबांच्या चरित्रासंबंधीं आणि अभंगांविषयीं अधिक अभ्यासाला आणि संशोधनाला आव्हान देण्याचें सामर्थ्य ह्या त्यांच्या ग्रंथांत निःसंशय आहे. तुकोबांच्या चरित्राबरोबरच महाराष्ट्रांत भागवतधर्माची इमारत ज्या संतश्रेष्ठांनीं बांधली आणि त्याची परंपरा आज ज्या महापुरुषांनीं चालविली त्यांच्याहि चरित्राची आणि कार्याची श्री. कवडे ह्यांनीं आज ओळख करून दिलेली आहे. अशा रीतीनें ऐति-हासिक आणि चिकित्सक पार्श्वभूमीवर अत्यंत रसाळ आणि सुबोध भाषेंत श्रीतुकारामहाराजांचें व्यक्तिगत नि वाङ्मयीन चित्र श्री. कवडे ह्यांनीं रेखाटलें असल्यामुळें तें आबालवृद्ध, सुशिक्षितांना आणि अल्पशिक्षितांना अतिशयच आवडेल, यांत कांहीं शंका नाहीं. ह्या ग्रंथानें उपलब्ध तुका-राम वाङ्मयांत मोलाची भर पडलेली आहे असें मला वाटतें.

मुंबई १ ऑगस्ट १९५४. (आचार्य) प्रल्हाद केशव अत्रे

*

श्री. कवडे यांनीं लिहिलेलें तुकोबांचें चरित्र मी मोठ्या आवडीनें वाचलें. "संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज" असे न म्हणतां 'तुकोबा' हा सलगीचा शब्द मी मुद्दामच वापरत आहे. कुटुंबांतला प्रेमळ पिता हा घराबाहेर 'दे. भ. बापूराव', 'मान्यवर बापूसाहेब' किंवा असाच कांहीं-तरी बडा मनुष्य असतो. पण घरांत त्याचीं लहानमोठीं मुलें त्याला 'बापू' म्हणूनच हांक मारतात तसेंच हें आहे.

तुकोबांची पित्याशीं तुलना करतांना न कळत मी एक चूक करीत आहे. तिची जाणीव मला आहे. ज्ञानदेवी ही आम्हां मराठ्यांची माय-माऊली आहे असें म्हणण्याची विद्वान लोकांची पद्धत आहे. पण मला

वाटते, तुकोबांची गाथा हीच महाराष्ट्राची खरीखुरी आई आहे. तुकाई आणि ज्ञानोबा हेच आमचे आईबाप आहेत.

मीं असें म्हणतों, याचें कारण तुकोबांच्या गाथेंत जसा आईचा जिव्हाळा आहे तसा तिचा रागहि आहे. खरी आई केवळ प्रेमळ कधींच असत नाहीं. मुलाला दृष्ट लागूं नये म्हणून ती जशी त्याला पदराखालीं घेईल, तसा त्यानें फाजील आडदांडपणा करूं नये म्हणून ती त्याला चार चापटयाहि देईल. इतर सर्व संतांपेक्षां तुकोबा ही भूमिका अधिक प्रभावी-पणानें पार पाडतात. पांडित्य, प्रतिभा, परिश्रम वगैरे गुणांत त्यांच्याहून वरचढ असलेले संतकवि सांपडतील. पण प्रेमाच्या बाबतींत —मग तें प्रेम ईश्वरावरलें असो नाहींतर समाजावरलें असो— त्यांची बरोबरी कुणीच करूं शकत नाहीं. म्हणूनच तीनशें वर्षें झालीं तरी त्यांच्या अभंगांचा सुगंध घरोघर दरवळत आहे. शहरापासून खेड्यांपर्यंत तो पसरला आहे. अडा-ण्यापासून पंडितापर्यंत सर्वांना तो मोहवून टाकीत आहे.

श्री. कवडे यांच्या या तुकाराम चरित्रांत संशोधक वृत्ति आणि मार्मिक माहिती यांचा चांगला मेळ पडला आहे. उदाहरणार्थ, तुकोबा सदेह वैकुंठाला गेले या गोष्टीवर मी शाळेंतला विद्यार्थी होतो तेव्हांसुद्धां माझा विश्वास बसत नसे. पुढें पुढें तर खऱ्याखुऱ्या अर्थानें वास्तववादी असणाऱ्या या संताच्या देहावसानाविषयीं इतकी अद्भूत कथा कशी निर्माण झाली हें कोडं मला बैचेन करूं लागलें. पण पांगारकरांसारख्या आधुनिक विद्वानांनींहि तुकोबाच्या सदेह वैकुंठगमनाचा पुरस्कार केला. आतां श्री. कवडे यांनीं ही गोष्ट अमान्य करण्याचें धैर्य दाखविलें हें फार चांगलें झालें.

माहितीच्या दृष्टीनें सदरहू चरित्र मला मोठें मनोरंजक वाटलें. कांहीं कांहीं ठिकाणीं वादविषय आले आहेत पण ते वाचकांच्या विचाराला चालना देतील असेच आहेत. काळ बदलला असला तरी महाराष्ट्राच्या पुढील प्रवासांतहि तुकोबा आम्हांला आमचे सांगाती हवे आहेत. तें कां याचा उलगडा या चरित्रावरून चांगल्याप्रकारें होईल.

कोल्हापूर
७-७-५४

वि. स. खांडेकर
(महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध साहित्यिक)

*

आपल्या पुस्तकाची प्रथमावृत्ति इतक्या लवकर संपली हाच खरा लोकाभिप्राय होय.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचें चरित्र लिहितांना अभंगांची निवड मार्मिकपणें केली गेली आहे. विवेचन पद्धति चांगली आहे. ब्राह्मण जातीच्या अभिमान्यांना उत्तरें मुद्देसुद दिलीं आहेत व हीं कामें करीत असतांना वापरलेली भाषा ओघवती व सोपी आहे सर्वसाधारण लिहितां वाचतां येत असलेल्या माणसास विशेषत: वारकरी समाजास हें पुस्तक मननीय होईल.

कै. भावे यांच्या लिखाणामुळें रा. कवडे यांस लेखणी हातीं घ्यावी लागली. कै. भावे किंवा तसलेच ब्राह्मण वर्चस्वाचे अभिमानी यांनीं आज-वर ब्राह्मण जातीचें वर्चस्व टिकविण्यासाठीं ब्राह्मणेतर साधुसंत पराक्रमी वीर व राज्यकर्ते यांची कांहीं कमी निंदा केली नाहीं. अजूनहि ब्राह्मण जात व्हावी तशी जागी झालेली दिसत नाहीं. भावे यांनीं वादग्रस्त मुद्दे लोकांपुढें विशेषत: श्रद्धाळु लोकांपुढें मांडणें बरें नव्हतें. विद्यापीठानीं व शाळा खात्यानें विद्यार्थ्यांसाठीं पुस्तकाची शिफारस करणें ती फार काळजीपूर्वक व चौकसबुद्धीनें केली पाहिजे पण तसें झालेलें दिसत नाहीं.

तुकारामासारख्या क्षत्रीय मराठ्यानें स्वत: शेती व व्यापार केला असतां वैश्य अगर शूद्र म्हणवून घेणें किंवा एकाद्या ब्राह्मण जातींतील प्रामाणिक जनावरांचे डॉक्टरानें आपण कसाईखान्यांत कोणती बकरी मारण्यास योग्य व अयोग्य हें ठरवीत असतांना बैल बडवीत असतांना अगर पोल्ट्री (कोंबड्यांचा धंदा करीत असतांना) जर म्हटलें कीं "आम्ही कसचे ब्राह्मण." आम्ही शूद्र नव्हे का? हें म्हणणें पुरावा म्हणून सांगणें हा निव्वळ मानभावीपणा आहे. हें काम भाव्यांनीच केलें असें नाहीं. त्याचा मोह पांगारकरांसारख्यांनाही आवरता आला नाहीं.

वर्णाश्रमधर्मानें जातीभेदाचें अवडंबर केलें. त्यास ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, तुकाराम यांनीं सुरुंग लावले तथापि हें अवडंबर अजूनहि रेंगाळत आहेच. श्रीयुत कवडे यांनीं लिहिलेलें तुकाराम चरित्र सर्व लोकांना विशेषत: साधुसंतांच्या पाईकांना पंढरीच्या वारकऱ्यांना आवडेल यांत शंका नाहीं.

हें उपयुक्त व मननीय चरित्र लिहिल्याबद्दल श्री श्रीयुत कवडे यांचें मनापासून अभिनंदन करतों.

इंदू निकेतन, ताराबाई पार्क, कोल्हापूर. १५–५–५४

**पांडुरंग चिमणाजी पाटील थोरात.**
(माजी प्रिन्सिपॉल शेतकीकॉलेज पुणें.)

*

श्री. कवडे हे एक व्यासंगी गृहस्थ आहेत. त्यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेल्या तुकाराम महाराजांच्या चरित्राला दुसऱ्या आवृत्तीचा योग लाभला ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. मी श्री. कवडे यांचे या त्यांच्या सुयशाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या संतमालिकेंतच नव्हे तर साहित्यिकांत सुद्धां तुकाराम महाराजांचें स्थान फार मोठें आहे. त्यांच्या चरित्राविषयीं अद्याप अनेक दंतकथा आहेत. अस्सल कागदपत्रांवरून आपल्याला त्यांचें चरित्र नीट तपासून घेतलें पाहिजे आणि परत लिहिलें पाहिजे. तुकाराम महाराज हे एक भावडे, कजाग बायकोच्या जाचाला कंटाळलेले असे विरक्त साधु होते. असा त्यांच्याविषयीं प्रवाद आहे. संसारात कांहीं अर्थ नाहीं. ही सर्व माया आहे अशी त्यांची शिकवण होती. असें आजपर्यंत आपण मानीत आलों आहे. आपल्याला तुकाराम महाराजांच्या चरित्राबाबत आणि शिकवणीबाबत आपलीं मतें बदलावीं लागणार आहेत. त्यांच्या अभंगांचा चांगल्या रीतीनें अभ्यास केला तर महाराज फार चाणाक्ष, चतुर असे संसारी गृहस्थ होते. धूर्त व दांभिक लोकांच्या लबाड्या जाणण्याइतके त्यांच्यांत चातुर्य व शहाणपण होते. त्यांना संस्कृत भाषेमधील जुन्या धर्मग्रंथांचें चांगलें ज्ञान होतें. परमेश्वर आणि मनुष्य यांच्या दरम्यान कोणीही दलाल असतां कामा नये असा त्यांचा कटाक्ष होता आणि म्हणून त्यांनीं आपल्या अभंगांमधून भटभिक्षुक वर्गावर सोवळे ओवळ्यांवर व्रत वैकल्यावर चांगलेच कोरडे ओढले आहेत.

श्री. कवडे यांनीं महाराजांच्या अभंगांचें चांगल्या रीतीनें पृथक्करण केलें आहे. व त्यांची शिकवण विशद करून दाखविली आहे. श्री. कवडे यांच्या पुस्तकावरून तुकाराम महाराजांच्या तत्त्वज्ञानावर चांगला प्रकाश पडेल असा मला विश्वास आहे. एक चांगलें पुस्तक लिहिल्याबद्दल श्री. कवडे यांचे परत मी अभिनंदन करतों.

पुणें ७–६–५४

**वि. द. घाटे**
एम्. ए. बी. टी. टी. डी. लंडन (माजी शिक्षणाधिकारी)

संतसेवक पांडुरंग बाळाजी कवडे नांदगांव यांस, आपण श्रमपूर्वक लिहिलेलें संतश्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांचें चरित्र मी वाचलें. आपण चरित्रांत महाराजांच्या निंदकांचा समाचार घेतलेला आहे. तुकाराम महाराज जिवंत असतां त्यांचा छळ झाला आहेच. पण आतां त्यांना काल-वश होऊन इतकीं वर्षें होऊन सुद्धां त्यांची खोटी नालस्ती करण्याचें, इतिहास संशोधन या मोठ्या नांवाखाली कांहीं मंडळी सोडीत नाहींत. याबद्दल वाईट वाटतें. तुकाराम महाराजांचा मी एक नम्र उपासक आहे. पुणें ट्रेनिंग कॉलेजचा प्रिन्सिपॉल असतांना सतत आकरा वर्षें तुकाराम महाराजांच्या व इतर संतांच्या अभंगावर प्रवचनें करीत होतों. माझ्या विद्यार्थ्यांवर त्यांचा बराच परिणाम झाला. तुकाराम महाराजांच्या अभंग-वाणीनें त्यांना मानवधर्माची जाणीव करून दिली. अशा संत श्रेष्ठाच्या कुळाबद्दल नांवें ठेवणें अगर त्यांना कोणत्याहि रीतीनें हीन लेखण्याचा प्रयत्न करणें हें करणाऱ्याच्या मनाच्या हीन वृत्तीचें लक्षण आहे. आपण अशा लोकांचा समाचार घेतला आहे ही योग्यच गोष्ट केली आहे व त्या-बद्दल मी आपणांस धन्यवाद देतो. तुकाराम महाराज हा महाराष्ट्राचा ठेवा आहे. मानवधर्माचा आधारस्तंभ आहे. आपण हा प्राणापलीकडे जतन करून ठेविला पाहिजे. आपलें हें सुंदर पुस्तक सामान्य जनतेच्या वाचनांत येणें फार अगत्याचें आहे. आपल्या हातून अशीच संतसेवा घडो कळावे.

कोल्हापूर
७-६-५४

सी. रा. तावडे.
बी. इ. एस्. क्लास (रिटायर्ड)
(माजी प्रिन्सिपॉल सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज)

★

श्री. तुकोबारायांचें चरित्र संतसेवक श्री. कवडे यांनीं लिहून दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलें होतें. त्याची द्वितीयावृत्ति दोन वर्षांतच काढण्याचा सुयोग आला ही गोष्टच या पुस्तकाचें महत्व व लोकप्रियता पटविण्यास पुरेशी आहे. महाराष्ट्राची अध्यात्मक तनु ज्यांनीं आपल्या भक्तिज्ञान वैरा-ग्यानें ओथंबलेल्या रसाळ अभंगवाणीनें पुष्ट करण्याचें श्रेष्ठ कार्य केलें आहे त्या श्री. तुकोबारायाचें जीवनचरित्र प्रत्येक सुशिक्षित वा अशिक्षित नाग-रिकानें परिशीलन केलें पाहिजे व त्या महान विभूतीच्या जीवन निष्ठेचा

जितका अधिक अंक आपल्या जीवनांत उतरविता येईल तितका उतरविला पाहिजे.

या पुस्तकांतील महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे श्री. तुकोबारायांची कुळी शूद्र अथवा गोसावी (गोसावी हा शब्द साधुवृत्तीवाचक असा तुकोबांना वा त्यांच्या वंशजाना वापरतात. जातीवाचक रीतीनें नव्हें) नसून मराठा क्षत्रियांची होती व त्या दृष्टीनें मोरे घराण्याचे निरनिराळ्या प्रसिद्ध घराण्याशी संबंध झाले होते त्यांची माहिती लेखकानें उत्तम दिली आहे. महाराजांची मातृभक्ति व जिजाबाईंची पतिभक्ति यांचें चित्र लेखकानें मोठ्या सहृदयतेनें रंगविलें आहे. "महाराजांच्या भाकरीशी तिनें आपल्या जीविताचें सर्वस्व बांधले होते." हें त्या माऊलीचें वर्णन किती सत्य व हृदयस्पर्शी आहे लेखकानें या व तुकोबारायाची तपश्चर्या व कार्य या प्रकरणांत जेवढी कळकळ व्यक्त केली आहे तितकाच निर्भीडपणा कै. पांगारकर, राजवाडे, भावे यांची एकांगी विचारसरणी कशी दोषास्पद आहे हें सांगतांना प्रगट केला आहे. शेवटच्या प्रकरणांत रामदास व श्री. तुकोबा यांच्या शिकवणुकीची तुलना करून तुकोबाचा दृष्टीकोन स्वामीच्या दृष्टीकोनाहून कसा विशाल होता हें विशद केलें आहे.

पंढरपूर }
८–५–५४ }

भा. पं. बहिरट एम्. ए.
(वारकरी व भागवतधर्माच्या ग्रंथांचे अभ्यासू)

★

सर्व महाराष्ट्रीयांस परिचित वाटणाऱ्या तुकारामचरित्रांतील विवाद्य घटनांवर या पुस्तकानें चांगलाच प्रकाश पाडला आहे. प्रत्येक सुबुद्ध महाराष्ट्रीयानें या पुस्तकाचें परिशीलन केलें पाहिजे. श्री. कवडे यांच्या श्रमांचे महाराष्ट्र कौतुक केल्यावाचून राहणार नाहीं असा विश्वास वाटतो.

लोणावळें }
२८-५-५४ }

रघुनाथशास्त्री कोकजे.
(धर्म निर्णय मंडळ, लोणावळे)

★

हरिभक्तपरायणापासून तो आधुनिक सुशिक्षितापर्यंत सर्वप्रकारच्या लेखकांनीं संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांचीं चरित्रें लिहिली आहेत पण त्यांच्या मनाची बैठक चरित्रकारांची नसून पुराणकारांचीच असल्यामुळें

त्यांनीं महाराजांच्या जीवनांतील घटनांच्या सत्यासत्याविषयी संशोधन करून महाराजांचें विशुद्ध जीवन-चरित्र जनतेसमोर मांडण्याऐवजी रूढ प्रवाहांत मिळून चालत आलेल्या दंतकथा वा काल्पनिक अवास्तव घटनांना महत्त्व देऊन भोळ्याभावड्या बहुजन समाजापुढें महाराजांचें अद्‌भूतरम्य चरित्र ठेवलें आहे. किंबहुना स्वतःला वरिष्ठ समजणाऱ्या वर्गानें संशोधनाच्या गोंडस नांवाखाली महाराजांच्या जीवनांतील सत्य घटना, त्यांचीं मतें व तत्त्व यांना प्रक्षिप्त अभंगाच्या अतिशयोक्तिपूर्ण अर्थावरणाखाली दडपून ठेवण्याचा पद्धतशीर प्रयत्न करूनच महाराजांचें चरित्र प्रसिद्ध केलें आहे असें म्हणणें विशेष वावगे होणार नाहीं. असें नसतें तर ऐतिहासिक भरपूर पुराव्यानें सिद्ध होणारी महाराजांची 'मराठा' ही जात न सांगता याति 'शुद्र वैश्य केला व्यवसाय' या प्रक्षिप्त अभंगानें त्यांना शूद्र ठरविण्याचा प्रयत्न कां केला गेला असतां? लेखकानें या आरोपाचें सप्रमाण खंडन करून महाराजाची मराठा ही खरी जात प्रकाशांत आणली. लेखकाचा प्रयत्न बहुमोलाचा आहे.

संतसेवक कवडे यांच्या या बहुमोल प्रयत्नाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतों.

महाल नागपूर<br>मे १९५४

**डॉ. इंदुभूषण भिंगारे,**<br>( तुकाराममहाराजांचे एकनिष्ठ भक्त)

★

श्री संत ज्ञानेश्वर, नामदेवमहाराज, एकनाथ महाराज व संतश्रेष्ठ तुकाराममहाराज आदि संतांनीं त्या त्या काळांत ढोंगबाजीला मोठाच धक्का दिला लोकांस सन्मार्ग दाखविला. नैतिक धडे दिले. आजहि अशा श्रेष्ठतम वाङमय प्रसाराची व प्रचाराची अत्यंत गरज होय. सदर पुस्तक या दृष्टीनें अत्यंत उपयोगाचें आहे. शिक्षणसंस्था आणि समाजसुधारक यांनीं या पुस्तकास जरूर आश्रय द्यावा. महाराष्ट्रांत वारकरी सांप्रदाय ही एक विशाल चळवळ आहे. अनेक संत महंतबुवा महाराज या सांप्रदायाचे प्रचारक आहेत. त्यांनीं संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांची सत्य शिकवणूक लोकांना शिकवावी ती सोडून इतर सटरफटर वक्तव्याने कोणाचें कोणतेंच हित साधणार नाहीं.

असो शेवटी श्री. कवडे यांनीं एका अत्यंत उपयुक्त अवश्य अशा पुस्तकाची मराठी वाङमयांत बहुमोल भर घातली. याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

धुळें
मे १९५४

डॉ. पां. रा घोगरे
(अध्यक्ष प. ला. सेवक संघ धुळें)

★

संतसेवक कवडे यांनीं लिहिलेलें चरित्र अत्यंत काळजीपूर्वक वाचलें.

संसारांतील प्राप्त गोष्टी कर्तव्य या दृष्टीनें करणें हें भागवतधर्माचें आद्य तत्त्व आहे. संसारी जीवनांतील पहिलें व प्रमुख तत्त्व मातापित्यांची सेवा करणें व या सेवेंतच खरी ईश-सेवा आहे. हें भक्त पुंडलिकांनीं स्वतःच्या उदाहरणानें स्पष्ट केलें ती परंपरा सर्वच भागवतधर्मीय संतांनीं समाजाच्या गळी उतरविण्याचे प्रयत्न स्वकृतीनें केलें. संत तुकाराम महाराज हे मातृपितृभक्तींतूनच परमेश्वरी साक्षात्काराचे धनी झाले हें लेखकानें स्पष्ट लिहिलें. आईबापांच्या सेवेंतच खरी परमेश्वरी सेवा आहे हें लेखकानें वाचकांच्या गळी उतरविण्याचें केलें. तुकाराम महाराज यांचें चरित्र संशोधन दृष्टीनें पुढें आणलें याबद्दल श्री. कवडे यांचें अभिनन्दन करतों.

नाशिक
मे १९५४

बापूजी रामचंद्र शिंदे उर्फ रामकृष्णहरी
( अभिनव पुंडलीक )

# आगावू प्रति घेणारे धार्मिक बंधू आणि भगिनी

| प्रति | नांवे |
|---|---|
| ५०० | श्रीसंत गाडगेमहाराज यांचें कीर्तनांतील भजनीमंडळ. |
| २५० | श्रीमान विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील व्हॉईस चेअरमन लोणी सहकारी शुगर फॅक्टरी मु. लोणी जि. नगर. |
| २०० | श्रीमंत डी. आर. वनवटे उर्फ दादासाहेब वनवटे, शिवराज लिथो वर्क्सचे मालक नामपूर. |
| १५० | श्री. वामनराव गोविंदराव पाटील, डायरेक्टर बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक मुंबई, साकोरा (नासिक). |
| १२५ | श्री. दगाजी अजबा पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर सेल पर्चेस सोसायटी सटाणा (नासिक). |
| १०० | श्री. शिवराम वेडूजी पाटील, प्रेसिडेंट डि. लोकल बोर्ड नासिक, नायडोंगरी जि. नासिक. |
| १०० | श्री. काशिनाथ नानाजी पाटील, प्रेसिडेंट ता. डे. अग्रि. असोशियन नांदगांव रा. जातेगांव जि. नासिक. |
| १०० | श्री. लक्ष्मणराव देवराम पाटील, मुखेड ता. येवला जि. नासिक. |
| १०० | श्री. शेषराव जाधवराव, म्यु. प्रेसिडेंट वर्धा (नागपूर) |
| १०० | श्री. डॉ. इंदूभूषण भिगारे, महाल (नागपूर). |
| १०० | श्री. शंकरराव बळवंतराव घाडगे, मोरजाग मिलचे असिस्टंट विव्हिंग मास्तर मुंबई, रा. देगांव जि. सातारा, |
| ७५ | श्री. रामचंद्रराव माधवराव पवार, रा. परवाडी (नासिक). |
| ५० | श्री. सर्जेराव रामचंद्रराव मोकासे इनामदार, जामदरी जि. नासिक. |
| ५० | श्री. काशिनाथराव यशवंतराव मोरे, ग्रँड सर्कसचे मालक, रा. वडगांव ता. संगमनेर जि. नगर. |
| ५० | श्री. गणपतराव पांडुरंगराव शेडगे, समाधान गेस्ट हाऊसचे मालक पुणें. |
| ५० | श्री. भाऊसाहेब लालमण पाटील, रा. पिंपरखेड जि. नासिक. |
| ४१ | श्री. शालिग्राम बळवंत राऊत, शिवाजी पार्क दादर मुंबई. |
| ४० | श्री. माणकचंद खिवराज ललवाणी नगरशेठ, मनमाड जि. नासिक. |

४० श्री. तुंकाराममहाराजांचें एक भक्त, इचलकरंजी जि. कोल्हापूर.
४० श्री. जगन्नाथ कोंडाजी आणि वावरे बंधु प्रसिद्ध कोंडाजी चिवड्याचे व्यापारी नासिक,
३५ श्री. भाऊसाहेब संतराम पाटील,अडत व्यापारी शाहूपुरी कोल्हापूर.

★

३० सौ. हेमलताबाई कृष्णराव सावंत, कोल्हापूर.
२५ सौ. गजराबाई भ्र. एकनाथ जगताप, रा. कणकुरी जि. नासिक.
२० सौ. विमलाबाई राजाराम पाटील, नासिक.
२० सौ. सिताबाई नानासाहेब शेट, सिन्नर जि. नासिक.
२० सौ. शेवंताबाई पुंजारामशेट तेली, रा. सिन्नर जि. नासिक.
२० सौ. निर्मलाबाई विनायकराव देवरे, रा. कळमदरी जि. नासिक.
१५ डॉ. सौ. शकुंतलाबाई गणपतराव भोंसले, वरळी मुंबई..
१५ सौ. निर्मलाबाई मनसुखलालशेट, नासिक.
१० डॉ. सौ. सुभद्राबाई पटेल, येवला जि. नासिक.
१० सौ. नर्मदाबाई पवार, नांदगांव जि. नासिक.

★

३० { दिगंबरराव वेडूजी पाटील पगार, नथूराव दोधाजी पाटील पगार, } रा. कळमदरी जि.नासिक.
३० श्री. शंकरराव रामचंद्र लोंढे, सेक्रे. शिवाजी ए. सो. उमरावती (नागपूर)
२५ श्री. कचरदास रमणलाल, लँडलॉर्ड शहागंज औरंगाबाद.
२५ श्री. बाबूराव किसनराव कडू पाटील, चेअरमन सेल प. सो. कोपरगांव जि. नगर.
२५ श्री. रावसाहेब काशिनाथ नारायण धनवटे, चेअरमन म. प. सोसायटी पुणतांबे जि. नगर.
२५ श्री. बाळासाहेब दादासाहेब आढाव, सर्व्हंट को. सो. कोपरगांव जि. नगर.
२५ श्री. आर. डी. शिंदे पेन्शनर डिस्ट्रिक्ट जज्ज नाशिक.
२५ श्री.. वामनराव घोरपडे B. A. LL. B. वर्धा (नागपूर).
२५ श्री. अच्युतराव गुलाबराव देशमुख रा. सिरसो ता. मुर्तीजापूर (नागपूर).

२५ श्री. यशवंतराव रामजी पाटील रा. पिंपळद ता. चांदवड (नाशिक).
२५ श्री. नरहरराव कारभारी पाटील रा. काजी सांगवी ता. चांदवड (नाशिक).
२५ श्री. विठ्ठलराव गोविंदराव देशमुख धंदरसूल ता. येवला (नाशिक).
२५ श्री. शिवाजीराव रामराव वावळे रा. पिंपरी ता. श्रीगोंदा (नगर).
२५ श्री. नारायणदास लाहोटी,लाहोटी मिलचे मालक भिवंडी (ठाणा).
२५ श्री. नारायणराव लहानूराव कवत पाटील रा. ठाणगांव ता. येवला (नाशिक).
२५ श्री. शंकरराव बाळाजी गाडे पाटील रा. मायेगांवदेवी ता. कोपरगांव (नगर).
२५ श्री. ज्ञानोबा जाधवराव शिवाजीनगर जाधव निवास (पुणें).
२५ श्री. के. सी. तिवारी ॲन्ड सन्स चक्रपाणी विडीचे मालक नाशिक.
२५ श्री. केवळराव राघोजी पाटील हिरे निंबगांव (नाशिक).
२५ श्री. किसनराव गणपतराव देशमुख आंभोरकर संगमनेर जि. नगर.
२० श्री. विनायकराव पिलाजीराव राऊत विलेपार्ले (मुंबई).
२० श्री. श्रीरामजी दुर्गाप्रसाद शेठ तुमसर (नागपूर).
२० श्री. नारायणदास सोहनलाल शेठ गुळाचे व्यापारी येवला जि. नाशिक
२० श्री. रावबहादूर डॉ. डी. आर. धनवडे कोल्हापूर.
२० श्री. मेजर दादासाहेब निंबाळकर कोल्हापूर.
२० श्री. नारायण नामदेव आणि कंपनी नाशिक.
२० श्री. निवृत्ती त्र्यंबकराव वझरें नाशिक.
२० श्री. गणपत दगडू कोशीरे पंचवटी नाशिक.
२० श्री. नामदेव पुंजा पाटील रा. जळगांव ता. निफाड (नाशिक).
२० श्री. खंडेराव महादेव देशमाने पिंपळगांव बसवंत (नाशिक).
२० श्री. मेसर्स फकीरराव येसाजी पाटील साडी आडत दुकान मालेगांव (नाशिक).
२० श्री. गोविंदराव त्र्यंबकराव पाटील शिंदे येवला जि. नाशिक.
१५ श्री. डॉ. गणपतराव एम्. भोसले वरळी नं. ८ (मुंबई).

१५ श्री. गणेशरामजी फत्तेचंद शेठ मोर तुमसर (नागपूर).
१५ श्री. लक्ष्मण ब्रह्मदेव नवले शेट नाशिक.
१० श्री. आमदार जगन्नाथराव शंकरराव पाटील बारहाते पुणतांबे (नगर).
१० श्री. सूर्यभान कृष्णाजी महाले कोपरगांव जि. नगर.
१० श्री. सखाराम बाळाजी आढाव कोपरगांव जि. नगर.
१० श्री. भास्करराव सखारामजी पाटील रा. कोठूरे ता. निफाड (नाशिक).
१० श्री. अमृतलाल पी. त्रिवेदी बालाघाट (नागपूर).
१० श्री. रामकृष्णराव तुकारामजी तिडके मूर्तीजापूर (नागपूर).
१० श्री. एकनाथ तुकाराम सोनवणे उर्फ नाथू शेठ अंदरसूल ता. येवला (नाशिक).
१० श्री. पी. एम्. रावळ नाशिक.
१० श्री. दत्तात्रेय आबाजी टिळे नाशिक.
१० श्री. राणोजी दगडू शिंदे रा. ओझर (नाशिक)
१० श्री. भिला दाजी पाटील रा. मानूर ता. कळवण जि. नाशिक.
१० श्री. पर्वतराव भगवंतराव राजे दिंडोरी जि, नाशिक.
१० श्री. दत्तात्रेय महादेव केदार कातरगांव ता. निंफाड (नाशिक).
१० श्री. काशिनाथ दगडूलाल ऑईलमिल मालेगांव (नाशिक).
१० श्री. सहादू रामजी गायकवाड टिंबर मर्चंट मालेगांव (नाशिक).
१० श्री. मोतीलाल गिरधारलाल लोढा मालेगांव (नाशिक).
५ श्री. सरदार गुर्जर नागपूर.
५ श्री. आमदार वामनराव राणे. जे. पी. वरळी (मुंबई).
५ श्री. पर्वतराव श्रीपतराव जपे पाटील बोलकी जि. नगर.
५ श्री. व्ही. जी. चव्हाण कोल्हापूर.
५ श्री. तुकाराम आपाजी खैरे पाटील गणेशवाडी (नाशिक).
५ श्री. यशवंत नाना पाटील म्हसरूळ (नाशिक).
५ श्री. देवराम बाळाजी पाटील पाथर्डी (नाशिक).
४ श्री. डी. एन्. राणे दादर (मुंबई).

++++++++++++

# अनुक्रमणिका


| क्र. | विषय | पान |
|---|---|---|
| १ | पूर्वज आणि जन्म | १ |
| २ | तुकाराम महाराजांची जात | १६ |
| ३ | संसार आणि वैराग्य | २९ |
| ४ | भक्ति | ४१ |
| ५ | तपश्चर्येचें फळ | ५७ |
| ६ | महाराष्ट्रीय संत | ७८ |
| ७ | तुकाराम महाराजांचे अवतार कार्य | १०४ |
| ८ | संतांचें कार्य | ११८ |
| ९ | शेवट | १३४ |
| १० | अभंग प्रकाशन | १५० |
| ११ | श्री समर्थ रामदास आणि वारकरी संत | १६१ |


☆

---

# शुद्धि-पत्र

| पान | ओळ | चूक | बरोबर |
|---|---|---|---|
| ३७ | ११ | शके १८५१-५२ | १५५१-५२ |
| ७५ | १९ | तीन | तीस |

★

निष्काम् कर्मयोगी संत गाडगेमहाराज ऊर्फ गोधडेमहाराज



महाराष्ट्रांतील आधुनिक तुकाराम.

—लेखक.

(राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. वि: चरित्र
क्रमांक ...२५८१... नों० क्र० ८१६५५

# संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज यांचें चरित्र

८२१६

## पूर्वज आणि जन्म

श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचें नांव, त्यांची हरिभक्ति व त्यांचें श्रेष्ठ दर्जाचें साधुत्व ही मराठी भाषा समजणाऱ्या प्रत्येक स्त्री पुरुषांस माहीत आहेत. हिंदुस्तानांतील कोणत्याही प्रांतांतील धार्मिक बाबतींत लक्ष पुरविणाऱ्यांनाही ह्या थोर महात्म्याचें नांव व कीर्ति माहीत आहे. इतकेंच नव्हें तर साती समुद्रापलीकडे परधर्मीय विद्वान व भाविक अशा अनेकांनीं यांची भक्तिरसधारा पृथ्वीच्या पाठीवर अनेक खंडांत नेली व ती स्वभाषेंत प्रसिद्ध केली. तिचा लाभ स्वप्रांतांतील अनेक धार्मिकांस दिला. असे प्रयत्न हल्लीं होत असून पुढेंही निश्चित होत राहणार. अशा ह्या महान् श्रेष्ठ संताच्या घराण्यांतील मूळ पुरुष विश्वंभरराव मोरे आहेत हें उपलब्ध इतिहासावरून स्पष्ट झालें आहे.

### जावळीचे मोरे

सातारा जिल्ह्यांतील जावळी येथें मोरे घराणें आहे. हें तेथें पुरातन काळापासून नांदत आहे. विश्वंभररावाच्या काळीं महाराष्ट्रांतील मराठा सरदारांत या घराण्यास बरेंच महत्त्व होतें. परंतु कौरवपांडव यांच्यापासून

चालत आलेली क्षत्रियांतील उघडी भाऊबंदकी यांच्या घराण्यांतहि जन्मास आली व ती दिवसेंदिवस वाढूं लागली. त्यामुळें अनेक अनिष्ट प्रकार होऊं लागले. घराण्याच्या लौकिकास कमीपणा येऊं लागला. या एकंदर गोष्टीमुळें विश्वंभरराव मोरे यांचें मन उदास झालें, त्यांनीं घराण्याच्या एकंदर लौकिकाचा विचार केला. त्यासाठीं त्यांनीं वतनवाडीचा, घरादाराचा व भाऊबंदांचा त्याग करण्याचें निश्चयपूर्वक ठरवून जावळी सोडली व पुणें शहरापासून दहा कोसावर असलेल्या देहू गांवीं आले, व तेथेंच कायमचे स्थायिक झाले.

'कर्तबगारास कोठेंही वाव असतो' या म्हणीप्रमाणें विश्वंभरराव मोरे यांनीं थोडेंच दिवसांत देहू गांवची महाजनकी मिळविली. शेतीवाडी संपादन केली, चांगल्या प्रकारें संसार थाटला व घराण्याच्या मूळ वैभवास साजेल अशा प्रकारें या भागांत लौकिक मिळविला, परंतु या सर्व गोष्टीमुळें त्यांच्या मनास समाधान मिळेना. आपण हल्लीं जें करीत आहों त्यांत आपलें खरें हित आहे असें त्यांचें मन त्यांना ग्वाही देईना, मनास शांती मिळेना. संसाराबद्दल उदासीनता वाढूं लागली. केवळ भाऊबंदकीच्या भांडणासाठींच त्यांनीं वतनाच्या गांवाचा त्याग केला होता. तो भित्रेपणामुळें नाहीं, तर त्यांच्या ठिकाणीं उपजत न्याय, नीति, शांतता, धार्मिक भावना वगैरे चांगले गुण होते. त्यामुळें ते जावळीचें वडिलोपार्जित सर्वस्व सोडून परागंदा झाले होते. संसारसुखापेक्षां परमार्थाकडे त्यांच्या मनाचा कल दिसूं लागला व दिवसेंदिवस तो वाढूं लागला.

## पंढरपूरचा भागवत धर्म

महाराष्ट्रांतील भागवतधर्माचे आद्य संस्थापक श्रीनामदेव महाराज यांनीं समताधर्माची पंढरपूर येथें प्रथम आरोळी ठोकली. त्यांच्या हांकेस श्रीचोखोबा महाराज यांनीं पहिली ओ दिली. कारण ते नामदेव महाराज यांचे एकनिष्ठ भक्त होते. या उभयतांनीं भागवत धर्माच्या समानतेची व मानव धर्माची पताका पंढरपूर येथें फडकाविली. त्यांनीं नामस्मरणास सर्वस्वी महत्त्व दिलें व परमेश्वर भक्तीचें सोपें साधन समाजास दाखविलें. त्यामुळें सारा महाराष्ट्र जागा झाला. महाराष्ट्रांतील सर्व दर्जाचे लोक पंढरपुराकडे धांवूं लागले. याच सुमारास श्रीसांवता माळी श्रीगोरोबा

कुंभार, श्रीनरहरी सोनार, श्री बंका महार, श्रीसंत जनाबाई व संत भागूबाई महारीण वगैरे संतांनीं आपल्या अभंगवाणीनें समता धर्माची जोमानें वाढ केली. ती सर्व जातीच्या, धर्माच्या व पंथांच्या लोकांच्या तात्काळ पचनी पडली. कारण संत मंडळींचे सारे प्रयत्न अखिल मनुष्य जातींच्या धार्मिक कल्याणासाठीं होते. कर्मठांचे हव्यकव्य, जपजाप्य, समाजांतील नकली उच्चनीचता व संस्कृत भाषेंतील पक्षपाती धर्माज्ञा या एकंदर साडेसातींतून समाज सुटूं लागला. धार्मिक स्वास्थ्य व परमेश्वरप्राप्ती यांचा राजरस्ता संतांनीं सर्वांसाठीं मोकळा केला. त्यामुळें पंढरपूर हें भागवतधर्माचें पीठ बनलें. तें भागवत धर्मीयांचे सर्वश्रेष्ठ तीर्थ ठरलें.

## श्री ज्ञानेश्वर महाराज

याच सुमारास ज्ञानेश्वरमहाराज यांनीं कर्मठांविरुद्ध उघड बंड पुकारलें. त्यांनीं संस्कृतरूपी किल्ल्यांत अडकून पडलेलें वेदांतशास्त्र बाहेर आणण्याचे प्रयत्न केले. त्या शास्त्रांतील ज्ञान, ज्ञानेश्वरीच्या रूपानें मराठी भाषेंत सर्वांसाठीं उघडें केलें. ज्ञानेश्वरी ग्रंथ हा वेदांत शास्त्रांतील मराठी भाषारूपी पात्रांतील नंदादीप आहे. हा नंदादीप वाढत्या तेजानें निरंतर तळपून जनहितासाठीं सुरक्षित कसा राहील अशी ज्ञानेश्वर महाराजांस काळजी वाटूं लागली. नामदेव महाराजादि संतांनीं स्थापन केलेल्या पंढरपूर पीठाकडे महाराष्ट्रांतील जनता दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत ओढली जात आहे, हें पाहून ज्ञानेश्वर महाराजांस अत्यानंद झाला. ते आपल्या भावंडांसह ज्ञानेश्वरी ग्रंथ घेऊन पंढरपुरास गेले. तेथील संतांचें एकंदर कार्य पाहिलें. त्यांना आपल्या ज्ञानेश्वरीरूपी नंदादीप वाढत्या तेजानें या क्षेत्रांत निरंतर तेवत राहील असा आत्मविश्वास आला. त्यांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या रूपानें संतांच्या कार्यास मोठें सहाय्य केलें. भागवत धर्मप्रसाराची लाट महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत म्हणजे खेडोंपाडीं जाऊन आदळली. त्यामुळें लहानमोठ्या गांवांतून हजारोंनीं लोक पंढरपूरक्षेत्रीं येऊं लागले.

त्या काळीं महाराष्ट्र धार्मिक बाबतींत सारखा होरपळत होता. कारण कर्मठांची धार्मिक बाबतींत भयंकर कठोरता व वर्णाश्रम धर्माची करडी कृत्रिमता अशा कात्रींत बहुजन समाज सांपडला होता. कर्मठांनीं जपजाप्य, होमहवन व्रतवैकल्य, व संस्कृत ग्रंथाचें नसतें महत्त्व यांचें भयंकर स्तोम

माजवून एकंदर समाजास धार्मिक बाबतींत चोहोंकडून अगदीं पक्के जखडून टाकलें होतें, इतकेंच नाहीं तर धार्मिक बाबतींत याशिवाय दुसरा कोणताहि मार्ग नाहीं असें धर्माज्ञेच्या नांवाखालीं अट्टाहासानें सांगत होते.

अशा वेळीं नामदेवमहाराजादि सर्व संतांनीं धार्मिक स्वास्थ्य अगदीं सोप्या भाषेंत अभंगाद्वारें मिळवून देण्याचें धाडस केलें व त्यांत नामस्मरणास सर्वस्वी महत्त्व दिलें.

व्रत तप दान पूजन । न लगे साधन नाम म्हणतां ॥

× × ×

ब्राह्मण व शूद्र वैश्य नारीनर । सर्वांसी आधार नाम सत्य ॥

× × ×

नामापरता मंत्र नाहीं त्रिभुवनी । ऐसी बोले वाणी वेदशास्त्री

× × ×

नामाचा महिमा नेणेचि पैं ब्रह्मा । म्हणोनिया कर्मा अनुसरला ॥१॥ नाम हेंचि कर्म नाम हेंचि धर्म । केशव हेंची वर्म सांगितलें ॥२॥ नाम शुद्ध स्नान नाम शुद्ध संध्या नामाविणे वेद आणिक नाहीं ॥३॥ करितां आचमन केशव नारायण । करितां उच्चारण आधीं हेंचि ॥४॥ लग्नाचिये काळीं म्हणाति सावधान । लक्ष्मीनारायण चिंतन करा ॥५॥ देहाचिये अंतीं प्रायश्चित देती । शेवटीं वदती रामनाम ॥६॥ नामें होय गति नामें होय मुक्ति । नामयाचे चितीं रामनाम ॥७॥

× × ×

नाम हें सोपें जपतां विठ्ठल । अव्यंचि फळ हातीं लागे ॥१॥
योग याग जप तप अनुष्ठान । तीर्थ व्रत दान नाम जपतां ॥२॥
सुखाचें सुख नाहीं यातायाती । बैसोनी एकांतीं नाम स्मरा ॥३॥

चोखा म्हणे येणें साधेल साधन । तुटेल बंधन भवपाश ॥४॥

× × ×

माझें माझें म्हणुनि गुंतले हांवभरीं । वायां या संसारी मृगजळीं ॥१॥
आपुली आपण करा सोडवण । संसारबंधन तोडा वेगीं ॥२॥
निजनाम नौका विठ्ठल हें तारूं । भवाचा सागरू उतरील ॥३॥
हाचि पै विश्वास धरावा अंतरीं । म्हणतसे म्हारी चोखयाची ॥४॥

[ संत चोखोबाचें कुटुंब ]

जप तप कर्म क्रियाधर्म साधन । वारुणें बंधन उपाधीचें ॥१॥
येणें काय घडे साधन सर्वथा । वाउगाची शीण व्यर्थ आहे ॥२॥
सांवता म्हणे सार कंठीं धरा नाम । नको दुजा नेम वाऊगाची ॥३॥

× × ×

नलगे योग तप । करणें साटोप आम्हासी ॥१॥
सोपें साधन आमुचें । नाम गाऊं विठोबाचें ॥२॥

(संतसेना महाराज)

× × ×

नामाचें चिंतन श्रेष्ठ पै साधन । जातील जळोनी महापापें ॥
बैसुनि निवांत करा एक चित्त । आवडी गावें गीत विठोबाचें ॥
सकळाहुनि सोपें हेंचि पै साधन । सेना म्हणे आण विठोबाची ॥

× × ×

नामें दोष जळती । नामें पापी उद्धरती ॥१॥
हें आलें अनुभवा । सत्य जीवा प्रत्यया ॥२॥
नामें अपार तारिलें । नामें जीव मुक्त केले ॥३॥
कान्हो पात्रा नाम घेतां पायीं जडली तत्वता ॥४॥

× × ×

नाम फुकाचें फुकाचें । देवा पंढरीरायाचें ॥१॥
नाम अमृत हें सार । हृदयीं जपा निरंतर ॥२॥
नाम संतांचें माहेरें । प्रेमसुखाचें आगर ॥३॥
नाम सर्वांमध्यें सार । नरहरी जपे निरंतर ॥४॥

× × ×

मुक्तामुक्त दोन्ही नाइकतो कर्णीं । हरिनामपर्वणी सर्वकाळ ॥
नाहीं काळ तेथें आम्हां वेळ कैची । हरिनामछंदाची गोडी थोरी ॥
मुक्तपणें मुक्त मुक्ताई पैं रत हरिनाम स्मरत सर्वकाळ ॥

× × ×

ज्याचे मुखीं हरि तोचि धन्य ये जगीं । तरला पैं वेगीं विठ्ठल नामें॥

( श्रीसंत सोपानदेव )

त्या काळीं शास्त्रीपंडीत समाजास कंठरवानें सांगत. 'संस्कृत विद्येचा उच्चार करण्याचा अधिकार फक्त ब्राम्हणास ! त्यांतील हव्य-कव्यें इतरांस करतां येणार नाहींत. धार्मिक बाबतींत सर्वांस अधिकार नाहीं.' अशा परिस्थितीमुळें संतांनीं धर्मस्वातंत्र्यासाठीं उघड बंड केलें. त्यांनीं पंढरपूरचा भागवत धर्म हा परमेश्वरी नामाच्या साधनावर स्थापन केला असें म्हणण्याचें धाडस केलें तर तें अतिशयोक्ति ठरणार नाहीं.

## वारी

संत मंडळींनीं नामस्मरणाचें महत्त्व सांगतांना पंढरपूराकडे समाजास आणण्याचें विशेष प्रयत्न केले.

ऐसे तीर्थ कोणी दाखवा सुलभ । जेथें समारंभ हरिकथेची ॥
ऐसे तीर्थ कोणी दाखवा निर्मळ । जेथें नासे मळ दुष्ट बुद्धि ॥
नामा म्हणे संतजनांचें माहेर । गातां मनोहर गोड वाटे ॥

पुणें प्रांतांतील लोकांबरोबर विश्वंभरराव मोरे हे पंढरपुरास गेले. तेथील नाममहात्म्य व धार्मिक समता पाहून त्यांचें समाधान झालें. सर्व

जातीच्या व पंथांच्या भाविकांस प्रत्यक्ष पायास स्पर्श करून दर्शन देणारा भक्तवत्सला श्री विठ्ठल पाहिला. दर्शन घेतलें महान् आनंद झाला. त्यांच्या ठिकाणची धार्मिक भावना उचंबळली. ते देहभानरहित अशा स्थितींत तेथें उभें राहिले. परत निघतांना मूर्तीच्या दर्शनाचा मोह त्यांना आवरेना. त्यांनीं प्रतिज्ञा केली, मी नियमानें वारी करीन. ते भक्तिमार्गास लागले. त्यांचा स्वभाव निश्चयी व करारी होता. देहाबद्दलचे नसतें महत्त्व त्यांच्या ठिकाणीं मुळींच नव्हतें. कारण ते शूरांचे वारसदार होते. त्यांच्या अनेक पूर्वजांनीं रणांगण पाहिलें होतें युद्ध म्हणजे त्यांना खेळ होता. विश्वंभर-रावांनींहि अनेक प्रसंगीं रणांगण तुडविलें होतें. त्यामुळें आयुष्याची किंमत ते ओळखून होते. ते शूर वीराप्रमाणें जिवावर उदार झाले, व त्यांनीं निश्चयपूर्वक भक्तिमार्ग धरला त्यांची भक्ति म्हणजे कठीण अशी तप-श्चर्याच होती.

विश्वंभरावांनीं संसारांतून मन काढलें ते रात्रंदिवस आपला सर्व वेळ भजनांत घालवूं लागले, पढपूरच्या त्यांनीं अनेक वाऱ्या केल्या. दिवसें-दिवस त्यांचें आयुष्य कमी होऊं लागलें परंतु त्यांची भक्ति मात्र वाढत्या मार्गानें जाऊं लागली. वयोमानामुळें त्यांना पंढरीच्या वारीस जाणें त्रासदायक होऊं लागलें, परंतु वाटेल ते हाल व कष्ट सहन करून प्रसंगीं प्राणाचीहि पर्वा न करतां ते वारीस जात.

### नाममहिमा

तो मी वैकुंठीं नसे । वेळु एक भानुबिंबींही न दिसे । वरी योगियांचींही मानसें । उमरडोनि जाय ।। ७ ।। परी तयांपाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोषु बरवा । करिती माझा ।। २०८ । ज्ञानेश्वरी अ० ९ ।।

विश्वंभरबावा थकले. त्यांना वारीस जाणें अशक्य झालें. त्यामुळें ते सारखे तळमळूं लागले केवळ पांडुरंगाच्या दर्शनासाठींच ते जगत होते. ही त्यांची श्रद्धा भक्तवत्सलाच्या ध्यानीं आली. देवानें त्यांचा भाव जाणला. तो देहानें देहू या गांवीं आहे परंतु मनानें माझ्याजवळ आहे. तरी त्याच्या

भक्तीसाठीं मी त्याच्याजवळ गेले पाहिजे. म्हणून श्रीविठ्ठलानें विश्वंभरबावास प्रत्यक्ष दृष्टांत दिला. 'मी तुझ्या भक्तीसाठीं देहूस आलों. आंबेवनांतील विठ्ठल ठिके या शेतांत आहे.' बोवांनीं आपलें स्वप्न गांवांतील लोकांस सांगितलें. सबंध देहू गांवास आनंद झाला. बोवांच्या भक्तीमुळें गांवांतील एकूणएक त्यांच्याकडे आदरानें पाहात होते. टाळ मृदंगाच्या जयघोषांत गांवांतील लहानथोर स्त्रीपुरुष आंबेवनांत गेले. तेथें भगवंतानें आपल्या आगमनाची खूण म्हणून तुलसी व बुक्का उधळला होता. 'याच ठिकाणीं माझा दीनदयाळ आहे.' असे बोवांनीं सर्वांस सांगितलें. बरोबरच्या मंडळीसह त्यांनीं त्या ठिकाणीं खोदण्यास सुरुवात केली. थोड्यांच वेळांत श्रीविठ्ठलरुक्मिणीच्या मूर्ति सांपडल्या! त्या स्वयंभू दिसत. तें पाहून सर्वांस महान् आश्चर्य वाटलें. बोवांच्या भक्तीबाबत सर्वांना जास्त विश्वास वाटूं लागला. त्या मूर्ति वाजतगाजत देहू गांवांत आणल्या. विश्वंभरबोवांनीं त्यांची स्थापना स्वतःच्या घरांत केली. हल्लीं देहू येथील देवळांत त्याच मूर्ति आहेत.

## श्रीक्षेत्र देहू

श्रीविठ्ठलानें विश्वंभरबोवांच्या भक्तीसाठीं श्रीक्षेत्र पंढरपूरचा त्याग केला. तो देहू गांवीं आला. ही बातमी वाऱ्यावर स्वार झाली. तिनें सबंध पुणें प्रांत व्यापला. त्यामुळें श्रीपांडुरंगाच्या दर्शनासाठीं व महान् भक्त विश्वंभर बोवा मोरे यांना पाहाण्यासाठीं हजारों लोक येऊं लागले. देहू ह्या गांवास क्षेत्राप्रमाणें लोक मानूं लागले, त्या वेळेपासून देहू हें महाराष्ट्रांतील महत्त्वाचें क्षेत्र गणलें जात आहे.

## स्वर्गवास

श्रीविठ्ठल माझ्या भक्तीसाठीं देहूस आला. या विचारानें ते स्वतःस धन्य समजत. जन्माचें सार्थक झालें, वतनवाडीचा त्याग केला. परंतु परमेश्वर दर्शनाचा लाभ झाला वगैरे विचार ते कुटुंब अमाबाईस सांगत. त्यामुळें तिचा आनंद गगनांत मावेनासा होई. ती पतीबरोबर रात्रंदिवस राहून त्या मूर्तीचे भजनपूजन करीत असे. शरीरधर्माप्रमाणें विश्वंभरबोवा दिवसेंदिवस थकत चालले, शेवटीं त्यांनीं देहत्याग केला. मरणसमयीं त्यांना

हरी व मुकुंदराव असे दोन मुलगे होते श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या मूळ पुरुषानें आपल्या भक्तीच्या जोरावर श्रीविठ्ठलास प्रसन्न केलें व देहू या गांवास क्षेत्राचें महत्त्व प्राप्त करून दिलें. आपल्या पुढील वंशजासाठीं व महाराष्ट्रासाठीं विठ्ठलभक्तीचा मार्ग दाखविला. या बाबीस भागवत धर्माच्या इतिहासांत महत्त्वाचें स्थान देणें अत्यंत जरूर आहे.

## रण मैदानाकडे

विश्वंभरबोवाच्या मृत्यूचें दुःख करीत न बसतां अमाईनें देवघर हें सर्वस्व ठरविलें. ती आपला सर्व वेळ त्या मूर्तीच्या सेवेंत व नामस्मरणांत खर्च करी. तिचे दोघे मुलगे महाजनकीचे हक्क वसूल करून शेतीवाडीकडे लक्ष देत. परंतु त्यांना देहू येथील ठराविक उत्पन्नांत समाधान वाटेना. त्यांच्या ठिकाणचें जन्मजात क्षात्रतेज उसळूं लागलें. त्यासाठीं ते प्रयत्नास लागले. वतनाच्या गांवींहि एक दोन फेऱ्या केल्या. परंतु भाऊबंदकीच्या भांडणाची आग अद्यापपावेतों पाहिजे तशी विझलेली नव्हती. भाऊबंद हे आपल्या लष्करी पेशाकडे विशेष लक्ष देत आहेत. हें पाहून यांनींहि लष्करांत दाखल होण्याचा ठाम निश्चय केला. त्यांनीं आपला हेतु आईस सांगितला. आईनेंहि मोठ्या आनंदानें त्या उभयतांस लष्करांत जाण्यास संमती दिली. परंतु तिनें त्यांना बजावून सांगितलें कीं, मी जिवंत आहे तोंपर्यंत ह्या मूर्तीचे पाय सोडणार नाहीं. तुम्ही कोठेंहि जा कारण केवळ तुमच्या वडिलाच्या भक्तीसाठीं देवानें पंढरपूर येथून देहूस येणें केलें.

महाराष्ट्रांत फलटण येथील नाईकनिंबाळकर यांचें घराणें अत्यंत जुनें असून इतिहासप्रसिद्ध आहे. नाईकनिंबाळकर व जावळीचे मोरे यांचे पूर्वापार संबंध ! त्यामुळें हरी व मुकुंदराव हे फलटण येथें त्यांच्याकडे गेले. त्यांच्या वशिल्यानें ह्या दोघांहि भावांस दौलताबाद येथें सैन्यांत चांगली नोकरी मिळाली. त्यांनीं आपल्या मर्दुमकीवर व अंगच्या एकंदर हुषारीवर लवकरच नावलौकिक कमावला. सैन्यांत विशेष दर्जाचें स्थान मिळविलें. त्यांनीं आई व कुटुंब यांना आणण्यासाठीं देहूस स्वार पाठविले. अमाईचा नाईलाज झाला, कारण सुनांबरोबर तिला जाणें भागच होतें. ती आपल्या सुनांसह मुलांकडे गेली. जातांना तिनें देवाच्या पूजेची उत्तम व्यवस्था केली होती.

## धारातीर्थी

" अनेक युगांच्या संस्कृतीची ठेव ब्राह्मणवर्गापाशीं आहे आणि त्यांतील भाग आतां त्यानें सामान्य लोकांस दिला पाहिजे. ही ठेव ब्राह्मणवर्ग आतांपर्यंत कृपणपणानें दडपून बसल्यामुळें हिंदुस्थानावर मुसलमानी राज्य होणें शक्य झालें. आज हजारों वर्षें कोणत्याहि जेत्यापुढें आम्हांस मान वाकवावी लागली आहे. याचेंहि कारण हेंच कीं, या ठेवींचा उपयोग सामान्य लोकांस न होतां ही फक्त एकाच वर्गाच्या ताब्यांत आहे."

(स्वामी विवेकानंद स० ग्रं० खंड ५ वा)

हिंदुधर्मांत वर्णाश्रमाची कठोरता, उच्चनीचतेचें फाजील स्तोम, वाढते भेदभाव, स्वधर्मीयाबद्दलची उघडी बेपर्वाई, कर्मठांची राष्ट्रऐक्याबद्दलची घातकी वृत्ति व त्यांतून उत्पन्न झालेली आपसांतील फूट या एकंदर कारणामुळें हिंदुस्थान व हिंदुधर्म यांचे दुर्दैव त्यावेळीं झपाट्यानें वाढीस लागलें होतें. त्याचा पुरेपूर फायदा मुसलमानांनीं घेतला. त्यांनीं सबंध उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत केला. तरी दक्षिण हिंदुस्थान या महत्वाचा गोष्टीकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत होता. कारण देवगिरी येथील अल्लाउद्दीनाच्या स्वारीच्या वेळीं कांहीं ऐतिहासिक घटना घडल्या. त्यांकडे इतिहाससंशोधकांनीं लक्ष दिल्यास त्या कळून येण्यासारख्या आहेत अल्लाउद्दीनास देवगिरीवर स्वारी करणें जें सुलभ झालें त्याला वर सांगितलेली अनेक दुर्दैवीं कारणें सहाय्यकर्ती झालीं. त्यानें देवगिरी उर्फ दौलताबादेवर स्वारी केली. पहिल्याच स्वारीत त्याला आमच्या राष्ट्रघातकी वृत्तीनें साथ दिली. यादवांचें राज्य खिळखिळें केलें. दक्षिणेंतील हिंदु राज्यें व हिंदु संस्कृति यांना पद्धतशीर सुरुंग लावला गेला. सबंध दक्षिणेंतील हिंदूंच्या स्वातंत्र्याची ज्योत मावळण्याच्या पंथास लागली अशा त्या दुर्दैवी प्रसंगाच्या वेळीं हरी व मुकुंदराव हे दौलताबाद येथील हिंदुराजांच्या नोकरींत होते. लवकरच मुबारीक यानें दौलताबादेवर स्वारी केली. त्या प्रसंगीं हे दोघे भाऊ रणांगणावर गेले. या उभयतांनीं व इतर योद्धयांनीं लढण्याची शिकस्त केली. परंतु

विजयश्रीचा कल जणूं ठरलेलाच होता. तिनें शत्रूस माळ घातली. रणांगणावर अनेक योद्धे कामास आले त्यांत हे दोघे भाऊ धारातीर्थी पावन झाले.

## सतीचें वाण

त्या काळीं प्रत्यक्ष रणांगणावर मृत्यु येणें हें महान् भाग्य समजले जाई. नरवीर आपल्या मरणाच्या मोलानें स्वर्गाचीं द्वारें उघडून घेण्याचा दैवी हक्क प्राप्त करून घेत. अशा नरसिंहांचीं प्रेतें रणांगणावर सांपडल्यास त्यांच्या बायका स्वतःस धन्य समजत व त्या प्रेतांबरोबर सती जात. अमाईच्या दोन्ही मुलांचीं प्रेतें रणांगणांत मिळालीं. क्षात्रधर्माप्रमाणें तिच्या दोन्ही सुना सती जाण्यास तयार झाल्या. परंतु परमेश्वरास ह्या थोर भक्तीप्रसारक व महाराष्ट्र उद्धारक घराण्याचा वंशखंड करणें नव्हता म्हणून हरीच्या बायकोस शास्त्राधाराप्रमाणें सती जाण्याचा हक्क मिळाला नाहीं. कारण ती गरोदर आहे असें सासूस कळून आलें होतें.

सतीचें वाण घेण्याचा हक्क कोणास आहे? जे महापुरुष धर्मासाठीं, देशासाठीं व स्वातंत्र्य रक्षणासाठीं आपले प्राण केव्हांही अर्पण करण्यास सदैव तयार असतात; प्रत्यक्ष रणांगणावर मृत्यु येणें हें जें आपलें परम भाग्य समजतात व त्या भाग्याच्या प्राप्तीसाठीं ते सर्वकाळ आपल्या देहावर उदार असतात, अशांच्याच स्त्रिया त्या काळीं सती जात व त्यांनाच तो हक्क आपल्या पतीच्या आत्मयज्ञाचें फळ म्हणून मिळत असे. अमाईनें मुकुंदाच्या त्या वीरपत्नीस सती जाण्यास मोठ्या आनंदानें व अभिमानानें परवानगी दिली. नंतर ती हरीच्या बायकोसह देहू या गांवीं परत आली.

## वंश वाढ

अमाई आपल्या देहूं गांवीं आली. तिनें सुनेस माहेरी पाठवून दिलें. पुत्र वियोगाचें दुःख बाजूस सारलें फिरून विठ्ठल भजनास लागली. त्यानंतर घर सोडून कोठेंच गेली नाहीं कारण विश्वंभरबोवांनीं स्थापन केलेल्या मूर्ति त्या घरांत होत्या. माहेरी सून बाळंत झाली. मुलगा झाला. अमाईला विशेष समाधान झालें. कारण वंशवृक्ष वाढीस लागला. तिनें सूनेस घरी आणविलें. नातवाचें नांव विठ्ठल ठेवलें. श्री पंढरीनाथाच्या भक्तीची माळ तिच्या गळ्यांत अडकवली. विठ्ठल वयांत आला. त्यानें पंढरपूरची वारी सुरू केली. आजोबानें मिळविलेली विठ्ठल भक्तीची मिरासदारी उत्साहानें चालविली.

त्यामुळें देहू गांवास फिरून क्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालें. विठोबाचा मुलगा पदाजी, पदाजीचा शंकर, शंकरचा कान्होबा आणि कान्होबाचा बोल्होबा. बोल्होबा मोरे हेच श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे जन्मदाते !

## अनेक पूर्वजांची पुण्याई

भागवत धर्मरूपी ज्योत महाराष्ट्रांत प्रथम पेटविण्याचें महान कार्य श्रीसंत नामदेव महाराज यांनीं केलें. त्यांना त्या काळच्या सर्वच संतांनीं सहाय्य केलें. ती धर्मज्योत त्यानंतरच्या काळांत साधारण मंदावत होती. तिच्यावर कर्मठरूपी पतंग वर्णाश्रमाची झडप घालून विझवण्याच्या प्रयत्नांत होते. परधर्म सत्तेची हवा तिला अस्थिर करूं पाहात होती. अशा वेळीं ज्या महात्म्यानें आपल्या जीविताचें सर्वस्व ओतून ती पूर्वीपेक्षां तेजस्वी केली. तिचा प्रकाश राजवाड्यापासून तों झोपडीपर्यंत पाडला. इतकेंच नव्हें तर प्रत्येक महाराष्ट्रीय स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणांत यावच्चंद्र दिवा करी तो प्रकाश वाढता राहील असें केलें फत्तररूपीं अनेक कर्मठांस भागवतधर्माचा द्रव आणला. परधर्मीयांच्याही भावनेंत भागवत धर्माबद्दल आदर उत्पन्न होईल असें केलें मनुष्य प्राण्यांस धार्मिक बाबतींत समानतेचा मानवी हक्क आहे. हें स्वानुभवानें सिद्ध केलें, परमेश्वरभक्तीचा कर्मकांडी एकांगीं आडमार्ग मोडून साधा व सोपा भक्तीमार्ग मोकळा केला. महाराष्ट्रास माणुसकीचा व राष्ट्रोद्धाराचा कानमंत्र दिला. अशा महान् थोर पुरुषास जन्म देण्यासाठीं त्याच्या अनेक पूर्वजांनीं व मातापित्यांनीं अत्यंत खडतर अशी तपश्चर्या करून त्यांना उपयोगी पडेल असा पुण्यसंचय केला असेल.

श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे मूळ पुरुष विश्वंभरबोवा यांनीं श्री विठ्ठलास देहूस आणलें. तें भक्तीच्या व जिवंत धार्मिक भावनेच्या बळावर ! त्यांच्या दोन्ही मुलांनीं स्वातंत्र्यासाठीं आपले प्राण धारातीर्थी अर्पण केले व समाजासाठी राष्ट्रभक्तीचा मार्ग मोकळा केला. त्यांच्या पुढील पिढ्यांनीं संसार केला. परंतु त्या प्रत्येकाच्या अंतःकरणांत संसारतृष्णा मावळलेली होती. केवळ कर्तव्य म्हणून संसाराकडे पहात. परमेश्वर भक्ति हेंच त्यांच्या जीविताचें ध्येय ठरलेलें होतें. मागील सहा पिढ्याचा धार्मिक कमाईचा ठेवा बोल्होबा मोरे यांना मिळालेला होता.

## आईबाप

बोल्होबा मोरे यांनीं आपली वडिलार्जित खरी मिरासदारी जी विठ्ठलभक्ति ती अत्यंत मनोभावानें केली. संतश्रेष्ठास जन्म देण्यापूर्वीं त्यांनीं कांहीं तपें केलीं. पंढरपूरची वारी खंड पडूं न देतां केली. त्यांचे कुटुंब कनकाई ह्या अत्यंत धार्मिक असून भक्तीच्या बाबतींत त्या बोल्होबाच्या जणूं छायाच असत. बोल्होबाच्या उत्कट भक्तीचें प्रत्येक चिन्ह कनकाईच्या ठिकाणीं तंतोतंत उमटे. अशा महान भक्तिवान आईबापांनीं तुकाराम महाराजांस जन्म दिला; असें म्हणण्याऐवजीं महाराष्ट्र धर्म, मानवधर्म, भक्ति, त्याग, वैराग्य व महाराष्ट्राचें भाग्य ह्यांसच जन्म दिला असें म्हणणें अधिक संयुक्त दिसेल.

तुकाराम महाराज याची माता कनकाई पतीबरोबर पंढरपूरास अनेक वेळां गेली होती. तिनें तेथील भक्ति अंतःकरणांत पुरेपूर सांठवली होती. शिवाय घरांत विठ्ठल-रुक्माईच्या मूर्तीचा नित्य सहवास; त्या मूर्तीच्या रूपानेंच पांडुरंगानें पंढरपूराहून येणें केलें. तेंही आपल्या पूर्वजांच्या भक्ति-साठीं ! आपल्या घराण्यांत असे थोर पुरुष होऊन गेले. हे विचार तिचा स्वाभिमान नित्य वाढवीत असत. अशा भक्तिमय वातावरणामुळेच कन-काई तीन नररत्नास जन्म देऊं शकली. सावाजी, तुकाराम आणि कान्होबा हीं त्यांचीं नांवें ! सावाजी ऐवजी तिनें प्रत्यक्ष वैराग्यासच जन्म दिला हें म्हणणें अधिक शोभेल. त्याचा जन्मतःच धार्मिक मार्गाकडे ओढा ! बालपणीं लग्न झालें. बायको वारली. फिरून लग्न केलें नाहीं. पर-मेश्वर भक्तीसाठीं गृहत्याग केला. आईबापांची माया सोडली. संसारा-बद्दल पूर्ण उदासिनता पत्करली, जीविताचें ध्येय निश्चित ठरविलें व सर्व-संगी परित्यागी बनून आपलें नांव अगर ठिकाणही कोणास अखेरपर्यंत समजूं दिलें नाहीं. दुसरे तुकाराम महाराज व तिसरे कान्होबा हेही महान् भक्त होते. या भक्तांचीं खरी खाण त्यांची माता !

### माता

नारिओंको निंदो नये नारी नरकी खाण ।
जिस खानमें पैदा हुवे भीष्म राम हनुमान ।।

हिंदु समाजाच्या सर्व नाशासाठीं कर्मठ अशा शास्त्री पंडितांनीं वेदाच्या नांवावर रूढिधर्माचा खोटा बागुलबोवा पुढें करून जीं अनेक घातक शस्त्रास्त्रें निर्माण केलीं त्या सर्वांस धर्मशास्त्र असें गोंडस नांव दिलें, या सर्वांत घातक असें शस्त्र म्हणजे धार्मिक बाबतींत स्त्रीशूद्रास हक्क नाहीं हें होय. त्या घातक शस्त्राचा फोलपणा अनेक घडलेल्या उदाहरणांवरून समाजाच्या प्रत्ययास स्पष्टपणें आलेला आहे. बहुजन समाज त्या गोष्टीच्या विरुद्ध आहे पण रूढिप्रिय शास्त्री मंडळी तें मृत वचन बदलण्यास आजही तयार नाहींत हें एक आश्चर्य आहे.

## जन्म

हरिभक्त जन्मे जिचें कुशीं । अवघे त्रैलोक्य वंदिती तिसी ॥

(भावार्थ रामायण)

शके १५२० मध्यें (सन १५९८) कनकाईच्या उदरीं तुकाराम महाराज जन्मास आले. महाराज कनकाईच्या पोटीं जन्मास आले असे म्हणण्याऐवजीं महाराष्ट्राचा नवा मनु जन्मास आला हें म्हणणें अधिक संयुक्तिक दिसेल. कारण त्या काळीं महाराष्ट्राची धार्मिक, सामाजिक व राजकीय परिस्थिति मृतप्राय होऊन तिला धाण येऊं लागली होती. महाराष्ट्रांतील बहुसंख्य जनता धार्मिक स्वास्थ्याकरतां शाक्तपंथाच्या व परधर्मीय पीर व फकीर यांच्या आहारी जात होती. पारतंत्र्य हें महाराष्ट्राच्या पचनी पडून गुलामी हें त्याच्या आवडीचें व्यसन बनलें होतें. कृत्रिम उच्चनीचतेनें शिखर गांठल्यानें हिंदुसमाज विस्कळित बनला होता. अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितींत महाराजांचा जन्म, ती एकंदर परिस्थिति सुधारण्यासाठींच झाला असें म्हणणें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. अशा त्या थोर संतास जन्म देणारे मातापिता धन्य होत. महाराष्ट्र हा कदाचित तुकाराम-महाराज यांच्या ऋणांतून मुक्त होऊं शकेल. पण बोल्होबा कनकाई यांच्या उपकारांतून तो कधींही सुटणार नाहीं.

विश्वंभरबोवा यांनीं भाऊबंदकीच्या भांडणांत आयुष्याचा खेळखंडोबा केला नाहीं. जावळी येथील देशमुखी सारख्या महत्त्वाच्या वतनाचा त्याग केला. घरदार सोडलें, पर ठिकाणचा रस्ता धरला. कर्तबगारी दाखविली.

# तुकाराम महाराजांची जात

एथ एकाचि हें धनुष्यपाणी । परी जाहले गा चहूं वर्णी । ऐसी गुणकर्म कडसणी । केली सहजे ॥७९॥ म्हणौनि आईके पार्था । हे वर्ण. भेद संस्था । मी कर्ता नव्हें सर्वथा । याचि लागी ॥८०॥

ज्ञा अ. ४

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांना जग सोडून तीनशें वर्षे झालीं तरी त्यांची रूढ जात सांगण्याचे आजपर्यंत बहुतेकांनीं टाळलें आहे. कित्येकांनीं या महत्त्वाच्या प्रश्नास बुद्धिपुरःसर टाळण्याचें प्रयत्न केले व खोटी बाजू समाजापुढें मांडली परंतु आजच्या या जागृतीच्या व चिकित्सेच्या काळांत त्यांचें हें करणें समाज चालूं देणार नाहीं; कारण जनता जागी झाली आहे.

'सत्पुरुष व त्याचें शत्रुत्व हीं जणूं जुळीं भावंडेंच असतात. हें इतिहासांत घडलेल्या गोष्टींवरून स्पष्ट होत आहे' तुकाराम महाराज जिवंत होते त्यावेळीं त्यांच्या कीर्तीचे व अभंगवाणीचे शत्रू होते. महाराज गेले परंतु शत्रूत्व चालविणारे मात्र वरचेवर जन्म घेत आहेत. अलीकडच्या काळांत कै. राजवाडे कै. भावे व कै. पांगारकर या तिघांनीं विशेष प्रकारें महाराजासंबंधी श्लाघ्य जनुदारपणा दर्शविला आहे.

कै. पांगारकर यांनीं सर्व आयुष्य हरिभक्तीच्या नांवावर घालविलें. हरिभक्त म्हणून वारकरी समाजांत ते हक्कानें वावरले. हरिभक्तांस धार्मिक वाङ्मयाचें बाबतींत विशेष हक्क असतो असें त्यांनीं आपल्या लिखाणांत अनेक प्रसंगीं सांगितलें. हरिभक्तीच्या हक्कानें त्यांनीं इतर कांहीं लेखकांस दोषही दिले आहेत. त्याच पांगारकरास संत तुकाराम-महाराज यांच्याविषयीं खरा व जिवंत आदर दाखवितां आला नाहीं किंवा त्यांचें खरें चरित्र जनतेपुढें मांडण्याचें त्यांनीं केलें नाहीं.

## पांगारकरांचें तुकाराम चरित्र

कै. पांगारकरांनीं तुकाराम महाराज यांचें समग्र चरित्र प्रसिद्ध केलें. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या तुकाराम चरित्रांत हेंच सर्वांत विस्तृत आहे. शेकडों पृष्ठें खर्ची घातलीं. परंतु तुकोबारायांच्या चरित्रावर सनातनी छाप मारण्याचें त्यांनीं विशेष काम केलें. आपल्या पुस्तकांत त्यांनीं तुकोबाची जात म्हणून स्वतंत्र प्रकरण घेतलें आहे. पान४७वर त्यांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे. " महात्म्याच्या चरित्राचा सांगोपांग विचार करीत असतांना लौकिक दृष्टीनें त्याच्या जातकुळीचा विचार केला पाहिजे. 'तुका वाणी' अशी त्यांच्या नांवाची प्रसिद्धी असल्यामुळें ते जातीनें वाणी होते असें कोणासहि वाटण्याचा संभव आहे. पण त्यांच्या घराण्यांत वाण्याचा धंदा कित्येक पिढ्या चालत होता. त्यांनींही पूर्ववयांत तो केला. म्हणन त्यांना वाणी म्हणत. 'वाणी ही कांहीं त्यांची जात नव्हे' अलिकडे कित्येक जात्यभिमानी विद्वान त्यांना 'मराठा क्षत्रिय' ठरविण्याच्या प्रयत्नांत आहेत."

प्रो. राजाराम शास्त्री भागवत व अनेक उदारमतवादी ब्राह्मण व इतरहि लेखक तुकाराम महाराज यांची जात 'मराठा' सांगतात. सत्य परिस्थिति व इतिहासाचा पुरावा सांगणें हें कै. पांगारकरास जात्यभिमानाचें लक्षण दिसावें हें नवल आहे.

तुकाराम महाराज यांची जात मराठा आहे, हें सांगणें पांगारकरांच्या कर्मठ हृदयास सहन झालें नाहीं. त्यांनीं तुकाराम महाराज यांच्या नांवावरचा एक अभंग घेतला.तो अभंग बनावट तरी असला पाहिजे किंवा त्याच्यांतील कांहीं महत्त्वाच्या शद्बांत मुद्दाम बदल तरी केला असेल हें आम्ही अभंग प्रकाशन या प्रकरणांत स्पष्ट केलें आहे. वाचकांनीं त्याकडें जरूर लक्ष द्यावें. 'याती शुद्र वैश्य केला व्यवसाय' हा तो अभंग आहे.

या अभंगाच्या आधारासाठीं पांगारकरांनीं सर्व बळ खर्च केलें, बुद्धीची कसरत दाखविली. द्वेषाचा काळाकुट्ट रंग उडविला व शेवटीं स्वमत म्हणून तुकाराम महाराज 'शूद्र' होते.असें स्पष्ट सांगण्याचें धाडस केलें. आपल्यावर सध्याच्या जागृतीच्या व चिकित्सतेच्या काळीं समाज विश्वास ठेवणार नाहीं म्हणून स्वमताच्या पाठिंब्यासाठीं त्यांनीं महिपतबाबा, कवि

मोरोपंत व निबंधमालाकार (चिपळूणकर) यांचेंहि असेंच मत होतें म्हणून सांगितलें, यांच्याही नांवाचा उपयोग होणार नाहीं हें जाणून ते नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील क्षेत्रोपाध्याय (बडवे) यांच्या वह्यांत घुसले व त्या वह्यांच्या आधारावर महाराजांस शूद्र ठरविण्याचा प्रयत्न केला.

महिपतबाबा यांचें सर्व लिखाण पुराणाच्या धर्तीचें. त्याला कांहींच धरबंध नाहीं. त्यानें तुकाराम महाराज शूद्र म्हणून एका टोंकास ठाकून ठोकून उभें केलें तर लगेच दुसऱ्या टोंकास तुकाराम महाराज हे पूर्वीच्या देवतांचे अवतार आहेत म्हणून जोरानें प्रतिपादिलें. मोरोपंत हे कवि होते. कवींस कोणतेच नियम बंधनकारक नसतात. परंतु पांगारकरानीं निबंधमालाकार (चिपळूणकर) यांच्या राष्ट्रघाताच्या आड लपण्याचा प्रयत्न करणें हाच त्यांच्या सनातनी हृदयाचा उघडा पुरावा होय. महात्मा फुले यांनीं समाजोद्धाराकरितां स्त्रीशिक्षण, अस्पृश्योद्धार वगैरे सुधारणांचा पुरस्कार करण्याची हांक मारली, त्यावेळीं हेच चिपळूणकर विरोधासाठीं उभे राहिले. सबंध पुणें शहरांत सुशिक्षित वर्गांत यांच्याइतका त्या काळीं कोणीहि कर्मठ सांपडणें अशक्य. अशांचा आधार घेणें हें आश्चर्य आहे.

तुकाराम महाराजांचे पुत्र नारायणबोवा नाशिक व त्र्यंबक येथ आल्याचा उल्लेख करून पांगारकर बडव्यांच्या वह्यांतील मजकूर साल व वह्यांच्या पानांचा क्रमांक सांगून त्या आधारावर तुकाराम महाराजास शूद्र ठरवूं पाहात आहेत. परंतु त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचें प्रत्यक्ष स्वरूप मुद्दाम विसरतात. रामेश्वरभटानें तुकाराम महाराजांच्या वह्या पाण्यांत बुडविल्या याचें मुख्य कारण तो महाराजास शूद्र समजत होता. त्यानंतर महाराष्ट्राच्या इतिहासांत घडलेल्या महान् घटनेकडे पांगारकरांनीं लक्ष देणें जरूर होतें.

ज्या प्रतापी वीरानें महाराष्ट्रभर तरुण मावळ्यांच्या ताज्या रक्ताचा सडा शिंपडला, ज्यानें शून्यांतून स्वराज्य निर्माण केले, राष्ट्राच्या गुलामी मनाला स्वाभिमानाची खळखळीत उकळ आणली, हिंदुधर्म व हिंदुराष्ट्र यांच्या उद्धारासाठीं रात्रंदिवस कष्ट केले, गो-ब्राह्मण प्रतिपालक हें विशेषण कपाळास चिटकविलें, ज्याची राष्ट्रसेवा व धर्मसेवा पाहून उत्तर हिंदुस्थानांतील अनेकांस कौतुक वाटलें, त्याच्यावर कवनें केलीं.

काशीकी कला जाती थी । मथुराकी मसजित बनती थी ॥
एक शिवाजी नहीं होता । तों सबकी सुन्नत बनती थी ॥

ज्या महाराष्ट्रानें अशा वीरास जन्म दिला, ज्याच्यासाठींच तो रात्रंदिवस झटला अशा त्या शिवाजी महाराजांस राज्याभिषेक प्रसंगीं महाराष्ट्रांतील कर्मठ क्षत्रिय म्हणण्यास तयार नव्हते. इतकेंच नाहीं तर विरोधासहि तयार होते. एकाही मायेच्या पूतानें छातीठोकपणें पुढें येऊन त्यांना क्षत्रिय म्हणून सांगण्याचें धाडस केलें नाहीं. शेवटीं महाराजांस काशीहून गागाभट्टासारख्या थोर विद्वानांस मुद्दाम आणावें लागलें. त्यावेळीं महाराष्ट्रांतील कर्मठांचीं तोंडें बंद झालीं, मग क्षेत्राचें गंगापुत्र नारायण बुवास क्षत्रिय म्हणून कसें समजतील व आपल्या वहींत तसा मजकूर कसा लिहितील. ते शूद्रच म्हणून हट्टानें लिहितील याचा पांगारकरांनीं विचार करणें जरूर होतें.

पांगारकर भावनेच्या भरांत स्वतःची कृति विसरले. स्वतःच्या तुकाराम चरित्रांत (पान ५७ वर) ते लिहितात—

"हरी व मुकुंद या उभयतांच्या मनांत 'सेना तुरंग शिबिका आभरण । आपणाकारणें असावी, असा विचार आला. क्षात्रवृत्ति उत्पन्न झाल्यामुळ आईचे न ऐकतां ते निघून गेले. त्यांनीं राजसेवा पत्करली." फिरून ५८ वर ते लिहितात— "जें घनघोर युद्ध झालें त्यांत हरी व मुकुंद दोघेहि धारातीर्थीं पडले. मुकुंदची स्त्री सतीधर्माप्रमाणें सती गेली." हरी व मुकुंद हे महाराजांच्या सातव्या पिढीचे पूर्वज ! ते क्षात्रधर्मास अनुसरून लढाईंत गेले. प्रत्यक्ष रणक्षेत्रावर त्यांनीं देह अर्पण केले. मुकुंदच्या बायकोनें आपल्या प्राणाच्या मोलानें नवऱ्याच्या क्षात्रधर्मास उजाळा दिला. अशा महत्त्वाच्या गोष्टी पांगारकर स्वतः कबूल करतात व शेवटी महाराजांची जात शोधण्यासाठीं आडमार्गांत शिरतात.

पांगारकरांनीं देहूस अनेक खेपा घातल्या. महाराजांच्या वंशजांच्या घरीं मुक्काम केले. त्यांनीं महाराजांची जात खऱ्या दृष्टीनें शोधली असती तर ते बडव्यांच्या वह्यांत न घुसतां देहूंतच या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत त्यांची खात्री झाली असती. कारण तुकाराम महाराज संसारी होते त्यांची

एक मुलगी देहूशेजारी एलवडी येथें मालजी गाडे यांच्या घराण्यांत दिली होती. तें गाडे घराणें वतनदार पाटील असून आज त्या गांवीं नांदत आहे. देहू येथें महाराजांच्या वंशजांची सुमारें पन्नास घरें असतील या सर्वांचें महाराष्ट्रभर प्रसिद्ध अशा मराठा घराण्याशीं संबंध आहेत.

महाराजांचे पूर्वज जावळीचे देशमुख आहेत.त्यावेळीं फलटणच्या नाईक निंबाळकर यांच्याशी त्यांचे पूर्वापार संबंध होते.महाराष्ट्रांतील मराठा समाजांत सुमारें सातशें वर्षें हें फलटणचें घराणें अत्यंत मानासन्मानानें नांदत आहे. महाराजांच्या चौथ्या पिढीपासून घडलेले संबंध पुढीलप्रमाणें आहेत. बाळकृष्ण बीन खंडोबा यांचें कुटुंब कुवराबाई ह्या अक्कलकोट संस्थान भोसले घराणें, रामचंद्रबोवा यांचें कुटुंब, ग्वाल्हेरचे सरदार फाळके, सदानंदबोवा यांचे कुटुंब, जानकीबाई राहू पिंपळगांव येथील देशमुख, नारायणबोवा यांचीं चार लग्नें. १ सेल पिंपळगांव येथील पाटील ता. हवेली, २ चरोलीचे तापकीर देशमुख ता. हवेली, ३ उसणेधामणे येथील देशमुख ता. मावळ. ४ किंनई ( देहूजवळ ) चे पाटील, नारा-बोवाची एक बहीण इतिहासप्रसिद्ध धनाजी जाधव यांच्या घराण्यांत वाघोली येथें ता. हवेली व त्यांचीं मुलगी ग्वाल्हेरचे सरदार इंगळे यांच्या घराण्यांत, विष्णुबोवाचीं तीन लग्नें झालीं. १ सिरसोली जि. पुणें येथील गुंड देशमुख, २ वासी जि. उस्मानाबाद ( है. राज्य ) येथील निंबाळकर जहागिरदार, म्हाळुंगे ता. माळसिरस जि. सोलापूर येथील देशमुख हल्लीचे वंशज बाबासाहेब यांचे कुटुंब मु. वासी जि. उस्मानाबाद येथील गाय-कवाड यांची कन्या, व त्यांचे धाकटे बंधु बाळकृष्णबोवा यांचे कुटुंब, महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध सखाराम उर्फ दादासाहेब जेधे देशमुख, पुणें यांची कन्या असून प्रसिद्ध पुढारी केशवराव जेधे यांची पुतणी आहे.

याशिवाय या मोरे घराण्याचा आप्तसंबंध तळेगांव येथील इतिहास प्रसिद्ध सेनापति दाभाडे, तळेगांव ढमढेरे, धारदेवास येथील दोन्ही राजघराणीं. जुन्नर येथील राजे हांडे, बडोद्याचे सरदार ढवळे, धुळें जिल्ह्यांतील तोरखेडचें कदम, बांडे व साक्री येथील राजे माधवराव भोसले. महाराजांच्या वंशजांची घरेंहि बरीच असल्यामुळें त्यांचा आप्त संबंध धार, देवास, ग्वाल्हेर, बडोदा, कोल्हापूर येथील प्रसिद्ध मराठा घरा-

ण्याशीं असून महाराष्ट्रांतील प्रत्येक जिल्ह्यांत प्रसिद्ध अशा मराठा घराण्यांत त्यांचे आज संबंध आहेत. नगर जिल्ह्यांत सारोळें येथील काळे, नगरचे रावबहादूर नवले, पानवडीचे सरदार थोरात, संगमनेरचे भाऊसाहेब गुंजाळ पाटील, धांदरफळचे कवडे देशमुख, पुणतांबे येथील काशीनाथ पाटील धनवटे, नगरचे खासदार कानवडे वकील वगैरे नगर जिल्ह्यांत अनेक संबंध आहेत. नाशिक जिल्ह्यांत वणीचे रावसाहेब थोरात, पिंपळगांव बसवंत येथील रावसाहेब खंडेराव आबाजी मोरे उर्फ नामदेव पाटील, कुंदेवाडी (निफाड) येथील पि. के. पाटील उर्फ भाऊसाहेब, परधाडी येथील रामचंद्रराव माधवराव पवार, वामनराव गोविंदराव पाटील साकोरे, शिवराम वेडूजी पाटील नायडोंगरी, अण्णासाहेब मुरकुटे वकील, नासिक, दमाजी अजबा पाटील सटाणें, दिवाण बहाद्दूर वंडेकर नासिक, भाऊसाहेब हिरे निमगांव, बाबूराव देशमुख अंदरसूल, माधवराव पाटील येवले, भाऊसाहेब लालमण पाटील पिंपरखेड, जयवंतराव रामचंद्रराव उर्फ दादासाहेब इनामदार जामदरी, काशीनाथ नानाजी पाटील जातेगांव, माधवराव परशराम पाटील बोलठाण, रावसाहेब काळे सिन्नर. काकासाहेब वाघ नाशिक, पूर्व खानदेशमध्यें चाळीसगांव व पाचोरे येथील देशमुख, माधवराव पाटील पोहरे. सातारा जिल्ह्यांत जाधवराव जाहागीरदार भुइंजकर, सरदार पाटणकर पाटण, माने पाटील जहागीरदार म्हसवड, निगडे देशमुख, सिरवळ, पिसोळकर देशमुख आघेड, बेळगांव जिल्ह्यांत म्हईसळचे शिंदे जहागीरदार, हेरे येथील जहागीरदार, कोल्हापूर येथें सरदार घोरपडे माद्याळकर औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड ह्या जिल्ह्यांतील प्रसिद्ध अशा अनेक मराठा घराण्याशीं संबंध आहेत. नागपूर येथील राजे भोसले, सरदार गुजर व श्रीमंत दादासाहेब धनवटे, अच्युतराव देशमुख सिरसी. ता. मूर्तिजापूर. वगैरे त्या भागांतील प्रसिद्ध अशा घराण्याशीं संबंध आहेत.

## कवि महालिंगदास

खानदेश प्रांतांत कवि महालिंगदास म्हणून होऊन गेले. त्यांचें एकंदर धोरण हिंदु समाजास पोषक असें होतें. त्यांनीं शके १४८७ मध्यें 'सिंहासन बत्तीशी' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यांनीं महाराष्ट्रांतील मराठ्यांच्या कुळांची माहिती दिली आहे. त्यांत मोरे हें नांव आहे त्यांकडे तरी पांगारकरांनीं लक्ष देणें जरूर होतें.

## पांगारकरांची कबुली

पांगारकरांनीं मराठी वाङ्मयाचा खंड २ मध्यें पान ७८ वर स्पष्ट लिहिलें आहे कीं, "मराठे हे खरे क्षत्रिय आहेत." कांहीं मराठ्यांच्या कुळांच्या नांवाचाहि त्यांनीं उल्लेख केला. त्यांत मोरे हें नांवहि घेतलें. त्याच खंडांत पान ५८७ वर "महाराष्ट्रांतील मराठे हे खरेखुरे क्षत्रिय आहेत" अशी कबुली देत असूनही तुकाराम महाराजांस नुसते मराठा जातीचे होते येवढें म्हणण्याचें हट्टानें कां टाळावें हा प्रश्न आहे..

पांगारकरांचेंच अनुकरण इतर लेखकांनीं केलें आहे. कोठल्यातरी कागदाच्या ढिगाऱ्यांत घुसावें, कागदपत्राचें संशोधन या नांवाखालीं ओढाताण करावी, आपलें मत म्हणून त्यावर हवें तें ठोकावें व तें समाजापुढें मांडावें. त्यांचें हें करणें वाळूचे मनोरे ठरत आहेत. अगदीं प्रस्तुत काळीं श्री. बेंद्रे या नांवाचे एक गृहस्थ संशोधन या नांवाखालीं तुकाराम महाराजासंबंधी कांहीं मजकूर प्रसिद्ध करीत आहेत. त्यांनीं तुकाराम महाराज यांच्या जातीसंबंधी विपरीत हट्ट धरला.त्यांची सहज श्री. न. र. फाटक यांचे येथें गांठ पडली.या महत्त्वाच्या विषयावर बोलणें निघालें. मी त्यांना सांगितलें कीं प्रत्यक्षाचा रोख पुरावा सोडून कोणत्या तरी काळीं कोणत्या तरी दृष्टीनें हव्या त्या गृहस्थानें लिहून ठेवलें असेल तें योग्य कारण न पाहतां तुम्ही प्रसिद्ध करतां व समाजाचें ऐक्य बिघडवितां हें बरें नाहीं. हवें असल्यास विश्वंभरबोवापासून तों आजच्या प्रत्यक्ष परिस्थितीपर्यंत तुम्हाला तुकाराम महाराज यांच्या घराण्याचे संबंध प्रसिद्ध अशा मराठा घराण्याशीं आहेत कीं नाहींत तें मी दाखवितो. अशा गोष्टीकडे मुद्दाम दुर्लक्ष करून हवें तें लिहिणें बरें नाहीं. या सर्व मंडळींचा खरा राग तुकाराम महाराजांचे जातीवर नसून समाजोद्धाराच्या कार्यावर आहे.

## पांगारकरांचें अंतरंग

पांगारकरांनीं मराठी वाङ्मयाशीं इतिहासाचीं तीन खंडें, ज्ञानेश्वरीची प्रभावळ व इतर संतांचीं चरित्रें लिहिलीं. त्यांच्या एकंदर वाङ्मयाकडे पाहिल्यास त्यांत स्पष्ट हेंच दिसून येते कीं, वर्णाश्रमाची कृत्रिमता टिकविणें व वेदाचा अधिकार फक्त एकाच ठराविक वर्णास आहे. असें दाखविणें, हें त्यांचें साध्य होतें. तुकाराम चरित्रांत तें पान १४० वर

" ब्राह्मणांनीं तेवढें वेदाध्ययन करावें आणि आम्हां शूद्रांना हा अधिकार नसावा असें मनांत आणून त्यांनीं (तुकाराम महाराजांनीं) कधीं ब्राह्मणाशीं भांडण केलें नाहीं." त्या पुस्तकांत नसते प्रसंग उभे करून मला वेदाचा अधिकार नाहीं असे शब्द तुकाराम महाराजांच्या तोंडांत घालण्याचे प्रयत्न केले. " तुकारामासारख्या शूद्राला अनेक ग्रंथांचें अध्ययन ब्राह्मणांनीं करूं दिलें." " स्त्री शूद्रांना अज्ञानांत ठेवलें ही ओरड करणारांची चूक आहे." असें लिहिण्यांत त्यावेळच्या कर्मठांची बाजू घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला व सत्य परिस्थिति झांकण्यासाठीं वर्णाभिमानाचें पांघरूण चांगल्या प्रकारें सांवरून घालण्याचें कृत्य केलें. तुकाराम महाराजांनीं महत् प्रयासानें अभंग रचना केली. त्या अभंगामुळें समाजाचें खरें हित होणार होतें. असें अभंगाचें स्वरूप असतां वाघोलीचा भटजी देहूच्या पाटलास हुकूम करतो कीं, तुकारामाला माझ्या समोर हजर करावे. त्याप्रमाणें महाराजांस पाटील हजर करतो. भटजी भयंकर रागावतो व ते सर्व अभंग नदींत खोल पाण्यांत बुडवतो. हें त्यावेळीं धार्मिक स्वातंत्र्य होतें काय! ज्ञानेश्वराची प्रभावळ म्हणून त्यांनीं ग्रंथ लिहिला. त्याला स्वतःच लांबलचक प्रस्तावना जोडली. प्रस्तावनेंत त्यांनीं आपलें खरें अंतरंग जागें केलें. पान ५ वर " वर्णाश्रम सोडूं नये, जातीचा काला अगर गोलंकार करूं नये." पान १३ वर "प्रत्येकानें वर्णाश्रम धर्माप्रमाणें म्हणजे जातिधर्माप्रमाणें वागावें. इतकेंच नव्हें तर जाती परमेश्वरानें निर्माण केल्या." असें पांगारकर स्पष्ट सांगतात. पान २३ वर " त्रिवर्णांना त्यांच्या स्वधर्माचारांत सेवेचें सहाय्य करणें हा गुण शूद्राचा. शूद्रानें तीन वर्णांची फक्त सेवा करावी." असें त्यांनीं लिहिलें आहे. हें त्यांचें सर्व लिहिणें भागवत धर्माच्या समता तत्त्वाच्या विरुद्ध आहे. भागवत पंथांत जातीस मुळींच महत्त्व नाहीं, कृतीस आहे. सनातनी तत्त्वाप्रमाणें चोखोबाहि वागले असते. फक्त त्रिवर्णाच्या सेवेंतच त्यांनीं आपलें आयुष्य खर्ची घातलें असतें, तर त्यांना प्रत्यक्ष परमेश्वरी दर्शनाचा दैवी हक्क प्राप्त झाला असतां काय? महाराष्ट्र धर्माचा पाया भरण्याचें महान् कार्य त्यांना करतां आलें असतें काय? परमेश्वराजवळ जातीची कृत्रिम उच्चनीचता मुळींच नाहीं हें महान तत्त्व त्यांना सांगता आलें असतें काय? किंवा बाबासाहेब आंबेडकरास भारताची घटना घडविण्याचा मान मिळाला असतां काय?

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांसारख्या संतास आमची ही सनातनी मंडळी वेदाचा अधिकार देण्यास तयार नाहींत. ज्यांनीं पांचव्या वेदास जन्म दिला अशी ज्यांची श्रेष्ठ योग्यता त्यांच्यापासून वेदाधिकार हिसकावण्याची यांची तयारी ! याचें मुख्य कारण ते सर्व महाराजांस जातीनें शूद्र समजत होते व आजही कित्येकजण तसें समजत आहेत.

## वेदाधिकार

"वेदांतील पुष्कळ विचार मौक्तिकें अरण्यांत जन्मास आलीं नसून अत्यंत कार्यव्यापृत अशा क्षत्रिय राजांपासून त्यांचा जन्म झाला आहे."

(स्वामी विवेकानंद स०ग्रं. खंड ८ वा.)

वेदांचा अधिकार सर्व हिंदूस नाहीं, एका ठराविक वर्गास आहे हें धर्मनाशक तत्त्व ज्या दिवशीं जन्मास आलें त्याच दिवशीं हिंदुधर्माच्या नाशाचीं बीजें पेरलीं गेलीं. भागवतधर्मीय संतांनीं वेदांत तत्त्वज्ञानापेक्षां परमेश्वराच्या नामस्मरणास विशेष महत्त्व दिलें. आपल्या धर्मांतील हिंदुबांधवापासून वेदांत धर्म लपविण्यांत येत होता. परंतु परधर्मीयास त्याचें ज्ञान कर्मठ देत होते.

कर्म भ्रष्ट झाले द्विज । म्लेच्छा सांगती वेदबीज । सर्वे गेले
सहज । मंदगति झाले ब्राह्मण ॥ २२३ ॥

(एकनाथी भागवत)

हिंदुच्या उपनिषद ग्रंथांच्या संख्येंत अल्लोपनिषद म्हणून एका उपनिषदाची भर पडली. ती बहुतेक अकबर बादशहा यांचे वेळीं पडली असावी. कारण अकबर बादशहा वेद ऐकत असे व त्या वेळचे शास्त्री पंडित पैशांचे लोभास्तव वेदांतील तत्त्वज्ञान परधर्मीय राजास सांगत असत व त्या बादशहाचें सांगण्यावरूनच त्या उपनिषदाची उत्पत्ति झाली असावी असें थोरांचें मत आहे.

ईस्ट इंडिया कंपनीनें लाखों रुपये खर्च केले व ऋग्वेदाचें इंग्रजीत भाषांतर केलें. प्रोफेसर मॅक्समुल्लर साहेबांना वेदवाणी सांगणारे कोण होते. आज पृथ्वीच्या पाठीवर अनेक निरनिराळ्या भाषेंत वेदांत तत्त्वज्ञानाचें भाषांतर झालें आहे. वैदिक धर्माच्या भाग्यानें जन्मास आलेले स्वामी दयानंद सरस्वती यांनीं वेदांचें भांडार लुटून जगहितासाठीं उघडें मांडलें.

स्वामी विवेकानंद यांनीं लेखन द्वारें व भाषण द्वारें हेंच सांगितलें कीं, वेदावर फक्त हिंदुवाच हक्क आहे असें नाहीं तर अखिल मानव जातीचा हक्क आहे. भागवत धर्मीय संत ज्ञानेश्वर महाराजांनी हें उच्च तत्त्व त्या काळच्या पैठण येथील पंडितास सांगितलें होतें. या सर्व गोष्टीकडे मुद्दाम दुर्लक्ष करून पांगारकर यांचेप्रमाणें त्यांचे अनेक मतभाई वेदांचा अधिकार सर्वांस नाहीं हें आजही सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत हें धर्माचें दुर्दैव समजलें पाहिजे.

" तुझ्या खिशांत पुरेसा पैसा असला कीं, तुझ्या हव्या त्या कर्माला शास्त्राधार काढून देण्यास भट-भिक्षुक एका पायावर तयार असतात."

(स्वामी विवेकानंद खंड १२ पान १०३)

पांगारकर यांची हरिभक्ति पिकून तिला चांगल्या प्रकारें द्रव्यरस कोठें आला असेल तर तो इंदोरचे महाराज तुकोजीराव होळकर यांच्या राजवाड्यांत ! तुकोजीराव होळकर सरकार हे आपली धार्मिक तहान भागविण्यासाठीं कै. पांगारकर यांचा कांहीं प्रसंगीं उपयोग करीत. त्यावेळीं पांगारकर आपला कर्मठपणा पूर्णपणें विसरून महाराजांची व त्यांच्या घराण्याची भरपूर स्तुति करीत. ' महाराज आपलें घराणें क्षत्रियांचें आहे. त्याग, वैराग्य व भक्ति हे गुण क्षत्रियांच्या ठिकाणीं उपजत असतात. आपण राजा जनकाप्रमाणें वैराग्यशील असून क्षत्रियांचे खरे गुण आपल्या ठिकाणीं आहेत. क्षत्रियाशिवाय उदारता वैराग्य इतरत्र क्वचितच असते, वगैरे स्तुति आपल्या हरिभक्तीच्या दुकानांतून ते तोंड भरून करीत.

## परशुरामाचा अवतार

" ब्राह्मण वर्ग आधीं होता तसा पुढें राहिला नाहीं. कालेकरून त्यांच्यांत अनीति वाढत गेली. स्वतःचें महत्त्व रक्षण करण्यासाठीं तो जुलूम करूं लागला, स्वार्थासाठीं अनेक वेदबाह्य आणि तर्कबाह्य अशीं मतेंहि स्वधर्मांत घुसडण्यास त्यानें कमी केलें नाहीं. हेतु हाच कीं, आपलें महत्त्व कायम राहावें."

(स्वामीविवेकानंद सं. ग्र. खं.१२ पान १०१)

हिंदु समाजांत पुराणप्रिय, वर्णाभिमानी, संकुचित दृष्टीचा व वृत्तीनें पुरा कर्मठ असा एक वर्ग होता. त्यांनीं वर्णाभिमान टिकविण्यासाठीं समाजाची बौद्धिक हिंसा केली आहे व आजहि कांहीं तसे प्रयत्न करीत आहेत. ते आपल्या कृतीस धर्माचें व शास्त्राचें रूप देतात.

समाजास पुराणांच्या बुजगवण्यानें भीति दाखविण्याचें त्या वर्गानें अनेक प्रयत्न केले. पुराणांचा मुख्य गाभा म्हणजे दशावतार. हे पुराणांतील दहा अवतार प्रत्यक्ष देवानें घेतले असें सांगण्यांत येत आहे. देवास अवतार घेण्याचें मुख्य कारण म्हणजे पृथ्वीवर पापांचा भयंकर भार होतो. तो नाहींसा करण्यासाठीं देवास अवतार घेणें भाग पडतें. (देव मनुष्याचाच नाहीं तरी पशूंचासुद्धां अवतार घेतो असें सांगतात.) अवतार घेऊन पाप करणारांचा नाश करून देव परत स्वस्थानीं जातो. अशा एका अवताराचा म्हणजे परशुरामाचा विचार करणें अत्यंत जरूर आहे.

देवास परशुरामाचा अवतार घेण्याचें कारण असें सांगितलें जातें कीं, पृथ्वींवरील क्षत्रिय मारून नाहीसें करणें व त्यांचें राज्य व सत्ता ब्राह्मणास देणें. इतर अवताराचें वेळीं जरूर तें काम आटोपून देवानें अवतार संपविले. परंतु परशुरामाचें वेळीं देवानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली, नंतर अवतार संपविला.

परशुरामाच्या अवताराचा जन्म पुराणांत ज्या दिवशीं व ज्यावेळीं झाला त्याच क्षणीं हिंदुधर्म व हिंदुस्थान यांच्या अधःपाताचा व पारतंत्र्याचा जन्म झाला. युद्ध, कला, विद्या, श्रेष्ठ संस्कृति उच्च धर्मज्ञान व एकंदर मानवी कल्याणाचे श्रेष्ठ मार्ग वगैरे दृष्टीनें परिपूर्ण असलेल्या ह्या भारत देशास परक्यांच्या लाथा खाण्याचा दुर्दैवी प्रसंग अनेक शतकें आला. हिंदुस्थानांतील एकूण एक पवित्र क्षेत्रें व देवस्थानें कित्येक वेळां भ्रष्ट झालीं. आमच्या आया बहिणी डोळ्यांदेखत परक्यांनीं ओढून नेल्या तें मानवी हृदयास कधीहि सहन न होणारें दुष्ट कृत्य अनेकवार पाहिलें. आमचे धर्मबांधव परकीयांच्या जुलमामुळें परधर्मांत गेले तर कांहींना वरिष्ठ वर्गाचा करडा जुलूम व रूढीच्या वरवंट्याखालीं चेंगरणें असह्य झालें. केवळ माणुसकी जगविण्यासाठींच त्यांनीं आपण होऊन परधर्माचा आश्रय केला. इतकेंच नाहींतर हिंदुस्थानचा जेतेपणा गेला, शौर्य मावळलें,

ऐक्य विरलें, हिंदुस्थान हा गुलामी पचविणारा देश आहे, हें लाजीरवाणें विशेषण शेंकडों वर्षें माथ्यावर वागवावें लागलें. या सर्व नाशाचें महत्त्वाचें व मुख्य कारण परशुरामास कारण नसतां अवतारी पुरुष बनविलें हेंच असावें.

परशुरामाचा अवतार जोंपर्यंत पुराणांत ठेवण्याचा प्रयत्न होणार, तोंपर्यंत आमचे कर्मठबंधू तुकाराम महाराजांस शूद्रच म्हणणार. कारण परशुरामानें क्षत्रियांचा निःपात केला. फक्त ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण त्यानें ठेवले. बिचाऱ्या वैश्य वर्णाचें काय झालें तें मात्र समजत नाहीं. त्यांनीं होऊनच शूद्र वर्णाचें स्वीकार केला असावा म्हणून ते परशुरामाच्या सपाट्यांत सांपडले नाहींत. अगदीं अलीकडे एका पदवीधरानें परशुरामाचें चरित्र लिहून समर्थ रामदास स्वामीस परशुरामाचा अवतार ठरविण्याचा प्रयत्न केला. पांगारकरांनीं अनेक संताचीं चरित्रें लिहिलीं त्यांत त्यांनीं त्यांच्या रूढ जातीचा उल्लेख केला. नामदेव महाराज शिंपी, चोखोबा महार, नरहरी सोनार, सांवता माळी, गोरोबा कुंभार, रोहीदास चांभार असा त्यांच्या रूढ जातीचा उल्लेख केला. त्याप्रमाणें तुकाराम महाराजांची कोणती तरी रूढ जात दाखविणें त्यांचें व इतर लेखकांचें कर्तव्य होतें. तरी त्यांचा शूद्र म्हणून उल्लेख केला. शूद्र हा वर्ण आहे. शूद्र ही रूढ जात नाहीं.

## महाराजांची खरी जात

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांची जात म्हणजे अखिल जगतांत मानवांचे कल्याणकर्ते जे महापुरुष होऊन गेले त्यांची जी जात ठरत असेल तीच त्यांची खरी जात! तुकाराम महाराज यांना रूढ जातीचा वृथा अभिमान नव्हता हें त्यांच्या पुढील उद्गारावरून स्पष्ट होत आहे.

" चौवर्ण लक्षण शास्त्रानें कथिलें। जाणोनि वाहिले चित्तीं धरा ॥
ज्या वर्णे लक्षण युक्त जो असेल। त्या वर्णाचा पावेल अधिकार तो ॥
ब्राह्मणाचें चिन्ह अंत्यजा असती। तरी ते पावती ब्राह्मणत्व ॥
ब्राह्मण असूनि चिन्ह अंत्यजाचें। तरी पावे साचें अंत्यजत्व ॥
लक्षण ब्राह्मण क्षत्रियादि जाण। जाती अप्रमाण शास्त्र बोले ॥

भीड भाड कांहीं शास्त्रासी तें नाहीं । मेंड वळणी पाही त्रास पावे ॥
परी गुणावगुण न विचारी मनीं । मूढपणीं जनी भांडतसे ॥
शूरपणा नाहीं कैचा तो शिपाई । विचारूनी पाही मनामाजी ॥
युद्ध करावया सामर्थ्य आणावें । तरीच म्हणावें क्षत्रिय त्यासी ॥
अर्थासह वेद ब्रह्म जे जाणती । तेचि ते पावती ब्राह्मणत्व ॥
विद्या ज्ञान गुणे अधिकार पावले । तेचि वाखाणले सर्व जगी ॥
गुण नसतां केवळ जातीमान जाण । न मिळे सन्मान जनामाजीं ॥
पिता तो परीक्षा देऊनि शोभला । त्याच्या मूढ मुला न पुसे कोणी ॥
ऐसा हा विचार सज्ञान जाणती । अज्ञ मूढाप्रति नेणवेचि ॥
चार वर्ण गुण-कर्म स्वभावानें । ठरविलें शास्त्रानें तुका म्हणे ॥

महाराजांची योग्यता जातीवर मुळींच नाहीं. मराठा अगर क्षत्रिय यावर तर नाहींच. त्यांची निर्मळ भक्ति, सद्‌याचरण, अहिंसा, हीन दीनाबद्दलची जागती कळकळ, भागवत धर्माचीं द्वारें सर्वांसाठीं खुलीं करणें, उच्चनीचतेची कृत्रिमता गाडणें, रूढीच्या दास्यांतून सर्वांस मुक्त करणें, वर्णाश्रमाबाबत उघड बंड करणें. परधर्मीयाच्या धार्मिक आक्रमणास अटकाव करणें व महाराष्ट्रांतील बहुसंख्य लोकांत चालू काळाबद्दलची जाणीव उत्पन्न करणें ह्यावर सर्वस्वी अवलंबून आहे. या एकंदर गोष्टीमुळें महाराज महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या हृदयांत ठाव धरून बसणार ! इतिहास जोंपर्यंत जिवंत राहील, मानवी मन, धर्म व भक्ति या गोष्टीस बांधले राहील तोंपर्यंत महाराष्ट्राच्या हृदयाची जागा ते सोडणार नाहींत.

कै. पांगारकर, कै. राजवाडे, कै. भावे यांनीं जरी जाणूनबुजून महाराजांच्या कार्यावर आघात केले व त्यांना अनेक लेखकांनीं साथ दिली व हल्लीहि कांहीं देत असले तरी महाराजांचें कार्य अभंग राहणार. तें कधींहि भंग पावणार नाहीं. शेवटीं महाराष्ट्रांतील सुशिक्षितांस एवढेंच सांगावयाचें आहे कीं महाराष्ट्राचेंच नव्हे तर भारताचें जें अहित झालें त्याला मुख्य कारण कर्मठांचा खोटा वर्णाभिमान !

# संसार आणि वैराग्य

प्रपंची असूनि परमार्थ साधावा । वाचे आठवावा रामकृष्ण ॥१॥
उंच नीच कांहीं न पाहे सर्वथा । पुराणींच्या कथा पुराणींच ॥२॥
घटिका आणि पळ साधी उतावीळ । वाऊगा तो काळ जाऊं नेदी ॥३॥
सांवता म्हणे वाचे जपें नामावळी । हृदय कमळी रामकृष्ण ॥४॥

बोल्होबा मोरे हे संसारांतील सर्व व्यवहार अगदीं दक्षतेनें करीत. परंतु त्यांत ते गुंतलेले नव्हते. कारण संसारापेक्षां ते विठ्ठलभक्तीस विशेष महत्त्व देत. विश्वंभर बोवानंतर झालेल्या पूर्वजांनीं तिच्यांत वाढ केली व देहूगांवचें क्षत्रमहात्म्य कायम ठेवलें होतें. म्हणून बोल्होबानेंहि त्याच मार्गाचा पूर्ण अवलंब केला होता. वार्षिक आषाढी कार्तिकी वारी करणें, पूर्वजांनीं स्थापन केलेल्या विठ्ठलमूर्तीची पूजाअर्चा करणें, नियमानें भजन करणें वगैरे धार्मिक बाबतींत त्यांचा बराच वेळ जात असे. इस्टेट वाढविण्यापेक्षां विठ्ठलभक्तीची वाढ जास्त कशी होईल याकडे त्यांचें सर्व लक्ष असे. पुढील पिढीसाठीं वतनवाडीपेक्षां विठ्ठलभक्ति जास्त उपयोगी पडेल अशी त्यांची मनोदेवता ग्वाही देई. त्यांच्या परमार्थास साह्यकर्ती अशी गुणवंत स्त्री त्यांना मिळालेली होती. कनकाईस आपल्या घराण्याविषयीं विशेष अभिमान असे. कारण पूर्वजांनीं विठ्ठलभक्तीची महत्त्वाची ठेव आपल्याकरितां ठेवली. राहत्या गांवास क्षेत्राचें जें महत्त्व आलें तें आपल्या वाडवडिलांमुळेंच आलें. या एकंदर गोष्टीमुळें ती नवऱ्याप्रमाणें संसारसुखापेक्षां परमेश्वरसेवेस जास्त महत्त्व देई. आपल्या मुलाबाळांनीं पूर्वजांच्या मार्गानें जाऊन भक्तिमार्गास विशेष जोर आणावा अशी तिची भावना असे. या श्रेष्ठ भावनेमुळेंच तिचे तिघे मुलगे संत होऊन महान् भक्त झाले.

तुकाराम महाराज यांचें बालपणचें चरित्र लिहिणें ही गोष्ट बरीच कठीण आहे. त्यांच्या चरित्राबाबत त्यांच्या घराण्यानें आजपर्यंत पाहिजे तसें

लक्ष दिलें नाहीं. पहिले चरित्रलेखक महिपतबाबा! यांनीं आपल्या चरित्र-लेखनास पुराणाचा अगदीं गर्द रंग दिला! पुराणांतील लेखनास जसा धरबंध नसतो त्याप्रमाणें ह्या चरित्राचीहि स्थिति झाली आहे. कारण महिपतबाबानें महाराजास शूद्र म्हणून एका टोंकास उभें केलें तर दुसऱ्या टोकांस देवतांचे ते अवतार म्हणून दाखविलें. त्यानंतर अनेक लेखक झाले. त्यांतील बहुतेक कर्मठ तर कांहीं रूढीला भयंकर डरणारे! त्यामुळें खरें रूप बाहेर आलें नाहीं. अशा एकंदर परिस्थितीमुळें महाराजांचें बालपणचें चरित्र लिहिण्याचें धाडस करणें म्हणजे नुसत्या कल्पनेच्या मोटा बांधून समाजापुढें ठेवण्यासारखें होणार! या महत्त्वाच्या प्रसंगाबाबत त्यांच्या कांहीं अभंगाच्या आधारानें कल्पना उभी करून चरित्रासाठीं अल्पसा आधार मिळणार!

'प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण॥'

वरील संतवचनाप्रमाणें बोल्होबा मोरे प्रपंचांत अगदीं सावध होते. पोटापुरती शेतीवाडी, मालकीचें घर, महाजनकीचें उत्पन्न, किराणा मालाचें दुकान व कांहीं सावकारी! या सर्व गोष्टींकडे ते हुशारीनें लक्ष देत होते. कारण आपण संसारी आहोंत.संसार करून परमार्थ केला पाहिजे. अन्यायाच्या एका पैशाचाहि विटाळ आपल्या संसारास न होतां तो व्यवस्थित चालला पाहिजे. परमार्थाच्या नांवाखालीं एक कवडीहि आपल्या घरांत घुसतां कामा नये. कारण त्यांच्या सर्व पूर्वजांनीं तें तत्त्व पाळलें होतें. हें पथ्य आपण सांभाळून आपल्या पुढील पिढीनेंही पाळलें पाहिजे म्हणून ते म्हणत व मुलांपुढें तो आदर्श नित्य ठेवीत. बोल्होबाच्या संसारदक्षतेमुळें त्यांना समाजांत चांगला मान होता, हें एका उदाहरणावरून स्पष्ट होत आहे. त्या काळच्या रिवाजाप्रमाणें तुकाराम महाराजांचें लग्न लहानपणीं झालें. लग्नानंतर लवकरच त्यांचे कुटुंब रखमाबाई हिला दम्याची व्यथा जडली. त्यामुळें नाइलाजास्तव वडिलांनीं त्यांचें दुसरें लग्न केलें. पहिली बायको जिवंत असतां दुसरी मिळणें कठीण असतें. तरी पुणें येथील गुळवे नांवाच्या श्रीमंत गृहस्थानें आपली मुलगी जिजाबाई त्यांना दिली.

बोल्होबाचा वडील मुलगा सावाजी याचें लहानपणींच लग्न झालें होतें. लग्नानंतर कांहीं दिवसांनीं त्याचें कुटुंब वारलें. नंतर तो वयांत

आला. त्याचें फिरून लग्न करावें म्हणून आईबाप प्रयत्नास लागले. पण या जन्मत्याग्यानें त्या गोष्टीस साफ नकार दिला. आप्तेष्टांनींहि भीड घातली. आसपासच्या सुखी लोकांनीं मुली देण्याची तयारी दर्शविली. पण त्यानें आपला निश्चय कायम ठेवला. कारण काय तर आपलें उभें आयुष्य परमेश्वरभक्तींत घालणें. सावाजी लग्न करीत नाहीं व संसाराकडे ढुंकूनहि पाहात नाहीं व तो पाहणें शक्य नाहीं अशी पूर्ण खात्री झाल्यावर बोल्होबानें संसाराची जबाबदारी महाराजांच्या गळ्यांत अडकविली. अगदीं अल्पवयांत संसाराची जबाबदारी त्यांच्यावर पडली तरी त्यांनीं ती जबाबदारी हुशारीनें व आनंदानें पार पाडण्याचे प्रयत्न केले. वडिलांची योग्य ती देखरेख, व व्यवहाराबाबत त्यांच्याकडून वारंवार सूचनाही मिळत. अशावेळीं सावाजीनें कोणासही न सांगतां गृहत्याग केला. त्याचें एकंदर पूर्वचरित्र बापास माहीत होतें. त्यामुळें बोल्होबानें निश्चित ठरविलें कीं तो आतां परत येणार नाहीं त्याप्रमाणें सावाजीनें घर सोडल्यानंतर स्वत:च्या अस्तित्वाचा त्यानें थांगपत्ताहि कळूं दिला नाहीं. यावेळीं बोल्होबा उतारवयासलागले होते. पुत्रवियोगानें त्याचें मन संसारांतून परावृत्त होऊं लागलें. पूर्वजांच्या भक्तिसंस्कारानें त्यांना चांगलेंच वेढलें. त्यांच्या वागण्यांत व्यवहारापेक्षां परमार्थाच्या गोष्टी जास्त दिसूं लागल्या. यामुळें तुकाराम महाराजांस व्यवहारी शिक्षणाऐवजीं वडिलांकडून परमार्थाचेंच महत्त्व शिकविलें गेलें.

महाराजांच्या पूर्ववयांतील चरित्राकडे पाहिल्यास त्यांच्या ठिकाणीं मातृपितृभक्ति मोठ्या प्रमाणांत असली पाहिजे. कारण मातृपितृभक्तीचा जागता कळवळा त्यांच्या सुरवातीच्या अभंगांत प्रामुख्यानें आढळून येतो. परमेश्वर दर्शनासाठीं जगन्नियंत्या दयाघनाची प्रार्थना करतांना त्यांनीं मातेच्याच उपमेनें देवास हांका मारल्या. त्यांच्या एकंदर संतपणाचा, भक्तीचा व श्रेष्ठतेचा पाया मातृभक्तींतच होता. त्यांच्या ठिकाणीं जाज्वल्य स्वरूपांत मातृभक्ति निर्माण करणारी माता कनकाई ही अत्यंत श्रेष्ठ दर्जाची माता होती. त्या माउलीनें महाराज गर्भांत असतां श्वासाबरोबर भक्तीची पांखर घातली. तान्हेपणीं स्तनांतून त्यागरूपी दूध पाजलें व बाळपणीं पवित्र असे संस्कार केले, त्यामुळेंच हा जगद्वंद्य महात्मा निर्माण

होऊं शकला. ' एक माता जें करूं शकेल तें हजारों शिक्षकांस अगर गुरु म्हणून मिरवणारास करणें अशक्य आहे.'

कनकाईनें महाराष्ट्रांत भक्तीचा दीप पाजळविला व देहूमधील समताधर्म फडकविणाराकडे जगानें पाहात राहावें असें केलें. त्याचप्रमाणें पुण्यश्लोक जिजामाता हिनें श्रेष्ठ कार्य केलें. भारतांत शेंकडों वर्षें परसत्तेची तुफानी हवा मन मानेल तशी वहात होती. त्यामुळें स्वातंत्र्याची ज्योत पेटवली जाईल अशी आशा बुजत होती, अशा वेळीं ती ज्योत प्रथम पेटविण्याचें श्रेय जिजामातेनें घेतलें. कनकाईचा संसार म्हणजे सर्व भक्तिमय ! तिच्या पूर्वजांनीं भक्तीच्या जोरावर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत नवचैतन्य खेळविण्याचें अनेक प्रयत्न केले होते. त्या मागील एकंदर पुण्याईमुळेंच तिला संतश्रेष्ठास जन्म देण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. तद्वत् सूर्यवंशांतील अगणित वीरांनीं देशसेवा केली. त्या सेवेसाठीं त्यांनीं अनेकवार खडतर असा वनवास भोगला. कर्तव्यासाठीं व ध्येयासाठीं त्यांना परागंदा होण्याचे कित्येक प्रसंग आले. त्या अशा थोर घराण्यांतील पुण्याईची वारसदार जिजामाता ! तिनें प्रत्यक्ष रणांगण पाहिलेलें. परकीय सत्तेच्या प्रखर ज्वालांनीं महाराष्ट्र होरपळत असतां तें कठोर दृश्य तिनें अनेकवार प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलें त्या एकंदर प्रकारामुळें जिजामातेनेंहि गर्भांतच शिवरायास राष्ट्रभक्तीचें शिक्षण देऊन महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यास जन्म देण्याचें महान् पुण्य मिळविलें

जिच्या हातीं पाळण्याची दोरी । तीच देशाते उद्धारी ॥

शिवरायाच्या सर्व यशाची, कर्तबगारीची, अलोट धैर्याची, अनुपम शौर्याची, स्वराज्यस्थापनेची व राष्ट्रोद्धाराची खरी धनीण जिजामाताच होय. कांहीं लेखक शिवरायाच्या एकंदर सर्वश्रेष्ठ कार्याचें यश ओढूनताणून कोणाहि साधुवैराग्याच्या झोळींत टाकण्याचे प्रयत्न खुशाल करोत. अगर एखाद्या पोटभरू कारकुनाच्या लेखणीस बांधण्याचे प्रयत्न करोत ! परंतु निर्विकार मनानें सारासार विचार करून त्यांनीं गत इतिहासाच्या पोटांत शिरणें अत्यंत जरूर आहे, कारण कांहीं शतकांच्या पारतंत्र्याच्या दीर्घकाळांत हिंदुस्थानच्या पाठीवर कोणीच कर्तबगार व देशप्रेमी साधु संन्यासी जन्मला नसेल काय ? किंवा अशा संन्याशास कांहीं शतकांच्या काळांत

एकही कर्तबगार राजा शिष्य मिळवितां आला नाहीं काय ? इतिहासाच्या आधारावर सत्यपरिस्थितीचा विचार करतां त्या पडत्याकाळीं महाराष्ट्राच्या भाग्याचा रस्ता मोकळा करण्याचें श्रेष्ठ कार्य ह्या दोन मातांनीं सुपुत्रांस जन्म देऊन केलें हें मात्र खरें !

श्रीछत्रपति शिवाजी महाराज मोठे मातृभक्त होते. परमेश्वराइतकीच मातेच्या ठिकाणीं त्यांची श्रद्धा होती. ते मातेस आपली आराध्य देवता समजत याबाबत एक आख्यायिका आहे.

इ. स. १२९४ मध्यें देवगिरी (दौलताबाद) येथील यादवांचें राज्य बुडालें. महाराष्ट्र पारतंत्र्याच्या भयंकर यातना भोगूं लागला. सुमारें ३५२ वर्षांनीं शिवाजी महाराजांनीं तोरणा किल्ला घेतला व त्यावर स्वराज्याचें तोरण बांधलें. त्यामुळें महाराष्ट्रांत आशेचा प्रकाश पडूं लागला. शिवाजी महाराजांनीं स्वराज्यप्राप्तीची तपश्चर्या खडतर अशा व्रतानें आरंभिली. या तपश्चर्येस एक तप पुरें होत आहे, तोंच शिवाजीमहाराजांवर व स्वातंत्र्यावर संकट ओढवलें, विजापूरच्या बादशहाचा सरदार अफझुलखान पैजेचा विडा उचलून महाराजांस पकडण्यासाठीं निघाला. त्यानें वाटेंतील महाराष्ट्रांची पवित्र देवळें तुळजापूर व पंढरपूर भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला व महाराष्ट्रास हादरा दिला. अफझुलखानानें प्रतापगडावर महाराजांस कोंडलें. जणूं स्वराज्यरूपी बारा वर्षें उमरीचें बालक त्यानें कोंडलें म्हटलें तरी चालेल. अखिल महाराष्ट्र काळजीच्या चिंतेनें जळूं लागला. महाराजांनीं समयसूचकतेच्या जोरावर खानाशी प्रत्यक्ष भेटीचा घाट घातला. महाराजांचा हा धाडसी विचार इतरांस पसंत पडला नाहीं. कारण मुसलमानांची राक्षसी राजनीति, हिंदुबद्दलचा जागता द्वेष, महाराष्ट्रांतील सुमारें तीनशें वर्षांची वाढती राजतृष्णा, शिवाय अफझुलखान हा व्यक्तिशः अत्यंत दुष्ट व विश्वासघातकी ! या एकंदर गोष्टीमुळें महाराजांचे राजकारणीमंडळ काळजीत पडले. भेटीचा दिवस उजाडला. महाराज भेटीच्या तयारीस लागले. त्यामुळें सगळे हितचिंतक चितेच्या जाळ्यांत सांपडले. अनेकांनीं अनेक सल्ले देण्याचे प्रयत्न करून पाहिले. कांहीं महत्त्वाच्या सूचनाही करूं लागले. त्या सर्वांस महाराजांनीं निश्चयपूर्वक सांगितलें. तुम्ही काळजी करूं नका. मी खानाच्या भेटीस जातांना मातोश्रीस नमस्कार करीन.

त्यावेळीं आई आशीर्वादाचा जो श्वास माझ्यावर सोडील, तोच माझें सर्वस्वी रक्षण करील. त्यानच काय प्रत्यक्ष काळास भेटण्यास जाण्याची जरी पाळी आली तरी मातेचा आशीर्वाद तेथेंसुद्धां माझा सांभाळ करील. इतकी जाज्ज्वल्य मातृभक्ति ! तिच्या जोरावरच त्यांना स्वराज्य स्थापनेचें पूर्ण यश मिळालें. ' जो मातृभक्त नाहीं, तो राष्ट्रभक्त नाहीं. तो हरिभक्तहि नाहीं. सर्व यशाचें मूळ मातृभक्ति !

तुकाराम महाराज यांना परमेश्वर भक्तीचा मार्ग त्यांच्या मातृपितृ भक्तींतून सांपडला. असें त्यांच्या सुरवातीच्या अभंगावरून दिसत आहे.

मायबापें केवळ काशी । तेणें नच जावें तीर्थासी ॥
पुंढलीकें काय केलें । परब्रह्म उभे ठेलें ॥
तैसा होई सावधान । ह्रुदयीं धरीं नारायण ॥
तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥

श्रीक्षेत्र पंढरपूरची सुरवात पुंडलीकापासून झालेली आहे. त्या मातृ-पितृभक्तानें आईबापांच्या सेवेमुळें भगवंतास पंढरपूर क्षेत्रीं आणून उभे केलें व समाजास आईबापांच्या सेवेचा मार्ग दाखविला. आईबापांच्या सेवेंत सर्व तीर्थें सगळा धर्म व सर्व पुण्य संचय आहे श्रीनामदेव महाराज व त्यानंतर झालेल्या भागवत धर्मीय संतांनी आईबापांच्या सेवेस विशेष महत्व दिलें आहे.

बाप करी जोडी लेकराचे ओढी । आपली करवंडी वाळवून ॥
एकाएकी केला मिरासीचा धणी । कडिये वागवूनी भार खांदी ॥
लेववूनी पाहे डोळा अलंकार । ठेवा दावी थोर करूनियां ॥
तुका म्हणे नेदी गांजू आणिकांसी । उदार जिवासी आपुलिया ॥

० ० ०

नलगे मायेसी बाळें निरवावें । आपुल्या स्वभावे ओढे त्यासी ॥१॥
मज कां लागला करणें विचार । ज्याचा जारभार त्याचे माथां ॥धृ॥
गोडधड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥२॥
खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥३॥

त्याच्या दुःखें पडे आपण खापरीं । लाही तळीवरी होय जैसी ॥४॥
तुका म्हणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागों नेदी ॥५॥

आळविती बाळें । माते तें सुख आगळें ॥१॥
द्यावें आवडी भातुकें । पाहे निवे कवतुकें ॥धृ॥
लेववूनि अलंकार । दृष्टी करावी सादर ॥२॥
आपुलिये पदीं । बैसवूनि कोडे वंदी ॥३॥
नेदी लागों दिठी । उचलोनि लावी कंठीं ॥४॥
तुका म्हणे लाभा— । वारी घ्यावो पद्मनाभा ॥५॥

० ० ०

प्रीतीच्या तो कळवळा । जिव्हाळाचि वेगळा ॥१॥
बहु नेदी रडों माता । दुश्चित होतां धीर नव्हे ॥२॥

० ० ०

मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ती ॥१॥
देह विसरे आपुला । जवळीं घेतां शीण गेला ॥२॥

० ० ०

लागलिया मुख स्तना । घाली पान्हा माऊली ॥१॥
उभयतां आवडी लाडें । कोडें कोडें पुरतसे ॥धृ॥
मेळवितां अंगे अंग । प्रेमरंग वाढतो ॥२॥
तुका म्हणे जडभारी । अवघे शिरीं जननीचे ॥३॥

मातृपितृभक्तींतून त्यांना परमेश्वरी भक्तीचा मार्ग सांपडला व परमात्म्यासहि त्या हट्टानेंच आळविलें व आईबापाप्रमाणें त्यास भक्तीच्या मायेनें ओढलें.

धेनु चरें वनांतरीं । चित्त बाळकापें घरीं ॥१॥
तैसें करीं वो माझे आई । ठाव देऊनि राखे पायीं ॥२॥

० ० ०

माझी विठ्ठल माऊली । प्रेमपान्हा पान्हाइली ॥१॥
कुरवाळूनि लावी स्तनी । न वजे दूरी जवळूनी ॥धृ॥
केली पुरवी आळी । नव्हे निष्ठुर कोंवळी ॥२॥
तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥३॥

० ० ०

धांव घाली आई । आतां पाहतेस काई ॥१॥
धीर नाहीं माझे पोटीं । झालों वियोगें हिंपुटी ॥२॥
करावें शीतळ । बहु झाली हळहळ ॥३॥
तुका म्हणे डोई । कई ठेवीन हे पायीं ॥४॥

महाराजांच्या अभंगांत अशीं अनेक वचनें सांपडतात. त्यांच्या आधारावरून ते नि:सीम मातृपितृभक्त होते हें दिसून येतें. या भक्तीच्या द्वारेंच त्यांच्यांत दया, क्षमा, शांति, परोपकार वगैरे लोकोत्तर गुणांचा उदय झाला. मातृपितृ भक्तीच्या योगानें त्यांना प्रत्यक्ष परमेश्वरी दर्शनाचा दैवी हक्क लाभला.

वडिलांच्या मृत्यूनंतर लगेच मातेचा मृत्यु झाला. या वियोगानें त्यांचें मन संसारांतून उठलें व ते निराळ्या मार्गानें विचार करूं लागले, त्यांचा वडील भाऊ सावाजी यानें आपल्या अस्तित्वाचा पत्ता लागूं दिला नाहीं. सावाजीचा आदर्श त्यांच्या उदासीनतेमध्यें नित्य भर घालू लागला. त्यांना संसार निरस वाटूं लागला. भावाप्रमाणें आपणही सर्वस्वाचा त्याग करावा असे विचार वारंवार येऊं लागले. ते संसाराची जबाबदारी पार पाडीत होते परंतु आपण करीत आहों हेंच आपलें कर्तव्य नाहीं. यापेक्षां निराळे कांहीतरी आहे असें त्यांचें मन त्यांना ग्वाही देऊं लागले.

महाराजांनीं संसार सोडला व परमार्थ जोडला. याचीं कारणें अनेक लेखकांनीं आपल्या परी शोधली. त्यांत बहुतेकांनीं एका बाबतींत विशेष जोर दिला, दुष्काळ पडला. महाराजांचें दिवाळें निघालें, संसाराची दुर्दशा उडाली. अन्नान्न करीत डोळ्यादेखत घरांतील कांहीं माणसें मेलीं वगैरे लिहिलें आहे. कांहीं लेखकांनीं त्यांच्या गोठ्यांतील बैलांची संख्या दिली

व त्यांतील किती मेले तोहि नक्की आंकडा देण्याचा प्रयत्न केला. दुष्काळ पडला नसतां व संसाराची वाताहत झाली नसती तर महाराज संसारांतच राहिले असते असे अप्रत्यक्ष सांगण्याचा त्यांचा हेतु स्पष्ट दिसतो.

प्रियजनांचे मृत्यु, दुष्काळ, प्रलयकाळ, धर्म व देश यांवरील संकटें मनुष्याच्या मनावर परिणाम करूं शकतात. असल्या संकटापासून कोणताही मनुष्य भांबावून जातो हेंहि खरें आहे व त्यांतून वैताग निर्माण होतो, परंतु 'वैताग आणि वैराग्य' यांत जमीनअस्मानइतकें अंतर असतें. वैराग्य विचारांचें परिपक्व फळ! व त्यागाचें खरें दृश्य स्वरूप! वैताग प्रतिकूल परिस्थितीच्या हादऱ्यानें बदललेलें मन! व तें अल्पकाळच टिकूं शकतें.

शके १८५१-५२ मध्यें महाराष्ट्रभर मोठा दुष्काळ पडला होता. त्यानें देशाचा कानाकोपरा व्यापला होता. त्याचें स्वरूपही कठीण होतें असे इतिहास सांगत आहे. कठीण प्रसंगामुळें कित्येकांस प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यांस हव्या त्या ठिकाणीं सोडण्याचे प्रसंग आले असतील. जन्मदाते आईबाप अन्नान्न करीत प्राण सोडीत असतील. असले दुर्धर प्रसंग त्यांच्या दुर्दैवी मुलांस उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचे प्रसंग आले असतील बाडवडिलांनीं कमावलेली शेतीवाडी व गांव सोडून जातांना मालकीच्या घराचें दार लावण्याचेंहि भान कित्येकास राहिलें नसेल. स्वत:चा प्राण वांचविणें हेंच प्रत्येकाचें ध्येय ठरलेंहि असेल व त्यासाठीं दाहि दिशांना वणवण फिरत असतील. अशा दुर्धर प्रसंगांत अखिल महाराष्ट्र सांपडला होता. तो कठीण प्रसंग एकट्या तुकाराम महाराज यांच्यावरच नव्हता. मग या दैवी आपत्तीच्या ज्वाळांतून किती तुकाराम निर्माण झाले. दुष्काळ व एकंदर दैवी आपत्ति या देखाव्यामुळें महाराजांच्या ठिकाणीं उपजत असलेली धार्मिक व परोपकारी वृत्ति खडबडून जागीं होणें शक्य आहे. परंतु त्यांना खरें वैराग्य प्राप्त होण्यास त्या काळची एकंदर परिस्थिति विशेष कारणीभूत झाली असेल.

## देशस्थिति

या सुमारास मुसलमानांची राज्यतृष्णा दिवसेंदिवस वाढत्या मार्गानें पसरत होती. प्रत्यक्ष महाराष्ट्रांत व आसपासच्या प्रांतांत अनेक मुसल-

मानांचीं राज्यें निर्वेधपणें नांदत होतीं. परकीय सत्तेमुळें महाराष्ट्राची जणू कंबरच मोडली होती. तो फिरून उठून उभा राहूं शकेल अशी आशा फारशी दिसत नव्हती. खुद्द पुणें प्रांत हा विजापूरच्या बादशाहाचे ताब्यांत होता. विजापूरचा बादशाह प्रति अकबराचाच अवतार! त्यानें हिंदुंना आपल्या राज्यास पद्धतशीर जुंपलें होतें. अनेक सरदार, इनामदार, जाहगीरदार देशमुख व देशपांडे त्या परकीय सत्तेचा गाडा अगदीं स्वत्व विसरून समाधानानेंच नव्हे तर अहमहमिकेनें ओढीत होते. हिंदूंनीं वाढत्या बळानें आपणास मदत करावी म्हणून त्या धूर्त बादशाहानें मुसलमाना-ऐवजीं उच्चवर्णीय अशा अनेक हिंदूना अधिकारावर नेमले होते. त्यामुळें पसरलेली मुसलमानी सत्ता ही हिंदु व हिंदुधर्म यांचा प्राण राक्षसी वृत्तीनें गिळीत होती. परसत्तेच्या नांवावर झालेले हवे ते जुलूम सहन करण्याची हिंदूंना संवय झालेली होती. प्रतिकाराची इच्छाच मेली होती; कर्मठ खेड्यापाड्यांतून आपल्याच हिंदु बांधवांना धर्माज्ञेच्या नांवावर छळीत. मुसलमानी सत्ता त्याकडे अप्रत्यक्षपणें दुर्लक्ष करी. कारण वरिष्ठांच्या करड्या अमलामुळें खालच्या समाजांतील लोक धर्मांतर करीत. ते राज्यकर्त्यास हवेंच होतें. दुष्काळासारख्या दैवी आपत्तींत परकीय सत्तेनें मुद्दाम केलेली डोळेझांक व त्यामुळें लोकांची उडालेली भयंकर दुर्दशा पाहून फत्तरास सुद्धां पाझर फुटला असता. मग महाराजांचे ठिकाणीं उपजत असलेली धार्मिक भावना व परोपकारी वृत्ति कोणत्या वेगानें उसळली असेल याची कल्पना करणें शक्य नाहीं. त्यांच्या सात पिढ्यांतील पूर्वजांनी विठ्ठलभक्तीच्याद्वारें दयाधर्म जिवंत ठेवला होता. त्या सर्व पुण्याईनें महाराजांस जागृत केलें असेल. त्यांचें मन संसारांतून उठणें शक्य होते.

## वैराग्य

महाराजांस वैराग्य उत्पन्न होण्यास कदाचित् अनेक कारणेंहि असतील. परंतु मुख्य व महत्त्वाचे म्हणजे दुष्काळांत परसत्तेनें असंख्य गरीब जनतेकडे मुद्दाम केलेलें दुर्लक्ष व त्यामुळें झालेले लोकांचे भयंकर हाल! स्वतःच्या संसाराची वाताहात झाली म्हणून त्यांनीं संसारत्याग केला हें म्हणणें चुकीचें आहे. कारण इतर लोकांच्या मानानें त्यांची स्थिति

चांगली होती. दुष्काळानंतर त्यांना पूर्वपदावर जाणें कठीण नव्हतें. त्यांची देवघेव होती व जमीनही चांगली होती. याबाबतचे त्या काळचे कागदपत्र आम्ही त्यांचे वंशज बाबासाहेब इनामदार यांचेकडे पाहिले व ते कोणा-सहि पाहातां येतील. त्यावरून महाराजांची वडिलार्जित इस्टेट त्यांच्या-वेळीं चांगल्या प्रकारची होती. त्यांनीं त्या इस्टेटीकडे अगर संसाराबाबत कोणत्याच गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं व कोणाची मदतहि संसाराकरतां घेतली नाहीं. त्यामुळें त्यांच्या कुटुंबाचे व मुलाबाळांचे साधारण हाल झाले असतील. परंतु आजकालच्या कांहीं लेखकांची लेखणी सांगत आहे, किंवा कांहीं कीर्तनकार मनाच्या मापानें वर्णन करतात तशी स्थिति मात्र तेव्हां नव्हती.

' न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होते ।।धृ।।

हे त्यांचे उद्गार त्या एकंदर जनतेच्या दुःखास अनुसरून आहेत व या सर्व परिस्थितीवर उपाय शोधण्यासाठीं म्हणून त्यांनीं संसाराचा त्याग केला असेल. '**काय तुम्हीं येथें नसालसे झाले**' परमेश्वरासहि त्यांनीं विचारलें व परमेश्वरास जागे केल्याशिवाय ही परिस्थिति नाहींशी होणार नाहीं. परमेश्वरी शक्तीवाचून यावर दुसरा उपाय नाहीं, असें त्यांचें मन त्यांना सांगत असेल व त्याला प्रसन्न करणें हें आपणांस अशक्य नाहीं. कारण आपल्या पिढीतील आठव्या पूर्वजानें त्याला पंढरपुराहून येथें आणलें-मग आपणास काय अशक्य ? **तुका म्हणे देवा । जुन्हार हीं माझी सेवा । वंश परंपरा दास मी अंकीत ॥**' परमेश्वरभक्ति ही त्यांच्या घराण्याची खरी मिरासदारी होती. म्हणून त्यांनीं मनाची पूर्ण तयारी केली पुढील सर्व आयुष्य त्याच्या भक्तीसाठीं वेंचण्याचें त्यांनीं ठरविलें व परमेश्वरप्राप्तीसाठीं येणारी हवीं तीं संकटें सहन करण्याची पूर्ण तयारी केली. '**तुका म्हणे शूर झालों । बाहेर आलों संसारा ॥**' संसारी जीवनास स्वहस्तें त्यानी त्यागरूपी अग्नि लावला. त्या अग्नीच्या उजेडांत त्यांनीं जनहिताचा खरा मार्ग शोधला. संसारी जीवनाचा शेवट गांठून पर-हितासाठीं नवीन जीवन धारण केलें. '**रणीं निघतां शूर न पाहे माघारें । ऐसा मज धीर राख आतां ॥**' पूर्ण विचारांती वैराग्ययुक्त असे परसेवे-साठीं त्यांनी व्रत घेतलें आणि परमेश्वरा,या खडतर व्रतांतून मला पार पाड,

धैर्य दे व माझा सांभाळ कर असे प्रार्थिलें. यावरून हेंच स्पष्ट होत आहे कीं, संसारीं सुख नाहीं म्हणून नाइलाजास्तव ते भक्त झाले नाहींत तर पूर्ण विचारांती त्यांनीं वैराग्याची कांस धरली.

महाराजांचा त्याग, भक्ति व असामान्य साधुत्व यांची प्रभा महाराष्ट्रभर फांकली. महाराष्ट्रांतील सर्व दर्जाचे लोक त्यांचेकडे येऊं लागले. त्यांच्या चरणाजवळ लक्ष्मीनें आपलीं अनेक बालकें निरनिराळ्या प्रकारांनीं पाठविलीं. खुद्द शिवाजी महाराजांनीं त्यांच्या योगक्षेमासाठीं मोठी देणगी पाठवली, पण या महात्म्यानें त्या सर्व गोष्टीवर आपली नुसती नजर सुद्धां फिरविली नाहीं. यानंतर शिवाजी महाराज अगर समाजांतील कोणाहि लहानमोठ्या व्यक्तींच्या असल्या गोष्टी कानानें सुद्धां ऐकून घेण्याचेंहि केलें नाहीं. कारण काय तर "**बुडति हे जन पाहवेना डोळां म्हणून येतो कळवळा तारावयासी ॥**" या एकाच तत्त्वासाठीं त्यांनीं उभें आयुष्य परमेश्वरभक्ति व जनहित यांत खर्च करण्याचा निर्धार केला होता. त्यांनीं समाजाच्या निरंतरच्या उपयोगासाठीं जी अमोल अभंगवाणी करून ठेवली त्या शक्तीचें मूळ, ज्या दिवशीं संसार सोडला त्याच वेळीं त्यांच्या हातीं लागलें. केवळ परहितासाठीं विचारपूर्वक निग्रहानें संसार सोडला व वैराग्य धारण केलें.

# भक्ति

झुंझायच्या गोष्टी ऐकतांची सुख । करितां हें दुःख थोर आहे ।।
तैसी हरिभक्ति सुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।।

(तु. म.)

तुकाराम महाराज यांच्या घराण्यांत भागवतधर्मीय संताबद्दल अत्यंत आदर होता. त्यांच्या अभंगावर व शिकवणूकीवर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. श्रीनामदेव महाराजांच्या अभंगामुळेंच विश्वंभरबोवांनीं पंढरपूरची वारी सुरु केली होती व भागवत धर्माचें अनुयायीत्व पत्करलें होतें. बापाकडून महाराजांस सर्वच भागवतधर्मीय संताबद्दलची माहिती मिळाली होती. संतांची शिकवण महाराजांच्या मनावर चांगल्या प्रकारें बिंबविली होती. संताबद्दल त्यांच्या मनांत पूर्ण आदर व श्रद्धा निर्माण केली होती. संतांचा आदर्श महाराजापुढें बोल्होबांनीं चांगल्या प्रकारें ठेवला होता.

महाराजांनीं संसारत्याग केला, परमार्थाचा मार्ग धरला, परंतु मागील संतांनीं जो मार्ग धरला होता त्याच भक्तीपंथानें जाण्याचें निश्चयपूर्वक ठरविलें. भागवतधर्मीय सर्वच संतांनीं संसार केला. बायकापोरांची ओळख ठेवली. फक्त त्यांत इतर संसारी जीवांसारखें गुंतून राहिले नाहींत. संसारांत असतां परमेश्वर त्यांच्या खऱ्या भक्तीमुळें त्याना त्यांच्या घरीं भेटला. इतकेंच नाहीं तर आपल्या मूळ पुरुषानें संसारी घरांत पंढरपूरच्या विठोबास येणें भाग पाडलें. वगैरे विचारानें त्यांनीं संसारांत राहून भगवंतास पाहण्याचा निश्चय केला व ते भक्तीच्या मार्गास लागले.
"प्रत्येक अवतारी पुरुष हा स्वतःच्या पूर्वजांचा प्रतिनिधिरूप असतो."

(स्वा. विवेकानंद सं. ग्र. खं. ४था)

या वेळीं देहू गांवचें क्षेत्रमहात्म्य वाढत होतें. आसपासचे लोक देहूस येऊन इंद्रायणीचें स्नान करून भक्तीभावानें विठ्ठलाचें दर्शन घेत.

प्रत्येक एकादशीस गर्दी जमत असे. हें दृश्य पाहून महाराजांच्या मनांत धार्मिक भावना उचंबळत. आपल्या पूर्वजांनीं या गांवास क्षेत्राचें महत्त्व आणलें, आपल्यासाठीं भक्तीचा वृक्ष लावला वगैरे विचारानें त्यांना सात्विक स्वाभिमान वाटे. वाडवडिलांनीं भक्तिमार्गानें जाण्यासाठीं बरीच कमाई करून ठेवली. आपणहि त्याच मार्गानें गेलें पाहिजे. त्यांनीं भक्तीरुपी तपश्चर्या सुरू केली. ही पूर्वजांपेक्षां जास्त कडक भासूं लागली. त्यांच्या मनानें ज्या दिवशीं संसारत्याग करण्याचें ठरविलें, त्या दिवसापासून त्यांनीं स्वत:करितां अगर बायकोपोरासाठीं कांहीं एक करावयाचें नाहीं असें निश्चयपूर्वक व्रत घेतलें, संसाराचा भार परमेश्वरावर पूर्णपणें टाकला व ते भक्तिमार्गास लागले. ससारास सर्वस्व मानणाऱ्या जिजाबाईला त्यांचें हें करणें उदासवाणें वाटूं लागले. तिनें स्वत: प्रयत्न केलें. नंतर बापाकडून व इतर आप्ताकडून महाराजांना संसारांत परत अडकविण्याचें प्रयत्न करून पाहिले पण ते सर्व वायां गेले. आतां या संसाराचे पाश नकोत व ते पाश फक्त परमेश्वर कृपाच तोडूं शकेल, या भावनेनें ते भक्तिमार्गास लागले.

## आरंभ

एका बीजा केला नास । मग भोगिलें-कणीस ॥  
लाभ नाहीं फुकासाठीं । केल्याविण जीवासाठीं ॥  
तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥

घरांत राहणें, बायकोमुलाकडे पाहणें आप्तेष्टांची ये–जा यामुळें नकळत ससारी पाश जवळ येणें हें त्यांच्या तात्काळ लक्षांत आलें. म्हणून त्यांनी दिवसा गृहत्याग करावा. सायंकाळीं नियमानें घरीं यावें व रात्रीं भजन करावें. असें आरंभी कांहीं दिवस त्यांचें वागणें असे. नतर एखादा दुसरा दिवस रानांत कोठेंतरी एकांतांत राहावें व नंतर घरीं यावें असे कांहीं दिवस गेल्यानंतर त्यांना संसाराबद्दल पूर्ण उदासीनता भासूं लागली.

संसाराच्या तापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥१॥  
म्हणवूनी तुझे आठवले पायें । येवो माझे माये पांडुरंगे ॥धृ॥  
बहुता जन्मींचा झालों भार वाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥२॥

वाढियेलों चोरी अंतर्बाह्यात्कारीं । कवण न करी कोणी माझी॥३॥
बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दीस जालों कासाविस ॥४॥
तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा॥५॥

× × ×

देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगे वारावार करोनि ठेवी ॥१॥

× × ×

पंचमहाभूतांचिये सांपडलों संधी । घातलेंसे बंदी अहंकारें ॥१॥
आपुल्या आपण बांधविला गळा । नेणेचि निराळा असतांही ॥ध्रु॥
कासया हा सत्य मानिला संसार । कां हे केले चार माझे माझे॥२॥
कां नाहीं शरण गेलों नारायणा । कां नाहीं वासना आवरिली॥३॥
किंचित सुखाचा धरिला अभिलाष । तेणें बहु नाश केला पुढें ॥४॥
तुका म्हणे आतां देह देऊं बळी । करोनि सांडू होळी
संचिताची ॥५॥

फळकट हा संसार । यथें सार भगवंत ॥

× × ×

दुःखबांदवडी आहे हा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ॥

× × ×

सव संगीं वीट आला । तूं एकला आवडसी ॥१॥
दिली आतां पायीं मिठी । जगजेठी न सोडी ॥२॥

## संसाराचें पिंडदान

जिजाईचे सर्व प्रयत्न संपले. आप्तस्वकीयहि आपल्या संसारी चष्म्यांतून महाराजांस वेडसर समजूं लागले. गावांतील लोकहि त्यांच्याबाबत लक्ष देईनासे झाले. महाराज आपलें ध्येय आपल्या मनानें आक्रमीत होते. घरांत गले पंधरा दिवस आले नाहीत. जिजामाता काळजी करूं लागली.

तिनें कान्होबास त्यांच्या तपासास पाठविलें.त्यांचीं सर्व ठिकाणें पाहिलीं. ते सांपडले नाहीं.कान्होबा निराश होऊन घरीं परतले,इतक्यांत त्यांना माहिती मिळाली कीं महाराज भंडाऱ्या डोंगरावर आहेत.भंडाराडोंगर हा देहूपासून तीन मैल लांब आहे.त्या ठिकाणीं पूर्वीच्या त्यागी लोकांच्या गुहाहि आहेत. डोंगरावर पाण्याची सोय आहे हल्लीहि अनक लोक त्या ठिकाणीं गाथ्याचे पारायणासाठीं बसतात. एका निवांत स्थानांत महाराज बसलेले कान्होबास दिसले.त्यांनीं घरीं चालण्यास त्यांना सांगितलें.पण त्यांनीं साफ नकार दिला. शेवटीं कान्होबानें हट्टच धरला म्हणून ते उठले.गांवाजवळ आले व इंद्रायणी नदीच्या पैलतीरावर बसले.कान्होबास म्हणाले,"आपल्या घरीं सावकारीची खतपत्रें आहेत तीं घेऊन ये." कान्होबानें त्याप्रमाणें खतपत्रें आणलीं. तीं सर्व त्यांनीं हातांत घेतलीं व ते कान्होबास म्हणाले,"कान्होबा,हा संसारांतील लोभाचा पाश आहे तो मी आज तोडतो.म्हणजे हीं सर्व खतपत्रें इंद्रायणीस अर्पण करून मोकळा होतो." कान्होबा म्हणाले, "आपण संसार सोडला, भक्तिमार्ग धरला पण माझा संसार अद्याप होणें आहे. आपण तसें करूं नये." महाराजांनीं कान्होबाच्या हिश्याची निम्मी खतपत्रें त्यांच्या स्वाधीन केली. निम्मी खतपत्रें स्वहस्तें इंद्रायणीच्या पाण्यांत बुडविली व तेथेंच निर्विकार मनानें ते बसून राहिले. कान्होबा घरीं गेले, त्यांनीं घडलेली हकीकत जिजाबाईला सांगितली. जिजाबाईला खतपत्रें पाण्यांत गेलीं याचें दुःख न होतां महाराज आलें हाच विशेष आनंद झाला. तिनें स्वतः इंद्रायणीच्या काठीं जाऊन महाराजांस घरीं आणलें.

"जनसेवा करावी या हेतूनें जो कोणी पुढें सरसावतो त्यानें आपलीं सुखदुःखें, आपली ऐहिक संपत्ति, कीर्ति इत्यादिकांचें गाठोडें बांधून तें प्रथम समुद्रांत झुगारून द्यावें आणि नंतर परमेश्वरापुढें उभें राहावें."

(स्वा. विवेकानंद सं. ग्र. खंड ११ वा न्यूयार्क २१ मार्च १८९५)

महाराजांनीं सावकारीचीं खतपत्रें पाण्यांत टाकणें हा त्यांचा त्याग म्हणजे' संसाराचें पिंडदान स्वहस्तें करणें होय.' जो स्वतःचा संसार सोडतो तोच जगकल्याण करूं शकतो. अशा अनेक उदाहरणानें धार्मिक इतिहास भरलेला आहे व हें अनादि सिद्ध तत्त्व आहे.

'तुका म्हणे जो या संसारा रुसला । तेणें ठाकिला सिद्ध पंथ ॥'

श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या चरित्रांतहि प्रामुख्यानें हेंच दिसत आहे. परमहंस हे द्रव्याचा स्पर्श आपल्या हातास होऊं देत नसत. हें महान् तत्त्व त्यांनीं अगदीं आत्मसात् केलें होतें. परमहंस या बाबतींत अगदीं जीतेंद्रिय आहेत अशी त्या काळीं सर्वत्र प्रसिद्धि होती. त्यांचीहि परीक्षा घेण्याचें धाडस त्यांच्या नित्य सहवासांतील एका भक्तानें केलें. परमहंस गाढ झोपेंत होते. त्यांच्या हातावर एक रुपया त्यानें ठेवला. रुपया ठेवतांच त्याचा स्पर्श हातास सहन झाला नाहीं. त्यामुळें रुपया खालीं पडला. हा प्रयत्न त्यानें दोनतीन वेळेस करून पाहिला. प्रत्येक वेळेस रुपया खालीं टाकला गेला. भक्तास आपल्या कृतीचा पश्चात्ताप झाला, 'धन्य ते परमहंस व धन्य त्यांची शक्ति !' या बळावरच त्यांनीं आपल्या एका शिष्याकरवीं सनातन सत्य धर्माचीं तत्त्वें पृथ्वीच्या पाठीवर झटक्यासरशी पसरविलीं. भगवान बुद्धानें राज्य सोडलें, धनसंपत्तीचा पूर्णपणें त्याग केला. परमेश्वर भेटीसाठीं अरण्यवास पत्करला. म्हणूनच त्यांनीं स्थापन केलेल्या बुद्धधर्माचीं तत्त्वें पृथ्वीच्या पाठीवर मोठ्या प्रमाणात जिवंत आहेत. भगवान येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांस निक्षून सांगत. "तुला परमेश्वर दर्शन पाहिजे असेल तर तुझ्याजवळील असेल नसेल तें सर्व गरिबांस वाटून नंतर माझ्याकडे ये" तुकाराम महाराजांनीं परमेश्वरप्राप्तीसाठीं भक्ति हें औषध घेऊन द्रव्यास स्पर्श न करणें हें पथ्य सांभाळलें. म्हणूनच त्यांच्या हातून जनोद्धाराचें महान् कार्य झालें.

आशा हे समूळ खणोनि काढावी । तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें ॥१॥
नाहीं तरि सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं न ये २॥
आशा मारूनियां जयवंत व्हावें । तेव्हांचि निघावें सर्वांतूनि ॥३॥
तुका म्हणे जरी योगाची तांतडी । आशेची बाबुडी करीं आधीं ॥४॥

जे पैशांसाठींच संसार करतात पैसा हेंच जीविताचें सर्वस्व मानतात व त्यासाठीच जगतात. अशांना सुद्धां द्रव्यामुळें सुख लाभत नाहीं. मनुष्यप्राणी सोन्यासाठीं आपलें अमोल आयुष्य मातीमोल करतो. जें द्रव्य मनुष्यास संसारांतील सुख शेवटपर्यंत मिळूं देत नाहीं तें द्रव्य साधुसंतास

परमेश्वरप्राप्तीचें सुख कसें प्राप्त होऊं देईल. महाराजांनीं नदींत खतपत्र टाकल्यानंतर पैसा अगर पैशासंबंधीचा कागद अगर कोणतेंहि द्रव्य याचा स्पर्श हातास होऊं दिला नाहीं.

## शिळा विटाळली.

धन्य देहूगांव पुण्यभूमी ठाव । तेथें नांदें देव पांडुरंग ॥१॥

धन्य क्षेत्रवासी लोक दैवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ॥२॥

देहूगांवचें महाराजांनीं वर्णन केलें आहे. कारण त्याकाळीं महाराष्ट्रांतील बहुसंख्य लोक देहूस विशेष महत्व देत होते. महाराजांनीं वैराग्य धारण केल्यामुळें देहूच्या महत्त्वांत विशेष भर पडूं लागली. त्यामुळें जनता देहूगांव व महाराजांचें दर्शन याकडे ओढली जाऊं लागली. श्री शिवाजी महाराज यांचें आरंभीचें वास्तव्य पुणें प्रांतांत होतें. आईकडून त्यांना राष्ट्रप्रेमांबरोबरच धर्मप्रेमाचेहि धडे विशेष प्रकारें दिले गेले. जिजामातेकडून त्यांना देहूचे महत्त्व अनेकवार सांगण्यांत आलें होतें. तुकाराम महाराजांची वाढती कीर्ति त्यांच्या कानावर वरचेवर येऊं लागली. त्यामुळें ते महाराजांच्या दर्शनासाठीं देहूस वारंवार येत. त्यांच्या भजनाचा व उपदेशाचा फायदा घेत. अशा श्रेष्ठ संतांची आपणास कांहीं सेवा घडावी या पवित्र उद्देशानें शिवाजी महाराजांनीं कांहीं संकल्प केला. सोन्याच्या ताटांत मोहरा भरल्या व देहू येथें महाराजांस अर्पण करण्यासाठीं आले. महाराज गांवांत नव्हते. गांवाजवळील करंजाईच्या वेटांत एका दगडी शिळेवर डोळे झांकून भजनांत गुंग होते. देहाचें भान विसरून नामस्मरणांत तल्लीन असतां महाराजांनीं आणलेलें ताट त्यांच्या समोर त्याच शिळेवर ठेवलें. दूर उभे राहून संतदर्शनाचा लाभ घेऊं लागले. महाराजांचें भजन आटोपलें. त्यांनीं डोळे उघडले तों समोर सोन्याचें ताट व त्यांत मोहरा ! हें दृश्य पाहून त्यांना दुःख झालें. ते तेथून निघाले. त्या शिळेकडे अगर त्या ताटाकडे फिरून पाहिलें नाहीं. माझी भजन करण्याची शिळा द्रव्याच्या स्पर्शानें विटाळली असे ते म्हणाले. नंतर त्या शिळेस त्यांनीं स्पर्श केला नाहीं. ती दगडी शिळा करंजाईच्या बेटांत हल्लीं आहे. भाविक यात्रेकरूस दाखविण्यांत येते. याबाबत आम्ही तुकाराम महाराजांचे वंशज

यांजकडे मुद्दाम चौकशी केली. त्यांनीं सांगितलेली ही हकीकत आमच्या घराण्यांत खरी मानली जात आहे.

## जिजाबाईची योग्यता.

महाराज भजनासाठीं घर सोडून कोठेंही रानावनांत बसत. अन्नपाण्याची त्यांना पर्वा नसे अशा वेळीं जिजाबाई त्यांना दुपारची भाकरी पोहोचती करी. मुलेंबाळें लहान नि त्याचें काम म्हणून दुसरे कोणी भाकरी नेण्यास तयार नसत. शिवाय महाराजांचे रानांतील बसण्याचें स्थान निश्चित नसे. माता जिजाई, घरांत असेल ती रुखीसुखी भाकर घेऊन त्यांच्या तपासासाठीं निघे. कांहीं प्रसंगीं दिवसभर रानांत भटकूनहि महाराजांची भेट होत नसे. आज महाराज भेटणें शक्य नाहीं. अशी मनाची पक्की खात्री झाली म्हणजे निरुपायास्तव ती घरीं येई. घरांतून निघतांना अन्नास स्पर्श न करितां ती निघे. महाराजांस भाकरी पोहोचती केल्यानंतर मग ती अन्नग्रहण करी. आरंभीचे दिवसांत महाराजांस भाकरी पोहोंचती करणें हें तिनें आपलें पवित्र कर्तव्य मानलें होतें. त्यासाठीं तिनें संसाराकडे लक्ष दिलें नाहीं कीं, पोराबाळांच्या होणाऱ्या अव्यवस्थेची पर्वा केली नाहीं. संसा ` चालविण्याच्या बाबतींत तिला दुसऱ्या कोणाची मदत नव्हती अशा परिस्थितींत होणारे हाल व त्रास यांची पर्वा न करितां सुरवातीस महाराजांची तिनें अत्यंत काळजी घेतली नसती तर कदाचित् ते संतच झाले नसते. आरंभी त्यांची चोहोंकडून उपेक्षा होई. त्यांनाहि स्वतःच्या देहाची पर्वा नसे. अशा त्या काळीं या मातेनें पतिव्रताधर्माच्या ज्योतीवर त्यांना भावी मार्गानें जाण्यास खरी मदत केली.

वडिलार्जित सावकारीचीं खतपत्रें महाराजांनीं पाण्यांत बुडवून संसाराची वाताहत केली. कारण त्यांनीं जरी सावकारीकडे लक्ष दिलें नसतें तरी कुळांनीं आपण होऊन पैसे आणून दिले असते. त्या काळची सावकारी अत्यंत प्रामाणिकपणानें, पावित्र्यानें केली जात असे. त्या काळचे सावकार आजकालच्या कांहीं सावकारासारखे राक्षसी वृत्तीचे नव्हते. कुळाच्या मुलाबाळांचें रक्त पिऊन समाधान झालें नाहीं तर त्यांच्या घरादाराचें ते वाटोळें करीत नसत. न्यायाचे सहाय्यकर्ते म्हणून नीतीला कायद्याच्या कात्रीनें कातरणारे बुद्धिजीवी लोकहि त्या काळीं नव्हते. त्यामुळें कुळें

आपल्याकडील देणें इमानेंइतबारें परत करीत. सावकाराचें देणें या जन्मीं दिलें नाहींतर पुढील जन्मीं फेडावें लागेल. कर्ज म्हणजे नरकवास; त्यांतून मुक्त झालेंच पाहिजे अशी सर्वत्र भावना होती. अशा त्या काळांतील सावकारीचे कागद आपल्या नवऱ्यानें नदींत टाकले त्यामुळें मुलेंबाळें उघडीं पडलीं वगैरे विचार जिजाबाईला येणें शक्य होते. पण या बाबतींत तिनें नवऱ्याचा कोणत्याहि प्रकारें तिरस्कार केला नाहीं; अगर एक शद्बहि ती बोलली नाहीं. हीं खतपत्रें बुडवून टाकल्याची गोष्ट प्रत्येक चरित्रकार कबूल करतात. त्याबाबतींत जिजाई रागावली नाहीं अगर महाराजांस टाकूनहि बोलली नाहीं हा महत्त्वाचा भागहि ते कबूल करतात. मग जिजाबाई खट्याळ होती, कर्कशा होती, रागीट असूनहि तोंडाची फटकळ होती वगैरे तिच्या बाबतचें वर्णन काय आधारावर केलें जातें? कारण जिजाबाईच्या दृष्टीनें खतपत्रें नदींत टाकण्याइतकी दुसरी मोठी चूक महाराजांकडून कोणतीहि झाली नाहीं. मग जिजाई त्यांच्यावर रागावत असें हें कोणत्या आधारावर ते म्हणतात?

दुष्काळाचें खरें स्वरूप व त्याचा प्रताप हा फक्त शेतकऱ्यांसच माहीत. इतरांस त्याची कल्पना येणें शक्य नाहीं! एक वर्षाचा दुष्काळ अनेक वर्षें शेतकऱ्यांस सुधारू देत नाहीं. दुष्काळ संपल्यानंतर तर महाराजांनीं संसाराचें दर्शनहि घेतलें नाहीं. त्यामुळें जिजाबाईची शेतीच्या बाबतींत कोण ओढाताण झाली असेल? तरी संसार करतांना महाराजांनीं तिला कांहीं सांगितलें तर ती प्रत्येक आज्ञा तंतोतंत पाळीत असे. तिच्याकडून त्याचें उल्लंघन झाल्याचें एकहि उदाहरण कोणी सांगू शकणार नाहीं. घरांत गाडग्यामडक्यांचा संसार, मुलेंबाळें उघडीं, कांहीं प्रसंगी तिचा पूर्ण निरुपाय होई. अशी संसाराची उडालेली दुर्दशा! अशा प्रसंगीं शिवाजी महाराज यांनीं तिच्या संसारासाठीं मदत व्हावी म्हणून धनद्रव्य कपडा लत्ता वगैरे पाठविले. परंतु नवऱ्याच्या सांगण्यावरून जिजाईनें ते सर्व परत केलें. त्या परधनाचा विटाळ आपल्या फाटक्या संसारास होऊं दिला नाहीं. संसारांत प्रतिदिनीं निर्माण होणारीं संकटें, मुलाबाळांचा सांभाळ, महाराजांची काळजी, त्यांची आज्ञा व्रतासारखी पाळणें, अशा अनेक तापामुळें त्या माऊलीकडून सात्विक संतापामुळें कांहीं प्रसंगी राग दाख-

विला जाणें शक्य आहे. अशा एखाद्या साधारण गोष्टीचा मोठा वृक्ष अनेक लेखकांनीं उभा केला आहे. त्याला जिजाईच्या खाष्ट स्वभावाची नसतीं फळें लटकविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे

अनेक चरित्रकारांनीं लिहिलें कीं जिजाबाईला विठ्ठलभक्तीचा मोठा राग असे इतकेंच नाहीं तर ती विठ्ठलास शिव्याहि देत असे. इतकें खोटें लिहिण्याचें धाडस केले परंतु या महत्वाच्या प्रश्नाचा विचार चिकित्स-कतेच्या आधारें करणें अत्यंत जरूर आहे. त्याकाळच्या परिस्थितीनुरूप तिचें लग्न वयाचे आठव्या अगर नवव्या वर्षी झालें असेल.अशा कोंवळ्या वयांत ती देहू येथें सासरी आली असेल. त्यावेळीं देहूचें सर्वच वातावरण विठ्ठलमय होतें. या गोष्टीस सर्वस्वी कारण तिचें सासरचें घराणें. तिच्या खुद्द राहत्या घरांत विठ्ठलमूर्ति ! सासूसासरें विठ्ठलभक्त ! तिच्या समक्ष त्यानीं पंढरपूरच्या अनेक वाऱ्या केल्या असतील. अशा त्या पवित्र वातावरणाचा जिजाईच्या बालमनावर कांहींच परिणाम झाला नसेल ? स्त्रियांचा जन्मजात स्वभाव धार्मिक असतो. त्या तत्वास अनुसरून जिजा-बाई विठ्ठलभक्त नव्हती असें लिहिलें गेलें हा प्रश्न विचार करण्या-सारखा आहे. कांहींनी असा शोव लावला कीं ती मंगळाई नांवाच्या देवीची भक्त होती तो मंगळाई कोणत्या देवळांतील अगर गांवांतील याचा तपास लेखकांनीं केला नाहीं. तिच्या नावावर यांनीं नेमकें एकच चार ओळीचें काव्य केलें व तें तिच्या तोंडांत कोंबण्याचाहि प्रयत्न केला. ह्या त्यांचा हेतु शुद्ध नसला पाहिजे असे मोठ्या खेदानें व दुःखानें म्हणावें लागत आहे.

तुकाराम महाराज यांनीं आपले अभंग कोणत्या वेळीं व कोणत्या प्रसंगासाठीं केले असतील हें त्या महात्म्यासच माहीत.त्याबाबत विचार करून स्वमत प्रदर्शित करणें हें सामान्य व्यवहारी मनुष्याच्या शक्ती-बाहेरचे आहे. परतु अनेकांनीं तसे प्रयत्न केले व आजहि सुरू आहेत.

पांगारकरांनीं स्वतःच्या तुकारामचरित्र पुस्तकांत पान ८१ वर खालील अभंग घेतला आहे.

बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥१॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संसार ॥धृ॥

बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें
बरें जाले जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥३॥
बरें झालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों शरण तुज देवा४॥

यांत संसारांतील दुःखें दाखवितांना बायकोचाहि उल्लेख त्यांनीं केला. परंतु पहिली बायको दमेकरीण असल्यामुळें लहान असतांच ती वारली. तिनें सासूसासरे अगर सवत यांच्याशीं भांडण केल्याचेंहि कोणी सांगत नाहीं. मग बाईल 'कर्कशा' हें विशेषण जिजाबाईलाच लावण्याचा पांगारकरांचा असत्य प्रयत्न दिसतो. कारण त्याबाबत त्यांनीं स्पष्ट असा खुलासा केलेला नाहीं. तुकाराम चरित्राबाबत देहू येथील महाराजांच्या वंशजाकडील कागदपत्र पाहिल्याचें पांगारकर सांगतात. शिवाय त्यांनीं लिहिलेल्या महाराष्ट्र वाङ्मयाचा इतिहास खंड २ मध्यें ते तुकाराम-महाराजांच्या हस्ताक्षराची खात्री करून घेतली असें स्पष्ट लिहितात. तुकाराम महाराज यांच्या हस्ताक्षराची (अभंगाची) फक्त एकच वही त्यांच्या वंशजाकडे आहे. याशिवाय दुसरा कोणताहि कागद नाहीं. पांगारकरांनीं वर तुकाराम चरित्रांत जो अभंग दिला तशा स्वरुपाचा अभंग त्या वहींत आहे तो आम्हीहि समक्ष पाहिला. तो अक्षरशः पुढील प्रमाणें आहे.

बरें झालें देवां निघालें दिवाळें । बरीया दुष्काळें पीडा केली ॥१॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संसार ॥२॥
बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरेंगुरें ॥३॥
बरें जालें नाहीं धरिली लोक लाज । बरा आलों तुज शरण देवा॥४॥
बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥५॥
तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासीं जागरण ॥६॥

पांगारकरांनीं अभंग घेतला त्यांत तिसऱ्या चरणांत 'बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥' हें तुकाराम महाराजांच्या हस्ताक्षराच्या वहींत नाहीं. पांगारकरांनीं कोणत्यातरी छापील गाथ्यां-तून तो अभंग घेतला असेल व त्या चरणावर त्यांनीं जिजाईचें स्वभाव–

चित्र लिहितांना तिला अनेक नांवें ठेवलीं व इतर अनेक लेखकांनींहि तसेंच केलें. पांगारकर हे स्वतःस हरिभक्त समजत, तुकाराम महाराज यांच्या ठिकाणीं माझी अनन्यभक्ति आहे. असें त्यांनीं बऱ्याच ठिकाणीं लिहिलें. म्हणून तुकाराम महाजांसाठीं तरी जिजाबाईबद्दलचा खरा आदर बाळगणें त्यांचें पवित्र कर्तव्य होते. त्यांनीं मूळ छापील वहीतील अभंग घेणें जरूर होतें. व समाजापुढें तो प्रश्न चांगल्या प्रकारें मांडणें जरूर होतें. त्याप्रमाणें त्यांनीं केलें असतें तर समाजावर त्यांचे एक प्रकारें उपकार झाले असते.

८२९६

कै. पांगारकरांनीं खरा अभंग प्रसिद्ध करण्याचें पवित्र कर्तव्य तर केलें नाहींच पण जिजाबाईबद्दलचा पूर्ण सूड उगविण्याचा प्रयत्न केला असें पुढील हकीकतीवरून दिसून येईल. चरित्राच्या माहितीसाठीं देहूस कांहीं दिवस आमचा मुक्काम असतां हल्लीचें तुकाराम महाराजांचे वंशज श्री. हरिभक्त बाबासाहेब यांचेकडून पुढीलप्रमाणें हकीकत समजली. पांगारकरांचा मुक्काम देहूस असतां त्यांनीं महाराजांच्या हस्ताक्षराची वही ही माझ्याकडे देणें म्हणजे मी ती एखाद्या मोठ्या संस्थेस देईन अगर मी तिचा चांगल्या प्रकारें उपयोग करीन असा बाबासाहेबांच्या मातोश्रीस आग्रह केला होता. पण उपयोग झाला नाहीं. बाबासाहेब अज्ञान होते. त्यांच्या इस्टेटीची देखरेख पुण्याच्या कलेक्टरसाहेबांकडे होती. पांगारकर कलेक्टरसाहेबांस भेटले. त्यांच्याकडून बाबासाहेबांच्या मातोश्रीस भीड घातली. कलेक्टरसाहेब यांनीं स्वतःहि आग्रह केला. परंतु बाबासाहेबांच्या मातोश्रीनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें, 'ही वही म्हणजे आमच्या घराण्यांत प्रसाद समजला जातो. आमच्या अनेक पूर्वजांनीं ह्या वहीस जिवापलीकडे जतन केलें आहे. वाटेल तें झालें तरी वही देणार नाहीं. ही वही माझ्या वाड्यांतून गेली कीं, आमच्या घराण्याचें सर्वस्व गेले असें मी समजेन."

देहू येथें यात्रेनिमित्त येणारे लाखों भाविक ह्या पवित्र वहीचें दर्शन घेतात. महाराजांचें हस्ताक्षर पाहण्यास मिळालें आपल्या डोळ्याचें पारणें फिटलें असें ते मानतात व आनंदानें परत जातात. इतर भाविकांसहि ते तसें सांगतात. अशा पवित्र स्थानांतून ही अभंगाची वही

काढून बुद्धीलाच सर्वस्वी महत्व देणाऱ्या लोकांसाठीं नेण्याचा पांगारकरांचा हेतु कितीहि पवित्र असला तरी माझ्यासारखा अल्पमतीचा साधारण शेतकरी हेंच सांगेल कीं तुकाराम महाराजांच्या नांवावर जिजाबाई कर्कशा होती वगैरे जीं बनावट विशेषणें लावलीं गेलीं आहेत तीं कायम ठेवलीं जावीत असाहि पांगारकरांचा त्यांत हेतु असावा. तुकाराम भक्तांस लेखकाची नम्र विनंती आहे कीं, आपणास ज्यावेळीं शक्य होईल त्यावेळीं तो अभंग पाहावा. म्हणजे मातोश्री जिजाईसंबंधीं जो नसता व खोटा गैरसमज पसरविण्यांत आला आहे तो कसा चुकीचा आहे याबद्दल भाविकांची खात्री पटेल.

आदर्श असें अवतारकार्य, दाखविलेला सुलभ भक्तिमार्ग, मानव-धर्म, अभंग–निर्मिति व समाजऐक्य अशा अनेक गोष्टीमुळें महाराष्ट्र तुकाराम महाराजांचा ऋणी आहे. अशा थोर महात्म्याच्या धर्मपत्नीबद्दल अनेक लेखकांस नुसती खरीं कृतज्ञता दाखवितां आली नाहीं हें एक आश्चर्य आहे. अनेक चरित्र लेखकांनीं याबाबतींत आपल्या लेखणीचा तोल सोडला. त्यामुळें नाटककार वगैरे लेखकांनीं याबाबतींत लिहितांना अखिल भारतीय स्त्री जातीचा अपमान करण्याचें पातक केलें. हिंदु संस्कृतीची शोभा वाढवून तिला उच्चस्थान प्राप्त करून देण्याचा मान आमच्या स्त्री जातीला आहे. तुकाराम महाराजांच्या अंतःकरणांत भक्ति व वैराग्यरूपी कोंवळें कोंब नुकतेच जन्मास येण्याची सुरवात होती. अशा वेळीं जिजामातेनें आपल्या देहाचें कांटेरी कुंपण तयार करून त्यांचे रक्षण केलें व तें वाढीस लावून त्यांचा मोठा वृक्ष बनविण्याचें श्रेय घेतलें, अशा त्या थोर मातेच्या एकंदर पतिधर्माचें महत्व न ओळखतां खरी परिस्थिति न पाहतां वाटेल तें लिहिणें हें एक महान् आश्चर्य समजलें पाहिजे !

## पतिधर्माचा रोख पुरावा

देहूपासून कांहीं अंतरावर असलेल्या चिंचवड या गांवीं मोरया गोसावी (चिंतामणी देव) या नांवाचे एक गणपतीभक्त तुकाराम महाराजांचे समकालीन होते. ते महान् पुरुष असून त्यांना सिद्धि सामर्थ्य प्राप्त आहे अशी सर्वत्र पुणें प्रांतांत त्यांची प्रसिद्धि होती. पुणें शहरांत

अनगडशाह या नांवाचे मुसलमान फकीर होते. ते ईश्वरभक्त असून मोठे अवलिया होते. भक्तीच्या जोरावर त्यांनाहि सिद्धीची प्राप्ती झाली होती. ते चिंचवड येथें चिंतामणी देवाच्या भेटीस गेले. चिंतामणी देवाच्या वाड्यासमोर त्यांनीं भिक्षेची आरोळी ठोकली. चिंतामणी देवांनी भिक्षा वाढण्यास सांगितलें. भिक्षा वाढण्यास आलेल्या इसमास अनगडशाहा म्हणाले. 'कटोरा भरून पाहिजे.' त्या इसमानें फकीराची इच्छा चिंतामणी देवास कळविली. त्यांनीं कटोरा भरून भिक्षा वाढण्यास सांगितलें. भिक्षा बरीच वाढली तरी कटोरा भरत नाहीं ही आश्चर्यकारक गोष्ट चिंतामणी देवास सांगण्यांत आली. त्यांनीं धान्याचीं पेवें उघडून भिक्षा घालण्यास सांगितलें, तरी अनगडशाहा सिद्धीच्या जोरावर कटोरा भरूं देईना. याचें मुख्य कारण चिंतामणी देवानें जाणलें. ते स्वत: उठले व बाहेर आले. त्यांनीं सिद्धिसामर्थ्यानें कटोरा भरविला. पण फकीरानें सिद्धीच्या बळावर तो रिकामा केला. त्यावेळीं चिंतामणी देवास अनगडशाहाची खरी योग्यता कळली. त्यांनीं त्यांचा सन्मान केला व त्यांला वाड्यांत बसविलें.

तुकाराम महाराजांची कीर्ति व साधुत्व अनगडशाहाचें ऐकिवांत होतें. त्यांचीही परीक्षा पाहण्याचें त्यांनीं ठरविलें. व त्याप्रमाणें ते देहूस आले. गांवांत आल्यावर त्यांनीं तुकाराम महाराजांचें दाराशीं भिक्षेची आरोळी ठोकली. 'आपल्या दाराशीं भिक्षा मागण्यास आलेल्या कोणासहि धान्य घरांत असल्यास देत जावें, नसल्यास गोड शब्दानें बोलून त्याला समाधानपूर्वक परत करावें.' असें महाराजांचे जिजाबाईस सांगणें होतें. त्याप्रमाणें पतीदेवाची आज्ञा जिजाबाई तंतोतंत पाळीत असे. फकीरानें भिक्षा मागतांच जिजाबाईनें मुलगी गंगू हिला सांगितलें, 'मडक्यांतून त्या फकीरास पीठ वाढ,' गंगूनें आपल्या चिमुकल्या हातांच्या ओंजळींत पीठ घेतलें व फकीराच्या कटोऱ्यांत टाकलें. 'पीठ कटोऱ्यांत टाकतांच तो भरून खाली सांडला.' हें दृश्य पाहून अनगडशाहा आश्चर्यानें चकीत झाला. सिद्धिसामर्थ्य विसरून ते मुलीकडे सारखे पाहात उभे राहिले. नंतर त्यांनीं प्रश्न केला. 'तुझें नांव तुकाराम ?' हें ऐकून गंगूस हंसू आलें. ती म्हणाली 'तुकाराम माझे बाबा आहेत. ते देवळांत असतील अगर कोठेंतरी भजन करीत बसले असतील. अनगडशाहा न थांबतां महारा-

जांच्या दर्शनास गेले. नंतर ते वरचेवर देहूस येऊं लागले. शेवटचे दिवस देहूंत राहून तेथेंच त्यांनीं देहाचें विसर्जन केलें. त्यांचीं समाधि (कबर) देहू गांवांजवळ आजहि सुस्थितींत आहे. त्या समाधीची सर्व व्यवस्था आजपर्यंत महाराजांचे वंशजाकडून होत आहे. वरील आख्यायिका, अनेक चरित्रकारांनीं दिली असून ती लेखकांसहि देहू येथें महाराजांच्या वंशजाकडून समजली आहे.

कांहीं तपें तपश्चर्या व योगसाधनें करून ज्या चिंतामणी देवास फकीराचा कटोरा भरणें अशक्य झालें, त्यांचे सिद्धिसामर्थ्य लूळें पडलें, तोच कटोरा जिजाबाईच्या नुसत्या शब्दानें भरला गेला. फकीरास स्वतःचें सिद्धिसामर्थ्य विसरणें भाग पडलें याचें खरें कारण तुकाराम महाराजांच्या साधुत्वांत नाहीं. अगर त्यांची धर्मपत्नी हिच्यांतहि नाहीं तर जिजाबाईनें मिळविलेल्या पतीव्रता धर्मांत आहे. आपल्या अनेक ग्रंथांत पतिव्रता धर्माची महति गायलेली असून महाराजहि आपल्या अभंगवाणींत म्हणतात, 'पतिव्रतेची देवावरी सत्ता' सर्वस्वाचा त्याग करून निरहंकार वृत्तीनें गिरीकंदरांत राहणें एक वेळ सोपें ठरेल. पण पतीव्रताधर्म पाळणें महान् कठीण व्रत आहे. जी स्त्री कायेनें, वाचेनें व मनानें पतीसेवा करील, तिलाच या व्रताचें फळ मिळत असतें. जिजाआईनें हें व्रत सर्व प्रकारें पाळले म्हणून तिला वाणी सिद्धि (वाक्‌सिद्धि) प्राप्त झाली असली पाहिजे.

## एकांत

"केवळ ध्यानमग्न व्हावें या हेतूनें बाह्य जगाशीं असलेला सारा संबंध तोडून टाकून पर्वत गुहांचा अथवा अरण्यांचा आश्रय करणारे धीर पुरुष प्रत्येक राष्ट्रांत आढळतात.

( स्वा. वि. स. ग्रं. खं. १ वा. )

महाराज लोकांचा सहवास शक्य तितका टाळूं लागलें, कारण सहवासानें मनुष्यांस आपलें ध्येय गांठतां येत नाहीं. ते एकांतांत जास्त वेळ राहूं लागले. परमेश्वराचें नामस्मरण करून त्याची प्रत्यक्ष प्राप्ती करून घ्यावी या उद्देशानें त्यांनीं बाह्य गोष्टीकडून सर्व प्रकारें मन काढून घेतलें व तें रानावनांतच राहूं लागले.

जो अनन्यु ऱ्यापरी । मी जाह्लाही मातें वरी । तोचि तो मूर्तधारी । ज्ञान पैं गा ॥६११॥ शैलकक्षांचीं कुहरें । जळाशय परिसरें । अधिष्ठी जो आदरें । नगरा नये ॥६१३॥ बहु एकांतावरि प्रीती । जया जनपदाची खंती । जाण मनुष्या कारें मूर्ती । ज्ञानाची तो ॥६१४॥ ज्ञा. अ. १३

० ० ०

सर्वासंगी वीट आला । तूं एकला आवडसी ॥१॥
दिली आतां पायीं मिठी । जग जेठी न सोडी ॥२॥

० ० ०

तुका म्हणे आतां एकलेचि भले । बैसोनि उगले रहावे तें ॥

० ० ०

तुका म्हणे घडे आतां एकांताचा वास । तरिच या नाश संबंधाचा ॥

० ० ०

एकांताचें सुख जडलें जिव्हारीं । वीट परिचारी बरा आला ॥

० ० ०

वृक्षावल्ली आम्हां सोईरी वनचरें । पक्षीहि सुस्वरें आळविती ॥१॥
एणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं येत गुणदोष अंगा ॥२॥
आकाश मंडप पृथ्वी आसन । रमें तेथें मन क्रिडा करूं ॥३॥
कथा कमंडलू देह उपचारां । जाणवितो वारा अवसरूं ॥
हरीकथा भोजन परवडी विस्तार । करूनि प्रकार सेवूं रुचि ॥४॥
तुका म्हणे होये मनासी संवाद । आपलाची वाद आपल्यासी॥५॥

० ० ०

पंधरा दिवसांमाजीं साक्षात्कार जाला । विठोबा भेटला निराकार ॥
भांबगिरिपाठारीं वस्ति जाण केली ॥ वृत्ति थिरावली परब्रह्मीं॥

महाराजांना एकांत सुख देत होता. त्यामुळें ते आपल्या ध्येयाजवळ जात होते परंतु जिजाबाईला त्यांचा एकांत फारच दुःख देई. कारण महाराजांच्या भाकरीशीं तिनें आपल्या जीविताचें सर्वस्व बांधलें होतें. तिची धार्मिक दृष्टि तिला पतिव्रताधर्म दाखवित होती. संसाराकडे तिला पुरेसे लक्ष देतां येत नसे. महाराजांनीं स्वहस्तें संसार चक्र मोडून टाकलें.ते चक्रपाणीच्या दर्शनासाठीं तळमळू लागले म्हणून शक्य तितका जास्त एकांत ते भोगूं लागलें. त्यांनीं देहू जवळील भामनाथ डोंगरावर जाऊन परमेश्वर भेटीसाठीं निश्चय केला. व तेथें ते कांहीं दिवस राहिले.

तेथें त्यांनीं जपजाप्य केलें नाहीं किंवा व्रत अनुष्ठान केलें नाहीं. भागवतधर्मीय संताप्रमाणें परमेश्वरी प्राप्तीसाठीं नामस्मरणाचा मार्ग त्यांनीं अनुसरला. त्याच मार्गानें गेले. ते नामस्मरणाच्या भक्तियुक्त अंतःकरणानें भगवंतास आळविलें. तो भक्तवत्सल त्यांच्या त्या साध्या व सरळ उपायास वश झाला व त्यांना परमेश्वरी कृपेचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला. साक्षात्कारानंतर महाराज शरीरानें पहिले राहिले परतु मनानें व कृतीनें निराळ्या जन्मांत गेले. त्यामुळेच त्यांच्याकडून भागवतधर्म प्रसाराचें व समाजोद्धाराचें महान् कार्य झालें. महाराजांची तपश्चर्येची जागा पहाण्यासाठी आजपर्यंत अनेकांनीं प्रयत्न करून पाहिलें परंतु तेथील एकंदर परिस्थिति व कांहीं दैवी चमत्कार यामुळें तेथें कोणीहि थांबू शकत नाहीं.

# तपश्चर्येचें फळ

आई केरे जना । तुझ्या स्वहिताच्या खुणा । पंढरीचा राणा । मना माजी स्मरावा ॥१॥ मग कैचें रे बंधन । वाचें गातां नारायण । भयसिंधु तो जाण । येची तीरीं सरेल ॥धृ.॥ सकळ शास्त्रांचें सार । हें वेदांतांचें गव्हर । पाहतां विचार । हाचि करिती पुराणें ॥३॥ ब्राह्मण क्षेत्री वैश्य शूद्र । चांडाळाही अधिकार । बाळें नारी नर । आदी करुनि वेश्याही ॥४॥ तुका म्हणे अनुभवें । आम्ही पाडियेलें ठावें । आणिक हीं दैवें । सुख घेती भाविकें ॥५॥

तुकाराम महाराज पिढीजात भागवतधर्मीय होतें. भागवत धर्माचीं जीं प्रमुख तत्त्वें निःसीम परमेश्वरभक्ति व नामस्मरण यांच्याच आधारावर त्यांनीं स्वतः परमेश्वरी साक्षात्कार मिळविला. हा लाभ कोणाहि मनुष्य प्राण्यास घेतां येतो. त्यांत जातीभेद, धर्मभेद अगर स्त्री पुरुष भेद आड येत नाहींत. या स्वानुभवाच्या आधारावर त्यांनीं आपलें पुढील सर्व आयुष्य मानव प्राण्यांच्या हितासाठी खर्चण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें प्रत्यक्ष कार्यास लागले.

" उपनिषद ग्रंथ क्षत्रियांनीं निर्माण केले आहेत. हिंदुस्तानांतील बहुतेक अवतारी पुरुष क्षत्रिय वर्णाचें होते. त्यांनीं विश्वव्यापी सनातन धर्माचा उपदेश केला. उलटपक्षीं बहुतेक ब्राह्मण अवतारी पुरुष अधिक कोत्या मार्गानें जाणारे होते. राम कृष्ण आणि बुद्ध हे अवतार क्षत्रीय वर्गांत उत्पन्न झाले."

( स्वामी विवेकानंद स. ग्र. खंड, था.)

श्री नामदेव महाराज व त्यांच्या समकालीन झालेल्या संतांनीं अभंग वाणी निर्माण केली. त्या वाणीचा प्रसार त्याकाळीं महाराष्ट्रभर झाला होता. त्यामुळें भागवत धर्म हा सर्व मानव प्राण्यांचा धर्म आहे अशी

सर्वांची खात्री झाली होती. अभंगवाणी स्वतः निर्माण करून ती कीर्तनद्वारें समाजांत पसरविण्याचें पहिलें काम संत नामदेव महाराज यांनीं केलें. नामदेव महाराज भागवत धर्माचें पहिले कीर्तनकार आहेत. कीर्तनाची परंपरा त्यांनींच सुरू केली. त्यांच्या नंतर सुमारें पावणेतीनशें वर्षांच्या दीर्घ काळांत अभंगवाणी निर्माण करून कीर्तन करणारा संत महाराष्ट्रांत झाला नाहीं. मध्यंतरीच्या काळांत श्री एकनाथ महाराज यांनीं थोडीशी अभंगवाणी निर्माण केली. परंतु कीर्तनरूपानें तिचा प्रसार समाजांत त्यांना विशेष करतां आला नाहीं. श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या मार्गानें जाऊन संस्कृतमधील धर्मज्ञान मराठी भाषेंत आणण्याचें अत्यंत महत्त्वाचें कार्य केलें. त्यांनीं भागवत या नांवाचा मराठी भाषेंत अत्यंत उत्कृष्ट असा ग्रंथ निर्माण केला. या भागवत ग्रंथामुळें भागवत धर्माच्या प्रसारास मोठेंच साहाय्य झाले. त्या काळच्या परिस्थितींत भागवत हा ग्रंथ तोफेचा गोळाच ठरला. त्यानें वर्णाश्रम धर्मरूपी तटास अनेक भगदाडें पाडली. कर्मठांच्या एकांगीं धार्मिक वृत्तीस हादरा दिला. त्यांच्या संस्कृतांतील ज्ञान मराठींत आणण्याच्या दीर्घ प्रयत्नामुळें त्यांना समाजांत प्रचारद्वारें पाहिजे तशी जागृति करतां आली नाहीं. पावणेतीनशें वर्षांत बहुजन समाजांत भागवत धर्माचा पाहिजे तसा प्रचारक निर्माण झाला नाहीं. कर्मठांनीं याचा पुरेपूर फायदा घेतला. त्यांनीं आपल्या पूर्वपरंपरेस अनुसरून वेदांत धर्माचें एकांगीं लोढणें वर्णाश्रमाच्या दोरीस बांधलें व समाजाच्या गळ्यांत पद्धतशीर अडविण्याचें प्रयत्न सुरूं केले.

## कीर्तनास प्रारंभ

महाराजांस बालपणीं नामदेव महाराजादि संतांच्या अभंगाचा चांगला परिचय होता. त्यांचें कित्येक अभंग त्यांना पाठ होते. सर्वसंग परित्यागानंतर त्यांनीं अभंगाचे गाथे, ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत यांचा चांगला अभ्यास केला. शक्य होती तीं पुराणें धुंडाळलीं. त्या अभ्यासास अंतःकरणाचें पावित्र्य, ईश्वरभक्तीचें साह्य व जनहिताची खरी तळमळ यांची जोड असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं दिव्य निर्माण झालो. त्या शक्तीच्या जोरावर ते समाजास मार्ग दाखविण्याचें कार्य करूं लागलें.

"चित्तांतून सर्व लौकिक विचारास रजा देऊन केवळ नैतिक आणि धार्मिक वातावरणांतच जे संचार करीत असतील अशांना अत्यंत गहन असे विचारहि आपोआप सुलभ होतील. असे लोक अशिक्षित असले तरी महापंडित होतील."

(स्वामी विवेकानंद स. ग्रं. खंड, ४ था.)

सुरवातीस नामदेवादि संताचे अभंग घेऊन त्यावर ते कीर्तन करीत. कीर्तनांत ज्ञानेश्वरी भागवत वगैरे ग्रथांचेंहि ते आधार घेत. कांहीं दिवसानंतर त्यांनाच अभंग करण्याची स्फूर्ति निर्माण झाली. विशेषत: त्या अभंगाच्या आधारावरच ते कीर्तन करीत. अभंग र्निमितीबाबत अशी आख्यायिका आहे कीं, प्रत्यक्ष श्री विठ्ठल नामदेव महाराजांसह स्वप्नांत आले व अभंग करण्यास सांगितलें.परंतु खुद्द महाराजांचा स्वप्नांवर मुळींच विश्वास नव्हता. त्या काळच्या परिस्थितींत ब्राह्मण समाजाशिवाय इतर लोकांस धार्मिक काव्य अगर धार्मिक ग्रंथ लिहिण्यास अनेक अडथळे येत. तसें करण्यास जवळजवळ त्यांना बंदीच होती. या आपल्या धार्मिक कार्याच्या रक्षणासाठीं महाराजांनीं वरील प्रमाणें स्वप्नाचें कारण सांगितलें असावें. हा वादग्रस्त प्रश्न आम्ही वाचकांवर सोंपवितों. त्यांच्या कीर्तनांत जनसेवा व समाजास भागवत धर्माकडे नेणे हेंच प्रामुख्यानें असे.

विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतांचा सार ॥
जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥
जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥

त्यांच्या कीर्तनाचा प्रसार समाजांत वाऱ्याच्या वेगानें होऊं लागला. याचें मुख्य कारण त्यांत परमेश्वरी भक्तीचा जिव्हाळा, समाजसेवेचा कळवळा व जनहिताचा खरा ओलावा होता.

## अभंग निर्मिति

कीर्तनांत परमेश्वर कृपेनें सुचलेलें अभंग व इतर वेळीं मुद्दाम बसून केलेलें अभंग एकत्रित करून त्यांचा संग्रह करण्यास त्यांनीं सुरवात केली. अभंग निर्माण करतांना ते समाजाच्या सर्वकाळ निरंतर उपयोगी पडतील असेंच करूं लागले.

अधिकार तैसा करुं उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥१॥
मुंगावरी भार गजाचें पाळण । घालितां ते कोण कार्यसिद्धी ॥२॥
तुका म्हणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगीं ते काढी पारधी तो॥३॥

महाराजांचे कार्य व अभंगवाणी यावर निवृत्तीचें आरोप करणारास आव्हानपूर्वक हेंच सांगणें आहे कीं, त्यांनी या अभंगगंगेंत खोलवर बुडी मारून पाहावी. ज्याला जें हवें असेल तें सर्व या अभंगगंगेंत आहे. वेदांत तत्वज्ञानाचें रिकामें भांडें घेऊन जरी कोणी आला तरी तें तत्काळ भरलें जाईल. मग तो कोणत्याहि मताचा अगर पंथाचा असो. त्याच्या पूर्ण समाधानासाठीं हा अमोल ठेवा आहे.त्याला जें हवें तें यांत पुरेपूर आहे.

महाराजांच्या कीर्तनांत व वहींत जोंपर्यंत सौम्य स्वरूपाचे अभंग येत होते, तोंपर्यंत कर्मठांनीं त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. कांहीं दिवसानंतर ते भागवत धर्माच्या सर्वश्रेष्ठ तत्वांनीं भरलेले अभंग म्हणू लागले वहींत लिहूं लागले. त्यावेळीं कर्मठांनीं आपलें खरें स्वरूप प्रगट केलें.

वर्ण अभिमानें कोण झाले पावन । ऐसे द्या सांगून मजपाशीं ॥
अत्यंजादि योनी तरल्या हरि भजनें । तयाची पुराणें भाट झाली ॥
वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहीदास ॥
कबीर मोमीन लतीफ मुसलमान । सेना न्हावी आणि विष्णुदास॥
कान्होपात्रा खोदू पिंजारी तो दादु । भजनीं अभेदु हरिचे पायीं ॥
चोखा मेळा बंका जातीचा माहार । त्याशीं सर्वेश्वर ऐक्य करी ॥
नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवीं पंढरीराव तिचे सवें ॥
मैराळ जनक कोण कुळ त्याचें । महीमान तयाचें काय सांगो ॥
यातायाती धर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥
तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणो किती ॥

वर्णभेदाच्या विषारीपणामुळें समाजांत ऐक्य नव्हतें. जातीभेदाच्या चिखलांत तो पक्का रुतला होता. जातीची कृत्रिम उच्चनीचता धर्ममार्गांत

आडवी उभी राही. परमेश्वर प्राप्तीचा हक्क हा सर्वांस खुला नाहीं, असें शास्त्राज्ञेच्या नांवाखालीं उघड सांगितलें जाई. महाराजांनीं समाज ऐक्या-साठीं व धर्म प्रसारासाठीं वर्णाभिमानाच्या तटास अभंगवाणीचे सुरुंग पद्धतशीरपणें पेरण्यास सुरवात केली.

परमेश्वराजवळ कसलाहि भेदभाव नाहीं. भक्ति, परोपकारवृत्ति, न्याय,. नीति, व सत्याचरण हें ज्याच्याजवळ असेल, तो परमेश्वराप्रत पोहोंचूं शकतो. मग तो कोणत्याहि जातीचा असो, परधर्मीय असो, स्त्री असो, अगर पुरुष असो. देवानें जाती मुळींच निर्माण केल्या नाहींत, जातीचा खोटा अभिमान भगवंतास मुळींच मान्य नाहीं.

अभक्त ब्राह्मण जळो त्यांचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥१॥
वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळीं याति ॥२॥
ऐसा हा निवाडा झालासे पुराणीं । नव्हे माझी वाणी पदरींची॥३॥
तुका म्हणे आंगीं लागो थोरपणा । दृष्टी त्या दुर्जना न पडो माझी॥४॥

प्रत्येक शब्दाला अंतःकरणांतील पावित्र्य, सत्याचरण, व ईश्वरनिष्ठा यांचा पाठिंबा असल्यामुळें व सत्‌शास्त्रांचा आधार यामुळें समाज न कळत त्यांच्याकडे आकर्षिला जाऊं लागला. लोकांत नवचैतन्य खेळूं लागलें. भागवतधर्माचीं सत्य तत्त्वें झपाट्यानें प्रसार पावूं लागलीं. वर्णा-श्रमधर्माचा जुलूम व कर्मठांची कठोरवृत्ति याबद्दल प्रतिकाराची भावना समाजांत जोरानें धावूं लागली. उच्चनीचतेचा कृत्रिम भेदभाव गाडला जाऊन समाज एकासूत्रांत येऊ लागला. परधर्माची लागलेली आग विझूं लागली, व नकली, खरीं, खोटी, धार्मिक तत्त्वें पारखण्याचें खरे साधन समा-जास लाभलें. त्यामुळें महाराष्ट्र जनता श्रुतिस्मृतीचा चक्रव्यूह, कर्म-कांडाचा तट व वर्णाश्रमरूपी कांटेरी कुपण याच्यातून सुटूं लागली.

परमेश्वरी कृपा, निरहंकार वृत्ति, पवित्र आचरण, हीनदीनाबद्दल कळकळ व भागवतधर्मप्रसाराची पवित्र इच्छा या भांडवलावर त्यांच्या स्फूर्तीस पूर येऊं लागला अभंग निर्मितीसाठीं त्यांना मुद्दाम विचार करावा लागत नसे ‘ सहजची बोलणें हाचि उपदेश ।’ असे ते म्हणत. त्यांच्या अभंग-वाणीचा प्रसार जोमानें होऊं लागला. महाराष्ट्रांतील जनता नव्या दमानें व

नव्या विचारानें भागवत धर्माच्या झेंड्याखालीं एकत्रित होऊं लागली. हें दृश्य कर्मठांस सहन होईना !

## अभंग निर्मितीस विरोध

देहू गांवांत मंबाजी या नांवाचे कर्मठ, ब्राह्मण होतें. त्यांचे ब्राह्मण्य प्रथम जागृत झालें. व त्यांनींच प्रथम विरोधास सुरवात केली. ते स्वतःस श्रेष्ठ समजत. परंतु त्यांच्या ठिकाणीं साधी माणुसकी सुद्धां नव्हती. ते सर्व अवगुणाचे पुतळेच होते. त्यांचे अवगुण त्यांचाच घात करूं लागले, त्यामुळें त्यांचा विरोध चालेना. त्यांना संताप आला. त्यांनीं चिडून पुणें येथील आप्पाजी गोसावी ह्या वेदोनारायणाकडे पत्र पाठवून कळविलें कीं, देहू येथील तुकाराम हा जातीनें शूद्र आहे. तो नवीन अभंग रचून त्या आधारावर कीर्तनहि करतो, त्याच्या अभंगांत श्रुतीचा अर्थ उमटतो. हें महान् धर्मसंकट आहे, त्याच्या भजनीं कांहीं ब्राह्मणहि लागतात. या शूद्राचा धर्मरक्षणासाठीं वेळींच बंदोबस्त होणें अत्यंत जरूर आहे. आप्पाजी गोसावी यांच्या अंगांत ब्राह्मण्याचा वर्णाश्रमरूपी समंध सदैव जागृत असे. त्यानें याबाबतींत विशेष चौकशी न करतां सरकारांत असा अर्ज केला कीं, देहू येथील तुकाराम हा जातीनें शूद्र आहे. तो आपल्या कवित्वांत वेदांचा उच्चार करतो. त्याचें हें करणें वाईट असून धर्मबाह्य आहे त्यामुळें राज्यावर संकट येईल.

महाराष्ट्रीय विचारवंत व इतिहासाचे भोक्ते यांनीं विचार करण्या-सारखी ही गोष्ट आहे. कारण त्याकाळीं सबंध महाराष्ट्रावर राज्य कोणाचें होतें ? खुद्द पुणें प्रांत विजापूरच्या बादशाहाचे ताब्यांत होता. ह्या राज्या-वर संकट येऊं नये म्हणून वेदाचे हे वारसपुत्र कसें प्रयत्न करीत ? विजापूरच्या राज्यावर संकट येऊ नये म्हणून आप्पाजी गोसाव्यास काळजी ! यावरून ह्या वेळची परकीय सत्ता ही आमच्या कर्मठांच्या पूर्णपणें पचनी पडली होती, असेंच दिसतें.

पूर्वीं प्रत्येक राज्यकर्त्यांचें राज्य करण्याचें नियम निरनिराळे असत. ते काळ वेळ, व लोक-परिस्थिति यांचा प्रामुख्यानें विचार करीत. व त्या मार्गाचा पूर्णपणें अवलंब करीत. या तत्वास अनुसरून विजापूरच्या बाद-शाहानें, महाराष्ट्राच्या लोकस्थितीची नाडी तपासून पाहिली. महाराष्ट्रास

वर्णाश्रमधर्माचा रोग जडला आहे, तो रोग दिवसेंदिवस वाढत आहे. या रोगामुळें राष्ट्र लवकर बरे होणार नाहीं. जोंपर्यंत राष्ट्र या रोगाच्या आहारीं आहे. तोंपर्यंत आपला धर्म व आपले राज्य याकडे तो डोळे उघडून पाहाणार नाहीं. अशा या रोगाच्या वाढीसाठीं कुपथ्य सुरू ठेवलें पाहिजे. या रोगावर एकच चांगलें कुपथ्य आहे. तें म्हणजे कर्मठपणा वाढता ठेवणे म्हणून त्या धूर्त बादशाहानें मुरारपंत नांवाच्या कर्मठास आपला दिवाण नेमला, त्याचें महत्व वाढविलें. त्याच्याकरवीं चिंचवड वगैरे अनेक ठिकाणच्या कर्मठांच्या देवस्थानास जहागिऱ्या दिल्या. कर्मठांच्या वृत्तीस तो बादशाह अप्रत्यक्ष रीतीनें सर्व प्रकारें साह्य करीत असे. त्यामुळें कर्मठ हें आपल्या वर्णाश्रमधर्माचे श्रेष्ठत्व कायम राखण्यासाठीं बहुसंख्य जनतेच्या राष्ट्रीय वृत्तीची वेदांत धर्माच्या नांवावर हिंसा करीत, समाजाच्या कोणत्याहि प्रगतीपर हालचालीस वेदांत धर्माची आडकाठीं उभी करीत. खालचा समजला जाणारा जो समाज. त्याच्यावर रुढीची अनेक कठीण बंधनें घालीत. त्याला कोणत्याहि प्रकारें आपली हालचाल करतां येऊं नये असें सतत प्रयत्न करीत. तो समाज, हिंदुधर्म व हिंदु यापासून दूर लोटला जाईल असें वागत. त्यामुळें त्या समाजांतील कित्येक लोक माणुसकी जगविण्यासाठीं मुसलमानी धर्माचा स्वीकार करीत. परधर्माचा आश्रय केल्यामुळें हिंदु समाज व हिंदुधर्म यांचे ते कट्टेवैरी होत. विजापूरच्या बादशाहानें आपलें राज्य स्थिर होऊन वाढतें राहण्यासाठीं हाच उपाय शोधून काढला होता व तो महाराष्ट्राच्या हाडांत चांगल्या प्रकारें मुरला होता. कारण शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेस जास्त विरोध जर कोणाचा झाला असेल तर तो कर्मठांचा व वर्णाश्रमधर्माच्या सांवलींत वाढलेले देशमुख, सरदार, इनामदार व गढीचे मालक असे अनेक मोठमोठे पाटील यांचा ! तसें पाहिलें तर अप्पाजी गोसावी यांचें म्हणणें खरें होतें. कारण तुकाराम महाराजांनीं आपल्या अभंगवाणीनें खालच्या थरास हात घालून सबंध महाराष्ट्र खडबडून जागा केला. त्यामुळें विजापूरच्या बादशाहाची सत्ता कायमची पंगू झाली. तिच्यावर संकट आणलें. तिनें फिरून डोकेंच वर केलें नाहीं.

महाराजांचें साधुत्व व कीर्ति ही वाढत्या प्रमाणांत समाजांत पसरूं लागली. अशा वेळीं, पुणें शहराजवळ वाघोलीच्या येथील रामेश्वर

भट त्यांना विरोध करण्यासाठीं पुढें सरसावलें. त्यांना वेदान्त धर्माचा कडा अभिमान होता. स्वतःच्या विद्वत्तेची व घराण्याची विशेष घमेंड होती. त्यांनीं देहू येथील पाटलास हुकूम केला, "कीर्तन करणाऱ्या तुकारामास माझ्यासमोर तावडतोब हजर करावे" पाटलानें हुकूमाप्रमाणें महाराजांस वाघोली येथें रामेश्वर भटापुढें हजर केलें. वाघोली व देहू या दोन गांवांतील अंतर सुमारें वीस मैल आहे. तेथील एक भटजी देहूच्या पाटलास हुकूम करतो व हुकूमाप्रमाणें पाटील वागतो. या एकाच गोष्टीवरून त्यावेळची राजकीय सत्ता हिंदूंच्या धार्मिक बाबतीत कोणत्या मार्गानें जात होती हें स्पष्ट होत आहे.

"ज्यानें ब्रह्म जाणलें तो स्वतः ब्रह्म होतो. त्याचे शब्द म्हणजे श्रुतीच होत. अज्ञानांधःकाराला नाहींसे करण्याचें सामर्थ्य त्यांत असतें. आपलें शब्द त्यानें संस्कृतांत उच्चारले अथवा सामान्य लोकांच्या भाषेंत उच्चारलें तरी त्यांतील सामर्थ्यांत फरक पडत नाहीं."

(स्वामी विवेकानंद संग्र. खं. ५ वा.)

तुकाराम महाराजांस पाहतांच रामेश्वर भटाचा राग अनावर झाला. त्यानें अधिकार वाणीनें दरडाविलें, "तूं जातीनें शूद्र! अभंग करून कीर्तन करतोस, त्या अभंगांत श्रुतीचा अर्थ उमटतो हें तुझें करणें धर्मबाह्य आहे. या कलीयुगांत फक्त ब्राह्मण व शूद्र असे दोनच वर्ण आहेत. श्रुतीचा अधिकार फक्त ब्राह्मणांना आहे. तू शूद्र असून श्रुतीचा अर्थ अभंगांत आणतोस हें महापाप आहे. शूद्रांस श्रुतीचा अधिकार नाही." महाराज अत्यंत नम्रपणें म्हणाले, "मी भागवत धर्माच्या पूर्वपरंपरेस अनुसरून वागत आहे संत नामदेव महाराजांनीं कीर्तनाचे व नामस्मरणाचें महत्त्व सांगितलें." यावर भट म्हणाले "तूं आज येथें कीर्तन कर म्हणजे तें स्पष्ट कळेल." महाराजांनीं रात्रीं कीर्तन केलें.

काळवेळ नसे नामसंकीर्तनीं। उंचनीच योनी हेंहि नसे ॥१॥
धरा नाम कंठीं सदा सर्वकाळ। मग तो गोपाळ सांभाळील ॥२॥
कृपाळु कोंवसा सुखाचा सागर। करील उद्धार भाविकांसी ॥३॥
नामा म्हणे फार सोपें हें साधन। वाचें नाम घेणें इतुकेंचि ॥४॥

तुकाराम महाराजांस भटजीच्या हुकूमावरून देहूच्या पाटलानें वाघोलीस नेलें. ही बातमी आसपासच्या गांवीं पसरली होती. त्यामुळें हजारों भाविक वाघोलीस जमा झाले. महाराजांनीं नामदेवराय यांच्या वरील अभंगावर कीर्तन केलें. कीर्तनांत प्रसंगोपात स्वत: केलेले अभंगहि घेतले. कीर्तन ऐकून जमलेला समाज धार्मिक भावनेच्या आनंदानें बेहोष झाला. त्यांच्या भक्तीबद्दल व जनहिताबद्दल लोकांना विशेष कौतुक वाटलें. कीर्तन संपलें. महाराजांनीं रामेश्वर भटास साष्टांग नमस्कार घातला, परंतु रामेश्वर भट संतापून म्हणाला, " तुझ्यासंबंधीं जी तक्रार आहे ती अगदीं खरी आहे. तुझ्या अभंगांत श्रुतीचाच काय पण वेदांचाहि अर्थ स्पष्ट उमटतो. तूं जें हें आरंभिलें आहेस, तें महा पाप आहे. यामुळें तूं स्वत: नरकांत जाशीलच पण ऐकणारेहि जातील. कारण श्रुतींची आज्ञा अशी आहे कीं, जो क्षुद्र, श्रुतीचा उच्चार करील तो स्वत: व ऐकणारा असें दोघेंहि नरकांत जातील. तुझ्या कीर्तनांत कांहीं ब्राह्मण भोळ्या भावानें येतात असें मी ऐकलें. ब्राह्मणांच्या कानांवर क्षुद्राच्या मुखांतून श्रुतीचा अर्थ गेला तर त्या ब्राह्मणांनासुद्धां निष्कारण नरकांत जावें लागेल." भटजीचें हें विषारी भाषण ऐकून सारा समाज नाराज झाला. त्याला अत्यंत वाईट वाटलें. पण ब्राह्मणांच्याविरुद्ध जाण्याची कोणाची छाती झाली नाहीं. मुसलमानांच्या राज्यांत त्याकाळीं धार्मिक बाबतींत कर्मठांच्या हातांत केवढी राक्षसी सत्ता होती याचा विचार करणें जरूर आहे.

रामेश्वरभट म्हणाले, " यापुढें तूं कीर्तन करूं नकोस." महाराज म्हणाले, " आज्ञा प्रमाण ! परंतु अभंग करण्याची आज्ञा मला नामदेव महाराजांनीं केली." ' करितों कवित्व म्हणाले हे कोणी। माझी नाहीं वाणी पदरींची " यावर भटजी म्हणाले, " अभंगांतच श्रुतींचा अर्थ उमटतो, तूं यापुढें अभंग करण्याचे बंद कर! जवळ असलेल्या अभंगाच्या वह्या तूं नदींत बुडवून टाक, कारण हें धर्मबाह्य कृत्य वेळींच बंद पडणें जरूर आहे." यावर महाराज लीनतेनें म्हणाले, " आपली आज्ञा कबूल, त्याप्रमाणें करीन." भटजी म्हणाले, " तसें नाहीं, मी स्वत:च येतो व ते सर्व अभंग नदींत बुडवतो." त्याप्रमाणें रामेश्वर भटजी दुसरें दिवशीं देहू क्षेत्रीं आले.

## अभंगास जल-समाधि

" आचार्यांची (आद्य शंकराचार्य) बुद्धिमत्ता वस्तऱ्याच्या धारेसारखी तीव्र होती यांत शंका नाहीं. ते उत्कृष्ट पंडित होते आणि वादविवादांत प्रतिपक्षाला चीत करण्याची हातोटी त्यांना चांगली साधली होती यांत शंका नाहीं. तथापि बुद्धीच्या विशालतेइतकी अंत:करणाची विशालता त्यांच्यापाशीं नव्हती. त्यांना स्वत:च्या ब्राह्मण्याचा अत्यंत अभिमान होता. वेदांत सूत्रांवर लिहिलेल्या भाष्यांत ब्राह्मणेतरांना परम ज्ञान प्राप्त होणार नाहीं असें त्यांनीं अट्टाहासानें म्हटलें आहे.

(स्वा. विवेकानंद सं. ग्रं. खंड १२.)

तुकाराम महाराजांनीं अभंगाच्या वह्या घरांतून बाहेर आणून रामेश्वर भटापुढें ठेविल्या. त्यांनीं त्या वह्या स्वत:च्या डोक्यावर घेण्यास महाराजांस सांगितलें. वह्या डोक्यावर घेतल्यावर भटजीनें इंद्रायणीच्या डोहाकडे चालण्याचा त्यांना हुकूम केला. डोहाजवळ गेल्यानंतर त्यांनीं त्या अभंगाच्या वह्या महाराजांच्या डोक्यावरून स्वत:च्या हातांत घेतल्या. त्या वह्या नव्हे तर हिंदुधर्माचें सारसर्वस्व त्या कर्मठानें नदींतील खोल पाण्यांत बुडविलें. हें धर्मनाशक कृत्य करतांना त्या पाषाण हृदयीं, स्वधर्मद्रोही, समाजघातकी वेदोनारायणास किंचित्‌हि दु:ख झालें नाहीं. उलट कर्मठ हृदयाची साक्ष म्हणून त्याच्या चेहेऱ्यावर आनंद व समाधान वाढू लागले. परत जातांना त्यानें महाराजांस फिरून बजावलें, " असलें धर्मबाह्य कृत्य फिरून करूं नको. " मुसलमानी राज्यामुळें दररोज गायींची कत्तल भररस्त्यावर होत होती. हिंदूंचीं पवित्र देवस्थानें वरचेवर भ्रष्ट केलीं जात होतीं. हिंदूंच्या आयां-बहिणी दिवसाढवळ्या जबरीनें ओढून जनानखान्यांत नेल्या जात होत्या. हिंदूंना बाटविण्यांत येत होतें. ह्या असल्या अनेक गोष्टी रामेश्वरभटास धर्मबाह्य वाटल्या नाहींत. त्यासाठीं त्यानें कांहींसुद्धां प्रयत्न केले नाहींत. ज्या अभंगवाणीनें समाज जागृत होऊन एकीच्या मार्गावर येऊन धर्मरक्षणासाठीं बलवान होणार होता ते अभंग फक्त धर्मबाह्य दिसले. धन्य आहे त्या वर्णाश्रम धर्माची व कर्मठ वृत्तीची !

आपण श्रुति–धर्मांचें रक्षण केलें, वर्णाश्रम धर्मास लागणारा वणवा विझविला. अशा विचाराच्या समाधानानें रामेश्वर भट वाघोलीस परत गेले. परंतु महाराज त्याच ठिकाणीं आसन मारून बसले. त्यांनीं परमेश्वराचा धांवा सुरूं केला. अन्नपाणी सोडलें. शरीरधर्मास सर्वप्रकारें रजा दिली. रात्रंदिवस भक्तवत्सलास सारखें आळवूं लागले. त्याच ठिकाणीं सारखे तेरा दिवस बसले. परमेश्वर भक्ताच्या हांकेस ओ देतो. त्यांच्या शुभेच्छासाठीं तो आपली कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् शक्ति उपयोगांत आणतो. हा सिद्धांत जगांतील सर्व धर्मशास्त्रांनीं मान्य केला आहे. अनेक धर्मांतील कित्येक श्रेष्ठ सत्पुरुषांस तसा अनुभवहि आलेला आहे. भगवंतानें आपल्या भक्तांसाठीं अशक्य तें शक्य करून दाखविल्याच्या आख्यायिका आहेत.

तेराव्या दिवशीं बुडविलेल्या वह्या डोहांत तरंगतांना लोकांस दसल्या अशी आख्यायिका आहे. त्या बाहेर काढल्या. वाजतगाजत मंदिरांत ठेवल्या. ह्या दैवी चमत्काराबाबतची सत्यता आम्ही वाचकांवर व अधिकारी व्यक्तीवर सोंपवितों. कारण चिकित्सकतेच्या कसोटीवर हा प्रश्न घांसून प्रत्येकानें आपलें वैयक्तिक मत बनविणें जरूर आहे. कारण महाराजांच्या एकंदर चरित्रांत हा एक व सदेह वैकुंठास जाणें हा दुसरा असें मानवी मनाच्या आटोक्यांत न येणारे दोन प्रश्न आहेत. तेरा दिवस अन्नपाणी वर्ज करून महाराज एका स्थानीं परमेश्वरचिंतनांत बसले. या घटनेचा मात्र जनसमूहाचे मनावर विशेष परिणाम झाला असेल. लोक कर्मठांच्या भीतीस झुगारून महाराजांच्या पाठीशीं निश्चित उभे राहिले असतील व त्यांनीं महाराजांच्या समता धर्माचें अनुयायित्व मोठ्या प्रमाणावर स्वीकारलें असेल.

" उत्तम प्रकारची नीति आणि शुद्ध तत्त्वें यांवरच जन धर्माची उभारणी झाली आहे- त्याचप्रमाणें बौद्ध धर्माचा पायाहि सर्वांभूतीं दया आणि उत्तम शील हाच होय. हे धर्म उदयास आले नसते आणि उच्चवर्णीयांच्या जुलमाच्या जाल्यांत भरडल्या जाणाऱ्या खालच्या जाती मुक्त झाल्या नसत्या तर हिंदुस्थानचा,

खचित तरुणोपाय नव्हता. अगदीं आर्वाचीन काळीं ब्राह्म आणि आर्य या समाजांची स्थापना झाली. हे अवतार निर्माण झाले नसते तर आर्यावर्तांत आजमितीला ख्रिस्त आणि मुसलमान यांची संख्या हिंदूहून अधिक असती यांत संशय नाहीं.

(स्वामी विवेकानंद).

तुकाराम महाराज यांच्या काळीं महाराष्ट्र हा सर्व बाजूंनीं अवनतीच्या खड्ड्यांत पंगू होऊन पडला होता. ज्याला खालचा वर्ग म्हणून संबोधण्यांत येते तो चोहोंबाजूनें दीन बनला होता. परधर्मांतील माणूसकीचें आमिष त्याला सारखें ओढीत होतें. तो समाजहि ओढला जात होता. अशा वेळीं महाराजांनीं भागवतधर्माचीं दारें सताड उघडून सर्वांस स्थिर बसविलें. त्यामुळेंच महाराष्ट्राचें वैशिष्टच भारतांत विशेष प्रकारानें दिसत आहे. सर्व जनतेंत धार्मिक ऐक्य उत्पन्न करून त्यांना कार्यप्रवृत्त त्यांनींच केलें.

## पंढरीस दिंडि

" भटाभिक्षुकांच्या अथवा मूठभर लोकांच्या हातीं धर्म जोंवर नांदत होता, तोंवर देवळांत, ग्रंथांत, हटवादी मतांत, आचारांत आणि बाह्य देखाव्यांत तो दडी मारून बसला होता. तेथून बाहेर पडून ज्या वेळीं तो विश्वव्यापी होईल, त्याच वेळीं त्याला सत्यता आणि जिवंतपणाहि प्राप्त होईल."

(स्वामी विवेकानंद खं. १, प्रकरण धर्माची आवश्यकता.)

महाराजांच्या घराण्यांत पंढरपूरची वारी करण्याची प्रथा सुमारें अडीचशें वर्षें सुरू होती. त्याप्रमाणें त्यांनींहि वारीस सुरवात केली, अभंग निर्माण करून त्यांनीं कीर्तनास सुरवात केली. त्यानंतर वारीस दिंडीचे स्वरुप दिलें. म्हणजे पंढरपुरास जातांना बरोबर हजारों स्त्री पुरुषासह ते जाऊं लागले. वाटेनें हरीनामाचा गजर करीत चालावे व मुक्कामाचे ठिकाणीं कीर्तन करून धर्मप्रसार करावा. त्या काळीं महाराष्ट्रांतच नव्हे तर भारतांतहि पंढरपूरासारखे समताधर्माचें ठिकाण सांपडणें

अशक्य ! 'पंढरीसी नाहीं कोणा अभिमान। पायां पडे जन एकमेकां ॥' पंढरपूरच्या भूमींत पाय ठेवला, चंद्रभागेचें स्नान केलें कीं, त्याचा वर्णाभिमान मावळतो व जातीची उच्चनीचता नष्ट होते. सर्वच वैष्णव, स्त्रीपुरुष हा भेदहि नष्ट होतो. अशा त्या क्षेत्रीं महाराजांनीं धर्मप्रसारास सुरवात केली. 'फोडिलें भांडार धन्याचा हा माल। मी तव हमाल भार वाही ॥' पूर्वीच्या संतांनीं समताधर्माची पताका उभी केली होती. तिच्या भोवतीं त्यांनीं समाजास जगविलें. परमेश्वर भेटीसाठीं जातीभेद व लिंगभेद आडवा येत नाहीं, नामस्मरण हेंच परमेश्वर प्राप्तीचें मुख्य व महत्वाचें सुलभ साधन आहे, परमेश्वर प्राप्तीचा दैवी हक्क प्रत्येक मनुष्य प्राण्यास आहे वगैरे उच्च तत्वांचा प्रसार केला. पंढरपुरास निरनिराळ्या प्रांतांतून लोक येत. त्यांच्यांत धार्मिक भावनेच्या आधारें ऐक्य निर्माण केलें व भागवतधर्म हा मानवांचा धर्म आहे हें त्यांच्या गळीं उतरविलें.

## पुराणें

" सांप्रत काळीं, पुराणांना वेदांत ग्रंथांच्याहि माथ्यावर आम्ही बसविलें आहे.

(स्वामी विवेकानंद खंड ५ वा.)

पुराणांची तरफदारी आमचे अनेक लोक करीत आहेत. हरिभक्त पांगारकर आपल्या तुकारामचरित्रांत आग्रहानें सांगतात. " सुलभ पुराण ग्रंथांतून आणि प्राकृत ग्रंथांतून वेदांचें मर्म समजून घेण्याचा मार्ग शूद्रांना मोकळा ठेवला आहे. तेवढ्यांत त्यांनीं समाधान मानून घ्यावें." वेदांत ग्रंथ संस्कृत भाषेच्या कडीकुलपांत कोंडून त्यावर सोवळेंओवळेंपणाचा कडक पाहारा कर्मठांनीं ठेवला. बहुजन समाजाच्या भुकेसाठीं त्यांनीं पुराणांची उभारणी केली. त्या पुराणाकडे चिकित्सकपणें व सारासार विचारानें पाहूं गेल्यास भयंकर निराशा निर्माण होते. पुराणांच्या अस्तित्वामुळें बहुजन समाजास धर्मज्ञान मुळींच झालें नाहीं व होत नाहीं. असें म्हणणें चुकीचें ठरणार नाहीं. उलट त्यांच्यांत अंधश्रद्धा निर्माण होऊन त्यांच्या धार्मिक बुद्धीची हिंसा मात्र झालेली आहे.

" तुमचा इतिहास, तुमचे वाङमय, तुमच्या दंतकथा आणि तुमची

शास्त्रेंपुराणें या साऱ्यांनीं मिळून लोकांना घाबरून टाकण्याचा उद्योग केला आहे. 'तूं अमक्या नरकांत जाशील, यमधर्म तुला अमुक शिक्षा करील असल्या भेसूर गोष्टी आजपर्यंत लोकांच्या कानांवर एकसारख्या पडत आहेत. यामुळें जनतेच्या चित्तावर विषादाचें दडपण पडून ते आळसी बनले आहेत."

(स्वामी वि. खंड १२ वा, येलूर मठ, सन १८९९.)

पुराणांच्या मालिकेंत रामायणाचा नंबर बराच वर लागेल. रामायणांत रामराज्याची स्तुति करण्यांत आलेली आहे. रामराज्यासारखें न्यायी व प्रजेस सुख देणारें राज्य कधीं झालें नाहीं व पुढेंहि होणार नाहीं. आजकाल अशी गोष्ट मोठ्या अभिमानानें सांगण्यांत येत आहे. परंतु ह्या रामायणाच्या पोटांत एक विष ओतलें गेलें. त्याकडे मुद्दाम डोळेंझांक होत आहे. " रामराज्यांत जनता सर्वप्रकारें सुख भोगीत आहे, दुःखाचें नांवही नाहीं." अशा त्या न्यायी व धार्मिक समजल्या जाणाऱ्या राज्यांत एक दुःखदायक गोष्ट घडली. 'एका ब्राह्मणाच्या मुलास मृत्यू आला. रामराज्यांत हें दुःख कशामुळें जन्मास आलें याबद्दल सर्वांस आश्चर्याचा धक्का बसला. या दुःखाचें मूळ शोधण्यासाठीं सर्वत्र धांवाधांव सुरू झाली, शेवटीं कारण सांपडलें. "एका शूद्राच्या मुलानें परमेश्वरप्राप्तीसाठीं तपश्चर्या आरंभली" शूद्रानें परमेश्वराची प्रार्थना करणें महापाप! तें पाप परमेश्वरास सहन झालें नाहीं म्हणून त्यानें हें संकट रामराज्यावर आणलें. याच्या निवारणार्थ उपाय शोधण्यास रामराज्याचें सर्व हितचिंतक लागले. शेवटीं उपाय सांपडला व तो सर्वांस मान्य झाला. 'जो शूद्राचा मुलगा परमेश्वराचीं तपश्चर्या करीत आहे त्यास त्याच स्थितींत, त्याच ठिकाणीं ठार मारलें म्हणजे' हा ब्राह्मणाचा मुलगा परमेश्वर तात्काळ जिवंत करील. त्याप्रमाणें त्या मुलास परमेश्वर चिंतनात असतांनाच ठार मारलें. तात्काळ ब्राह्मणाच्या मुलगा जिवंत झाला.अशा प्रकारच्या अनेक हकिकतीनें बरबटलेले आमचे पुराण-ग्रंथ आहेत. त्यांतून बहुजन समाजास धार्मिक स्वास्थ्य कसें लाभूं शकणार? त्या काळीं सामाजास जाळणाऱ्या असल्या पुराणांच्या अग्नीवर तुकाराम महाराज यांनीं अभंगरुपी जल ओतून तो

अग्नि शांत करण्याचे प्रयत्न केले व परमेश्वरप्राप्तीचा मार्ग प्रत्येक मनुष्यप्राण्यास सताड मोकळा आहे हें अधिकारवाणीनें सांगितलें.

## महाराजांस गुरु होते काय ?

महाराजांच्या चरित्रांत बुद्धिप्रधान अशा लेखकांनीं कांहीं बाबतींत नसती ओढाताण केली आहे व महाराजांच्या भक्तास नसत्या घोंटाळ्यांत पाडण्याचें कार्य केलें आहे. त्यांतील प्रमुख बाब म्हणजे, 'महाराजांस गुरु होते काय ?' कारण महाराजांच्या अभंगाच्या आधारें त्यांना गुरु करण्याची जरूर नव्हती. त्यांनीं गुरु केला असेल असेंहि दिसत नाहीं.

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठीलागे ॥१॥
म्हणोनियां अवघे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥धृ.॥
वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकामधीं ॥२॥
पाहो गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखे चेष्टा विपरीत ॥३॥
आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । योगी करिती रागे गुरु गुरु ॥४॥
तुका म्हणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥५॥

× × ×

गुरु शिष्यपण । हे तो अधम लक्षण ॥
भूतीं नारायण खरा । आप तैसाचि दुसरा ॥

× × ×

मेघवृष्टीनें करावा उपदेश । परी गुरुनें न करावा शिष्य ॥

× × ×

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणाचि देव होय गुरु ॥

× × ×

सांपडला देव । तुका म्हणे गेला भेव । उभा पांडुरंग । मागें पुढें ॥

× × ×

पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार जाला। विठोबा भेटला निराकार ॥
दीपका कर्पूर कैसा तो विरला। तैसा देह जाला तुका म्हणे ॥

× × ×

पांडुरंग सत्य केला अनुग्रह। निरसोनि संदेह बुद्धिभेद ॥
निजीं निजरूपीं निजविला तुका। अनुहातें बाळका हलरु गाती ॥

× × ×

कृत्यकृत्य झालों। इच्छा केली ते पावलों ॥

महाराजांस गुरुशिष्य हें नातें मान्य नव्हतें. त्याचा त्यांनीं निषेध केलेला आहे. शिवाय त्यांना प्रत्यक्ष परमेश्वर दर्शन घडलें तें स्वत: केलेल्या भक्तीमुळें! हें त्यांच्या वरील वचनावरून स्पष्ट होत आहे. शिवाय त्यांच्या चरित्राचा सांगोपांग विचार केला तर विचारी मनुष्य खरें तें अनुमान काढूं शकेल. त्यांचा मूळ पुरुष विश्वंभर बावा यांनीं भक्तीबळावर श्री विठ्ठलास देहूस आणलें. त्यांना गुरु करण्याची जरूर भासली नाहीं. नंतरच्या पिढ्यांतील प्रमुखांनीं गुरु केल्याचें आढळत नाहीं. महाराजांचे वडील बोल्होबा मोरे यांनीं गुरु केला असा कोठेंच उल्लेख नाहीं. प्रत्यक्ष परमेश्वरी साक्षात्कार झाल्यावरहि त्यांना गुरु करण्याची जरूर भासली असेल काय याबाबत विचार करणें जरूर आहे.

जप, तप, योगसाधन व समाधि वगैरे उपायांनीं आत्मदर्शन होऊन साक्षात्कार होत असतो. हा मार्ग दाखविण्यासाठीं कोणातरी योग्य अशा अधिकारी पुरुषाची अत्यंत जरुरी असते. असा जो मार्गदर्शक असतो तो गुरु बनतो. परंतु भागवतधर्मांत या मार्गाचा निषेध केलेला आहे. भागवतधर्मानें सर्वस्वी नामस्मरणास महत्व दिलें आहे. नामस्मरणानें पोटीं शुद्ध भक्ति उत्पन्न होते. भक्तीच्या जोरावर भक्त परमेश्वरदर्शनाचा अधिकारी बनतो. मग तो कोणत्याहि धर्माचा अगर पंथाचा असो; स्त्री असो अगर पुरुष असो. **तुका म्हणे तुम्ही चाला या वाटे। भरवशानें भेटे पांडुरंग ॥** भागवतधर्मानें गुरु-शिष्य परंपरेचा निषेध केला कारण गुरु शिष्याचा नमस्कार घेतो, परंतु भागवतधर्मांत परस्परांनीं परस्परास नम-

स्कार केलाच पाहिजे तेथें स्त्रीपुरुष असा भेद मानला जात नाहीं. समानता हें तत्त्व प्रत्येकानें पाळलेंच पाहिजे असें आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनीं ज्ञानेश्वरी या ग्रंथांत गुरुचें विशेष महत्त्व वर्णन केलें आहे.परंतु ज्ञानेश्वर महाराजांचा एकंदर इतिहास पाहिला तर तें नाथपंथी होते असें दिसतें. नाथ परंपरेंत गुरुपरंपरेस विशेष महत्त्व दिलें आहे. नाथपंथ त्यावेळीं महाराष्ट्रांत साधारण नांवापुरता जिवंत होता. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनां त्यावेळीं ज्ञानश्वरी पंढरपुरांत आणून भागवत धर्मसंतांच्या स्वाधीन केली. आत्मदर्शन होऊन परमेश्वरी साक्षात्कार व्हावा म्हणून एकनाथ महाराज प्रथम जनार्दन स्वामीजवळ बरींच वर्षे होते. त्यांनीं एकनाथ महाराजांस योगाभ्यासाचा मार्ग दाखविला. गुरुकृपा म्हणून दौलताबादेजवळ एका डोंगरावर त्यांना श्रीदत्तात्रयांचें दर्शन घडविलें. ( भागवतधर्मीयांचे दैवत श्री विठ्ठल आहे.) परमेश्वरी दर्शन घडल्यानंतर त्यांनीं मानवधर्म जो भागवतधर्म त्यासाठीं अनेक उत्कृष्ट ग्रंथ लिहून कांहीं अभंग करून श्रेष्ठ असें साह्य केलें आहे.

महाराष्ट्रांत भागवतधर्माचें आद्य प्रवर्तक नामदेव महाराज यांच्या घराण्यांत विठ्ठलभक्ति होती, त्यामुळें अगदीं बालपणीं त्यांना भक्तीचें वळण लागलें. बालभक्त म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे. शुद्ध भक्तीच्या जोरावर त्यांना बालपणीं पांडुरंगदर्शन घडलें. त्यानंतर महान् भक्त म्हणून त्यांची प्रसिद्धि झाली. परमेश्वरी साक्षात्काराच्या अनेक गोष्टी त्यांच्या आयुष्यांत घडल्या. तरी त्यांच्या गळ्यांत गुरुचें लोढणें अडकविण्याचें अनेकांनीं अनेक प्रयत्न केले. कै. पांगारकर यांनीं सर्वांवर ताण केली. नामदेव महाराजांस गुरु करण्याचा आग्रह प्रत्यक्ष विठ्ठलानें केला असें त्यांनीं लिहिण्याचें धाडस केलें. गुरु परंपरेचा मुख्य उद्देश असेल तर परमेश्वरीदर्शन घडविण्यासाठीं मार्गदर्शक म्हणून ! हें कोणासहि कबूल करावें लागेल.नामदेव महाराजांस परमेश्वरी दर्शन घडल्यावर अनेक लेखकांनीं त्यांच्या गळ्यांत विसोबा खेचराचे गुरु म्हणून लोढणें अडककविण्याचा प्रयत्न केला. विसोबा खेचर हे ज्ञानेश्वर महाराजांचे शिष्य. ज्ञानेश्वर महाराज हे नाथपंथी. भागवतधर्माच्या संस्थापकाचा गुरु नाथपंथी होता हें दाखविण्याचा हेतु स्पष्ट दिसतो. तुकाराम महाराज यांच्या

अनेक चरित्रलेखकांनीं गुरुपणाचें गांठोडें त्यांच्या डोक्यावर लादण्याचा प्रयत्न केला. त्या सर्वांपेक्षां पांगारकर यांनीं त्या गाठोड्याच्या गांठी घट्ट बांधण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या एकाच मुद्यासाठीं त्यांनीं आपल्या तुकाराम चरित्राची सदतीस पानें खर्च केलीं. त्यांनीं महाराजांचे गुरु बाबाजी चैतन्य ठरविलें. बाबाजी चैतन्य यांच्या गुरु परंपरेची साखळीची सुरवात थेट पुण्यांतून झाली. महाविष्णु, हंस (ब्रह्म), नारद, व्यास, राघव चैतन्य, केशव चैतन्य व बाबाजी चैतन्य यांच्यापर्यंत आणून सोडली. परंतु व्यासानंतर राघव चैतन्यापर्यंतची परंपरा कोठें गळून पडली याचें भान पांगारकरास राहिलें नाहीं. आपल्या मुद्याच्या सत्यतेसाठीं ते कांहीं काल्पनिक उदाहरणें देतात. व अखेर मानसशास्त्राच्या आधारांत घुसतात. ते लिहितात 'ज्याला जो ध्यास असेल तसें घडत असतें.'

श्री विठ्ठलाचें प्रत्यक्ष दर्शन घडल्यावर त्याच्या कृपाप्रसादानें जनहित करीन हेंच महाराजांचें ध्येय ! त्यासाठींच त्यांनीं परमेश्वरभक्ति आरंभली होती. ते ध्यानीं मनीं अखंड विठ्ठलनामाचा जप करीत. इतकेंच नाहीं तर जगांतील चराचराकडे पाहतांना, त्यांत माझा विठ्ठल इतक्या तन्मयतेनें वागत. महाराज भक्तीमार्गास लागले त्यावेळीं बाबाजी चैतन्य जिवंत नव्हते. ते भागवतधर्मीय संतहि नव्हते. त्यांचे अभंग अगर धार्मिक ग्रंथहि उपलब्ध नव्हता. इतकेंच नाहींतर बाबाजी चैतन्य या नांवाचे कोणी पुरुष होऊन गेले आहेत, अशी कल्पना महाराजांच्या मनांत येण्याससुद्धां कोणतेंहि कारण घडलें नाहीं. मग पांगारकर कोणत्या आधारावर सांगतात, कीं महाराजांस गुरूंचा ध्यास लागला होता.

तुकाराम महाराज यांच्या सबंध जीवनाचा विचार केला असतां वरील अभंगास ते जमत नाहीं असेंच दिसून येईल.कारण महाराज स्वप्नावर विश्वास ठेवीत नव्हते. 'स्वप्नीचें धन हातीं ना पदरीं, स्वप्नीचे घाये निबळसी वायां' अशा प्रकारचीं त्यांचीं अनेक वचनें आहेत. त्यावरून कोणीहि साधारण मनुष्यसुद्धां हेंच ठामपणें सांगूं शकेल कीं, स्वतः महाराजांचा स्वप्नावर विश्वास नव्हता व स्वप्नाच्या सत्यतेवर कोणीहि विश्वास ठेवूं नये. हा त्यांचा खरा उपदेश आहे.

सत्य गुरुरायें कृपा मज केली । परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला करूं ॥धृ॥
भोजना मागती तुप पावशेर । पाडिला विसर स्वप्नामाजी ॥२॥
कांहीं कळे उपजला अंतराये । म्हणऊनि काये त्वरा जाली ॥३॥
राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥४॥
बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरि ॥५॥
माहो शुद्ध पाहूनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥६॥

महाराज स्वप्नांत गंगेवर स्नानास जातात. गंगा कोणती ? कारण देहूच्या इंद्रायणी नदीस ते इंद्रायणीच म्हणत व इंद्रायणी नांवाबद्दल त्यांना प्रेम होतें. तसा त्यांनीं अनेकवार उल्लेखहि केला आहे. पंढरपुरच्या चंद्रभागेस ते 'चंद्रभागा' म्हणत. मग गुरु कोणत्या गंगेवर स्नानास जातांना यांना सांपडवितात. 'सांपडविले वाटे जाता गंगास्नाना' अगोदर भोजनास पावशेर तूप मागतात व नंतर मंत्र सांगतात. त्या गुरुला मी कोणाचा कोण हें स्वतःच सांगायची पाळी येते. या एकंदर प्रकारावरून हेंच स्पष्ट होत आहे कीं, 'एकाच वेळीं भोजनांत पावशेर तूप खाणाऱ्या तुपखाऊ गुरुनें वरील अभंग तयार करून तो तुकाराम महाराजांच्या तोंडांत घालून शिष्याकडून तूप घेण्याची परंपरा जिवंत ठेवण्यासाठीं हें कृत्य केलें असावें. शिवाय मंत्र दिला तो 'रामकृष्ण हरी !' महाराजांच्या घराण्याचा विठ्ठल नामाचा मंत्र आहे. हें गुरुमहाराज स्वप्नांत येण्यापूर्वीं तीन वर्षें अगोदर स्वर्गवासी झाले होते.

तुकाराम या नांवाचे चारपांच कवि झालेले आहेत. त्या प्रत्येकानें अभंग केलेले आहेत. त्यांपैकीं एखाद्या तुकारामाचा हा अभंग असेल. अगर तुकाराम महाराज जिवंत असतांना सालोमालो यानें अभंगांत मनास येईल तशी फिरवाफिरव केली तसा प्रकार झाला असेल. त्याबद्दल महाराजास खेदानें उद्गारहि काढावे लागले. महाराजांच्या पश्चात त्यांच्या अभंगांत अनेकांनीं मनास येईल त्याप्रमाणें फिरवाफिरव केली आहे. याबाबत अनेक विद्वानांनीं आपलें मतहि जाहीर केलें आहे.

पांगारकर आपल्या तुकाराम चरित्रांत पान २७१ वर लिहितात, "बाबाजी चैतन्याचा तुकोबांस स्वप्नोपदेश झाला हें प्रसिद्ध आहे. पण त्यांचे,

विषयीं कांहींहि विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. ज्या चार दोन गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांत परस्पर विरोधी असा भाग बराच आहे. अशा स्थितींत तुटपुंज्या, अर्धवट व परस्पर विरोधी असलेल्या माहितीच्या आधारावर तर्काची इमारत उभारून निश्चयात्मक सांगणें उचित नाहीं. संतचरित्र म्हणजे कांहीं कल्पित कादंबरी नव्हे. आधारावांचून येथें कहाणी सांगायची नाहीं." त्याच पानांत फिरून ते लिहितात, "तुकोबाचे गुरु कोण होते, कोठें राहात असत ते समाधिस्त कधीं झाले, त्यांची परंपरा मागून कोठून चालत आली याविषयीं वारकरीमंडळांत कांहींएक परंपरेची माहिती नाहीं. व ग्रंथहि उपलब्ध नाहींत." असें घरसोडीचें मत पांगारकर देतं असूनहि गुरु–शिष्य हें नातें जिवंत ठेवण्यासाठीं त्यांनीं आणखी अठरा पानें लिहिलीं.परंतु एकंदर वस्तुस्थिति पाहिल्यावर त्यावर कोणीहि विश्वास ठेवणार नाहीं.

पांगारकरांनीं बरीच ओढाताण केली व पान २२७ वर गुरु परंपरेचे दोन वृक्ष दाखविलें आहेत. त्यावरून कांहीं बोध होत नाहीं. अखेर त्यांनीं ज्ञानेश्वर महाराजांचे शिष्य सच्चिदानंदबाबानंतर विश्वंभर, राघवचैतन्य, केशवचैतन्य, बाबाजीचैतन्य व नंतर तुकोबाराय दाखविलें. एकूण महाराजांस भागवतपंथांतून ओढून नाथपंथाच्या परंपरेंत घालण्याचें धाडस पांगारकरांनीं केलें.

तुकाराम महाराज यांच्या सबंध जीवनचरित्राचा विचार केला तर त्यांचें भक्तिमय जीवन,समाज सुधारणा व अंधश्रद्धेपासून लोकांची मुक्तता करण्याची धडपड ह्या गोष्टीमुळें वरील अभंगाचा संबंध त्यांच्या चरित्राशीं लागत नाहीं. कारण जनहिताची खरी तळमळ व चिकित्सक बुद्धि हेंच त्यांच्या अभंगांतून व चरित्रांतून स्पष्टपणें उमटत आहेत. मग ते स्वप्नावर व स्वप्नांतील गुरुवर विश्वास कसा ठेवतील ?

स्वप्नाला जागृतींत महत्त्व दिल्याची एक गोष्ट पुराणांत आहे. राजा हरिश्चद्र याला स्वप्न पडलें कीं, आपण आपलें राज्य ब्राह्मणास दान दिलें. त्याप्रमाणें खरोखर जागृतावस्थेंत तो ब्राह्मणास राज्य दान करतो, आपण स्वत: देशोधडीस लागतो. बायको व मुलगा यांच्या संबंधीचें कर्तव्य विसरतो. राज्य आपलें नाहीं प्रजेचें आहे, प्रजेचें रक्षण करण्यासाठीं आपण राजे आहोंत. या फाटक्या ब्राह्मणास राज्य दिल्यानें हा राज्य कसें सांभा-

ळणार ? परचक्रापासून राज्याचें रक्षण कसें करणार ? वगैरे विचार न करतां स्वप्नाप्रमाणें राज्य दान देतो. त्याच्या कृतीस बुद्धिमान लोक महत्त्व देणार नाहींत. आजच्या लोकशाही काळांत अशा बावळट राजास राज्यावरून काढा व दुसरा राजा नेमा असें म्हणतील.परंतु आमच्या पुराणप्रिय लोकांनीं त्या हरिश्चंद्राला सत्त्वशील ठरविलें. ज्याप्रमाणें ही गोष्ट नवल करण्यासारखी आहे,त्याचप्रमाणें तुकाराम महाराजांसारख्या श्रेष्ठास स्वप्नांतील गुरुवर विश्वास ठेवण्यास भागहि पाडलें आहे. ज्यांची अभंगवाणी जिवंतवाणी म्हणून पृथ्वीच्या पाठीवर फिरत आहे, ज्यांच्या तत्त्वज्ञानाकडे जगांतील विद्वान् आदरानें पाहात आहेत. ज्यांच्या समाजासुधारणेंबाबत जगांतील कोणाहि सुधारकास आश्चर्यानें तोंडांत बोट घालावें लागेल. कित्येक परधर्मीय लोक आपल्या धर्मांतील संस्थापकांशीं तुकाराममहाराजांची तुलना करून पाहातात. महाराष्ट्रांतील बहुसंख्य लोक ज्यांच्या गाथ्यास पांचवा वेद मानतात अशा सर्वश्रेष्ठ संतास स्वप्नावर विश्वास ठेवण्यास भाग पाडून गुरुचें लोढणें अडकविण्याचें आजपर्यंत झालेले प्रयत्न पाहून कोणाहि विचारी माणसास आश्चर्य वाटेल व परधर्मीय लोक महाराजांस भोळसट समजतील. तरी याबाबत विचार करून निश्चित मत देणें हें महाराष्ट्रांतील लेखक व बुद्धिप्रधान लोकांचें कर्तव्य आहे असें माझ्या अल्पमतीस वाटत आहे.

तुकाराम महाराजांस गुरुपरंपरा मान्य नव्हती. गुरुशिष्य नातें त्यांना विघातक वाटत होतें. याबावत त्यांच्या अभंगाकडे लक्ष देणें अत्यंत जरूर आहे. आम्ही या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत महाराजांचें हल्लीचें वंशज बाबासाहेब देहूकर यांचेकडे चौकशी केली. त्यांनीं सांगितलें, आमच्या घराण्यांत गुरु करण्याची परंपरा नाहीं. कोणी गुरु केल्याचेंहि आमच्या पूर्वीच्या कागदपत्रावरून दिसत नाहीं.

आधुनिक काळांतील संत श्रीगाडगेमहाराज यानीं स्थापन केलेल्या एकंदर संस्थांचा सार्वजनिक उपयोगासाठीं ट्रस्ट केला. ट्रस्ट करतांना त्यांत त्यांनीं स्पष्ट लिहिलें कीं, " मी कोणास शिष्य केलें नाहीं, व माझा कोणी शिष्यहि नाहीं. श्रीगाडगेमहाराज शिष्य परंपरेच्या विरुद्ध आहेत हे यावरून स्पष्टच होते.

☆

# महाराष्ट्रीय संत

भजन चालिलें उफराटें । कोण जाणें खरें खोटें ॥
सजीवासी हाणी लाथा । निर्जीव पायीं ठेवी माथां ।
तोंड धरूनि मेंढा मारा । म्हणती सोमयाग करा ॥
नामा म्हणे अवघें खोटें । एक हरिनाम गोमटें ॥

भागवतधर्म हा महाराष्ट्रांत वारकरी संतांनीं स्थापन केला असा कांहींचा समज आहे. पण या धर्माची स्थापना व उगम भगवान कृष्णाच्या वाणीनें, वा कृतीनें शिकवणुकीनें झालेला आहे. परंतु मध्यंतरी या धर्मावर बुद्धिवान लोकांनीं वैदिक धर्माचें सोयिस्कर असें कवच चढविलें. मूळ प्रकाश झांकण्याचा प्रयत्न झाला. समाज धार्मिकदृष्टचा विस्कळीत झाला. अनेक उपपंथ निघाले. त्यांनीं कांहीं काळ सबंध भारत व्यापला, व शेवटीं ते स्वतंत्र धर्म म्हणून मूळ धरून राहिले. त्यामुळें देशामध्यें उच्चनीचतेचे विषारी वारे खेळूं लागले. नको त्या संकटांनीं भारतास हैराण केलें. वैदिक धर्म हा कांहीं ठराविक वृथाभिमानी व वर्णाभिमानी लोकांच्या हातांत गेला. त्यांनीं आपल्या बुद्धीच्या जोरावर भागवतधर्माचीं उच्च तत्त्वें सामान्य लोकांपासून लपविण्याचें प्रयत्न केले. शास्त्रवचन व धर्मग्रंथ संस्कृत-किल्ल्यांत कोंडले. त्या किल्ल्याभोंवतीं शास्त्री, पंडित जागता पाहारा करूं लागले. या किल्ल्यांत आमचे धर्मग्रंथ आहेत काय अशी कल्पनाहि सामान्य लोकांच्या मनात येऊं नये म्हणून ते अत्यंत जपूं लागले.

" शंकराचार्यांनीं अद्वैत मताचें पुनरुज्जीवन करून आपल्या अतुल बुद्धिबलानें त्याचा प्रसार साऱ्या देशभर केला. आर्यावर्ताला त्यांनीं हिंदुधर्माच्या तात्विक स्वरूपाकडे वळविलें हें खरें, तथापि आचार्यांच्या या कर्तृत्वाचा उपयोग सामान्य जनतेला फारसा झाला असें म्हणतां येत नाहीं. सामाजिक विषमता मोडण्याकडे आचा-

यांची प्रवृत्ति नव्हती. जातिभेदादि सामाजिक दोष त्यांनीं तसेंच कायम राहूं दिले. त्यामुळें त्यांच्या तत्वविवेचनाकडे सामान्य जनांचें लक्ष फारसें वेधलें नाहीं. याशिवाय आचार्यांच्या तत्वविवेचनांत अंत:करणाच्या कोमल भावनांना कोठेंहि अवसर सांपडला नसल्या-मुळें सामान्य मनुष्याला हें सारें विवेचन शुष्क वाटण्यासारखें आहे. रामानुजाचार्यांनीं याहून वेगळा मार्ग स्वीकारला. सामान्य जनांच्या बुद्धीला पटेल अशा मार्गानें आपल्या तत्वांचें विवेचन त्यांनीं केलें. बुद्धि जागृत करण्यापेक्षां अंत:करणाच्या जागृतीकडे त्यांनीं अधिक लक्ष दिलें. धर्माच्या साम्राज्यांत अधिकउणा भाव नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें आपलें हृद्गत सामान्य जनांच्या अंत:करणा-पर्यंत पोंहोचविण्याकरतां सामान्यांच्या भाषेंत ते बोलले. एकंदर जनसमुहाला वैदिक धर्माकडे वळविण्याचें कार्य रामानुजांच्या हातून अधिक प्रमाणावर झालें. रामानंद, कबीर, दादू आणि नानक असे अवतारी पुरुष एकामागून एक जन्मास आले. परमे-श्वराच्या दृष्टीनें मनुष्यामनुष्यांत भेद नाहीं या मताचा पुरस्कार या सार्‍यांनीं एका आवाजानें केला.

(स्वामी विवेकानंद, खंड १० वा)

देवगिरी (दौलताबाद) येथील यादवांचें राज्य मुसलमानांच्या आहारीं जाण्यापूर्वीं पैठण येथें आमचे शास्त्री-पंडित वैदिकधर्माचें रक्षण करण्यासाठीं मोठ्या संख्येनें एकत्रित झाले होते. त्यांनीं पैठणास पीठाचे स्वरूप आणलें होतें. उत्तरेस काशीकडे जितक्या महत्वानें शास्त्री पाहात तितक्या अभिमानानें हे पैठणकडे पाहात. वैदिकधर्माच्या नांवावर त्यांनीं वर्णाश्रमाचे बंड तेथें जोरानें सुरू केलें होतें. या बंडानें त्यावेळीं सबंध महा-राष्ट्र व्यापला होता. बहुजन समाजास त्यांनीं जणूं धार्मिकतेचीं द्वारें बंदच केलीं होतीं. याच वेळीं महाराष्ट्रांत महानुभावपंथानें जोर करण्याचा

प्रयत्न केला. कृष्णभक्ति व सामाजिक समतेचीं तत्वें यामुळें त्या पंथाचा प्रसार होऊं लागला. पैठणच्या शास्त्री-पंडितांनीं या पंथावर व त्याच्या प्रचारकावर स्वारी केली. त्यांना सळों कीं पळो करून सोडलें. बहुजन समाजांत त्या पंथाबद्दल भलभलतें गैरसमज उत्पन्न केले. त्यामुळें त्या पंथांतील पुढाऱ्यांनीं आपलें धार्मिक ग्रंथ सांकेतिक भाषेंत तयार केले. या पंथाचें अनुयायित्व रामदेवराव यादव यांच्या दिवाणाचे घरापर्यंत गेल्याचेंहि समजतें. शास्त्री मंडळीनीं या पंथाच्या पुढाऱ्यास उत्तर हिंदुस्थानचा रस्ता दाखविला. तो पंथ पंजाबांत मूळ धरूं लागला. आजही त्या पंथांचीं अनेक पूजास्थानें पाकिस्तानांत आहेत. याच सुमारास पंढरपूर भागांत दामूशेटी या नांवाचा शिंपी गृहस्थ राहत असे. त्याच्या पोटीं नामदेव-महाराज जन्मास आले.

श्रीनामदेव महाराज यांचा जन्म शके ११९२ त झाला. त्यांचे वडील दामुशेट हे शिंपी समाजांतलें असल्यानें ते आपला कपडे शिवण्याचा उद्योग करीत. ते पंढरपूरच्या विठ्ठलाचे महान् भक्त होते. त्यांचें कुटूंबहि विठ्ठभक्त होते. त्यामुळें त्या उभयतांनीं नामदेव महाराज यांच्या बालमनावर भक्तीची पांखर चांगल्या प्रकारें घातली. त्याचा परिणाम नामदेव महाराज हें बालभक्त म्हणून ठरलें. केवळ शुद्ध भक्तीचे जोरावर अगदीं बालपणीं साक्षात्कार फक्त नामदेव महाराज यांनाच झाला आहे. महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासांत असलें दुसरें उदाहरण बहुतेक सांपडणार नाहीं.

श्रीनामदेव महाराज यांनीं वयांत आल्यावर पंढरपूर येथें भागवत-धर्माची पताका प्रथम फडकविण्याचें महान् कार्य केलें. पैठणच्या शास्त्री-पंडितांस प्रतिस्पर्धी म्हणून पंढरपूर येथें संतांच्या समताधर्माचें पीठ त्यांनीं स्थापिलें. त्याच्या समकालीन चोखा महार, सांवता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर सोपानदेव, बंका महार, रोहिदास चांभार, जोगापरमानंद ( तेली ) कान्हो पाठक, जगन्नाथ चांगा, केशवदास वगैरे संत निर्माण झाले. शिवाय जनाबाई, मुक्ताबाई, भागूबाई महारीण व चोखोबाचे कुटूंब अशा स्त्रिया निर्माण होऊन त्यांनीं संतांची कामगिरी केली. या सर्वांनीं नामस्मरणाचा गडगडाट करून महा-

राष्ट्रभर भक्तीचा पाऊस पडला. त्यामुळें वर्णाश्रमाची घाण वाहूं लागली व चोहोंकडे भागवतधर्माचा प्रसार होऊं लागला.

## अभंगकर्ते व कीर्तनकार

महाराष्ट्रीय भागवतधर्मीय संतामध्यें श्रीनामदेव महाराज यांना अग्रस्थान आहे. नामदेव महाराजानी भक्तीभावानें श्रीविठ्ठलास बालपणींच प्रसन्न केल्याची आख्यायिका आहे. सामान्य जनतेस समजेल अशा सोप्या भाषेंत धर्मज्ञान प्रथम त्यांनीच अभंगद्वारें पुढें आणलें व त्याचा प्रसार कीर्तनद्वारें केला. कीर्तन करण्याची प्रथा त्यांनीच सुरूं केली असावी व त्यावरून नामदेव महाराज हे पहिले कीर्तनकार असावेत असें दिसतें.

आम्हा कीर्तन कुळवाडी । आणिक नाहीं उदीम जोडी॥
वाचा पिकली पिकली । हरिनामाची वगे झाली ॥

नामदेव महाराज यांचें कीर्तन अत्यंत भक्तीमय असे. त्यामुळें समाज त्यांच्याकडे वाढत्या वेगानें आकर्षिला जाई. कीर्तनांत ते स्वत: केलेले अभंग म्हणत. त्यांनीं हव्यकाव्य, जपजाप्य, यज्ञयाग, तपानुष्ठान यावर अभंगद्वारें कडकडून हल्ले केले. प्रत्येक मनुष्य प्राण्यास परमेश्वर प्राप्तीचा दैवी हक्क आहे, तेथें जातीची कृत्रिम उच्चनीचता आड येत नाहीं. परमेश्वरास निर्मळ भक्ति व सत्याचरण आवडतें. अशा कोणत्याहि स्त्री-पुरुषांस तो भेटूं शकतो, वगैरे तत्वांचा प्रसार त्यांनीं अत्यंत निर्भीडपणें केला व पैठण येथील पीठास एक प्रकारें आव्हानच दिलें हें त्यांच्या एकंदर अभंगवाणीवरून स्पष्ट होत आहे.

भक्ति प्रतापें पावलों मी सुपंथ । सफळ निश्चित परमार्थ ॥
देव सर्वांभूतीं असतां प्रगट । निर्वाणी चोखट भक्ति जाण ॥
धरुनिया मनीं जपशील नाम । तेणें निजधाम पावशील.
जप, तप, ध्यान न लगे साधन । भक्ति तें कारण नामा म्हणे ॥

× × ×

आम्हां वैष्णवांचा कुळ धर्म कुळीचा । विश्वास नामाचा सर्व भावें॥

× × ×

नामा परता मंत्र नाहीं त्रिभुवनीं । ऐसे बोले वाणी वेद शास्त्री ॥

× × ×

सार पै सांगत उपनिषद तुम्हां । वाचे रामनाम जप करा ॥

× × ×

नाम हेंचि कर्म नाम हेंचि धर्म । केशव हेंचि वर्म सांगितलें ॥

× × ×

अवघा करितां संसाराचा धंदा । वाचे वदा सदा हरिनाम ॥
ब्राह्मण तो तुम्ही सर्व नारीनर । सर्वांसी आधार नाम सत्य ॥
नामा म्हणे हरिकथा हरी भव व्यथा । उद्धरील सर्वथा भाक माझी॥
नामा म्हणे साधन न लगे आणिक । दिधली मज भाक पांडुरंग ॥

नामदेव महाराज यांनीं नामस्मरण व भजन यांवर प्रथम विशेष जोर दिला. कीर्तनांत ते स्वतः केलेले अभंग घेत. त्यांच्या अभंगाची भाषा सोपी असे. इतकेंच नव्हे तर ती सामान्य जनांच्या नित्य बोलण्यांतील असे. त्यामुळें त्यांचे अभंग लोकांच्या पाठांत लवकर येऊं लागले. अर्थ समजल्यामुळें परमेश्वरभक्ति व शास्त्र याबद्दल समाजांत प्रेम उत्पन्न होऊं लागलें. त्यांचे अभंग खेड्यांतून लोक भजनद्वारें म्हणू लागले. भक्तीचे बाबतींत स्त्रीपुरुष अगर वर्णव्यवस्था आडवी येत नसल्यामुळें सर्व जातीच्या स्त्रीपुरुषांच्या मुखांत नामदेव महाराज यांचे अभंग घोळूं लागले.

नामदेव महाराज यांच्या काळीं अनेक पंथ उपपंथ निर्माण झाले होते. ते परस्पराचा द्वेष करीत.

विष्णुसी भजला शिव दुराविला । अधःपात झाला तया नरा ॥१॥
शिवपूजा करी विष्णुसी अव्हेरी । तयाचियें घरीं यम नांदे ॥२॥

विष्णु कथा ऐके शिवासी जो निंदी । तयासी गोविंदीं ठाव नाहीं॥३॥
नामा म्हणे असती शिव विष्णु एक । वेदाचा विवेक आत्माराम ॥४॥

× × ×

वेदाध्ययन करिसी तरी वैदिकाचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना॥ पुराण सांगसी तरी पुराणिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना॥ कर्म आचरसी तरी कर्मठचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना ॥ नामा म्हणे नाम केशवाचे घेसी । तरीच वैष्णव होसी अरे जना ॥

त्या काळीं नामदेव महाराजांनीं आपली वाणी समाजोपयोगी व धर्म प्रसारार्थ या दोन्ही दृष्टीनें वापरली. सर्व शास्त्राचें गूढ त्यांनीं समाजापुढें अगदीं उघडें मांडलें. त्याच वेळीं उत्तर हिंदुस्तानमध्यें मुसलमानी सत्ता मनसोक्त नाचत होती. तिचें प्रत्यक्ष हादरे दक्षिण भारतास जाणवूं लागले होते. त्याबाबतहि त्यांनीं इशारे दिले आहेत. भक्तीचे बाबत उच्चनीच भेद नाहीं, तेथें सर्वांस अधिकार आहे हें तत्व त्यांनीं नुसतें तोंडांत अगर गाथ्यांत ठेवलें नाहीं तर तें प्रत्यक्ष कृतींत आणून दाखविलें, समाजास पटवून दिलें. चोखोबा यांना अगदीं समानतेनें वागवून त्यांना त्यांनीं परमेश्वरीं दर्शनाचें हक्कदार केलें.

## चोखोबा महाराज

नामदेव महाराज व चोखोबा या जोडीनें त्या काळीं धार्मिक बाबतींत मोठीच कामगिरी केली. नामदेव महाराजांनीं मध्यम वर्ग आवरून धरला. तर चोखोबांनीं धार्मिक बाबतींत खालचा थर पक्का केला. चोखोबा हे नामदेव महाराज यांच्या खांद्यास खांदा देत. या उभयतांनीं वर्णाश्रमाचे खड्डे, कर्मठपणाचे उंचवटे, रूढीच्या दरडी व संस्कृत भाषेची कांटेरी झुडपें यांतून भागवतधर्माचा गाडा ओढीत आणून पंढरपूर येथें उभा केला. चोखोबानें आपल्या भक्तीबळावर समाजास हें दाखवून दिलें कीं, परमेश्वराजवळ जाण्यास जातपातीचा प्रश्न आड येत नाहीं. देवाला

संस्कृत भाषा समजते असें नाहीं. त्याला प्रसन्न करण्यासाठीं जपजाप्य, यज्ञयाग. अनुष्ठान यांची जरूरी नाहीं. त्याच्या भेटीसाठीं कोणीहि मध्यस्थाचीरी जरू नाहीं. नामस्मरणानें व पवित्र आचरणानें तो कोणाहि मनुष्य प्राण्यास भेटतो. त्यांचे हे उद्गार स्वानुभवाचे होते. त्यामुळें ते खालच्या समाजाच्या अंतःकरणांत जाऊन भिडत. त्यामुळें तो समाज पंढरपूरच्या भक्तीच्या पेठेकडे लोटला जाई.

योगयाग तप व्रत आणि दान । करितां साधन नाना कष्ट ॥
सुलभ सोपेरें नाम विठोबाचें । सकळ साधनांचें मूळ ॥

× × ×

आम्हां नव्हे ज्ञान न कळे पुराण । वेदाचें वचन न कळे ॥
आगमाची आटी निगमाचा भेद । शास्त्रांचा संवाद न कळे आम्हां॥
योगयाग तप अष्टांग साधन । न कळेचि दान व्रत तप ॥
चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा । गाईन केशवा नाम तुझें ॥

चोखोबा महाराजांची निर्मळ भक्ति पाहून त्यांच्याइतका सहवास दुसऱ्या कोणाहि भक्तास विठ्ठलानें दिला नाहीं. हें भागवतधर्मीय ग्रंथांवरून स्पष्टच होते. त्यांची एकंदर अभंगवाणी पाहतां तिच्यांत व्यक्त झालेली त्यांची परमेश्वर भक्तीबद्दलची तीव्र तळमळ दिसून येते. कर्मकांडावर त्यांनीं आपल्या अभंगांत प्रखर प्रहार केले आहेत. त्यांना दीर्घायुष्य लाभलें होतें. त्यामुळें भक्तिमार्गाचा प्रसार त्यांना विशेषत्वानें करतां आला व समाजसेवेची संधीहि दीर्घ काळ लाभली.

कै. पांगारकर हे चोखोबाच्या भक्तीकडे बरेच आकर्षिले गेले. चोखोबाच्या संतपणाची त्यांनीं मोकळ्या मनानें अनेक प्रसंगीं स्तुति केली आहे. पण मधूनमधून त्यांचा वर्णाभिमान त्यांना घरसोडी करण्यास भाग पाडीत होता. त्यांनीं लिहिलेल्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड १ पान ५२७ यावर पुढील उतारा आढळतो, "पंढरीच्या देवाच्या पायावर अस्पृश्यांशिवाय सर्वांस मस्तक ठेवण्याचा अधिकार आहे. सर्वांस देवाची पूजा करतां येते, देवाला कडकडून भेटतां येते." त्याच ग्रंथांत पान ६५५

वर ते म्हणतात, " देव चोखोबाचे घरीं जेवायला आले " ते आपल्या तुकाराम चरित्रांत लिहितात, " चोखामेळ्यास विठोबाचें दर्शन घेतां आलें नाहीं. पण आपल्याला मंदिरांत येऊं दिलें नाहीं म्हणून त्यानें कुरकुर केली नाहीं. अशी परस्परविरोधी विधानें त्यांच्या एकंदर लिखाणांत बरीच आहेत. प्रत्यक्ष देव महाराचे घरीं जाऊन जेवला तरी चालेल पण देवळांत अस्पृश्य नको, हीच विचारसरणी अनेक पदवीधर हरिभक्तांची आहे.

चोखोबांच्या भक्तीचा परिणाम त्यांच्या सर्व कुटूंबांत झाला होता. बायको सोयराबाई, बहीण निर्मळाबाई मुलगा कर्ममेळा व बायकोचा भाऊ बंका महार हे सर्व भक्त होते. त्या सर्वांनीं त्या काळास अनुसरून अभंगवाणी केलेली आहे.

नामदेव महाराज यांच्या समकालीन झालेल्या संतांनींहि अमोल अशी अभंवाणी निर्माण केलेली आहे. या संत मंडळींत शिंपी, माळी, सोनार, कुंभार, महार, तेली, चांभार, वगैरे समाजांतील लोक होते. त्यांना बहुसंख्य समाजाबद्दल खरा जिव्हाळा होता. समाजावर कर्मठांचा होणारा धार्मिक जुलूम त्यांना प्रत्यक्ष जाणवत होता. बहुसंख्य समाज धार्मिक स्वास्थ्यासाठीं सैरावैरा फिरत आहे हें दृश्य त्यांना खेड्यापाड्यांतून दिसत होतें. त्या समाजाची खरी धार्मिक भूक त्यांना अंतःकरणाच्या ओढीनें कळत होती म्हणून त्यांच्यासाठीं सोयीस्कर होईल अशी अभंगवाणी निर्माण करून तिचा प्रसार त्यांनीं कीर्तनद्वारें व भजनद्वारें महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत केला. या संतमंडळींनीं व त्यांच्या अभंगांनीं महाराष्ट्रीय जनता धार्मिक स्वास्थ्याच्या जोरावर एकत्रित ठेवण्याचें मोठेंच कार्य केलें.

" भारतभूमीला अवनतावस्था आली तेव्हां भिक्षुकांनीं इतर जातींना ज्ञान जसें पारखें करून ठेवले तसेंच स्त्रियांचेहि सारे हक्क हिरावून घेतले. हजारों वेदज्ञ ब्राह्मणांसमक्ष गार्गीनें याज्ञवल्कयाबरोबर वादविवाद केला. तिच्या चर्चेचा विषय ' ब्रह्म ' हाच होता. कांहीं मोजक्या स्त्रियांना ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्याचा जर अधिकार असेल तर तो साऱ्यांनाच कां असूं नये?"

(स्वामी विवेकानंद खंड, १० वा.)

संत जनाबाई कान्होपात्रा, भागूभाई महारीण, व संत चांखोबाचे कुटुंब सोयराबाई, मुक्ताबाई, वगैरे स्त्रियांनीं त्या काळीं परमेश्वरभक्तीच्या बळावर शास्त्री-पंडितास हेंच दाखवून दिलें कीं, परमेश्वरभक्तीचा व प्राप्तीचा अधिकार स्त्रियांना आहे. तुमचीं शास्त्रवचनें फोल आहेत, एकांगी आहेत.

सिंहाचें तें नख पतिव्रतेचें स्तन । वेंचिलियां प्राण हातां नये ॥१॥
शूरांचें तें शस्त्र, कृपणाचें धन । वेंचिलियां प्राण हातां नये ॥२॥
गजमाथां मोती सर्पाचा तो मणी । वेंचिलियां प्राण हातां नये ॥३॥
विरल्यावांचून देहीं देहभाव । जनी म्हणे देव हातां नये ॥४॥

× × ×

परब्रह्मी चित्त निरंतर हा धंदा । तया नाहीं कदा गर्भवास ॥१॥
उपजोनी जनीं धन्य ते योनी । चित्त नारायणा मुक्त लगे ॥ध्रु.॥
अव्यक्त पै व्यक्त चित्तासि अनुभव । सर्व सर्वी देव भरला दिसे ॥२॥
ज्ञेय ज्ञाता ज्ञान उन्मनी विज्ञान । चित्त नारायण झालें त्याचें ॥३॥
आदि अंती हरि सर्व त्याचा जाला । परतोनि अबोला प्रपंचेसी ॥४॥
मुक्ताइचें चित्त निरंतर मुक्त । हरि हेंचि संचित आम्हां घरीं ॥५॥

× × ×

काज नाहीं हो जनासी । रिझवावे त्या देवासी ॥५॥
जन हांसतील मज । आतां झालें मी निर्लज्ज ॥ध्रु॥
मागेंपुढें नाहीं कोणी । सख्या विठ्ठलावांचुनी ॥२॥
अनाथाचें करितो काज । म्हणोनि भरोसा आहे मज ॥३॥
भागु म्हणे झाले निर्भयी । आहे माझी विठाई ॥४॥

× × ×

नाहीं उरली वासना । तुम्हां नारायणा पाहतां ॥१॥
उरला नाहीं भेदाभेद । झालें शुद्ध अंतर ॥२॥
विटाळाचें होतें जाळें । तुटलें बळें नामाच्या ॥३॥
चौदेहाची तुटली दोरी । म्हणे चोख्याची म्हारी ॥४॥

या स्त्रियांना प्रत्यक्ष पांडुरंगाचें दर्शन होऊन साक्षात्कार झाला असें भागवतधर्मीय वाङमयाचें म्हणणें आहे.

## ज्ञानेश्वर महाराजांचें पंढरपुरास आगमन

श्रीसंत नामदेव महाराज व त्यांच्या समकालीन संतांनीं पंढरपूर येथें भक्तीचें पीठ स्थापन केलें. त्यासाठीं त्यांनीं अहोरात्र कष्ट केले. परमेश्वरभक्तीच्या जोरावर व नामस्मरणाच्या आधारावर त्यांनीं अखिल महाराष्ट्र या पीठाकडे ओढला. पंढरपूरच्या भागवतधर्मीय संतांची कीर्ति व त्यांचे महत्त्व ज्ञानेश्वर महाराज यांच्या कानावर गेलें. त्यांनीं पंढरपूर येथें जाऊन या संताची भेट घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें आपल्या सर्व भावंडासह ते पंढरपूरास आले.

याबाबतची हकीकत कै. पांगारकर यांनीं आपल्या ' मराठी वाङमयाचा इतिहास ' खंड १, पृष्ठ ६५७ वर दिली आहे ती पुढीलप्रमाणें. " नामदेवाची महाभक्त म्हणून सर्वत्र ख्याति झाल्यावर ती ज्ञानेश्वर मंडळ नेवासें मुक्कामीं असतांना त्यांच्या कानांवर आली. ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी ग्रंथ झाला होता. रेड्याकडून वेद बोलविणें, भिंत चालविणें व त्यांच्या सिद्धिचमत्काराच्या गोष्टीहि पंढरीच्या भक्तभाविकांत पसरल्या असून ज्ञानेश्वरीचा आस्वाद चाखलेले कित्येक लोक पंढरीस आले व त्यांच्याकडून ज्ञानेश्वरांची कीर्ति नामदेवांच्या कांनीं येऊन त्यांच्या मनांत ज्ञानेश्वराविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला. परस्परांस परस्परांच्या भेटीची उत्कंठा लागून राहिली. अखेर निवृत्तिनाथ आपल्या भावंडास बरोबर घेऊन पंढरपूरास आले. आधींच ते सारे निःस्सीम कृष्णभक्त, त्यांत श्रीकृष्णाची बालमूर्ति विटेवर उभी राहिलेली पाहून व नामदेवरायांचें अलोट सप्रेमाचें कीर्तन ऐकून त्यास अत्यानंद झाला. ज्ञानेश्वर पंचक, नामदेवराय व त्यांची मंडळी यांच्या परस्परांच्या गांठीभेटी होऊन सर्वांचे परमसख्य जमलें."

महाराष्ट्रांतील भागवतधर्माचा इतिहास व पांगारकरासारख्या लेखकाची कबुली यावरून हेंच दिसून येतें कीं, श्रीज्ञानेश्वर महाराज हे पंढरपुरास जाण्यापूर्वी संतांनी भक्तीमार्गास सुरवात करून भागवतपंथाचें पुनरुज्जीवन केलें होतें. नामदेव महाराजांची व ज्ञानेश्वर महाराजांची प्रथम कीर्तनांत भेट झाली. त्यावेळीं ते भागवतधर्मावर कीर्तन करीत होते. गोरोबा हे ज्ञानेश्वरांपेक्षां नऊ वर्षांनीं मोठें. नामदेवराय सात वर्षांनीं वडील. त्याचप्रमाणें चोखोबा, सांवतामहाराज वगैरे संत मंडळी ज्ञानेश्वरापेक्षां वयानें मोठीच होती. ज्ञानेश्वरांची भेट होण्यापूर्वी या मंडळींनी स्वत: अभंग करून कीर्तनासहि सुरवात केली होती. प्रथम भेटीचे वेळीं नामदेवराये सुमारे बावीस तेवीस वर्षांचें असतील. ते बालभक्त असून त्यांच्या घराण्यांत पूर्वापार विठ्ठलभक्ति होती. त्या भक्तीच्या प्रसारार्थ त्यांनीं अभंगरचना करून कीर्तनास सुरवातहि केली होती. यामुळेंच महाराष्ट्रांतील भागवतधर्माचें आद्य प्रवर्तक नामदेव महाराज आहेत हें सिद्ध होते. परंतु अनेक लेखकांनीं लेखनकलेच्या जोरावर या पंथाचे संस्थापक म्हणून ज्ञानेश्वर महाराजांस ठरविण्याचें प्रयत्न केले. ज्ञानेश्वरानें पाया घातला असा एक अभंग आहे. त्यावर सर्वांनीं जोर दिला. इतिहासाच्या सत्यतेकडे दुर्लक्ष केलें गेलें असे माझ्या अल्पमतीस वाटतें. याबाबत विद्वानांनीं चर्चा करणें जरूर आहे. कारण ज्ञानेश्वर महाराज नाथ परंपरेंतील आहेत असें ज्ञानेश्वरी व त्यांचें एकंदर जीवनचरित्र यावरून वाटतें "महापुरुष हा जगत्कल्याणासाठीं देह झिजवतो. त्याप्रमाणें त्यांनीं आपला जन्म महाराष्ट्राच्या हितासाठीं व भागवतधर्माच्या प्रसारासाठीं खर्च केला." ते जरी नाथपंथी होते तरी त्यांनीं सत्यवचनें प्रकाशांत आणलीं. तीं समाजाच्या गळी उतरविण्यासाठीं सर्व प्रकारांनीं प्रयत्न केले. पंढरपूर येथें नामदेवमहाराज आदि संतांनीं स्थापन केलेल्या भागवत पंथास त्यांनीं सर्व प्रकारें मदत केली. त्या संतांच्या समागमांत आपले शेष आयुष्य घालविलें. त्यामुळें त्यांना संतमालिकेंत वरचें स्थान प्राप्त झालें.

ज्ञानेश्वर महाराज यांचे वडील विठ्ठलपंत यांनीं परमेश्वरप्राप्तीसाठीं संन्यास घेतला होता. नंतर गुरुच्या आज्ञेवरून त्यांनीं फिरून गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यानंतर त्यांना निवृत्तिनाथ, ज्ञानदेव व सोपानदेव

असे तीन मुलगे व मुक्ताबाई अशीं चार अपत्यें झालीं. मुलांच्या व्रतबंधा· साठीं त्यांनीं ब्राह्मणात विनंति केली. कर्मठांनीं त्यांची विनंति झिडकारली. "पाहिजे असल्यास मला शास्त्राधारानें प्रायश्चित सांगा पण मुलांचे मौंजीबंधनास साह्याय्य करा,अशीहि त्यांनीं विनंति केली. कर्मठांनीं त्यांच्या बाबत सारासार विचार केला नाहीं, उलट त्यांना आज्ञा केलीं कीं,'तुम्ही संन्यास घेऊन परत गृहस्थाश्रम स्वीकारला,यासाठीं तुम्हां नवराबायकोस देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरा इलाज नाहीं.' विठ्ठलपंत व त्यांची धर्म· पत्नी यांना त्या आज्ञेस मान द्यावा लागला. आपल्या लहान मुलांची माया सोडावी लागली. ती कठोर आज्ञा पाळण्यासाठीं नदींत उड्या टाकून प्राणत्याग करावा लागला. विठ्ठलपंतांनी परधर्म स्वीकारला नव्हता, अगर एखादे निंद्य कर्महि केलें नव्हतें, असें असतां कर्मठांची कठोरवृत्ति त्यांचे प्राण घेण्यास तयार झाली. त्यांच्या लहानमुला· बाळांची दया आली नाहीं कीं त्यांचा सांभाळ कसा होईल असा मानवी मनांतला दया धर्माचा विचारहि त्यांना शिवला नाहीं. अशा दुष्ट राक्षसी व धर्मनाशक कृत्यास ते धर्माचा रंग फासून समाधान मानीत.

"तुर्कीच्या सुलतानानें आफ्रिकेंतील एखाद्या सिद्दीस विकत घेऊन त्याला गुलाम करून आपल्या देशीं नेलें तरी त्यानें मुसल· मानी धर्माचा स्वीकार करतांच त्याचे दास्य नष्ट होतें. त्याच्या ठिकाणीं योग्य गुण आणि सामर्थ्य असलें तर प्रत्यक्ष सुलतानाच्या मुलीबरोबरहि तो विवाह करूं शकतो."

(स्वामी विवेकानंद खंड ४ था.)

त्या सुमारास महाराष्ट्रांत येण्यासाठीं मुसलमानी राज्यसत्ता डोकां· वून पहात होती. ती अगदींच गर्दी करून ताबडतोब आली. मुसलमानी सत्तेचें राज्यविस्ताराबरोबरच हिंदूंना मुसलमान करणें हें ध्येय ठरलें होतें व ध्येयाच्या पूर्ततेसाठीं त्यांचे अनेक प्रयत्न सुरू होते. कर्मठ लोक ज्याचा स्पर्शच काय पण त्याच्या सांवलीचा विटाळ मानीत. असा एखादा मनुष्य परधर्मांत गेला तर त्याला त्याच दिवशीं धर्माचे सर्व हक्क

प्राप्त होत. सामाजिक बाबतींत त्याला पूर्ण समानता मिळे. यामुळें हिंदुधर्मातील गांजलेले कांहीं लोक केवळ माणुसकीकरतां मुसलमानी धर्माचा स्वीकार करीत. हें धर्मांतर म्हणजे त्या काळीं हिंदु समाजास लागणारी गळती होती, आग होती. तिच्यामुळें सर्व हिंदू जात नामशेष होणार होती. तरी कर्मठास त्या गोष्टीची पर्वा नव्हती. ते आपला वर्णाश्रम टिकविण्यासाठीं पूर्वापार चालत आलेली चाकोरी सोडण्यास तयार नव्हते हें वरील महत्वाच्या उदाहरणावरून दिसत आहे. अशा वेळीं भागवत पंथाची स्थापना करून महाराष्ट्रीय संतांनीं मोठेंच कार्य केलें. नामदेव महाराजादि संतांनीं आपल्या अभंगवाणीनें व कृतीनें या महत्वाच्या बाबीस बंधन घातलें नसतें तर महाराष्ट्र कोणत्या थरास गेला असता ?

## ज्ञानेश्वरी

" महापुरुष वारंवार अवतरतात आणि पुढील मार्ग दाखवितात. यापैकीं कित्येकांनीं कनिष्ठ वर्गाचा उद्धार केला तर माधवाचार्यासारख्या दुसऱ्या कित्येकांनीं स्त्रियांस वेदाध्ययनाचा अधिकार दिला. " (स्वामी वि. सं. ग्रं. खंड ६ वा.)

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या मातापित्यास कर्मठांनीं देहांत प्रायश्चित दिलें, त्याप्रमाणें त्यांनीं देहाचें विसर्जन केलें. लहान मुलाबाळांस पोरकें सोडून त्यांना देहत्याग करावा लागला. कर्मठांचा इतका करडा अंमल त्या काळीं समाजावर होता. कांहीं दिवसानंतर निवृत्तिनाथ आपल्या भावंडास घेऊन त्या कर्मठांच्या दारीं पैठणास गेले. 'आम्हांस तरी शुद्धिपत्र द्या' असें ते म्हणाले. कर्मठांचे कठोर हृदय द्रवलें नाहीं. परंतु ज्ञानेश्वर महाराजांनीं त्यांच्याशीं शास्त्रार्थ केला. कांहीं दैवी चमत्कार करून दाखविलें. सोपानदेवांनीं एका अभंगाद्वारें कर्मठांच्या वृत्ति हालविण्याचा प्रयत्न केला.

दुर्वास, वशिष्ठ गौतम । हे ऋषी उत्तम कुळींचे कैसे ॥
व्यासादि वाल्मीक कोण कुळ यांचे । तैसेची आमुचें सोपान म्हणे॥

ज्ञानदेवांचे दैवी चमत्कार व निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताबाई यांचें उपजत ज्ञान पाहून ब्रह्मवृंद चकीत झाला. त्यांनीं नाइलाजास्तव यांना शुद्धिपत्र दिलें, परंतु अंतःकरणांतील एकांगी पीळ मात्र सोडला नाहीं. त्यामुळें या सर्वांनीं आपलें आयुष्य परमार्थांत घालविण्याचें ठरविलें.

कर्मठांचा बेगडी मोठेपणा व संस्कृत भाषेच्या पांघरुणाखालीं लपणें हें ज्ञानेश्वर महाराजांच्या लक्षांत आलें. त्यांनीं त्यांच्या वृत्तीवर प्रहार करण्याचें ठरविलें. भगवान श्रीकृष्णाच्या मुखांतून जिचा उगम, रणमैदान जिचें जन्मस्थान व कर्तव्यासाठीं जिला अवतार घ्यावा लागला, अशी जी भगवद्‌गीता तिचें मराठींत भाषांतर करण्याचें त्यांनीं ठरविलें. महाराष्ट्रांत संस्कृत भाषेचें भांडार लुटून सर्वांसाठीं खुलें करण्याचा प्रथमच धाडसी प्रयत्न श्रीज्ञानेश्वर महाराजांनींच केला असावा. मराठींत टीका करतांना त्यांनीं धर्महित व समाजहित डोळ्यांपुढें ठेवलें. संस्कृत भाषेचा बागुलबोवा खोटा ठरविला. वर्णाश्रम हा जातीवार नसून कर्मावर आहे. परमेश्वरभक्तीचा दैवी हक्क प्रत्येक मानव प्राण्यास आहे अशी उदात्त तत्त्वें प्रतिपादिलीं.

वेदू संपन्न होय ठाईं। परि कृपणु ऐसा आनु नाहीं। जे कानीं लागला तिहीं। वर्णाच्याची ॥१४५७॥ येरां भव व्यथा ठेलियां। स्त्री शूद्रादिकां प्राणियां। अनवसरू मांडूनियां। राहिला आहे ॥१४५८॥ तरी मज पाहतां तें मागील उणें। फेडावया गीतापणें वेदू वेठला भलतेणें। सेव्य होआवया ॥१४५९॥ अ. १८ वा

× × ×

आतां याचि परी जाण। हे चाऱ्ही वर्ण। सृजिले म्या गुण। कर्म विभागे ॥७७॥ एथ एकाचि हे धनुष्यपाणी। परी जाहले गा चहूं वर्णीं। ऐसी गुणकर्म कडसणी। केली सहजें ॥७९॥ म्हणौनि आईकें पार्था। हे वर्णभेद संस्था। मी कर्ता नव्हें सर्वथा। याचिलागीं ॥८०॥ अ ४ था.

× × ×

परी तयांपाशीं पांडवा । मी हारपला गिवसावा ।
जेथ नामघोषु बरवा । करिती माझा ॥२०८॥
तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ।
जाती तंवच वेगळालिया । जंव न पवती मातें ॥४६०॥
या लागीं पापयोनीही अर्जुना । कां वैश्य शूद्र अंगना ।
मातें भजतां सदना । माझीया येती ॥४७४॥ अ ९ वा

× × ×

जें जें भेटे भूत । तें तें मानि जे भगवंत ।
हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ॥११८॥
नाम जययज्ञु तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म ।
नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थ ॥२२३॥अ१०वा

ज्ञानेश्वरी हा मराठी भाषेंतील श्रेष्ठ असा ग्रंथ आहे. ज्ञानेश्वरांनीं गीतेंतील धर्मज्ञान लोकांना समजेल अशा मराठी भाषेंत मांडलें. सबंध ग्रंथ म्हणजे हिंदु–तत्वज्ञानाचें भांडार आहे. त्यांत वरीलप्रमाणें अनेक तत्वरुपी अमोलिक रत्नांचा भरपूर सांठा आहे ज्ञानेश्वर महाराज पंढरपूरास जाण्यापूर्वीं हा ग्रंथ त्यांनीं लिहिला. त्यामुळें सबंध ज्ञानेश्वरींत विठ्ठलाचें नांव आलें नाहीं, परंतु भागवतधर्मास अनुरुप अशीं तत्वें त्यांत आहेत. भागवतधर्माच्या प्रसारार्थ ज्ञानेश्वरीचा अत्यंत उपयोग झाला. त्यामुळें त्या पंथांतील लोक ह्या ग्रथांस संताच्या अभंगाइतकाच मान देतात व प्रमाणभूत ग्रथ म्हणून त्याला समजतात. पंढरपूरास गेल्यानंतर या चारहि भावंडांनीं अभंग रचना केली. त्यामुळें त्यांना संत मालिकेंत स्थान मिळालें. त्यांचे अभंग आजहि भाविक लोक मोठ्या प्रेमानें म्हणत असतात. ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ कित्येक स्त्रीपुरुष वारकरी नित्यनियमानें म्हणतात.

श्रीज्ञानेश्वर महाराज याचें एकंदर कार्य त्याकाळीं धर्म व राष्ट्र या दोन्ही दृष्टींनीं अत्यंत उपकारक झालें. या चारी भावंडांनीं आपले अव-

तार कार्य अत्यंत अल्पकाळांत संपविलें. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं शके १२१८ मध्यें आळंदी येथें समाधि घेतली. त्यांच्या समाधीच्या दर्शनासाठीं प्रतिवर्षी लाखों भाविक येतात. सासवड येथें सोपानदेवांची समाधि आहे. तापीचे कांठीं मेहूण येथें मुक्ताबाईची समाधि आहे व त्र्यंबकेश्वर येथें श्री निवृत्तिनाथांची समाधि आहे. ह्या समाधीच्या दर्शनासाठीं प्रतिवर्षी हजारों यात्रेकरू येतात. नामस्मरणाचा गजर करून कीर्तनाचा आनंद लुटतात.

सन १९४८मध्यें पुणें येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'चित्रमय जगत' या मासिकांत बडोदे येथील वि. स. वाकसकर या विद्वान गृहस्थानें एक लेख प्रसिद्ध केला. त्यांत त्यांनी हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला कीं, ज्ञानेश्वरी लिहिणारे ज्ञानदेव एक व पंढरपूरच्या भागवतधर्माचे ज्ञानेश्वर दुसरे. त्या दोघांचे समाधिकाल एक नाहींत, निरनिराळे आहेत, असें प्रतिपादन केलें. त्या वादाशी व चर्चेशी वारकरी संप्रदायास कर्तव्य नाहीं. कारण इतिहास संशोधनाची ज्यांना हौस आहे. बुद्धीच्या वाढीसाठीं वादविवादाच्या कसरतींची ज्यांना जरूर आहे. अशांनीं पाहिजे तर त्यांत लक्ष घालावें. भागवत धर्माच्या पडत्या काळांत ज्ञानेश्वर महाराजांनीं समाजासाठीं, धर्मासाठीं व राष्ट्रासाठीं आपल्या पवित्र आचरणानें भक्तियुक्त मनानें महाराष्ट्र धर्माच्या निरंतर उपयोगासाठीं, ज्ञानेश्वरीरूपी नंदादीप निर्माण केला. त्यामुळें वारकरी समाज त्यांच्याकडे आदरानें व स्वाभिमानानें पाहात आहे परंतु वाकसकरांनीं आपल्या लेखांत ज्याचा विचार करणें अत्यंत जरूर आहे. असा एक मुद्दा उपस्थित केला आहे. ते शास्त्राधाराच्या पुराव्यावर सांगतात. "कार्तिक मासांत म्हणजे दक्षिणायनांत कोणीहि योगी पुरुष समाधि घेणार नाहीं." त्यांचें हें म्हणणें नाकारतां येत नाहीं. ज्ञानेश्वर महाराजांनीं शास्त्राप्रमाणें समाधि घेतली किंवा त्यांना महात्म्यांच्या मरणाच्या मोलानें ती इच्छेविरूद्ध घ्यावी लावली हा प्रश्न सुज्ञ वाचकांवर सोपविणें बरें !

## संतांची अवतार समाप्ति

शके १२१८मध्यें मोर्डलिबजवळ अरण भेंडी येथें सावंता महाराजांनीं आपला अवतार संपविला, शके १२३५ मध्यें पंढरपूर येथें नरहरी सोनार

देवाघरीं गेले. शके १२४० मध्यें बंका महार यांनीं तोच मार्ग स्वीकारला. शके १२६० मध्यें चोखोबांना मंगळवेढे येथें गांवकुसाखालीं समाधि मिळाली. नामदेव श्री महाराजांनीं भक्तीभावानें त्यांच्या अस्थि स्वहस्तें पंढरपूर येथें आणून त्यांच्यावर समाधि बांधली. शके १२७२ मध्यें नामदेव महाराज यांनीं आपले अवतार कार्य पंढरपूर येथें समाप्त केलें.

श्रीज्ञानेश्वर महाराज समाधिस्त झाल्यानंतर श्रीचोखोबांनीं बेचाळीस वर्षें भागवतधर्माचा प्रसार समाजाचा मूळ पाया समजला जाणारा जो वर्ग त्यांच्यांत केला. ज्ञानेश्वरानंतर नामदेवरायांनीं चोपन्न वर्षें धर्म प्रसाराचें व समाज जागृतीचें कार्य केलें. कडकडीत नामस्मरणाची तपश्चर्या व कीर्तनप्रसार या जोरावर त्यांनीं महाराष्ट्राचा कानाकोपरा पावन केला. परमेश्वर कृपेनें त्यांना दीर्घायुष्य लाभलें होतें. त्यामुळें त्यांना हजारों अभंग निर्माण करतां आले. त्यांच्या अभंगाच्या अंतरंगांत शिरल्यास त्यांत हेंच दिसतें कीं, ह्या दैवी पुरुषानें सर्व शास्त्रांचें सार अभंगांत आणलें. समाजांत रुढीरूपी निर्माण झालेल्या अंध धर्मास अभंगवाणीनें खरी दृष्टि आणली. समाजांस एक सूत्रांत आणण्यासाठीं अभंगाच्या आधारानें प्रयत्न केले. वर्णाश्रमधर्माचा डोलारा पाडला. समानतेचा मानवी धर्म निर्माण करण्यासाठीं अभंगाचा जरूर तो उपयोग केला. राष्ट्रांत धर्म, ऐक्य व स्वाभिमान कायम राहण्यासाठीं अभंगाचा निनाद अक्षय जागृत राहील असें कार्य केलें. या महापुरुषानें आपलें कार्य महाराष्ट्रापुरतेंच केलें नाहीं. तर उत्तर हिंदुस्थानांतहि आपल्या कार्याचा प्रकाश पाडला. पंजाबसारख्या दूरच्या प्रांतांत नामदेवरायांचीं स्मृतिस्थानें आहेत. त्यांची अभंगवाणी आजहि त्या परप्रांतीय लोकांच्या पाठांत आहे. या संतपुरुषानें त्या काळीं एकंदर जें कार्य केलें त्यामुळें महाराष्ट्र आजपर्यंत आपल्या मूळस्थानीं स्थिर राहिला.

श्रीसंत नामदेव महाराजांची निस्सीम हरिभक्ति, अभंगरचना जनोद्धाराची तळमळ, सामाजिक सुधारणा, महाराष्ट्रधर्माची स्थापना व भागवतधर्माचा प्रसार या सर्वांबाबत सांगोपांग व व्यवस्थित वर्णन करणें हें माझ्या शिक्षणाबाहेरचें आहे. शिवाय माझ्या ठिकाणीं भक्तीचा जिवंत जिव्हाळा नाहीं. त्यामुळें संतांचें कार्य मला स्पष्टपणें दिसणें अशक्य

आहे. परंतु कांहीं लेखकांनीं श्रीनामदेव महाराज व संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या साधुत्वाबाबत व एकंदर थोर कार्याविषयीं समाजांत खोटा गैरसमज निर्माण करण्याचे बुद्धिपुरस्सर प्रयत्न केलें म्हणून त्याबद्दलची अल्पशी माहिती जनता जनार्दनापुढें मांडावी व वारकरी समाजानेंहि या महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष द्यावें म्हणून हा प्रयत्न केला.

माझा शेतीचा धंदा सांभाळून हें कार्य करावें असें ठरविलें त्यावेळीं महाराष्ट्रांतील अनेक विद्वानांच्या भेटी घेतल्या. महाराष्ट्र कवि, चरित्र लेखक श्रीयुत आजगांवकर यांची सन १९४८ मध्यें भेट घेतली. समक्ष विचारलें, 'आपण श्रीनामदेव महाराज एकनाथ महाराज तुकाराम महाराजादि संतांचीं चरित्रें लिहिलीं तर देहू व पंढरपूर या क्षेत्रीं गेला होता काय ? त्यांनीं उत्तर दिलें. मी अद्याप देहू व पंढरपूर पाहिलें नाहीं' त्यांच्या उत्तरामुळें अधिक विचारण्याची जरूर भासली नाहीं. कारण त्यांनीं या क्षेत्रांचें दर्शन घेतल्यानंतर संतांचीं चरित्रें लिहिलीं असतीं तर त्यांच्या लिखाणांत त्यांना ते कवि भासले नसते. संतांच्या योग्यतेनें त्यांनीं त्यांना पाहिलें असतें. श्री. आजगांवकर यांनीं नामदेव महाराज दरोडेखोर म्हणून लिहिलें. त्याबाबत श्री. पंढरीनाथ नारायण पाटसकर पुणें यानीं "श्रीसंत शिरोमणी बालभक्त श्रीनामदेव महाराज दरवडेखोर होते काय ?" हें पुस्तक लिहून त्यांना उत्तर दिलें. त्या पुस्तकाबाबत महाराष्ट्रांतील अनेक नामवंत अधिकारी व विद्वानांनीं आपले अभिप्राय देऊन पाटसकरांच्या खऱ्या लिखाणास पुष्टी दिली आहे.

## उघडा द्वेष

"ज्याला दुष्कर्मच करावयाचें आहे, त्याला कोणत्याहि मतांतून आधार सांपडतोच."

(स्वा. विवेकानंद खंड ८ वा.)

भागवतधर्मीय संताबद्दल उघडा द्वेष करण्याचें जणूं कंकणच ठाणें येथील कै. वि. ल. भावे यांनीं बांधलें होतें. कारण संतांनीं महाराष्ट्रास भक्तीमार्गाच्या जोरावर मूळ स्थानीं ठेवलें व जनतेची स्वातंत्र्यभावना पेटती ठेवली. या महत्वाच्या दोन गोष्टीपासून संतास व त्यांच्या काम-

गिरीस दूर ठेवणें यासाठीं त्यांनीं अनेक मार्ग आक्रमिले. त्यासाठीं त्यांनीं इतिहासाचा खून होईल व जनतेच्या भावना दुखावल्या जातील याची पर्वा केली नाहीं.

पंढरपूर येथील श्रीमंत लोक विठ्ठलमूर्तीची महापूजा करतात.महापूजा म्हणजे मूर्तीच्या अंगावरील सर्व कपडे काढून तिला स्नान घालणें, स्नानानंतर श्रीमंतांनीं नवीन आणलेले कपडे मूर्तीच्या अंगावर घालण्यापूर्वी पुजारी मूर्तीच्या अंगावरील कांहीं विशिष्ट खुणा दाखवून त्याबावत माहिती देतो. त्यावेळीं मूर्तीच्या छातीवरील एक बारीकसा खड्डा दाखवून तो सांगतो, 'ब्राह्मणानें देवाच्या छातींत लाथ मारली होती त्याची ही खूण आहे.' पुराणांत असलेली बनावट गोष्ट तो सांगतो. हें सांगतांना तो सारासार विचार करीत नाहीं. चालू चिकित्सकतेच्या काळाची कल्पना करीत नाहीं. एखादा विचारी व धार्मिक मनुष्य त्यावेळीं हजर असल्यास पुजाऱ्यास प्रश्न करील, 'देवास लाथ मारणारा मनुष्य कोणत्या कोटींतील ?' पृथ्वीवर जे कांहीं धर्म चालू आहेत त्या प्रत्येकांत भक्तानें देवास आळविणें, देवास पूज्य मानणें हें मनुष्यप्राण्याचें आद्य व मुख्य कर्तव्य आहे. ब्राह्मणानें देवास लाथ मारली तिचा खड्डा अनंतकाळ कसा राहील ? लाथ मारणारा देवापेक्षां बलवान नसतांना खड्डा कसा पडला असे अनेक प्रश्न हा मनुष्य विचारील. आपण काय उत्तर द्यावें ? अंधश्रद्धेचें युग आतां राहिलें नाहीं. याचा तो विचार करीत नाहीं व ही खोटी, धर्मास कमीपणा आणणारी गोष्ट आजहि सांगण्याचें धाडस तो करतो तद्वत कै. भावे व कांहीं मतभाई यांनीं संताबद्दल मनास येईल तसें खोटे सांगण्याचें धाडस केलें आहे.

भावे यांनीं आपल्या महाराष्ट्र सारस्वत भाग १ मध्यें नामदेव महाराजांस उघड दरोडेखोर म्हणण्याचें मुद्दाम धाडस केलें. त्यांचा हा हेतु त्यांच्या या पुस्तकांत अनेक प्रसंगीं उसळला आहे. पान १५५ वर ते म्हणतात "ज्ञानेश्वर हा स्वतः नाथपंथी, योगाभ्यासी, अत्यंत कुशाग्र बुद्धीचा संसारापासून पूर्णपणें अलिप्त असा असल्यामुळें त्याचे ग्रंथांत योग, ज्ञान वगैरेचेंहि संकीर्तन केलें गेलें आणि स्वतःच्या आचरणानें तो गृहस्थाश्रमी नसल्यामुळें त्याला या भागवतधर्माचें प्रत्यक्ष उदाहरण वागणुकींत दाख-

वतां आले नाहीं, यामुळें कित्येक वेळां ज्ञानेश्वरानें पढविलें एक आणि हे लोक पढले निराळेच असा प्रकार झाला. त्याचा पाठ गिरवतांना थोडासा अपपाठ झाला. नामदेवाचा प्रकार कांहींसा याच वळणावर गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यानें गृहस्थाश्रम सोडला नाहीं पण या आश्रमाला अवश्य ती संसाराची काळजी मात्र त्याला घेतां आली नाहीं. त्याची भक्ति थोडीफार भोळी व खुळी झाली. आईवर लहानग्या मुलाची जी भक्ति, ती भक्ति त्याची झाली. भक्तीला समाजाची व ज्ञानाची जोड राहिली नाहीं." यानंतर पान १५८ वर ते लिहितात—

"नाम्याची बायको राजाई हीदेखील विठ्ठलभाक्ति करी व अभंग रची." पान १३७ वर "ब्राह्मणांत जसे ज्ञानदेव,सोपान-देव झाले किंवा शूद्रांत सांवतामाळी, गोराकुंभार हे झाले, तसेंच अतिशूद्रांतहि चोखा मेळ्यासारखे व बंका महारासारखे विष्णुदास होऊन गेले."

नामदेव महाराजांसारख्या महान् संतास उघड नाम्या म्हणणें,त्यांच्या भक्तीला भोळी व खुळी म्हणणें माळी व कुंभार जातींत जन्म घेणाऱ्या संतास शूद्र म्हणणें व महार जातींतील संतास अतिशूद्र संबोधणें वगैरे सर्व धाडसाच्या गोष्टी श्री. भावे यांनीं आपल्या ग्रंथांत केल्या आहेत. कोणत्याहि जातीच्या अगर धर्माच्या विचारी माणसानें भाव्यांच्या महा-राष्ट्र–सारस्वताचे दोन्ही भाग वाचून पाहिले तर स्पष्टपणें तो हेंच विचारील कीं, समाजांत दुही पेटविणारे, वर्णाश्रमरूपी विषवृक्ष वाढविणारे ग्रंथ मुंबई विश्वविद्यालयानें अभ्यासक्रमांत कसे सुरू ठेवले ? महाराष्ट्रां-तील ऐकेच्छू सुशिक्षितांनीं व हरिणभक्तीचें पांघरुण घेतलेल्या अनेक पद-वीधरांनी याबाबत ओरड कां केली नाहीं ?

## श्री एकनाथ महाराज

"श्री शंकराचार्य विलक्षण बुद्धिमान होते ही गोष्ट खरी. तथापि त्यांचें अंतःकरण तसेंच उदार नव्हतें असें मला वाटतें.

श्रीरामानुज त्यांच्याहून अधिक दिलदार होते, खालच्या प्रतीच्या जनतेबद्दल श्रीरामानुजांच्या मनांत सहानुकंपा वसत होती.

ज्या लोकांना पूजा प्रकारची आवश्यकता होती, त्यांच्यासाठीं बाह्य पूजा विधि श्री रामानुजांनीं निर्माण केली आणि त्याबरोबरच अत्युच्च उपासना मार्गहि त्यांनीं खुला करून दिला. अशा रीतीनें ब्राह्मणापासून अतिशूद्रापर्यंत धर्माचा मार्ग श्री रामानुजांनीं आंखला.

( स्वामी विवेकानंद खंड ५ वा )

श्रीनामदेवमहाराजादि तत्कालीन संतानंतर सुमारें दोनशें वर्षांत भागवतधर्मीय प्रसिद्ध असा संत झाला नाहीं. या संधीचा फायदा कर्मठांनीं पुरेपूर घेतला. त्यांनीं वर्णाश्रमाचें जाळें पूर्ववत् पसरलें. जनता त्यांत अडकूं लागली. पैठणपीठ त्यांनीं फिरून जोरांत आणलें. बहुसंख्य समाज धर्मज्ञानास पारखा होऊं लागला. या संधीचा फायदा मुसलमान सत्तेनें पुरेपूर घेतला· त्यांनीं अखिल महाराष्ट्र आपल्या सत्तेनें आवळला.

अशावेळीं पैठणपीठांत शके १४५० मध्यें श्री एकनाथ महाराज यांचा जन्म झाला. नाथांचा अवतार हा महाराष्ट्राच्या पडत्या काळास मोठा आधार ! मुसलमानी सत्ता राक्षसी वृत्तीनें देश गिळीत होती. त्या कृतीस कर्मठांची वृत्ति एक प्रकारें साह्य करीत होती. राष्ट्र असह्य स्थितींत सांपडलें अशा वेळीं श्रीनाथ महाराजांच्यामुळें तें सांवरलें गेलें. महाराष्ट्राचा भावी काळ हा त्यांच्या जन्माबरोबरच उदयास आला असें म्हणणें अतिशयोक्तीचे ठरणार नाहीं.

त्यांनीं भागवतधर्माच्या प्रसारास पैठण येथूनच सुरवात केली. भागवतासारखा महत्वाचा ग्रंथ संस्कृत किल्ल्यांतून ओढून काढला. त्याला मराठी भाषेनें शोभविलें. हें करतांना त्यांनीं त्या वेळचो एकंदर परिस्थिति डोळ्यासमोर ठेवली. त्यामुळें महाराष्ट्रीय जनता त्यांच्या त्या ग्रंथाभोंवती व त्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्याभोंवती नव्या जोमानें एकत्रित होऊं लागली.

पैठण पीठांतील व आसपासचे कर्मठ त्यांच्यावर तुटून पडले परंतु नाथमहाराजांजवळ परमेश्वरभक्ति व जनोद्धाराची सत्य कामगिरी हीं प्रखर हत्यारें होतीं. त्यामुळें त्यांचा इलाज चालेना. शिवाय महाराष्ट्रांतील बहुजन समाजाचा करडा विरोध त्यांना होऊं लागला. त्यामुळें शास्त्री पंडीतांनीं काशी क्षेत्रीं धांव घेतली. नाथांच्या विरूद्ध त्यांनीं अनेक तक्रारी केल्या. "नाथांनीं भागवतग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें. त्यांत त्यांनीं वर्णाश्रम धर्माचें महत्व फोल ठरविलें आहे. त्या ग्रंथावर मराठींतून प्रवचन करतांना "तो शूद्रासहि जवळ बसवितो, तो परमेश्वर प्राप्तीचा हक्क सर्वांस आहे, असें तो सांगतो, अशा अनेक तक्रारी त्यांनीं केल्या.

काशी हें त्या काळीं हिंदुधर्माचें सर्वश्रेष्ठ न्यायालय होतें. तेथून नाथ महाराजांस बोलावणें आलें. 'मराठींत तयार केलेला ग्रंथ बरोबर घेऊन यावें' अशी त्यांना आज्ञा झाली. त्यांनीं तो बरोबर नेला. जनहिताच्या बळावर, भागवतधर्माच्या समतेच्या जोरावर व महाराष्ट्राच्या चालू परिस्थितीच्या आधारावर त्यांनीं तेथील शास्त्री मंडळीस गप्प केलें.

संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य । हें बोल काय होती शुद्ध ।
हाही अभिमान वाद । अहंता अशुद्ध परमार्थी ॥१०२५॥
देवासि नाहीं वाचाभिमान । संस्कृत प्राकृत त्या समान ।
ज्या वाणीं जाहलें ब्रह्मकथन । त्या भाषा श्रीकृष्ण संतोषी ॥
॥१०२६॥ अ. २९ एकनाथी—भागवत.

भागवतग्रंथांत केलेल्या टीकेंतील अनेक उदाहरणें देऊन व धर्म तत्वावर वादविवाद करून त्यांनीं काशीच्या शास्त्री-पंडीतांच्या अंतःकरणास समताधर्माचा पाझर फोडला. त्यांनीं नाथ महाराजांचा उलट चांगल्या प्रकारें गौरव केला. भागवत ग्रंथ त्यांच्याबरोबर देऊन त्यांना सन्मानपूर्वक पैठणास परत पाठविलें.

पैठणास परत आल्यानंतर त्यांनीं प्रवचनद्वारें समाजांत जागृति उत्पन्न करण्याचें काम मोठ्या प्रमाणांत सुरू केलें. समाजोपयोगी अभंग व इतर ग्रंथ निर्माण केलें. त्यांची एकंदर कृति त्या काळीं समाजास अमृताप्रमाणें उपयोगी पडली. कारण मुसलमानी धर्माची छाप वरिष्ठवर्गाच्या

घरांतसुद्धां शिरूं पाहत होती. ब्राह्मणांच्या देवघरापर्यंत पिरानें व दावल-मलकानें शिरकाव केला होता.

थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार ॥
सांडूनिया द्वीजवर । दावलपीर स्मरताती ॥

× × ×

दावलमलीकाची पूजिती गदा । वर्षांतून फकीर होती एकदां ॥
मग डोला होता थंडा । खाती मलीदा हिंदु तुर्कांचे की मायबाप ॥

भागवतपंथाची उच्च तत्वें नामदेवराय, ज्ञानेश्वर महाराज आदि संतांनीं सांगितलीं होतीं. त्यांचा प्रसार नाथ महाराजांनीं आपल्या वाणीनें अगदीं निर्भीडपणें केला. त्यांनीं भागवतधर्माचीं दारें सर्व जातीसाठीं सताड मोकळीं ठेवलीं.

शुद्ध याती कुळ अथवा चांडाळ । स्त्री अथवा बाळ होकां नीच ॥
एका जर्नादनीं नाहीं जातीचें कारण । वाचे उच्चारण तोचि शुद्ध

× × ×

जो जातीनें नीचत्वा गेला । परी भक्तिभावें उंचावला ॥
तो मद्रूप पावला । पूज्य झाला तिहीं लोकीं ॥

× × ×

भलता हो भलते जाती । ज्यासी भावार्थें माझी भक्ति ॥
तोचि जाणपा पवित्र मूर्ति । माझी प्राप्ति माझें भजनें ॥

× × ×

कलियुगाची थोर ख्याती । नामासाठीं लागे मुक्ति ॥
स्त्रियांही अंत्यज उद्धरती । नाम कीर्ति दाटुती ॥
न करितां नाना व्युत्पात्ति । सुगम पावे ब्रह्मप्राप्ति ॥
अबळें तारावया निश्चिती । भगवंते निज भक्ति प्रगट केली ॥

× × ×

८२१५

स्त्री–शूद्रादि अवघे । घालूनिया नांवें ।
एकची खेपे स्वयें न्यावें । भजन पावे परतीरा ॥

× ×

भागवत धर्माचिये स्थिति । बाळी भोळी भवाब्धि तरती ॥
सुखोपायें ब्रह्मप्राप्ति । होय निश्चित सकळिका ।

नाथ महाराजांच्या वेळीं महाराष्ट्रास परसत्तेचा भयंकर वणवा लागला होता. परकीय सत्ता फक्त राज्यासाठींच नव्हती, राज्य प्रसारा बरोबर मुसलमानी धर्माचा हव्या त्या बऱ्यावाईट मार्गानें प्रसार करणें हें त्यांचें मुख्य ध्येय होतें. अशा वेळीं नाथांनीं जरूरती अभंगवाणी निर्माण केली व भागवतधर्माच्या प्रसाराचा दणदणाट उडवून दिला. परसत्तेला प्रतिकार फक्त शूरच करणार म्हणून एकनाथ महाराजांनीं शूरपणावर अनेक अभंग केले. ते पाईक अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत. नाथ महाराजांनीं आपलें कार्य पैठण येथून केलें. त्यामुळें महाराष्ट्रांत त्याचा पाहिजे तितका प्रसार झाला नाहीं. तरी पुढील संतासाठीं त्यांनीं हा मार्ग बराच साफ केला होता.

### महाराच्या घरीं भोजन

पैठण येथें वर्णाश्रम सदैव जागता ! कर्मठांचा तो बाले किल्ला ! दक्षिणेंतील संस्कृत विद्येचें तें माहेर घर! स्पर्शास्पर्श भेद तेथें नेहमीं जागृत ! अस्पृश्यांची नुसती सावलीसुद्धां सनातनी मंडळीस सहन होत नव्हती. अशा पैठण नगरींत नाथ महाराजांचा राणू महार या नांवाचा एक भक्त होता. त्याची भक्ति व एकंदर आचरण श्रेष्ठ दर्जाचें होतें. नाथांचेंहि त्याच्यावर प्रेम होतें. स्पर्शास्पर्श भेद ठेवणें हें समाजास घातक आहे. हाच भेद हिंदूचें वाटोळें करणार ? धर्मास काळीमा आणणार वगैरे विचारांनीं नाथ महारवाड्यांत गेले. राणू महाराच्या घरीं त्यांनीं उघड भोजन केलें. नाथांचें हें कृत्य त्या काळीं मोठ्या धैर्याचें ठरलें. श्राद्धाचे दिवशीं दारासी महार आले, ते उपासी असून अन्नासाठीं तळमळत आहेत हें पाहतांच त्या महात्म्यानें ब्राह्मणांच्या अगोदर महारांना पक्तीस बसवून जेवण दिलें. जातीभेदाच्या नांवावर हिंदुच्या ऐक्याचा बळी घेणारी कृत्रिम

उच्च-नीचता गाडण्याचे अनेक प्रयत्न त्यांनीं कृतीनें केले. भर उन्हाळ्याचे दिवस, बारा वाजण्याचा प्रसंग ! अशा वेळीं एक लहान मूल त्या गोदावरीच्या वाळवंटांत रडत होतें. जवळून अनेक लोक येत जात होते परंतु त्या मुलास कोणी स्पर्श करीना कारण त्याला स्पर्श केला आणि तें अस्पृश्याचें निघालें तर कोण पंचाईत होईल ? तापलेल्या वाळूमुळें त्याचे पाय भाजत होते. आईबाप दिसेनात त्यामुळें तें घाबरलें. व आक्रोशानें रडूं लागलें. हें दृश्य नाथांनीं पाहिलें. ते स्नान करून घरीं चालले होते. त्यांनीं त्या मुलास उचललें व त्याच्या घरीं म्हणजे महारवाड्यांत नेलें. हिंदुधर्म व राष्ट्रीय भावना यांचें मूळ खाणारा भयंकर रोग स्पृश्यास्पृश्य हा त्या वेळीं होता. तो मुळांतून नाहींसा करण्याचे प्रयत्न नाथ महाराजाइतके धैर्यानें कोणीच केले नाहींत. हिंदुधर्मातील सारसर्वस्व धर्मज्ञान सर्व जातींना व पंथांना वाटण्याचें कार्य त्यांनींच केलें. महाराष्ट्राचें भवितव्य कोणत्या गोष्टीवर अवलंबून आहे हें त्यांनीं समाजास आपल्या कृतीनें व वाणीनें दाखवून दिलें. परंतु महाराष्ट्रांतील कर्मठ त्यांच्या या वागणुकीकडे जाति-वर्चस्वाच्या दृष्टीनें पाहात होते. त्यांना नाथांचें हें राष्ट्रोद्धाराचें कार्य आवडलें नाहीं. ते विरोध करीत राहिले. नाथांचा मुलगा हरी पंडित यानेंहि या विरोधांत प्रामुख्यानें भाग घेतला होता. त्यांनीं दाखविलेल्या सामाजिक व धार्मिक ऐक्याचा मार्ग जर कर्मठांनीं अंगिकारला असतां तर आज महाराष्ट्रांचें जें स्वरुप दिसत आहे तें खात्रीनें निराळें दिसलें असतें !

## महान् संघटक

नाथ महाराज हे संत मंडळींत हिंदु संघटक म्हणून ओळखले जातात. सबंध हिंदू एक आहेत हें त्यांनीं शास्त्राधारानें दाखवून दिलें व सर्व हिंदूंना धार्मिक बाबतींत समान हक्क आहेत असें आपला वेदांत धर्म सांगतो हेंहि त्यांनीं निर्भीडपणें सांगितलें. भागवतधर्मास सर्व प्रकारें मदत केली. त्याचा प्रसार केला. त्यासाठीं उपयुक्त अशी ग्रंथ निर्मिति केली. असा हा थोर महात्मा शके १५२१ फाल्गुन वद्य ६ रोजीं इहलोक सोडून गेला. त्याच्या अंतकालाबद्दल एकवाक्यता नाहीं. कांहीं म्हणतात, योग मार्गास अनुसरून त्यांनी जिवंत समाधि घेतली. कांहीं म्हणतात फाल्गुन

वद्य ६ रोजीं शिळी रंगपंचमी या दिवशीं त्यांना खुषीची जलसमाधि दिली. या वादासी कांहीं कर्तव्य नाहीं.

## सनातनी संशय

श्रीनामदेव, श्रीज्ञानेश्वर आदि संतांनीं स्थापन केलेल्या भक्ती मार्गास महाराष्ट्रांत दृढमूल करण्याचें महान् कार्य श्री नाथरायांनीं केलें. अशी महाराष्ट्रांतील विचारी लोकांची व वारकरी मंडळीची पक्की खात्री आहे. याबाबत कोणासहि संशय नाहीं व पुढें कधीहि उत्पन्न होणार नाहीं. परंतु पांगारकरांनीं त्यांच्या तुकाराम चरित्रांत पान १९८ वर नसता वादग्रस्त प्रश्न उपस्थित केला आहे. " ज्ञानेश्वर, नामदेव व एकनाथ याच परंपरेंत तुकोबा येतात. ज्ञानेश्वरी व नाथ भागवत ह्या ग्रंथांसी तुकोबाचा किती अतरंग-परिचय होता हें आपण पाहिलेंच आहे तेव्हां त्यांच्यामधून तुकोबांना फोडणें हें कोणालाहि शक्य नाहीं. नामदेव व तुकाराम यांनीच भक्तिपंथ काढला. त्याच्याशीं ज्ञानेश्वर एकनाथांचा कांहीं संबंध नाहीं हें त्रिखंडीत पंडिताचेंहि मत गडगच्च पुराव्यांपुढें क्षणभरहि टिकणारें नाहीं." पांगारकर हे वर्णाभिमानाचे कट्टे पुरस्कर्ते. त्यांनीं तुकाराम महाराजांना शूद्र ठरविण्यासाठीं आपलें सगळें बळ खर्ची घालून त्यांची कामगिरी झांकण्याचे प्रयत्न केले. त्याचप्रमाणें भावे आणि राजवाडे यांनीं तुकाराम महाराजांवर अत्यंत जहरी बाण फेंकले, त्यांनीं हें वर्णाभिमानासाठीं केलें. त्यांचें अनुकरण आजहि अनेक कर्मठ करीत आहेत. कर्मठांच्या कृतीची प्रतिक्रिया म्हणून एखादा बहुजन समाजांतील लेखकहि तसेंच करील, म्हणून नसतां संशय पांगारकरांनी उभा केला.

ज्ञानेश्वर महाराज व एकनाथ महाराज या संतांनीं वर्णाश्रमास समतेचे सुरूग लावून महाराष्ट्रांत भागवतधर्माचा रस्ता साफ केला. या थोर महात्म्याबद्दल बहुजन समाजांतील कोणीहि आजपर्यंत शंका घेतली नाहीं व घेणार नाही. वारकरी त्यांना देवासमान मानतात. दरवर्षी येणारे लाखों भाविक ज्ञानदेव-तुकाराम या नांवाचा घोष करीत येतात. कीर्तनांत फक्त एकनाथ महाराजांच्याच नांवाचा जयजयकार करण्याचा प्रघात आहे बहुजन समाज हा संताकडे जातीच्या चष्म्यांतून कधींच पाहात नसतो याचा विचार पांगारकरांनीं करणें जरूर होतें.

☆

# तुकाराम महाराजांचें अवतार कार्य

"योग्य काळीं महापुरुष, ऋषि सामान्य जनांत जन्म घेतात व त्या काळच्या परिस्थितीला अनुरुप अशी समाजरचना म्हणजे स्मृति निर्माण करतात."

(स्वामी विवेकानंद, खंड ४ था)

महाराजांच्या अवतार कार्यास सुरवात झाली, त्यावेळीं महाराष्ट्र हा निराशामय अशा अंधारांत स्वस्थ घोरत होता. तो लवकर जागा होईल अशी फारशी आशा नव्हती. त्याला जागें करणें जरूर आहे, म्हणून फारसे प्रयत्नहि होत नव्हते. कारण सुमारें अडीचशें वर्षांचा मुसलमानी अम्मल सर्व पथांच्या व समाजांच्या पूर्णपणें पचनीं पडला होता. महाराष्ट्रांत व आसपासच्या प्रांतांत मुसलमानी राज्यें वाढत्या बळानें नांदत होतीं. विजापूरचें राज्य वैभवाच्या कळसास पोहोंचलें होतें. त्यानें राज्याच्या स्थिरतेसाठीं निरनिराळें मार्ग शोधले होते. प्रसिद्ध अशा मराठा घराण्यांतील अनेक लोकांस हाताशीं धरून त्यांना जहागिऱ्या, इनामें, देशमुखी, देशपांडेपणा, वतनें वगैरे आमिषांचे तुकडे टाकले होते, हे तुकडे चघळतांना ते देशहित, समाजहित व धर्महित पूर्णपणें विसरले. आपसांतच ते एकमेकांवर गुरगुरत. तसें करण्यांत ते स्वतःचा व घराण्याचा लौकिक समजत. महाराष्ट्रांतील पुढारलेला जो वर्ग, त्याला त्यानें जरूर ती बाब मोकळी करून दिली. स्वतःचा दिवाण कर्मठ असा ब्राह्मण नेमला. त्यामुळें महाराष्ट्रभर कर्मठपणास जोर आला वर्णाश्रमाचें भूत नंगा नाच करूं लागलें. त्याला ह्या बादशाहाचें अप्रत्यक्ष प्रोत्साहन असे. कारण पुढारलेला वर्गच चळवळ्या! तो पूर्णपणें वर्णाश्रमांत अडकला. त्यामुळें त्याची दृष्टि इतर प्रश्नांकडे जात नसे. वर्णाश्रमासाठीं तो आपल्या धर्मबांधवावर जुलूम करी व त्यांना दूर ढकली जुलमामुळें व बेपर्वाईमुळें खालचा वर्ग भराभर परधर्मांत जाई. तरवारीच्या जोरावर केलेल्या धर्मांतरापेक्षां वर्णाश्रमाच्या धारेनें झालेलें धर्मांतर मुसलमानांस हवें होतें. कारण आपण

होऊन परधर्मांत गेलेले लोक सूडाच्या भावनेनें हिंदूकडे व त्यांच्या धर्माकडे पाहात. नेमकें हेंच विजापूरच्या बादशाहास हवें होतें. परकीय सत्ता, कडवा वर्णाश्रम व इतिहासप्रसिद्ध घराण्यांची गुलामी वृत्ति यामुळें बहुजनसमाज सर्व प्रकारें निराधार झाला होता.

अकबर बादशाहानें उत्तर हिंदुस्तानांत रजपूत लोकांत आपसांत भांडण्याची जी कला निर्माण केली होती, ती ह्या वेळीं महाराष्ट्रांतील मराठ्यांत चांगल्या प्रकारें वाढत होती. आपसांतील कलहानें देश सारखा होरपळत होता. दिवसेंदिवस तो रसातळास चालला होता, तरी त्याकडे लक्ष न देतां, तरवार बहाद्दर आपसांत भांडन मुसलमानी सत्ता वाढवीत होते. रजपूत लोकांत कांहीं घराणीं अशीं होतीं कीं, तीं स्वतःस श्रेष्ठ समजत. आपल्या व इतर जातीबांधवांस कमी मानीत. त्यामुळें आपसांतील वैर वाढत जाई व तेंच नेमकें मुसलमानास साह्य करी. महाराष्ट्रांतहि हें वीष त्या काळीं बरेंच पसरलें होतें. मुसलमान राजांनीं दिलेली देशमुखी, सरदारकी यांचा अम्मल त्यांना येई. ते आपल्या जातभाईस कमी लेखीत. त्यासाठीं स्वबांधवाचें रक्त सांडलें तरी पर्वा करीत नसत.

लखुजी जाधवराव हे देशमुख व सरदार होते. त्यांचे प्रत्यक्ष जांवई शहाजी भोसले हे पाटील होते.. शहाजीनें स्वकर्तबगारीवर मनसबदारी मिळवली तरी लखुजी जाधवाचा देशमुखीचा पीळ शहाजीस अखेरपर्यंत महत्व देण्यास तयार नव्हता. त्यामुळें ते आपलें नातें विसरले व अखेरपर्यंत एकमेकांचे हाडवैरी म्हणून राहिले. अशाच प्रकारची समाजघातकी पद्धत महाराष्ट्रांत अनेक भागांत व गांवोगांवीं अगदीं उघडचा प्रमाणांत दिसत होती. वर्णाश्रम, आपसांतील दुही व उच्चनीचतेची खोटी भावना या गोष्टींत हिंदूचा नाश सांठवला होता.

धार्मिक स्वास्थ्यासाठीं प्रत्येक समाज स्वतःची देवता स्थापन करी. बहुसंख्य लोकांत मरीआई, जोखाई, म्हसोबा, वेताळ, खंडोबा, बहिरोबा वगैरे देवतांची भक्ति होती. ह्या देवतांच्या जोडीला मुसलमानांच्या पीरानें व दावलमलकानें अनेक घरांत ठाणीं दिलीं. वर्णाश्रमाच्या मान्यामुळें हिंदूमधील ऐक्य पूर्णपणें मोडकळीस आलें होतें. प्रत्येक जात ही स्वतःपुरती पाहूं लागली. स्वजातीशिवाय इतर हिंदू हे माझ्याच धर्माचे आहेत ही भावना

मेली होती. त्यांच्यासंबंधीं आपलें कांहीं सामाजिक कर्तव्य आहे हें बहुतेक लोक विसरले होते.शेजारचा हिंदु परधर्मांत गेला, अगर त्याच्यावर परधर्मीयांकडून अन्याय झाला तर तो आपल्या जातीचा नाहीं ह्या एकाच मुद्यावर त्याकडे पूर्णपणें दुर्लक्ष करण्यांत येई. हिंदू जात व हिंदु धर्म हें फक्त ग्रंथांत होतें. व्यवहारांत त्याच्या वाढीसाठीं अगर त्याला जिवंत ठेवण्यासाठीं संघटीत , असें प्रयत्न होत नसत. उच्चनीचतेच्या कृत्रिम जाळ्यांत प्रत्येक समाज अडकला होता. तो एकमेकांस कमी अधिक मानण्यांत सर्व बळ खर्च करी. त्यामुळें राष्ट्रीय दृष्टि पूर्णपणें अधू झाली होती. खरी धार्मिक भावना आकुंचित वृत्तीच्या मान्यामुळें खिळखिळी होऊन मावळण्याच्या पंथास लागली होती.

महाराष्ट्रास सामाजिक विषमतेचा रोग जडला. त्यामुळें तो आपलें ध्येय विसरत आहे हें तुकाराम महाराजांनीं ओळखलें. त्यांनीं परमेश्वर भक्तीच्या आधारावर अभंगवाणीचें औषध देण्यास सुरवात केली. त्यांची वाणी देववाणीप्रमाणें कार्य करूं लागली, ज्याच्या कानावर ती पडे तो चांगल्या प्रकारें जागा होई. हिताहित धर्म 'अधर्म, खरेंखोटें व आपलें कर्तव्य हें तो जाणू शके. महाराज काळ, वेळ, परिस्थित्यनुरूप उपदेश करीत. त्यांचें सांगणें हें साधें, सरळ व लोकांच्याच भाषेंतील असल्यामुळें ते समाजाच्या हृदयांत घर करून बसे. त्यांच्या उपदेशास स्वानुभवाचा पाठींबा होता. प्रत्येक कृतीस सत्याचरणाचें पाठबळ होतें. मागील संतांच्या अभंगवाणीचें साह्य होतें व भागवतधर्माचें मुख्य तत्व जें समानता तें साह्य करीत होतें. नाथ महाराजांची शिकवण व प्रचारहि त्यांच्या कार्यास साह्य करी. कारण नाथांचा अवतार संपून थोडेच दिवस झाले होते.

यातायाती धर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥

× × ×

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळाही अधिकार ॥
बाळे नारी नर । आदि करोनि वेश्याही ॥
तुका म्हणे अनुभवें । आम्ही पाडियेलें ठावें ॥

त्यांनीं समाजास एकत्रित येण्याचा मार्ग अधिकारवाणीनें सांगितला. लोकांत धार्मिक बाबतींत विश्वास निर्माण केला. आपल्या उद्धारास

जातीची आडकांठीं नाहीं असें आग्रहानें सांगितलें. अनिष्ट बाबी घालविण्याचें कार्य केलें. हिंदु समाज एका मार्गावर एका ध्येयाकडे येण्यासाठीं प्रयत्न सुरू केले. त्यांची अभंगवाणी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत, गांवांत, रानावनांत, दऱ्याखोऱ्यांत इतकेंच नाहीं तर ज्या ज्या ठिकाणीं मनुष्य प्राणी आहे त्या त्या स्थानापर्यंत पसरूं लागली. त्यामुळें महाराष्ट्रांतील बहुसंख्य जनता त्यांच्या उपदेशाकडे आकर्षली जाऊं लागली.

## पंढरपूर क्षेत्रीं

श्रीसंत नामदेव महाराज यानीं भागवतधर्मरूपी समताधर्माचा ध्वज पंढरपूर येथें प्रथम उभारला. त्या ध्वजाजवळ सर्व जातींच्या व पंथांच्या लोकांस येण्याचें धैर्य श्रीसंत चोखोबानें निर्माण केलें. श्री ज्ञानेश्वर महाराजानीं संस्कृत भाषेंत अडकलेला वेदांत-धर्म सर्वांसाठीं मराठी भाषेंत याच ध्वजाजवळ उघडा ठेवला. नाथ महाराजांनीं समताधर्माचीं तत्वें अनेक ग्रंथांत ओतून त्याद्वारें रुढीच्या उच्चनीचतेचा बळी याच ध्वजाजवळ दिला. अशा त्या ध्वजाजवळ अखिल मराठी भाषा बोलणाऱ्या जनतेस मुसलमानी सत्तेच्या वाढत्या काळांत एकत्रित आणण्याचें कार्य तुकाराम महाराजांनीं केलें. महाराष्ट्राचें एकंदर अस्तित्व टिकविण्याचें श्रेष्ठ कार्य संतांनीं केलें वें त्या प्रतिकुल परिस्थितींत सर्व प्रकारें वाढीस लावण्याचें कार्य त्यांनीं केलें.

धन्य धन्य पंढरी । जे मोक्षाची अक्षय पुरी ॥
विश्रांतीचा ठाव । तो हा माझा पंढरीराव ॥
तुका म्हणे सांगे स्पष्ट । दुजी पंढरी वैकुंठ ॥

× × ×

पंढरीस जा रे आले ना संसारा । दीनांचा सोयरा पांडुरंग ॥

× × ×

पंढरीसी नाहीं कोणा अभिमान । पायां पडे जन एकमेकां ॥

• ० ०

कासया करावें मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुकासाठीं ॥
तुका म्हणे करी कीर्तन पसारा । लाभ येईल घरा पाहिजे तो ॥

० ० ०

आषाढी निकट । आणि कार्तिकीचा हाट ॥

पंढरपूर क्षेत्रांतील समता व त्यांचें महत्व अनेक अभंगांतून वर्णन केलें. पंढरपूराकडे जनसमुहाचा ओघ वळविला. महाराज आषाढी व कार्तिकी अशा दोन्ही वेळांस हजारों भाविक स्त्री-पुरुष बरोबर घेऊन पंढरपूरास जात. त्या काळीं सबंध महाराष्ट्रांत पंढरपूर हें एकच ठिकाण असें होतें कीं त्या स्थानीं यात्रेनिमित्त जमलेले सर्व दर्जाचे लोक धार्मिक बाबीबरोबर इतर प्रश्नांचाहि विचार करीत, भजन, कीर्तन व प्रवचन यासाठीं लोक एकत्रित जमत. इतर कोणत्याहि यात्रेंत असा सामुदायिक कार्यक्रम होत नसे. शिवाय महाराष्ट्राच्या दुर्दैवानें परधर्मीयांचा उघडा धिंगाणा सर्वत्र सुरू होता. त्यामुळें हिंदूंना एकत्रित जमताहि येत नसे. पंढरपूर सारखी धार्मिक समता इतर कोणत्याहि क्षेत्राचें ठिकाणीं नव्हती. महाराजांनीं पंढरपूर क्षेत्राचें धार्मिक द्वार सर्वांसाठीं खुलें ठेवलें होतें. ' **यारे यारे लहान थोर । याती भलते नारी नर ॥** कारण धर्माचा प्रसार व रक्षण हें एका विशिष्ट जातीकडून अगर वर्गाकडून होणें अशक्य. त्यासाठीं समाजाच्या सर्व थरांतून असंख्य स्त्री पुरुष एकत्रित होणें जरूर होतें. त्याप्रमाणें पंढरपूर क्षेत्रांत सर्व दर्जाचे लोक जमू लागले. पंढरी म्हणजे समतेची माऊली आहे. उभ्या हिंदुस्तानांत कोणत्याहि क्षेत्रांत इतकी समता आढळणार नाही. पंढरपूर हें समतेचें माहेरघर ! अशा पंढरीकडे जनसमुहाचा पूर लोटूं लागला. तेथील भेदरहित वातावरण धार्मिक व सामाजिक ऐक्य निर्माण करूं लागलें. धार्मिक ऐक्याच्या पोटीच देशाच्या स्वातंत्र्याचे विचार पंढरपूर येथून महाराष्ट्रभर जोरानें वाहूं लागले. त्याचें सर्व श्रेय महाराजांस आहे.

त्यावेळच्या परिस्थितीनुरुप समाजांत खरें शौर्य उत्पन्न होणें जरूर होतें. म्हणून महाराजांनीं शूरपणावर अभंग केले.

पाईकपणें जोतिला सिद्धांत । शूर धरी मात वचन चित्तीं ॥१॥
पाईकीवांचून नव्हे कधीं सुख । प्रजांमध्यें दुःख न सरे पीडा ॥२॥
तरा व्हावें पाईक जिवाचे उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ॥३॥

पाईकीचें सुख जयां नाहीं ठावें । धिग त्यांनीं जातें वायांविण ॥४॥
तुका म्हणे एका क्षणाचा करार । पाईक अपार सुख भोगी ॥५॥

× × ×

पाईकीचें सुख पाईकासी ठावें । म्हणोनियां जीवें केली साटी ॥१॥
येतां गोळ्या बाण साहिले भडिमार । वर्षतां अपार वृष्टी वरी ॥२॥
स्वामी पुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडण शोभा दावी ॥३॥
पाईकांनीं सुख भोगिलें अपार । शूर आणि धीर अंतर्बाही ॥४॥
तुका म्हणे या सिद्धांताच्या खुणा । जाणें तो शहाणा करी तो भोगी ॥५॥

× × ×

तृणवत तनु सोनें ज्या पाषाण । पाईक त्या भिन्न नाहीं स्वामी ॥१॥
विश्वासावांचूनी पाईकासी मोल । नाहीं मिथ्या बोल बोलिया ॥२॥

× × ×

जिवाचे उदार शोभती पाईक । मिरवती नाईक मुकुटमणी ॥१॥
आपुलिया सत्ता स्वामीचें वैभव । भोगिती गौरव सकळ सुख ॥१॥

× × ×

शूर तो नो ओळखे घायडाय हात । येरा होईल मात सांगायाची ॥
तुका म्हणे होई शूर । किंवा निसूर मजूर ॥

× × ×

भांडणेंचि झालें । मग जीवाचें काय चाले ॥१॥
येऊं नेदावी पुढती । आड भयाची ते जाती ॥धृ.॥
करितां बरोबरी । कांहीं न ठेवावी उरी ॥२॥
नये मरो लडीपणें । काय यापुढें तें जिणें ॥३॥
तुका म्हणे शूर । व्हावें धुरेसींच धूर ॥४॥

× × ×

तुका म्हणे मरण आहे या सकळां । भेणें अवकळा अभयें मोल ॥

० ० ०

धरितील पोटासाठीं हतियारें । कळतीं तीं खरें वेठीचीसी ॥

० ० ०

तुका म्हणे एका मरणेंचि सरे । उत्तमाचि उरे कीर्ति मागें ॥

० ० ०

त्या काळीं महाराष्ट्राची खरी वीरवृत्ति मावळण्याच्या पंथास होती. अनेक शिपाईगिरीचा पेशा करीत. पण तो फक्त पोटासाठींच ! त्यांच्या त्या करण्यांत स्वातंत्र्य, स्वधर्म, स्वकर्तव्य व जीविताचें खरें ध्येय नव्हतें. नैराश्य रोगानें जर्जर झालेल्या महाराष्ट्रास महाराजांनीं भक्तीरुपी पात्रांतून अभंगवाणी हें औषध पाजलें. त्यामुळें समाजांत नवचैतन्य निर्माण झालें. त्यांनीं समाज स्वकर्तव्याच्या मार्गावर आणून उभा केला. हें महान् कार्य करतांना त्यांनीं जातीभेद, पक्षभेद याकडे लक्ष दिलें नाहीं. अखिल महाराष्ट्राच्या उद्धाराचें ध्येय त्यांच्यासमोर उभें होतें.

" युद्ध करावया सामर्थ्य आणावें । तरीच म्हणावें क्षात्रिय त्यासी ॥"

जो युद्धावर जाईल, शौर्य गाजवून पराक्रम करील तोच क्षत्रिय ! येथें जातीची आडकाठी नाहीं. या तत्वाचा त्यांनीं पुरस्कार केला. सर्व दर्जाच्या लोकांत शौर्य निर्माण करण्यासाठीं त्यांनीं शक्य ते प्रयत्न केले. शूरपणांतच देव, धर्म, शांति, सुख व स्वातंत्र्य सांठविलेलें असतें. प्राणाच्या मोलानें व शूरत्वाच्या हक्कानेंच देश स्वतंत्र होऊन धर्म राखला जाईल. असें तळमळत्या अंतःकरणानें व अधिकारवाणीनें सांगितलें. यासाठीं त्यांनीं प्रसंगानुसार अनेक अभंग निर्माण केले. महाराष्ट्रांतील तरुणांच्या ताज्या रक्तास स्वदेशाभिमानाची व धर्माभिमानाची खळखळीत उकळी आणली. अभंगरचना काव्य म्हणून केलें नाहीं. अभंगास काव्य म्हणून वहींत अडवून पाडण्यासाठीं जन्म दिला नाहीं.आपली राष्ट्रोद्धारक व स्वधर्माभिमानी वाणी असंख्य तरुणांच्या अंतःकरणांत पद्धतशीर ओतण्याचें कार्य सतत केलें. पावित्र्य, भक्ति व तळमळ या त्रिवेणी संगमांत त्यांनीं अखिल महाराष्ट्र बुडवून पावन केला. त्यामुळेंच महाराष्ट्र त्या पडत्या काळीं स्वातं-

ऱ्यासाठीं कांहीं तरी करूं शकला. त्यांची ती शिकवण आजहि महाराष्ट्राच्या हाडामासांत मुरलेली दिसत आहे.

महाराष्ट्रांत परसत्तेनें सुमारें तीनशें वर्षें मूळ धरलें होतें. सत्तेच्या जोरावर तिनें समाजावर हवे ते अन्याय केले, धार्मिक जुलूम केले, तरी सर्व बाबतींत प्रतिकार जिवंत ठेवण्याचें महान् कार्य पंढरीच्या भक्तांनीं केलें. त्यांनीं धार्मिकभावनेच्या नांवावर जनतेचें राष्ट्रीय ऐक्य कायम टिकविलें. धार्मिक भावना जिवंत ठेवल्यामुळें अन्यायाची चीड व प्रतिकार वृत्ति समाजांत जीव धरून होती. तिला संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांनीं जरूर ती योग्य अशी चालना दिली. त्यामुळेंच महाराष्ट्र हा नव्या दमानें व वाढत्या जोरानें उभा राहिला. जें कोणत्याहि प्रांतास करतां आलें नाहीं तें फक्त महाराष्ट्रानें करून दाखविलें.

धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हांसी
वाचा बोलों वेदनीती । करूं संतीं केलें तें ॥

० ० ०

धर्माचें पाळण । करणें पाखांड खंडण ॥
हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥
तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेऊनि बाण फिरे ॥
नाहीं भीड भाड । तुका म्हणे साना थोर ॥

० ० ०

मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥

० ० ०

माझ्या मुखावाटा नयो हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणा ।

० ० ०

ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥

० ० ०

नर देह दुबळा । ऐसे न म्हणे रे चांडाळा ॥

० ० ०

देव जोडे तरी करावा अधर्म । अंतरें तें कर्म नाचारावें ॥

० ० ०

तुका म्हणे नाहीं जातीसवें काम । ज्याचें मुखीं नाम तोचि धन्य ॥

० ० ०

उघडा मंत्र जाणा । रामकृष्ण म्हणा.

० ० ०

नाम घेतां न लगे मोल । नाम मंत्र नाहीं खोल ॥
नाहीं वेळ नाहीं पंडिताचा धाक ॥

० ० ०

न धोवी तोंड न करी आंघोळी । जपे सदा काळीं रामनाम ॥

० ० ०

दया तिचें नांव भुताचें पाळण । आणिक निर्दाळण कंटकाचें ॥

० ० ०

दंड अन्यायाचें माथां । देखोनि करावा सर्वथा ॥

० ० ०

अन्यायासी राजा न करी दंड । बहु ते लंड पीडिती जना ॥

० ० ०

होईल तितकें बळ । फजित करावें ते खळ ॥

० ० ०

निवडावें खडे । तरी दळण ओजें घडे ॥
तुका म्हणें रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥

० ० ०

तुका म्हणे शूर । व्हावें धुरेसी धूर ॥

० ० ०

हिंदुधर्माचें सारसर्वस्व तुकाराम महाराजांच्या अभंगवाणींत पूर्णपणें आहे. इतकेंच नव्हे तर परधर्मीयांची परमेश्वरभक्तीची तहान भागून

त्याच्या मानवी मनाला पूर्ण शांति देणारी ती जिवंत वाणी आहे. सत्य दृष्टीचा चष्मा लावून त्यांच्या अभंगाच्या पोटांत शिरल्यास हेंच स्पष्ट दिसेल कीं, महाराष्ट्रास स्वकर्तव्य, स्वधर्म यांची खरी जाणीव करून देण्यांत महाराजांचा मोठा भाग होता.

## प्रवृत्तीचा रोख पुरावा

महाराजांची भक्ति व त्याचें एकंदर पवित्र आचरण याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर शिवाजी महाराजांस अनेक वार आलें होतें. शक्य असेल त्यावेळीं ते महाराजांच्या कीर्तनास येत. त्यांनीं कीर्तनांतून भक्ति सुखाचें अनेकवार वर्णन ऐकलें. महाराजांचा सहवास त्यांना वरचेवर घडूं लागला. त्यांच्या एकंदर जीवनचरित्राचा परिणाम त्यांच्यावर होऊं लागला या एकंदर गोष्टीमुळें शिवाजी महाराजांच्या ठिकाणी भक्ति सुखाची लालसा उत्पन्न झाली. त्यामुळें स्वराज्य स्थापनेच्या कामांत त्यांचें साधारण दुर्लक्ष होऊं लागलें. हें स्वातंत्र्यमातेच्या ( जिजामाता ) तात्काळ लक्षांत आलें. तिनें हा प्रकार तुकाराम महाराज यांच्या कानावर घातला. महाराजांच्या कीर्तनांत भक्तिबरोबर इतरहि विषय असत, परंतु जिजामातेच्या सूचनेमुळें त्यांनीं कांहीं कीर्तनांतून स्वधर्मावर ( स्वकर्तव्य ) विशेष जोर दिला. एका प्रसगीं शिवाजी महाराजांस उद्देशून त्यांनीं क्षात्रधर्माचें महत्त्ववर्णन केलें "राजे तुम्ही क्षत्रिय आहांत क्षात्रधर्माप्रमाणें तुम्ही वागल्यास तुमच्या राजवाड्यांत तुम्हास भक्तीचें फळ निश्चित मिळेल. परमेश्वराबाबतचें तुमचें कर्तव्य पार पडेल. त्यासाठी गिरीकंदराचा आश्रय नको, रानवन नको, सर्वसंग परित्याग ची जरूरी नाहीं. तुम्ही आंगिकारलेलें स्वराज्य स्थापनेचें कार्य पार पाडल्यास तुमच्या मनुष्य जन्माचें सार्थक होईल. तुमच्या स्वराज्य स्थापनेंतच धर्माचें व देशाचें खरें हित सांठविलें आहे. तुम्ही आपल्या प्राप्त कर्तव्यावर सर्व शक्ति खर्च करा!" शिवाजी महाराजांस तुम्ही क्षत्रिय आहात असें तुकाराम महाराज यांनींच त्याकाळीं प्रथम छातीठोकपणें सांगितलें. ह्या एकाच महत्त्वाच्या शब्दाचा महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत, रानावनांत, खेड्यांत व गांवोगांव केवढा परिणाम झाला असेल! कारण, शिवाजी महाराजांचे नातेवाईक व जातभाई सबंध महाराष्ट्रभर

पसरलेले. शिवाजीराजास तुकाराम महाराज क्षत्रिय म्हणतात. तर आपणहि क्षत्रिय आहांत, आपलें स्वकर्तव्य आपण केलेंच पाहिजे, असा महत्त्वाचा प्रश्न त्या प्रसंगांतून निर्माण होणें शक्य आहे. तुकाराम महाराज हे जर निवृत्तिमार्गी असते तर शिवाजीसारखा मोठा अनुयायी त्यांनीं भजनांत गुंतविला असता. संताच्या हातून काळ वेळ परिस्थितीनुरुप जनहिताचाच उपदेश होत असतो. परंतु संतांकडे दोषैक दृष्टीनें पाहणारास हें कसें दिसेल ?

## शिवाजी महाराजांचे राजकीय गुरु

शिवाजी महाराजांचें स्वराज्य स्थापनेच्या कामाकडून दुर्लक्ष झालें आहे. स्वकर्तव्याला मुरड देऊन भक्तिमार्गास लागत आहेत ही महत्त्वाची बाब प्रत्यक्ष तुकाराम महाराजांच्या लक्षांत आली नाहीं अगर दुसऱ्या कोणाहि साधु-संन्याशास दिसली नाहीं अगर एकाद्या कारकूनाच्या ध्यानांत आली नाहीं. तसें सांगण्याचें कोणाहि इतिहासकारानें धाडस केलें नाहीं. जिजामातेच्याच लक्षांत ही गोष्ट आली. त्याबद्दल तिला काळजी उत्पन्न झाली. तिनें त्यावर उपाय शोधला, यावरून शिवाजी महाराज यांचे राजकीय गुरु दुसरें कोणी नसून त्यांची जन्ममाता जिजाईच आहे.

## शिकवणूकीचा परिणाम

" पायांखालीं तुडविले गेलेल्या लक्षावधि गरीब लोकांस मुसलमानांच्या राज्यांत सुखाचे दिवस दिसले, आपल्यापैकीं एकपंचमांश प्रजा मुसलमान कां झाली ? याचें कारण हेंच होय. केवळ तरवारीच्या धारेनेंच मुसलमानी धर्माचा इतका प्रसार येथें झालेला नाहीं. जाळपोळ आणि कापाकापी या साधनांनीं मुसलमानी धर्म येथें इतका फैलावला असें म्हणणें मूर्खपणाचें आहे. पूर्वींच्याप्रमाणें एकपंचमांश लोक मुसलमान झाले, त्याचप्रमाणें एकपंचमांश काय पण अर्धे लोकहि ख्रिस्ती होतील असें होऊं नये अशी खबरदारी तुम्हींच घेतली पाहिजे. मलबारांत ज्या रस्त्यांतून एखादा उच्चवर्णीय ब्राह्मण जात असेल त्यावरून एखाद्या महाराला जाण्याची परवानगी तेथें नाहीं, पण तेंच त्यानें एकादें वेडेवांकडे इंग्रजी नांव घेतलें किंवा

तोच उद्यां एखादा हुसेनमिया झाला कीं, त्याचा सारा विटाळ नष्ट होतो." (स्वामी विवेकानंद)

ज्यांच्या कित्येक पिढ्या हिंदुधर्मांत गेल्या, हिंदुधर्मासाठीं ज्यांच्या अनेक पूर्वजांनीं हवा तो त्याग केला, संकटें भोगलीं अशा परंपरेचा वारसदार कोणत्याहि कारणास्तव परधर्मांत गेला तर त्याबद्दल हिंदुधर्माभिमानी लोकांस मुसलमानी सत्ता आल्यानंतरहि वाईट वाटत नसे. परधर्मांत कां गेला याचें कारण शोधीत नसत अगर त्यावर उपायहि योजीत नसत. परधर्मांत गेल्यावर एखाद्यास आपल्या मूळ धर्मांत परत येण्याची इच्छा झाली, त्यानें तशी विनंती केली. तरी आमच्यांतील कर्मठ धर्मज्ञांच्या नांवाखालीं त्यांच्या विनंतीचा मुळींच विचार करीत नसत. परधर्मांत गेल्यावर त्यास कोणत्याहि सबबीवर स्वधर्मांत घेत नव्हते. आपल्या करड्या धर्मज्ञांचामुळेंच तो परधर्मांत गेला याचीहि पर्वा नसे अशा धर्मघातक गोष्टीनें अनेक अनार्थांस जन्म दिला.

"मुसलमान लोक हिंदुस्तानांत प्रथम आले त्यावेळीं हिंदुंची संख्या साठ कोटी होती असें फेरिस्तानें कोठेंसें म्हटल्याचें मला आठवतें. आपल्या धर्मांतून बाहेर जाणारा प्रत्येक मनुष्य आपणास मुकतो एवढेंच नव्हे तर उलट आपल्या शत्रूच्या संख्येंत भर घालतो. (स्वामी वि. खं. ६ वा, सन १८९९)

फिरोज तघलकाचा वजीर मक्बुलखान हा तेलंगणांतील उच्च कुळांतील हिंदु अल्लाउद्दीनचा उजवा हात मलीक काफूर, हा गुजरातमधील उच्च कुलीन हिंदु यानें सबंध हिंदुस्थानभर मुसलमानी सत्ता व मुसलमानी धर्म परसविण्याचे प्रयत्न केले. अनेक पवित्र देवळें भ्रष्ट केलीं व हिंदुवर राक्षसी जुलूम केले. निजामशाही लोदी हा मूळचा हिंदु सोनार, गुजरातमध्यें मुसलमानी राज्य स्थापन करणारा मुजफरखान हा मुळचा हिंदु. वऱ्हाडची इमामशाही स्थापन करणारा फत्तेउल्लाखान हा तेलंगणमधील ब्राह्मण. तिमा भट नांवाच्या ब्राह्मणास बाटवून त्याचें नांव तिमाहसन ठेवलें. त्याचा मुलगा महंमदबहीरी यानें अहमदनगरची निजाम-

शाही स्थापन केली. वरीलप्रमाणें अनेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध असें अगणित हिंदु मुसलमानी धर्मांत गेले. त्यांच्या धर्मांतराकडे हिंदूंनीं कर्मठपणा जगविण्यासाठी तुच्छतादर्शक दृष्टीनें पाहिलें. त्यांची उपेक्षा केली. स्वधर्माकडे त्यांनीं फिरून पाहूं नये म्हणून त्यांच्यासाठीं धर्माची दारें कायम बंद आहेत असें अट्टाहासानें प्रतिपादिलें ह्या एकाच गोष्टीमुळें हिंदु धर्माचा ऱ्हास झाला व हिंदुस्थानचें स्वातंत्र्य कांही शतकें रसातळास जाण्यास जो कारणें झालीं त्यांत हें प्रमुख! कलकत्ता येथील बॅरिस्टर मुकर्जी यांनी सुमारें चाळीस वर्षांपूर्वी 'हिंदुधर्म सामर्थ्यवान कसा होईल' हें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत वरील प्रमाणें अनेक बाबं.ची त्यांनीं साधार चर्चा केली आहे. अशा महत्त्वाच्या प्रश्नाकडे जरी कर्मठांनीं अनेक शतकें दुर्लक्ष केलें होतें तरी भागवतधर्मीय सर्वच संतांनीं या अनिष्ट रुढीचा नायनाट करण्याचे अनेक प्रयत्न केले आहेत. तुकाराम महाराजांनीं त्यांच्या काळीं या महत्त्वाच्या गोष्टीवर विशेष जोर दिला होता. त्याचा परिणाम त्याकाळीं महाराष्ट्रांत कांहीं घडलेल्या गोष्टीवरून स्पष्ट होत आहे.

## शुद्धिकरण

शिवाजी महाराज यांचें स्वराज्य स्थापनेचें कार्य दिवसेंदिवस वाढत होतें. महाराष्ट्रांतील अनेक नामवंत लोकांस तें पटूं लागलें. ते त्यांच्या कार्यास वाढत्या बळानें सहाय्य करूं लागले अशा वेळीं विजापूरच्या बादशाहानें फलटणच्या बजाबा नाईक निंबाळकरास राजकीय हेतुसाठीं जबरीनें मुसलमान धर्माची दीक्षा दिली बादशाही घराण्यांतील एका मुलीबरोबर त्याचे लग्नहि लावून दिलें. महाराष्ट्रांत फलटणच्या नाईक निंबाळकरांचें घराणें अत्यंत पुरातन असून इतिहासप्रसिद्ध अशा थोर घराण्यांतील सरदारास मुसलमान करणें यांत त्या धूर्त बादशाहाचा राजकीय डाव होता. बादशाहानें बजाबाप्रमाणेंच इतर मराठा सरदारांस मुसलमानी धर्माची दीक्षा दिली तर ती गोष्ट महाराष्ट्रांतील स्वराज्य स्थापनेचें काळीज खाईल, महाराष्ट्र प्रेतवत होईल या फिकीरींत शिवाजी महाराज असतां त्यांना भागवतधर्माच्या उच्च तत्त्वाची आठवण झाली. तुकाराम महाराजांच्या वाणीचा त्यांना आधार सांपडला. '**यारे यारे लहान थोर। याती भलते नारी नर ॥**" भागवतधर्मानें परधर्माच्या लोकांसहि आपला धार्मिक दरवाजा मोकळा ठेवला आहे. मग बजाबा तर मुळचा हिंदु

आहे. त्यानें मुसलमानी धर्माचा स्वीकार स्वखुषीनें अगर त्या धर्माच्या प्रेमामुळें मुळीच केला नाही. त्याला स्वधर्मांत घेणें अत्यंत जरूर आहे. त्याप्रमाणे शिवाजी महाराजांनीं पुढाकार घेतला, बजाबास परत हिंदु करून घेतलें. शिवाजी महाराजांनीं स्वतःची मुलगी सखूबाई ही बजाबाच्या मुलास दिली. हिंदुधर्मियांस कांही शतकें धर्मांतररूपी महारोग जडला होता. त्यावर महाराजांनीं उपाययोजना केली.

भागवतधर्मीय संतांच्या शिकवणुकीमुळें शिवाजी महाराजांनीं नाईक निंबाळकरांच्या बाबतींत जें धर्मरक्षणाचें कार्य केलें तीच परंपरा निदान महाराष्ट्रापुरती तरी पुढें सुरू राहिली असती तर महाराष्ट्राचें अस्तित्व आज दिसत आहे त्यापेक्षां खास निराळें दिसलें असतें.

तुकाराम महाराजांचें अवतारकार्य हें महाराष्ट्राच्या उद्धाराचे बाबतींत सर्वप्रकारें उपयोगीं पडलें. भक्तिवृक्षाच्या छायेखालीं महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातीच्या व पंथांच्या हिंदूंस एकत्रित बसविलें. त्यांची धार्मिक तळमळ शांत केली. पक्षभेदाच्या व मतभेदाच्या लोकांस भागवतरुपी सूत्रांत ओवून त्यांचा एकजिनसी हार बनविला. धर्मजागृतीच्या पोटींच त्यांच्यांत सर्व प्रकारची जागृति निर्माण केली. शिवाजी महाराजांनीं व असंख्य वीरांनीं राष्ट्रोद्धारासाठीं जो आत्मयज्ञ सुरू केला होता त्याला उपयोगी पडेल अशा प्रकारची जरूर ती सामुग्री कीर्तनद्वारें महाराष्ट्रभर तयार करून ठेवली होती. भागवतधर्माचीं उच्च तत्त्वें व शास्त्राचें सार अभंगांत आणून त्याला बहुजन समाजाच्या भाषेनें शोभविलें व त्याचा प्रसार जनतेंत सदैव राहील अशा प्रकारचा मार्ग कायमचा खुला केला. 'भागवतधर्माच्या समतातत्त्वाचें महत्व समाजापुढें कायम स्वरुपांत राहील असें केलें. महाराष्ट्रास महाराष्ट्र धर्माचा धडा शिकविला व महाराष्ट्राचें वैशिष्टय हें निराळ्या तऱ्हेनें राहील असा धार्मिक स्वाभिमान त्यांच्यांत निर्माण केला. तुकाराम महाराज यांच्या अवतार कार्यामुळेंच महाराष्ट्राचें धार्मिक व राजकीय हित साधलें. परधर्मीयांच्या धार्मिक आक्रमणास राजकीयदृष्ट्या व धार्मिकदृष्ट्या विरोध करण्याचें सामर्थ्य महाराष्ट्रांत निर्माण झालें.

★

# संतांचें कार्य

धन्य तोचि देश जेथें संत वास । तापत्रय दोष जाती सत्य ॥

महाराष्ट्रांत मुसलमानी सत्ता जन्मास येत आहे अशा वेळीं संतांनीं समताधर्माच्या प्रसाराच्या कार्यास सुरवात केली. परसत्तेशीं झुंज देऊन महाराष्ट्राचें वैशिष्ठ्य कायम ठेवण्याचें कार्य त्यांनीं केलें.

'ब्रह्ममूर्ती संत जगीं अवतरले । उद्धरावया आले दीन जनां ॥'

त्या वेळच्या ऐतिहासिक सामाजिक व धार्मिक परिस्थितीचा विचार केला तर संताचें अवतार झाल्यानें देशाचें सर्वतोपरी हित झालें असेंच दिसून येईल.

"जगांतील सर्व दुष्ट, दुःखी, कष्टी, आणि गरीब लोकांचे आत्मे जेथें एकत्रित होतात तोच समवायी परमात्मा माझ्या पूजेचा हेतु होय. अरे मूर्खांनों, या जिवंत परमेश्वरास सोडून काल्पनिक पडछायेमागें कां धावतां आणि एकमेकांशीं भांडणें करून लढाया कां करतां ? या प्रत्यक्ष परमेश्वराचेंच पूजन करा!"

(स्वामी विवेकानंद पत्र ६४ वें.)

संत आपल्या प्रत्येक कृतींत सत्य परिस्थितीची गांठ बांधीत असतात. लोकहितासाठीं ते आपल्या देहावर नेहमींच उदार असतात. समाजहितासाठी ते आपली वाणी वापरतात. आपलें उभें आयुष्य ते जनहितासाठीं कष्टवतात. सर्व प्रकारच्या जनसेवेतच ते परमेश्वराची सेवा समजतात.

श्रीनामदेव महाराजांपासून तो तुकाराम महाराजापर्यंत सुमारें तीनशें वर्षें मुसलमानी सत्तेनें महाराष्ट्रभर धुमाकूळ घातला होता. त्यांना पद्धतशीर अटकाव करण्याचें महान् कार्य महाराष्ट्रीय संतांनीं केलें.

## कै. न्यायमूर्ति रानडे

कै. न्यायमूर्ति रानडे हे संतांच्या कामगिरीकडे इतिहासाचा पुरावा व समाजहिताचा आधार या दृष्टीनेंच पाहात होते. त्यांनीं लिहिलेल्या

" मराठी सत्तेचा उत्कर्ष " " Rise of the Maratha " या ग्रंथांत एका स्वतंत्र भागांत असें लिहिलें आहे." मराठी सत्तेच्या उत्कर्षास अनकूल भूमि महाराष्ट्रांतील वारकरी संप्रदायाच्या संतांनींच तयार केली होती." न्यायमूर्ति रानडे यांचें हें सत्य कथन महाराष्ट्रांतील कांहीं पक्षाभिमानी विद्वानास मानवलें नाहीं व आजहि कांहींना मान्य होत नाहीं. ते या सत्य परिस्थितीस झांकण्याचें अनेक प्रयत्न करीत आहेत.

## कै. इतिहासाचार्य राजवाडे यांचे तारे

कै. राजवाडे यांनीं इतिहासाची आवड दाखवितांना वारकरी संतावर अकारण असे अनेक वार केले. संताची कामगिरी मुद्दाम कमी मानली व वर्णाश्रम धर्माचा टेंभा मिरविण्याचे प्रयत्न केले. इतिहासाच्या नांवाखालीं जातीधर्मास उचलून धरलें भागवतपंथाच्या खऱ्या इतिहासास स्वकल्पनेच्या आधारानें डावलण्याचें घातकी प्रयत्न केले.त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड चौथा या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत जें लिहिलें आहे तें पुढीलप्रमाणें आहे.

" बाराव्या शतकाच्या सुमारास जैन धर्माच्या विरुद्ध लिंगायतांच्या व मानभावांच्या संसर्गानें सनातन धर्माच्या गोटांतील लोकांच्याहि मनावर कांहीं परिणाम झाले व त्यापैकीं कांहींनीं भक्तिमार्ग व उपासनामार्ग या नांवाखालीं मोडणारी सनातनधर्माची एक निराळीच शाखा स्थापिली. या शाखेला संतमंडळींचा अथवा संताळ्यांचा भक्तिपंथ म्हणून म्हणतात. जैन लिंगायत व मानभाव यांच्यांत कमीजास्त प्रमाणानें जातिभेद व्यवहारांत मानीत नाहीत. संताळ्यांत विठोबाच्या मंदिरांत तेवढा जातिभेद मानीत नाहींत,व्यवहारांत मानितात.ह्या भक्तीपंथाची स्थापना महाराष्ट्रांत तेराव्या शतकांत झाली. संताळ्यांची ही स्थापना झाल्यावर कांहीं काळानें देवगिरी येथील मराठ्यांचें राज्य नष्ट झालें व यवनांची सत्ता महाराष्ट्रांत तीनशें वर्षें म्हणजे शके १२४० त देवगिरी घेतल्यापासून शके १५४० त अहमदनगरची मनसबगिरी शहाजीला मिळेतोंपर्यंत बहुतेक अव्याहत चालली. या तीन शतकांत संताळ्यांचेंच प्राबल्य महाराष्ट्रांत फार होते. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगूपणाचा केवळ मूर्तीमंत पुतळाच. संताला

खाणें नको, पिणें नको, वस्त्र नको, प्रावरण नको, कांहीं नको. एक विठोबा मिळाला म्हणजे सर्व मिळालें. ऐहिक सुखदुःखें, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार यांच्यांत मन घालणें संतांचें काम नव्हे. इहलोक हा संतांचा नव्हेच. राजा कोणी असो सारा कोणीहि घेवो, संताला त्याचें कांहीं नाहीं. असल्या त्या संतमंडळीच्या हातीं विचाराची दिशा जाऊन महाराष्ट्र तीन शतकें पंगू बनून राहिला. सनातनधर्माला त्रासून महाराष्ट्रांतील लोकांनीं जी धर्मक्रांति केली, तिचें स्वरुप हें असें होतें. या धर्मक्रांतीनें धर्मोन्नति राष्ट्रोन्नति होण्याचे एकीकडेच राहून उलट धर्मावनति व राष्ट्रावनति मात्र झाली. कालांतरानें यवनांच्या अमलाखालीं पायमल्ली झालेली पाहून मराठ्यांचे डोळे उघडले. या पंगू संताळ्यांचा त्यांना वीट आला आणि सनातन धर्माकडे गोब्राह्मणप्रतिपालनाकडे चातुर्वर्ण्याकडे त्यांनीं पुन्हा धांव घेतली. या उपरतीच्या वेळीं रामदास स्वामी, रंगनाथ स्वामी मोरयादेव वगैरे सनातन धर्माभिमानी साधुपुरुष झाले व महाराष्ट्रास महाराष्ट्र–धर्माचा उपदेश करिते झाले. त्या सनातन धर्माभिमानी साधुपुरुषांच्या वेळीं संताळे आपला संतमार्ग आक्रमीतच होते परंतु इहलोकीचे अर्थ साधण्यास संताळ्यांचा उपयोग कांहीं नाहीं. हे सर्व तुकाराम पूर्णपणें जाणून होता. शिवाजी तुकारामाकडे उपदेश घेण्याकरतां गेला असतां त्या प्रामाणिक साधुनें आपल्यासारख्या पंगू माणसाकडे न येतां समर्थांच्याकडे जाण्याचा शिवाजीस उपदेश केला. संताळ्यांतील पंगुत्वालाच उपरोधून समर्थ हें नांव अस्तित्वांत आलें. हें लक्षांत घेतलें असतां, तुकारामाच्या उपदेशाचें महत्व व त्यानें स्वतः स्वीकारलेल्या पंथाचे लघुत्व कळून येईल. संताळ्यांच्या उपदेशानें महाराष्ट्रांत नवीन जोम आला, म्हणून न्यायमूर्ति रानडे म्हणतात, "तो खरा प्रकार नसून समर्थांनीं काढलेल्या नवीन रामदासी पंथाच्या उपदेशानें तो चमत्कार घडून आलेला आहे. निवृत्तीकडे ज्याचे डोळे लागले त्या संताच्या हातून हें प्रवृत्तिपर कृत्य व्हावें कसें ?

'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे'
असली धमकी देणाऱ्या समर्थांच्याच महोपदेशाचा तो परिणाम आहे."

कै. राजवाडे यांचा वरीलप्रमाणें खोटा पक्षाघपणा पाहून कोणासहि घाईट वाटेल. इतिहासाच्या नांवाखालीं समाजांत भागवतधर्माबद्दल अप्रिती निर्माण करण्याचा घातकी प्रयत्न व कर्मठपणास उजाळा देण्याचा हेतु वरील उताऱ्यावरून कोणाच्याहि लक्षांत येईल. परंतु राजवाड्यांनीं निर्विकार मनानें विचार करणें अत्यंत जरूर होते कीं महाराष्ट्रांतील शेंकडा नव्याण्णव जनता ही भागवतधर्मीय संतांच्या मागें आहे.महाराष्ट्रांत आज सर्वत्र भागवत धर्म आहे. चतुर्वर्ण्याचा धर्म हा फक्त सोवळ्यांत व कांहीं घरांत कसातरी जीव धरून आहे. राजवाड्यांना अगदीं बंधूप्रमाणें साह्यकर्ते कै. भावे हे होते. त्यांनीं महाराष्ट्रीय संतांवर अनेक विषारी बाण सोडले. त्याचें लिखाण जतन करण्याचे प्रयत्न आजहि अनेक विद्वान करीत आहेत. हें पाहून दुःख होते आहे. या सर्व मंडळींचा मुख्य हेतु हाच कीं वारकरी संतांचा महाराष्ट्राचें स्वातंत्र्य संपादन करण्यास मुळींच उपयोग झाला नाहीं. हें सांगणें विशेषतः महाराष्ट्रीय बहुसंख्य जनता तुकाराम महाराज यांच्या शिकवणी मागें आहे व महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं त्यांनीं जी खेड्यापाड्यांतून धार्मिक भावनेच्या आधारानें अनुकूल भूमिका तयार केली होती व तिच्यामुळेंच महाराष्ट्र हा स्वातंत्र्याकरितां कांहीं तरी करूं शकला हें ऐतिहासिक सत्य हवे ते प्रयत्न करून तुकाराममहाराजांकडून हिसकावून घेणें व रामदासी पंथाच्या पदरांत बळेंच बांधणें.

कै. राजवाडे म्हणतात "पंगू संताळ्यांचा वीट आला" चातुर्वर्ण्याकडे लोकांनीं धांव घेतली. अशा धांव घेणाऱ्या लोकांस रामदासस्वामी, रंगनाथ स्वामी, मोरयादेव हे उपदेश करण्यासाठीं पुढें आले. रामदास स्वामी यांच्या संबंधीं आम्ही 'श्री समर्थ रामदास आणि वारकरी संत' या स्वतंत्र प्रकरणांत शक्य ती माहिती देणार आहोंत. रंगनाथस्वामी यांचा जो प्रामुख्यानें उल्लेख केला. ते स्वामी कोठें होते व काय करीत होते याची आजच्या महाराष्ट्रीय जनतेस माहिती नाहीं व त्या काळचा इतिहासहि सांगत नाहीं. मोरया देव हे पुण्याजवळील चिंचवड या गांवचे गणपती भक्त! यांच्या देवस्थानास विजापूरच्या मुसलमान बादशहानें इनाम दिलें होतें. त्या इनामाच्या उत्पन्नावर त्यांनीं चिंचवड येथें फक्त

ब्राह्मण भोजनें घातलीं व वर्णाश्रम धर्म वाढीस लावला. समाज–जागृति व धर्म–जागृतीचे कार्य यांचेकडून कोणत्याहि प्रकारें झाल्याचें कोणीहि सांगूं शकणार नाहीं.

## चातुर्वर्ण्याकडे

राजवाडे म्हणतात, "मराठ्यांचे डोळे उघडले व चातुर्वर्ण्याकडे त्यांनीं फिरून धांव घेतली." शिवाजी महाराजांनीं प्रत्यक्ष स्वराज्य स्थापनेस सुरवात केली. त्यावेळीं त्यांना मुख्यत: चातुर्वर्ण्य आडवें आलें. सुरवातीस देशमुख, देशपांडे, सरदार, जहागीरदार त्यांना मदत देईनात. त्यांनीं विरोधमात्र केला. ही सर्व मंडळी चातुर्वर्ण्य पाळणारी होती. शेवटीं राज्याभिषेकाचे प्रसंगींहि हा चातुर्वर्ण्याचा राक्षस चवताळून उभा राहिला. ज्यांना श्रुति–स्मृतीची नांवापुरतीहि ओळख नव्हती. उलट वर्णाभिमानाची चीड ज्यांना होती अशा संतांच्या शिकवणुकीमुळें खेड्यापाड्यांत राहणारा बहुजन समाज आणि साधेभोळे मावळे व महार–मांगादि सर्व समाजांच्या लोकांनीं त्यांना सहाय्य केलें. हें इतिहासाच्या पोटांत शिरल्यास अगदीं उघड दिसून येईल. पेशवाई काळांत चातुर्वर्ण्यानें अगदीं कळस गांठला. त्याचा परिणाम पेशवाई नामशेष होण्याकडे झाला. स्वराज्य वाढण्याकडे मुळींच झाला नाहीं.

कै. राजवाडे यांनीं पुण्यश्लोक संतास संताळे म्हणून स्वत:च्या हृदयाचा उथळपणा दाखविला. इतिहासाचा जिवंतपणा राखण्यासाठीं संशोधनाच्या अनेक वाटा फिरणाऱ्या लेखकांना संतांची खरी कामगिरी दिसत नाहीं, हें त्यांचें अज्ञान नाहीं तर त्यांचा दुष्टपणा आहे. इतिहासाची इमारत त्यांनीं स्वमताप्रमाणें उभी केली. त्या इमारतीचें नकली महत्त्व वाढविण्यासाठीं त्यांनी संतांच्या कामगिरीस बुद्धिपुरस्सर छिद्रें पाडण्याचा प्रयत्न केला त्यामुळें त्यांचा खोटा पक्षांधपणा अगदीं उघड पडला. महाराष्ट्राचें धार्मिक, सामाजिक व राजकीय स्वरूप स्थीर ठेवण्याचें खरें श्रेय संतमंडळीस आहे, हें इतिहास आजही सांगूं शकेल. राजवाड्यांचा चातुर्वर्ण्य हा श्रुति–स्मृतीच्या जाळ्यांत अडकला होता. तो प्रत्यक्ष समाजापर्यंत पोहोंचत नव्हता. समाजाच्या वाढीकरतां त्याचा काडीइतकाहि उपयोग होत नव्हता. उलट प्रगतीचे सर्व मार्ग तो अड-

बीत होता. इतकेंच नाहींतर त्याचे जे खास वारसदार यांनाहि त्याचा उपयोग होत नसे. स्वराज्य स्थापनेच्या काळीसुद्धां तुकाराम महाराजांना पुढीलप्रमाणें निराशेनें उद्गार काढावे लागले—

टिळे लपत्रिती पाताडी। लेती त्रिजारी कातडी ॥
संता नाहीं मान। देव मानी मुसलमान ॥
नीचाचे चाकर। चुकलिया खाती मार ॥
सांडिले आचार। द्वीज झाले चहाडखोर ॥

भारताचें अनेक शतकें वाटोळें होण्यास जीं कारणें घडलीं, त्यांत चातुर्वर्ण्याचा दुराभिमान व कठोरपणा हें प्रमुख आहे. असें स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद व स्वामी रामतीर्थ वगैरे अनेक महापुरुषांनीं सांगितलें आहे

## संताचा मार्ग

संत हे जनहितासाठींच असतात. समाजाच्या उद्धारासाठीं ते आपल्या देहावर नेहमीं उदार असतात. समाजहितासाठीं ते आपली वाणी वापरतात, आपलें उभें आयुष्य वाटेल त्या हालअपेष्टा सहन करून खर्चीं घालतात. म्हणून जनता ही त्यांच्या वचनावर विश्वास ठेवून त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें भावनायुक्त मनानें जात असते. महाराष्ट्रीय बहुसंख्य जनता ही सुमारें सहाशें वर्षें संतवचनाप्रमाणें वागत आहे. जनतेचा हा ओघ अडविण्याचे मागें अनेक प्रयत्न झाले व आजही होत आहेत. परंतु ते सर्व निष्फळ ठरले व पुढेहि ठरतील.

प्रत्यक्ष संसारचक्रांत उभे राहून प्रत्यही उत्पन्न होणारे मायापाश परमेश्वरभक्तीच्या जोरावर दूर करणें, मायाजाळानें कितीहि त्रास दिला तरी आपली चित्तवृत्ति शांत ठेवणें, बायकोपोरांकडे फक्त कर्तव्य दृष्टीनें पाहून व्यवहारापुरती त्यांची ओळख ठेवणें, न्याय व नीति सदैव जागृत ठेवून स्वतःचा संसार आदर्श व पवित्र ठेवणें, सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ आहे. हें शास्त्रवचन स्वतःच्या उदाहरणानें समाजाचें गळीं उतरविणें हें सामान्य कार्य नाहीं. सर्वसंगपरित्याग करून ढुंगणास लंगोटी लावून

गिरीकंदराचा आश्रय करणाऱ्या साधु-संन्याशास म्हणावें गृहस्थाश्रमांत राहून परमेश्वराचें दर्शन घेणें तुला शक्य आहे काय ? महाराष्ट्रीय संतांनीं संसारांत राहून समाजासाठीं सर्वोपयोगी अशी अभंगवाणी निर्माण केली. जनहितासाठीं रात्रंदिवस कष्ट केले. संसारसुखास स्वहस्तें त्यागरूपी अग्नि लावून त्या प्रकाशांत जनतेस तिच्या हिताचा खरा मार्ग निरंतर दाखविला. अशा संतावर एकाद्या संसारी, मत्सरी, वर्णाभिमानी व समाज घातकी बुद्धीच्या भांडवलावर जनतेस भंडावून सोडणाऱ्यानें उठावें आणि संत नेभळे, पंगू व निवृत्तीचे उपासक आहेत असें म्हणत सुटावे हें आश्चर्य आहे. महाराष्ट्राच्या उद्धाराचे खरे वारसदार हे मानव-धर्माचे उपासक संतच आहेत. हे संत झाले नसते तर श्रुतिस्मृतीची स्मृतीहि महाराष्ट्राच्या मनांतून केव्हांच नष्ट झाली असती. संताचा हा मार्ग चालविणारे महापुरुष वरचेवर निर्माण होत असतात.

## महात्मा जोतीराव फुले

जे कां रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले ॥१॥
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा ॥२॥
मृदु सबाह्य नवनीत। तैसें सज्जनांचे चित्त ॥३॥
ज्यासीं अपंगिता नाहीं। त्यासी धरी जो हृदयीं ॥४॥
दया करणें जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी ॥५॥
तुका म्हणे सांगूं किती। तोचि भगवंताची मूर्ती ॥६॥

तुकाराम महाराजानंतर महाराष्ट्रांत भागवतधर्माचा प्रसार करणारा कोणी संत झाला नाहीं. भागवतपंथाचीं उच्च तत्त्वें ग्रंथांत अडकून पडलीं. समाजांत वर्णाश्रम धुमाकूळ घालूं लागला. शंकराचार्यांच्या मतांचा पगडा पुराणांच्याद्वारें समाजांवर उघड दिसूं लागला. पेशवाई काळांत समाजांत कडक जातीभेद निर्माण झाले. पुढारलेला वर्ग बहुसंख्येनें इतर लोकांकडे कठोरतेनें पाहूं लागला, समाजाच्या उद्धाराची हालचाल सर्वप्रकारें बंद झाली. अशा प्रतिकूल काळांत पुणें येथें सन १८२७ मध्यें महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म झाला.

महात्मा फुले यांचें जन्मस्थान पुणें ! पुण्याजवळच भागवतधर्मांचीं देहू व आळंदी हीं क्षेत्रें आहेत. तेथें यात्रेनिमित्त त्यांचें जाणें होऊं लागले. त्या स्थानांतील समता पाहून त्यांच्या उपजत पवित्र मनावर परिणाम झाला. त्यांनीं तुकाराम महाराजाचा गाथा ज्ञानेश्वरी व नामदेव महाराज वगैरे संतांचे ग्रंथ पाहिले. त्यांतील ज्ञानाकडे ते चिकित्सक मनानें पाहूं लागले.

महात्मा जोतीबा एका प्रसंगीं आपल्या ब्राह्मण मित्राच्या लग्नास गेले. लग्नाच्या वरातीत इतराबरोबर चालले. ते पाहून ब्राह्मण मंडळींत चर्चा सुरू झाली. एका कर्मठानें त्यांना दरडावून सांगितलें, 'तूं जातीनें माळी असून शूद्र आहेस आमचे बरोबर अगदीं समानतेनें चालून आमच्या श्रेष्ठतेस कमीपणा आणीत आहेस' या प्रकारानें त्यांचें मन दुःखी झालें. समाजांत चालू असलेल्या रुढीबाबत ते विचार करूं लागले. भागवतधर्मांतील सर्व ग्रंथांत समानता असतां प्रत्यक्ष आचरणांत आणलेला हा कठोरपणा पाहून त्यांचें मन कळवळलें. त्यांनीं समाजांत समानता निर्माण करण्याचें ठरविलें. त्यांच्या त्या ध्येयास प्रत्यक्ष त्यांचे वडील व इतर लोक विरोध करूं लागले.

'सत्यासत्यासी मन केलें ग्वाही । मानीलें नाहीं बहुमता ॥'

त्यांच्या रोमारोमांत भागवतधर्माच्या समतेचीं तत्त्वें मुरलेलीं होतीं. त्या तत्त्वांचा त्यांनीं जनतेंत प्रत्यक्ष प्रसार करण्याचें ठरविलें जनहित हेंच आपल्या आयुष्याचें ध्येय ठरविलें. समाजसेवा हें कठीण व्रत त्यांनीं धारण केलें. गळ्यांत माळ घातली नाहीं किंवा पंढरपूरच्या वाऱ्या केल्या नाहींत. बेगडी धार्मिकपणा दाखविला नाहीं. खऱ्या भागवतधर्माच्या तत्त्वांचे ते कृतीनें उपासक ठरलें.

त्याकाळीं महाराष्ट्र हा जपजाप्य, होमहवन व नसतें कर्मकांड यांच्या जाळ्यांत सांपडला होता. जातीद्वेषानें तर शिखर गांठलें होतें. जातीभेदाच्या उघड्या नाचामुळें, हिंदुचें ऐक्य पूर्ण मोडकळीस आलें होतें. पौराणिक ग्रंथांच्या भारानें समाज प्रगतीच्या मार्गापासून मागें फिरला होता. काल्पनिक पापपुण्याच्या फेऱ्यांत तो सांपडला होता. पेशवाई काळांत महार, चांभार, मांग वगैरे अस्पृश्य लोकांवर जुलूम करणें हें राजमान्य

ठरलें होतें, व या पाशवी अत्याचारास शास्त्राचा आधार दाखविण्याची पद्धत जडली होती. ही चाल खेड्यापाड्यांत, शहरांत गांवांत व रानावनांतहि चांगल्या प्रकारें पसरली होती. इंग्रजी राज्याच्या प्रसारामुळें शिक्षणाचें महत्व वाढीस लागलें होतें. पण लोक या सुधारणेपासून दूर जात. परकीय सत्तेनें झांकून वागविलेले ख्रिस्ती मिशनरी हे महार मांगादि अस्पृश्य लोकांस व इतर मागासलेल्या समाजांस प्रेम, शिक्षण, सुधारणा व माणुसकीचे हक्क देण्यासाठीं हात पुढें करून उभे होते. त्यांच्या ह्या आकर्षणास ते लोक तर बळी पडत होतेच पण सुशिक्षित असे अनेक ब्राह्मण आपण होऊन त्या ख्रिस्ती कळपांत घुसत होते. सोवळ्या ओवळ्याचे भयंकर बंड व अस्पृश्यतेची कठोरता यामुळें लोक भराभर ख्रिस्तीधर्मात जात होते.

अशा प्रसगीं महात्मा फुले यांनीं समताधर्माचा पुरस्कार केला. त्यांनीं रुढीचें बंधन तोडण्याचें धैर्य लोकांत निर्माण केलें. चालू काळाचें महत्त्व जनतेस पटविलें. जातीभेदाच्या डोंगऱ्यास ऐक्याची आग लावली. अस्पृश्यांची अस्पृश्यता पाळणें हें महापाप आहे. या गोष्टीचा साधुसंतांनीं निषेध केला असें सांगितलें व बदलत्या काळाप्रमाणें तुम्ही वागलेंच पाहिजे, असें समाजास त्यांनीं शिकविलें. त्यांनीं नुसता शाब्दिक उपदेश केला नाहीं तर प्रत्यक्ष कृतीनें हें समाजास पटविलें. पुणें शहरांत पहिली अस्पृश्यांची शाळा त्यांनीं काढली व विद्यादेवीच्या मंदीरांत घुसण्याचा सर्वांस हक्क आहे असें दाखवून दिलें.स्त्रियांस शिक्षण देणें हें धर्मबाह्य आहे असें शास्त्रीपंडीत व कर्मठ सांगत होते.प्रत्यक्ष स्त्री-शिक्षणास विरोध करीत होते. त्यांच्या अडकाठीस त्यांनीं जुमानलें नाहीं. पुणें शहरांत स्त्रियांसाठीं पहिली शाळा त्यांनीं सुरू केली. स्त्री शिक्षणाचें बीज पेरलें. त्याच बीजाचा आज पुणें शहरांत व महाराष्ट्रभर स्त्री शिक्षणरुपी अफाट वृक्ष दिसत आहे, त्याचें मूळ संस्थापक महात्मा फुले आहेत. समाजांत त्यांनीं नवचैतन्य निर्माण केलें. बहुजनसमाजास भटाभिक्षुकाच्या काल्पनिक पापपुण्याच्या कात्रींतून सोडविण्याचे भगिरथ प्रयत्न त्यांनी केलें. ते पाहून पुरोहित वर्ग खडबडून जागा झाला. श्राद्ध पक्षावर व जरजाप्यावर यापुढें पोट भरणें शक्य नाहीं म्हणून तो भराभर शिक्षण घेऊं लागला. त्या समाजावरहि

म. फुल्यांनीं अशा प्रकारें उपकार केले. महारामांगादि अस्पृश्य लोकांस त्यांनी जवळ केलें नसतें, त्यांच्यासंबंधीं समाजांत प्रेम उत्पन्न केलें नसतें तर तो वर्ग मोठ्या संख्येनें ख्रिस्ती झाला असता.

महात्मा पदवी घेण्यासाठीं त्यांनीं आपल्या प्राणाच्या मोलानें काम केलें. या महान् कार्यासाठीं त्यांना आपलें शीर सदैव हातावर घ्यावें लागलें. प्राण घेण्यासाठीं आलेल्या मारेकऱ्यांच्या तरवारीचें प्रत्यक्ष दर्शन घडलें म्हणून ते महात्मा झाले.

भागवतधर्माच्या उच्च तत्त्वांचा त्यांनीं समाजाच्या सर्व थरांतून प्रसार करण्याचे सतत प्रयत्न केले. भागवतधर्मीय सर्वच संतांनीं महाराष्ट्रीय बहुसंख्य जनता स्थोर करण्याचे ज्याप्रमाणें प्रयत्न केले त्याप्रमाणें महात्मा फुले ह्यांनींहि ते केले. ते प्रती सांवता महाराज होते. महाराष्ट्रांत आज हरिजनोद्धार, स्त्री शिक्षण, सामाजिक सुधारणा, विधवा विवाह, रुढीधर्माचा नाश, सक्तीचें शिक्षण, अनाथ महिलाश्रम, अनाथ विद्यार्थी गृहें वगैरे ज्या सुधारणा दिसतात त्याचें मूळ सस्थापक व कल्पक बहुतांशी महात्मा फुलेच आहेत.

## कै. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

भागवतधर्माच्या तत्त्वानुसार कै. महात्मा जोतीराव फुले यांनीं महाराष्ट्रांत समाजसुधारणेची ज्योत पाजळण्याचें कार्य केलें. त्यांच्या त्या उच्च ध्येयासाठीं एका महाराष्ट्रीय तरुणानें महाराष्ट्राच्या परंपरेस अनुसरून आपल्या जीविताचें ध्येय एकाच गोष्टीसाठी म्हणजे "अस्पृश्योद्धार" यांस बांधलें. ते अव्वल इंग्रजीतील बी.ए. होते. त्यांनीं संसारसुख हें ध्येय ठेवलें असतें तर पैशाचा पाऊस पाडणारे ते नामांकीत वकील झाले असतें किंवा सरकारी नोकरींत बऱ्याच जाड पगाराचे अधिकारी झाले असते. परंतु भागवतधर्माच्या समतातत्त्वासाठीं खडतर अशा मार्गाचा त्यांनीं अवलंब केला.

नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ॥
तये नावे संगे ब्राह्मण तरती । केवीं ते बुडती अनामिक ॥

पेशवाईचा शेवट झाला तरी पुढें कांहीं वर्षे पुणें शहरीं अस्पृश्यता ही शास्त्राधाराच्या चिखलाच्या आधारावर हिरवळीसारखी दिसत होती. तिला सुधारणेच्या नांगराचें कमी करण्यानें महान कार्य कै. विठ्ठल रामजी शिंदे यांनीं केलें. स्वतःचें उभें आयुष्य त्यांनीं अस्पृश्योद्धारासाठीं खर्च केलें व स्पृश्यांचीं अस्पृश्यासंबंधीं धर्माच्या नांवाखालीं बरबटलेली अंतःकरणें साफ करण्याचें कार्य त्यांनीं केलें. भागवतधर्माच्या समतातत्वाचे ते मोठे पुरस्कर्ते होते.

## संत साने गुरुजी

" सर्वसंगपरित्याग करून ज्यानें आपली दृष्टि धर्म साधनाकडे वळविली आहे, असा ब्राह्मण हाच आमचा अनुकरणाचा नमुना होय."

(स्वामी विवेकानंद खंड ४ था.)

भागवतधर्माचीं द्वारें सर्व जातीच्या व पंथांच्या लोकांस उघडीं आहेत. या पंथाचें आराध्यदैवत पंढरपूरचा विठोबा याचें दर्शन घेण्याचा सर्वांस हक्क आहे असें या पंथांच्या संतांनीं सांगितलें. त्यांची अभंगवाणीहि तसें सांगत आहे हें आजहि दिसत आहे. परंतु प्रत्यक्ष परिस्थिति मात्र निराळी दिसत होती.

तुकाराम महाराजानंतर भागवत धर्म हा ग्रंथांत अडकला गेला. त्याची हालचाल व पुढारीपण हें साधारण कर्मठांच्या हातांत गेलें. पांगारकरासारखे जे अनेक इंग्रजी पदवीधर या पथात घुसले त्यांनीं समतेच्या भागवतधर्मास एकांगी अशा सनातनी वळणावर नेण्याचे प्रयत्न केले, कर्मठपणाचे प्रयोगहि केले असें म्हणणें चूक होणार नाही. कारण स्पृश्यास्पृश्य भेद कायम राहावा म्हणून संत चोखोबाच्या आड लपण्याचा पांगारकर प्रयत्न करतात व सांगतात की, " विठोबाच्या मंदीरात येऊं दिलें नाहीं म्हणून चोखोबानें कधीं कुरकूर केली नाहीं व हीच विचारसरणी सर्वांच्या ठिकाणीं कमी अधिक प्रमाणांत दिसून येत होती.

महाराष्ट्रांत भागवतधर्माच्या शिकवणुकीमुळें धर्माचा खरा महत्त्वाचा थर जो अस्पृश्य वर्ग, तो जागा झाला. त्यामुळें हिंदुजात व हिंदुधर्म

यांचेकडे कित्येक शतकें तो आशेनें सारखा पाहात उभा आहे, त्यांच्या मतें मनाच्या शांतीसाठीं फक्त पंढरपूर हेंच एक स्थान आहे. अशा त्या समता भूमींत पूर्वापार लाखांनीं हरिजन दरवर्षी येत. त्यांचा भक्तिभाव हा अत्यंत वरच्या दर्जाचा असे. समाजानें त्यांची अवहेलना केली, धार्मिक म्हणविणारांनीं त्यांना दूर लोटलें, ' तुम्हांस धार्मिक बाबतींत हक्क नाहीं.' असे कठोर शद्व उच्चारून त्यांच्या भक्तीमय अंतःकरणावर घांव घातले, तरी ते पंढरपुरास येत. संतांनीं पावन केलेल्या भूमीचें दर्शन घेत. आपली खरी धार्मिक तहान पांडुरंगाच्या मंदिराच्या कळसाचें दुरून दर्शन घेऊन भागविण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या ह्या श्रष्ठ भावनेकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. उलट ते विरोध करीत राहिले व विरोधकच धर्माभिमानी नि धर्मरक्षक म्हणून मिरवूं लागले होते.

महाराष्ट्रांतील भागवत मर्चिया इतिहासाच्या पोटांत खोल बुडी मारून चाऱ्ही कोपरें तपासूनसुद्धां कोणीहि संशोधक सांगू शकणार नाहीं कीं, पंढरीच्या विठ्ठलाच्या मंदिराचे दरवाजे अस्पृश्यासाठीं उघडे होतें. त्यांना विठ्ठलाचें प्रत्यक्ष दर्शन घेतां येत होतें. ही कठीण परंपरा मोडण्याचें धाडस आजपर्यंत कोणीच केलें नव्हतें.

प्रति एकनाथ महाराजांचा अवतार असलेल्या साने गुरुजी यांनीं आपला हृदयस्थ पांडुरंग जागा केला. पंढरीच्या पांडुरंगाशीं एकरूप केला. त्यानीं प्राणाचे मोल देण्याचा निश्चय केला. आपल्या ओल्या अंतःकरणानें धार्मिकांस हांक मारली. त्यामुळें सारा महाराष्ट्र जागा झाला. भक्तवत्सल पांडुरंगाच्या नगरींत त्यांनीं धरणें धरलें. कारण काय तर पंढरपूरच्या विठोबाचें प्रत्यक्ष दर्शन सर्व हरिजनांस घेण्याचा धार्मिक हक्क समता तत्त्वानुसार सर्वांना मिळाला पाहिजे.

नकली धार्मिकांनीं लगेच ओरड सुरूं केली. धर्म बुडूं लागला. त्यासाठीं कांहीं कर्मठांनीं प्राण देण्याच्या प्रतिज्ञा केल्या. कित्येकांनीं पांडुरंगावरील अरिष्ट टळावें म्हणून अनुष्ठानें सुरूं केलीं. कांहींनीं देवाचें देवपण खापराच्या मडक्यांत सांठविण्याचा प्रयत्न केला व तसें जनतेस भासविण्याचें प्रयत्न केले अनेक थोर व मोठ्या पुढाऱ्यांनीं साने गुरुजोस या प्रतिज्ञेपासून मागें फिरविण्याचे प्रयत्न करून पाहिले. परंतु या संतानें अस्पृश्यांच्या

धार्मिक दु:खास साक्ष ठेवून प्रतिज्ञा केली होती. ती तीळमात्र ढळूं दिली नाहीं ! ते हृदयाच्या हाकांनीं त्या विटेवरील पांडुरंगास जागे करूं लागले. श्रीविठ्ठल जनतेच्या रुपांत महाराष्ट्रांत जागा झाला. महाराष्ट्र जनतेनें बहुसंख्येनें संत सानेगुरुजींच्या तपश्चर्येस मान्यता दिली. कर्मठांच्या व पुजाऱ्यांच्या पहाऱ्यांतून विठ्ठल मोकळा झाला. अखिल हरिजनास आपलें दर्शन देण्याचें त्यानें कबूल केलें.

भागवतधर्माच्या समतातत्त्वासाठीं व धार्मिक ऐक्यासाठीं संत साने गुरुजी यांनीं मोठी कामगिरी केली. आजपर्यंत झालेल्या सर्व संतांनीं जणूं काय स्वत: न करतां ती त्याच्यासाठींच मुद्दाम राखून ठेवली होती !

## संत गाडगे महाराज

" एखादा मोठा वक्तृत्ववान् पुरुष न्यायशास्त्राच्या कसोटीला पूर्णपणें उतरणारे आणि ज्यांत उच्च तत्त्वें गोविलीं आहेत असें भाषण करीत असतां त्यांस वेळीं एकहि श्रोता मिळत नाहीं. आणि उलट-पक्षी ज्याला व्याकरणशुद्ध भाषाहि बोलता येत नाहीं अशा एखाद्या सामान्य मनुष्याभोंवती अर्धेमुर्धे राष्ट्र जमा होतें. आणि त्याला परमेश्वर समजून त्याची पूजा करितें. यांतील रहस्यहि हेंच कीं, एकाची बडबड कोरडी असून दुसरा पुरुष स्वानुभवी असतो."

(स्वामी विवेकानंद खंड ४ था.)

सन ९०५ मध्यें मार्गशीर्ष वद्य पक्षांत गाडगे महाराजांनीं गृहत्याग केला. परमेश्वरभक्ति हाच त्यांचा घर सोडण्याचा मुख्य हेतु. तुकाराम महाराज यांनीं भक्ति व वैराग्य हें त्यांच्या डोळ्यांसमोर ध्येय. त्या ध्येयानुसार मनास येईल तिकडे ते फिरूं लागले. देहधर्माबद्दल पूर्ण औदासिन्य. वैराग्य हाच वाटाड्या ! जनहित हेंच व्रत ! पूर्वायुष्य खेड्यांत गेलेलें, परीट जातींत जन्म, घरची गरिबी, त्यामुळें शिक्षण नाहीं. वऱ्हाडांत परीट समाजास त्या काळीं अगदीं निराळ्या रीतीनें वागवीत. त्यामुळें सर्वच प्रतिकूल परिस्थिति ! असें असतां मराठी भाषा बोलणाऱ्या प्रत्येकास तुकाराम महाराजाप्रमाणेंच संत गाडगे महाराज यांचें नांव

माहीत आहे, त्याचें कारण केवळ त्यांची परमेश्वरभक्ति होय. गाडगे महाराज यांचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य महाराष्ट्रांत तरी क्वचितच् सांपडेल.

सुरवातीस एकतारीवर ते भजन करीत व कांहीं साधारण गोष्टी सांगत. त्यांच्या तोंडांतील प्रत्येक शद्वास अंत:करणांतील पावित्र्याचा पाठिंबा होता. त्यामुळें समाज तात्काळ आकर्षिला जाई. ज्या गांवीं त्यांचा मुक्काम होई तें गांव पूर्णपणें वैराग्य व भक्तीनें भारलें जाई.स्वत:च्या वागणुकींत त्यांनीं पूर्ण सत्यता ठेवली. समाजाच्या चालीरीति व रुढीरूपी धर्म, यांची पर्वा त्यांनीं केली नाहीं. खोटया मानापमानाच्या जाळ्यांत ते सांपडले नाहींत. देह धर्माबद्दल पूर्ण उदास. घर सोडल्यापासून नवीन कपडयांना स्पर्श केला नाहीं. किंवा लोकांनीं दिलेल्या पैशांतून कोणताहि पदार्थ घेऊन स्वत: खाल्ला नाहीं. रात्रबेरात्र फिरणें, ओल्या कपडयानिशीं झोंपणें. अंथरण्यास अगर पांघरण्यास स्वत:जवळ कांहीं न बाळगणें! आजपर्यंत कोणाच्या घरांत जाऊन मालकाच्या इच्छेप्रमाणें जेवण न करणें किंवा कोणत्याहि तांब्यापितळेच्या भांडयांचा कोणत्याहि कारणास्तव उपयोग न करणें हा त्यांचा रिवाज. गाडगे हेंच सर्वोपयोगी म्हणून यांना लोक गाडगे महाराज म्हणतात.

"स्वत:च्या य:कश्चित देहाची पर्वा ज्यांनीं कधींहि केली नाहीं असल्या माणसांनींच जगावर आणि मनुष्य जातीवर अत्यंत मोठे उपकार करून ठेवले आहेत. आणि स्वार्थबुद्धीच्या माणसांनीं जगासाठीं कांहींच केलें नाहीं. अशी साक्ष इतिहास आजवर स्पष्ट देत आला आहे."

(स्वामी विवेकानंद खंड ८ वा.)

त्या काळीं संत तुकाराम महाराज यांच्या समताधर्माच्या शिकवणूकीचीं सूत्रें बहुतेक वरिष्ठ वर्गाच्या हातांत गेलीं होतीं. वर्णाश्रमधर्माचा पगडा भागवतधर्मावर पूर्णपणें बसला होता. संतांचा भागवत धर्म गाथ्यांत कोंडला गेला होता. कांहीं कीर्तनकार स्वत:चा वडेजाव होण्यासाठीं तो जरूरीपुरता बाहेर काढून लोकांस सांगत. ब्रह्म, माया, मुक्ति, सुशुप्ती, आत्मज्ञान वगैरे शद्बांचें अवडंबर माजवून बहुजन-

समाजास ते धार्मिक भूल आणीत होते. त्यांच्यांत धार्मिक व सामाजिक सुधारणा होऊन सबंध हिंदु समाज एकत्रित व्हावा असे प्रयत्न होत नव्हते. अस्पृश्य समाजाची अस्पृश्यता धर्माच्या नांवावर जगविण्याचे कीर्तनांतून सांगितलें जात होतें.

अशा वेळीं गाडगे महाराजांनीं तुकाराम महाराजांचा भागवत धर्म सर्वांसाठीं उघडा ठेवण्याचें कार्य सुरू केलें. त्यांच्या त्या सत्य प्रचारास खेड्यापाड्यांतील व शहरांतील बहुजन समाज बहुसंख्येनें येऊं लागला. कोठेंहि गाडगे महाराजांचें कीर्तन आहे असें समजले कीं त्या स्थानास एखाद्या मोठ्या यात्रेचें स्वरूप येते. कित्येक प्रसंगीं यांच्या कीर्तनास लाखांनीं लोक जमलेले आहेत बैलगाडी, मोटारी अगर रेल्वे कशांतहि असो, गाडगे महाराज आहेत असें समजलें कीं लोक तेथें जमा झालेच.

"कांहीं कोळी आणि अक्षरशत्रु लोक ख्रिस्ताला देव समजले आणि विद्वानांनीं त्याचा जीव घेतला. कांहीं वैश्य आणि गुराखी हेच भगवान बुद्धाचे पहिले शिष्य !"

(स्वामी विवेकानंद खंड १३ वा.)

गाडगे महाराजांनीं भागवतधर्माच्या प्रचारासाठीं हजारों कीर्तनें केलीं. कोट्यावधि लोकांस भक्ति, परोपकार, शिक्षण, सामाजिक सुधारणा, ग्रामसफाई, दारूबंदी, देवाधर्माच्या नांवावर होणारी हिंसाबंदी हरिजनोद्धार वगैरे चालू परिस्थितीस अनुसरून ते उपदेश करीत आहेत. त्यासाठीं विश्रांति नाहीं कीं दुसरी कोणतीहि सबब नाहीं

महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनें पाहिल्यास संत गाडगे महाराज यांच्याइतकी अस्पृश्योद्धाराची कामगिरी व सामाजिक सुधारणेची कामगिरी इतरत्र क्वचितच सांपडेल. सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी स्पर्शास्पर्श भेद हा मोठ्या प्रमाणावर जिवंत होता. खेड्यापाड्यांत आजहि या भेदाचें केवढें कठीण स्वरूप आहे ? त्यावरून त्या काळीं किती कठीण असेल. अशा वेळी गाडगे महाराजांनीं खेड्यांत जाऊन या अनिष्ट रूढीचा नायनाट करा असे सांगावें. प्रत्यक्ष महारवाड्यांत जाऊन त्यांच्या ठिकाणीं आम्ही हिंदू आहोत हा आत्मविश्वास निर्माण करावा. कारण त्या काळीं अस्पृश्यास स्पर्श करणें जसें स्पृश्य पाप समजत, तद्वत अस्पृश्य समाजाचीहि अशी पक्की समजूत करून दिलेली असें कीं, तुम्ही स्पृश्यास चुकूनहि स्पर्श केला तर तुम्हास मोठें पाप लागेल !

" हिंदुस्तानांतील वैष्णव पंथांचा आद्य प्रवर्तक एक तामीळ अंत्यज होता."

(स्वामी विवेकानंद खंड १२ वा. पान २४८)

संत गाडगे महाराजांना तुकाराम महाराजाइतकाच संत चोखोबा-बद्दल आदर आहे. त्यांच्या भक्तिभावाबद्दल ते नेहमी सांगतात. सन १९१७ साली चोखोबाच्या स्मरणार्थ हरिजनासाठीं पंढरपूर येथें सुमारें लक्ष रुपये खर्च करून. धर्मशाळा बां ली. त्या काळीं श्रीमंत लोक अस्पृश्य हा शब्द उच्चारणेंसुद्धां पाप समजत असत. अशा कर्मठ वृत्तीच्या लोकांस माणुसकीचा त्यांनीं पाझर फोडला. त्यांच्याकडून या कार्यासाठीं पैसा जमविला. त्या काळीं सबंध हिंदुस्तानांत अस्पृश्य समाजासाठीं येवढी थोरली इमारत कोणाहि समाजसेवकानें बांवली नसेल व आजहि तशी क्वचित्‌च सांपडेल. महाराजांना परोपकारार्थ सुमारें पंचवीस लाख रुपये जनतेनें दिले, त्यांतून त्यांनीं सुमारें पंधरा सोळा लाखांच्या धर्मशाळा बांधून त्या परोपकारार्थ ट्रस्टींच्या स्वाधीन केल्या व बाकीचा सर्व पैसा परोपकारार्थ खर्च केला.

आजहि हिंदुस्तानांतील एकूण एक तीर्थ क्षेत्रें धुंडाळलीं तरी अंध, पंगु, निराश्रित व महारोगी अशा कोणत्याहि जातीच्या व धर्माच्या लोकांसाठीं अन्नसत्र नाहीं. गाडगे महाराजांनीं सन १९२० पासून अनेक ठिकाणीं अशीं अन्नसत्रें सुरू केलीं. त्यासाठीं लाखों रुपये खर्च केले.

या तीनशें वर्षांत महाराष्ट्रांत सामाजिक सुधारणा व अस्पृश्योद्धार या कार्यासाठीं महात्मा फुले, कर्मवीर अण्णासाहेब शिंदे, संत सानेगुरुजी व संत गाडगे महाराज यांनीं फार मोठें कार्य केलें.

संत गाडगे महाराज यांचे सारखे भ्रमण सुरू आहे. त्यांच्या प्रत्येक कीर्तनास हजारों लोक जमतात. खेड्यापाड्यांतील व शहरांतील बहुजन समाज मोठ्या संख्येनें जमत आहे. त्यांच्यांत भागवतधर्माच्या उच्च तत्त्वांचा प्रसार करीत आहेत. कोट्यवधि रुपये खर्च करून जी सामाजिक सुधारणा करणें अशक्य, ती आज गाडगे महाराज व त्यांचे अनुयायी मंडळ महाराष्ट्रांत करीत आहे. संत गाडगे महाराज हे आधुनिक तुकाराम आहेत.

★

# शेवट

न लगे देवा तुझें आम्हांसी वैकुंठ । सायुज्याचा पट न लगे मज॥
देई तुझें नाम मज सर्व काळीं । मागणें वनमाळी हेंचि तुज ॥

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या मानवी देहाचा शेवट कोणत्या प्रकारें झाला याबाबत निश्चित असें मत आजपर्यंत कोणीहि दिलें नाहीं. व पुढेंहि देऊं शकणार नाहीं. कारण तो प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा व मानवी बुद्धीच्या आटोक्यांत येण्यास बराच कठीण असा होऊन बसला आहे. या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाबाबत अनेकांनीं आपल्या कल्पनेनुसार अनेक तर्क उभे केलें. कित्येकांनीं अंधश्रद्धेच्या पडद्यास भावनेचा व भक्तीचा भडक रंग दिला. भाविकांच्या भोळसर भावनेवर ईश्वरी शक्तीचें झांकण टाकलें. बुद्धिवानांनीं समाजास तर्कुतर्कतेच्या फेऱ्यांत पाडले. त्यामुळें हा महत्त्वाचा प्रश्न प्रत्येकानें आपल्या चिकित्सक मनानें सोडविला पाहिजे.

## सदेह वैकुंठगमनाची कल्पना

महाराज अंतकाळीं देहासकट विमानांत बसून वैकुंठास गेले अशी काल्पनिक गोष्ट बहुजन समाजांतील भोळसर लोकांत आजपर्यंत पसरविली गेली. परंतु असल्या काल्पनिक वैकुंठगमनाचा सर्व भागवतधर्मीय संतांनीं उघड निषेध केला आहे. कारण संताचें खरें वैकुंठ पंढरपूर आहे. या भूलोकीच्या वैकुंठांत भक्तिसुखाचा खरा आनंद भोगण्यासाठीं आम्हांस पुन्हां पुन्हां जन्मास घाल अशी संतांनी देवाची प्रार्थना केली आहे. त्यामुळें तुकाराम महाराजांचें सदेह वैकुंठांत जाणें भागवतधर्माच्या तत्त्वांत बसूं शकत नाहीं.

नामदेव महाराजादि संतांनीं वैकुंठ सुखापेक्षां पंढरींतील भक्तिसुखास च विशेष महत्त्व दिलें आहे.

सोंडूनि पंढरीची वारी । मोक्ष मागती ते भिकारी ॥

× × ×

मुक्तिपद मी गा अभिलाषीन चित्तीं । म्हणीं अंतरती पाय तुझें ॥

× × ×

मोक्ष मागूं तुज प्रति । संत छळवादें हांसती ॥

(संत नामदेव महाराज)

न लगे भुक्ति मुक्ती वैकुंठीचा वास । सुखें पंढरीस राहीन देवा ॥
कोणी निंदो कोणी म्हणोत कां वेडा । जेणें नव्हे पीडा भजनासी॥
चोखा म्हणे मज आहे हेंच सुख। आणिके ठायीं दुःख नानापरीचें॥

× × ×

स्वर्गीचे अमर मागती देवा । संताचीया सेवा करावया ॥
पंढरीचें सुख देखोनि नयनीं । करिती विनवणी जोडूनि हात ॥
या सुखाचा थेंबुटा न मिळे ब्रह्मादिकां । तेथें सेना देखा सरता झाला

× × ×

वारंवार जन्म घेऊं । परी पाहूं पंढरपूर ॥१॥
दुजें मागणें नाहीं देवा । करुं सेवा वैष्णवांची ॥२॥
न मागों भुक्ति आणि मुक्ति । ती फजीती कोण सोसी ॥३॥
एका जनार्दनीं मागें । कीर्तन रंगी रंगला वेगें ॥४॥

× × ×

सांडोनि भजनाचा प्रेमा । मुक्ति मागसी अधमा ॥
एका जनार्दनी मुक्ति । भजन केलिया दासी होती ॥

सावंता महाराज, गोरोबा, नरहरी सोनार, जनाबाई आदि सर्वच संतांनीं वैकुंठ सुखापेक्षां इहलोकांतील भक्तिसुखास अधिक महत्त्व दिलें आहे. व तेंच सुख त्यांनीं भूलोकीं मिळण्यासाठीं फिरून आम्हांस मनुष्य जन्मांत घाल अशी प्रार्थना केलेली आहे.

तुकाराम महाराजांनीं आपल्या अभंगवाणींत वैकुंठसुखाचा निषेध केला आहे. त्यांनीं भूलोकीचे वैकुंठ जें पंढरपूर यांस सगळें महत्त्व

दिलें आहे. ते भक्तिसुखास विशेष महत्त्व देत. वैकुंठांत (स्वर्गांत) ते सुख नाहीं, कारण देव आणि भक्त हें नातें तेथें राहत नाहीं असें ते म्हणतात.

मोक्ष तुमचा तो देवा । तुम्ही दुर्लक्ष तो ठेवा ॥
मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गोडी ॥

× × ×

मोक्षाचें आम्हांसी नाहीं अवघड । तो असे उघड गांठेंळीस ॥१॥
भक्तीचे सोहाळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥२॥
ज्याचें त्यासी देणें कोणतें उचित । मानूनियां हित घेतों सुखें ॥३॥
तुका म्हणे सुखें देई संसार । आवडीसी थार करी माझें ॥४॥

× × ×

मोक्ष पदें तुच्छ केलीयां कारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ॥
मातले वैष्णव नटती नाना छंद । नाहीं चाड मोक्ष पदें भजनी आवडी ॥

× × ×

जंववरी नाहीं देखिली पंढरी । तंववरी थोरी वैकुंठाची ॥
मोक्ष सिद्धी तेथें हिंडे दारोदारी । होऊनि कामारी दीन रुप ॥

× × ×

घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरण सेवा साधावया ॥१॥
हरिनाम कीर्तन संतांचें पूजन । घालीन लोटांगण महाद्वारीं ॥२॥
आनंदे निर्भर असों भलते ठायीं । सुख दुःखा नाहीं चाड आम्हां ॥३॥
आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ॥४॥
मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी । होय सांगो तैसी तुका म्हणे ॥५॥

मोक्ष-सुख ज्या वैकुंठांत मिळतें, त्या स्वर्गवासाची नुसती कल्पना सुद्धां कधीं तुकाराम महाराजांनीं मनास शिवूं दिली नाहीं. उलट आपल्या जीविताचा हेतु हा जनोद्धारासाठीं व भक्तिप्रसारासाठींच आहे हें अनेक प्रसंगीं त्यांनीं सांगितलें.

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जे ऋषि । साच भावें वर्ताया ॥१॥ झाडूं संतांचें मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें ते सेवूं ॥२॥ अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषय लोभी मनें । साधनें बुडविलीं ॥३॥ पिटूं भक्तिचा डांगोरा । कळीकाळासी दरारा । तुका म्हणे करा । जय जयकार आनंदे ॥४॥

कांस घालोनी बळकट । झालों कळीकाळासी नीट । केली पाय वाट । भवसिंधूवरूनी ॥१॥ यारे यारे लहान थोर । याति भलते नारीनर । करावा विचार । न लगे चिंता कोणाशीं ॥२॥ कामीं गुंतलें रिकामें । जपी तपी यथ जमे । लाविलें दमामे । मुक्ता आणि मुमुक्षा ॥३॥ एकंदर शिका । पाठविला इह लोका । आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ॥४॥

## भूलोकीचें वैकुंठ

भागवतधर्मीय सर्वच संतानीं पंढरपूर हेंच इहलोकीचें वैकुंठ मानलें आहे व तशी त्यांची पूर्ण श्रद्धा होती. कारण देव आणि भक्त हें नातें त्या ठिकाणीं आहे. खरें भक्तिसुख त्या ठिकाणींच मिळूं शकते. स्वर्गांत गेल्यानें तेथें मुक्त स्थिति प्राप्त होते. त्यामुळें तेथें भक्तिसुख नसतें.

वैकुंठाहुनि केले येणें । भक्त प्रल्हादा कारणें ॥ नामदेव ॥

× × ×

अवधि पंढरी भू वैकुंठ नगरी । नांदतसे हरि सर्वकाळ॥ चोखोबा ॥

× × ×

देखोनि कीर्तनाची गोडी । देव धावे लवडसवडी ॥

वैकुंठाहुनि आला । कीर्तनी तो सुखें धाला ॥ एकनाथ ॥

× × ×

वैकुंठाचा देव आणिला भूतळा । धन्य तो आगळा पुंडलीक ॥
अंगे संगे रंगे क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहुणा वैकुंठाचा ॥
धन्य त्याची शक्ति भक्तीची हे ख्याति । तुका म्हणे मुक्ति पायीं लोळे॥

महाराजांनीं स्वर्गसुखापेक्षां पंढरपूर या वैकुंठास विशेष महत्त्व दिलें. मागील सर्व संतांनीं हें भूलोकीचें वैकुंठ जें पंढरपूर तें सकल प्राणिमात्रास धार्मिक सुख देईल असा विश्वास दाखविला व त्याप्रमाणें जनतेंत प्रसार केला असें असतां या भूवैकुंठनगरीच्या सुखापेक्षां त्या काल्पनिक स्वर्गसुखाची तुकाराम महाराजांनीं कधींतरी इच्छा केली असेल काय ? किंवा त्यांना तशी इच्छा नसतांहि जबरीनें त्यांच्यावर वैकुंठसुख लादलें असेल काय हा प्रश्न महत्वाचा आहे.

## विमानांतून वैकुंठगमन

पौराणिक काळांतील काल्पनिक कथांचा भाग सोडून दिला व हिंदुधर्माचा ऐतिहासिक काळ पाहिला तर हेंच स्पष्ट दिसून येते कीं, उपलब्ध इतिहासांत कोणीहि संत-महंत, साधु-संन्यासी, सिद्धपुरुष अथवा कोणताहि ईश्वरी भक्त देहासकट वैकुंठांत गेला नाहीं. तसें एखादेंहि उदाहरण कोणी सांगू शकणार नाहीं. मग ही अशक्य असणारी गोष्ट फक्त तुकाराम महाराज यांच्याच वांट्यास कशी येऊं शकली ? त्यांना देहू येथून नेण्यासाठीं जें विमान आलें होतें तें स्वर्गांतून देवानें स्वत: पाठविलें होतें व त्यांतून महाराजांना वैकुंठांत (स्वर्गांत) नेलें अशी ही जागृत मनाच्या कल्पनाशक्तीस न पटणारी शिवाय प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या विरुद्ध असणारी गोष्ट आजपर्यंत अनेक बुद्धिवान लोकांनीं उचलून का धरली व तिचा भोळ्याभाविकांत मोठ्या प्रमाणांत प्रसार कां केला हें समजत नाहीं.

## निरनिराळीं मतें

महाराजासंबंधीं चरित्र, निबंध प्रबंध वगैरे सुमारें पंचवीस तीस पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत.त्यांत बऱ्याच लेखकांनीं ते सदेह वैकुंठास गेल्याचें सांगितलें. कांहींनीं या बाबतींत धरसोड केली. परंतु बुद्धीस जागे ठेवून चिकित्सकतेच्या आधारानें व त्या वेळच्या परिस्थितीच्या दृष्टीनें ही गोष्ट समाजापुढें मांडण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहींत.

तुकोबाचें वैर साधण्यासाठींच ज्यांचा जन्म ते भावे असे म्हणतात, "त्यांनीं इंद्रायणीच्या कांठीं ज्ञानेश्वराप्रमाणें समाधि घेतली, स्वतःच समाधीचें दार बंद करून घेतलें. तीन दिवस त्या समाधीमंदिरांत आवाज येत होता, पंचमीचे दिवशीं आवाज राहिला व सर्व सामसूम झालें. असें झाल्यावर तुकोबांचा प्राण गेला. तेव्हां उगाच अट्टाहास करून येथें बसण्यांत आतां कांहीं हंशील नाहीं असें जाणून मंडळी घरोघर परत गेली. तुकोबा फाल्गुन वद्य २ ला बांधलेल्या समाधीघरांत गेले व पंचमीस मेले हा इत्यर्थ दिसतो." भावे हे आपल्या मतासाठीं ज्ञानेश्वर, एकनाथांचे अवतार व त्यांच्या त्यागाचें उदाहरण घेतात व इतर पांच लेखकांचीं निरनिराळीं मतें सांगून स्वतःचें वरीलप्रमाणें मत देतात. परंतु त्यांनीं समाधि घेतल्याचें कोणीच सांगत नाहीं.

हर्षे यांनीं तुकाराम चरित्र लिहिलें आहे. आपल्या पुस्तकांत या प्रश्नाबाबत निरनिराळ्या लेखकांचीं मतें दिलीं आहेत, "तुकाराम महाराज मेले नंतर त्यांना लांकडी विमानांत घालून इंद्रायणींतल्या डोहांत बुडविलें." "वेडाच्या भरांत तुकाराम महाराजांनीं इंद्रायणीच्या डोहांत प्राण दिला." "ते काशीयात्रेस निघून गेले." वगैरे मतें नमूद करून नंतर हर्षे स्वतःचें मत सांगतात, "तुकाराम महाराजांनीं फाल्गुन वद्य१ रोजीं इंद्रायणीच्या डोहाजवळील नांदुरकीच्या झाडाखालीं रात्रभर कीर्तन केलें. पहाटेस जमलेल्या मंडळीस भजनाच्या नादांत गुंतवून फाल्गुन व॥ २ रोजीं ते एकदम नाहींसें झाले.

## पांगारकरांचें मत

पांगारकर ह्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत स्पष्टपणें सांगतात, 'देवानें पाठविलेल्या विमानांतून ते सदेह वैकुंठांत गेले" आपल्या तुकाराम चरित्रांत पान ४६४ वर महाराज जिजाईशीं बोलत असल्याचा त्यांनीं उल्लेख केला आहे, "मी वैकुंठीं जाणार आहे. तूंहि मजबरोबर चल. आपला तेथें आदर होईल. घरादारावर तुळशीपत्र ठेवून ब्राह्मणास दान देऊन मोकळी हो कशी ! पाहा विचार करून पाहा ! 'मी' 'माझें,' हें सर्वस्वीं सोड. भूक तहान, द्रव्यलोभ, ममत्त्व पार सोडून मी कसा सुखी झालों आहे तें पाहा!" यानंतर त्यांनीं काल्पनिक उदाहरणें देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि

तीं कोणासहि पटण्याजोगी नाहींत. नंतर पुन: महाराज सदेह वैकुंठांत गेल्याचें त्यांनीं निश्चित सांगितलें आहे. फिरून आपल्या तुकाराम चरित्रांत पान ४६६ वर ते लिहितात, "इतके ( अभंग ) म्हणत तुकोबाराय कुडीसहीत गुप्त झाले. त्यांची कुडी कोणास दिसली नाहीं. तुकोबाचे पुत्र नारायणबोवा यांनीं तुकोबाराय कीर्तन करीत असतां अदृश्य झालें असेंच एका लेखांत म्हटलें आहे. हातचे चिद्रत्न गळून पडलें म्हणून सर्व शिष्यांनीं शोक केला. महाराज द्वितियेस गुप्त झाले. पंचमीला त्यांची टाळ-विणा-गोघडी सांपडली. पांच दिवस भक्त मंडळींनीं कीर्तन भजनोत्सव केला. तुकोबा सदेह वैकुंठास गेले. सबब त्यांचें क्रियाकर्मांतर करण्याचें कारण नाहीं. असा सप्तमीस रामेश्वर भटांनीं शास्त्रार्थ दिला, व तो सर्वांनीं मान्य केला."

कै. पांगारकर हे पदवीर होते. त्यामुळें जगांतील ज्ञानाशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला होता. हरिभक्तीचे अधिकार त्यांनीं ओढून ताणून स्वतःकडे घेतले होते. तरी त्यांनी तुकाराम महाराजांस शूद्र ठरविण्यासाठीं जिवाचा आटापिटा केला. त्यांना वेदाचा अधिकार नव्हता हें सांगण्यासाठीं जिवाची ओढाताण केली. त्यांच्या समताधर्मास जातीभेदाचीं भगदाडें पाडण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या भागवतधर्मावर वर्णाश्रमाचें जाड पांघरुण घालण्याचे प्रयत्न केले. एकंदरींत तुकाराम महाराजांबद्दल ज्या पांगारकरांना जरूर तो आदर दाखवितां आला नाहीं तेच पांगारकर महाराजांस 'सदेह वैकुंठास' जाऊं देण्याचा मनाचा मोठा उदारपणा दाखवितात यांत त्यांचा हेतु काय असेल ? कारण त्यांना या लोकीं वेदाचें अक्षर पाहण्याचा अधिकार नव्हता असें सांगणारे पांगारकर देहासकट त्यांना स्वर्गांत जाऊं देतात हें एक महान् आश्चर्यच म्हटलें पाहिजे. तुकाराम महाराजांनीं स्वर्गांत जाण्याचा देवाबरोबर करार केला होता व स्वर्गाची माहिती विचारली होती अशा भावनेनें ते लिहितात. कारण महाराज बायकोस स्वर्गांत चालण्यासंबंधीं आग्रह करतात व स्वर्गांतील माहितीहि सांगतात. घरादारावर तुळसीपत्र ठेवून ते ब्राह्मणास देण्यासंबंधीचे उद्गार तुकोबाचे तोंडांत कोंबण्यासहि ते कमी करीत नाहींत,

पांगारकर म्हणतात फाल्गुन व॥२ला महाराज गुप्त झाले व पंचमीला टाळ विणा व गोधडी सांपडली. महाराज जर द्वितीयेस गुप्त झाले तर त्यांच्यासाठीं सर्वत्र शोधाशोध सुरू झाली असेल. मग टाळ विणा व गोधडी शोधण्यास तीन दिवसाची काय जरूर होती? शिवाय हे सर्व इंद्रायणीच्या डोहाजवळच सांपडले. 'भक्तमंडळींनीं भजनोत्सव केला व शेवटीं रामेश्वरभटानें सप्तमीस तुकोबा सदेह वैकुंठास गेले असा निर्णय दिला.' हें एकंदर लिहिणें किती विसंगत आहे! कारण जर तुकोबा फाल्गुन व॥ २ ला स्वर्गात गेले तर पांच दिवसानंतर सदेह वैकुंठास गेल्याचा निर्णय काय म्हणून दिला? तत्काळ त्याचक्षणी कां दिला नाहीं व शेवटीं फक्त रामेश्वर भट सांगतो कीं, ते सदेह वैकुंठांत गेले.' कोणासही ते सदेह वैकुंठास गेल्याचें दिसलें नाहीं? प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्याचे कोणी सांगत नाहीं. त्याला प्रत्यक्ष पुरावाही सांगता आला नाहीं. केवळ अंधश्रद्धा किंवा लबाडी म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवण्यास पांगारकर सांगतात. त्यांच्यासारख्या विद्वानानें याबाबत सारासार विचार करून निश्चित मत देणें जरूर होते.

तुकारामहाराज हे भक्त होते योगी नव्हते. योगी योगबलावर इच्छेनुरूप देहत्याग करू शकतात असें अनेकांनी सांगितलें आहे. योगी हे स्वतःच्या हितासाठीं जगतात. परंतु संत हे परहितासाठीं जगतात. परहित साधनें हीच ते परमेश्वरी सेवा मानतात. जनहितांत आपलें हित आहे. हें सर्वच भागवतधर्मीय संतांनीं सांगितलें. तुकाराममहाराज सदेह स्वर्गात गेले असा एकही पुरावा आजपर्यंत पुढें आलेला नाहीं. श्री. पांगारकर सुद्धां या बाबतींत धरसोड करतात. इतर लेखकांनींही निरनिराळीं मतें देऊन हा प्रश्न जनतेच्या मनांत शंका कुशंका निर्माण होईल अशाच तऱ्हेनें हाताळला. आधुनिक काळांतील विद्वानांनीं एकत्र येऊन या प्रश्नाबाबत सर्व दृष्टीनीं विचार करून निर्णय देणें हें समाजाच्या हिताच्या दृष्टीनें उपयुक्त ठरणार आहे. कारण या पुढील काळ हा चिकित्सकतेचा येणार. त्यासाठीं विद्वान मंडळींनीं भावी पिढीसाठीं त्यांचा मार्ग सुकर करणें जरूर आहे.

### फाल्गुन वद्य द्वितिया

तुकाराममहाराज यांच्या जगण्याचा शेवटचा दिवस फाल्गुन व॥ २ हा आहे. या बाबत कोणाचेंही दुमत नाहीं. पांगारकर हे स्पष्ट लिहि-

तात कीं, महाराज वैकुंठास जाण्याची तयारी करीत होते. याबाबत त्यांचा देवाबरोबर जवळ जवळ करारच झाला होता. इतर बहुतेक लेखक वैकुंठ गमनाच्या पूर्व तयारीसंबंधी पांगारकरांशीं सहमत आहेत. या एकंदर बनावामुळें विचार करण्यासारखी एक शंका जन्मास येणें शक्य आहे.

महाराजांचे व देवाचे वैकुंठास जाण्याचें जर ठरलें होतें तर महाराजांनीं आषाढ अगर कार्तिक महिना कां ठरविला नाहीं कारण या दोन्ही महिन्याचें महाराजांनीं विशेष महत्व वर्णन केलें आहे. गीता ग्रंथांत मार्गशीर्ष महिन्याचें मोठें महत्व सांगितलें आहे. तोहि महिना त्यांनीं ठरविला नाहीं. मग गमनासाठीं फाल्गुन महिनाच कां पसंत केला? निदान फाल्गुन मासामधील एकादशी तरी ठरविणें जरूर होतें. कारण एकादशी हा दिवस महाराज विशेष मानीत असत. त्यांनीं अनेक प्रसंगीं एकादशीचें महत्वपूर्ण वर्णन केलें आहे. या दिवसाचे महत्व प्रत्येक भागवतधर्मीयानें पाळलेंच पाहिजे म्हणून कठोर शद्बांत अनेक सूचनाहि त्यांनीं समाजास केल्या आहेत. सर्वच भागवतधर्मीय संतांनीं एकादशीचें विशेष वर्णन केलें आहे. मग असा महत्वाचा दिवस गमनास (स्वर्गांत जाण्यास) न ठरवितां द्वितियाच कां पसंत केली! शिवाय ती फाल्गुन महिन्यांतील हें विशेष आहे! 'फाल्गुन वद्य द्वितिया' हा दिवस महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या विशेष माहितीचा असतो. या दिवसाचें ओंगळ स्वरूप जाणत नाहीं असा मनुष्य सांपडणें अशक्य! सभ्य व समंजस माणसास ह्या दिवसाबद्दल अप्रीति असते. स्त्रियांस या दिवसाबद्दल अत्यंत तिरस्कार असतो. कारण पुरुष वर्ग माणुसकी विसरतो. लहानमोठा भेद मावळतो, मर्यादेचे उल्लंघन होते. विचार अस्थिर होतात. वाणीस मुळींच धरबंध नसतो. आपली वागणूक माणुसकीस सोडून आहे, त्यामुळें आपल्या आयाबहिणीस किती वाईट वाटत असेल, याबद्दलचा विचार पुरुष वर्ग विसरतो. त्यामुळें त्या दिवशीं स्त्रियांस घराबाहेर पडणें सुद्धां मुष्कील होते. असें या द्वितीयेचें घाणेरडे व ओंगळ स्वरूप असतें. आजच्या सुधारणेच्या काळांतहि तिचें हें भयंकर स्वरूप दिसत आहे. मग रूढीच्या मार्गानें जाऊन त्या काळच्या परिस्थितीचा विचार करूं लागल्यास त्याचें

स्वरूप कितीतरी भयंकर वाईट असेल हें सांगणें नकोच ! कारण सन १८५२ शिमग्याच्या बीभत्स आचारास आळा घालावा म्हणून मुंबईंतील जाणत्या लोकांनीं सरकारांत अर्ज केला होता. या बाबतींत आजपर्यंत पुढाऱ्यांनीं अनेक प्रयत्न केले आहेत. अशा फाल्गुन महिन्यांतील वद्य २ ह्याच दिवस देवानें तुकाराममहाराजांना वैकुंठांत नेण्यासाठीं निश्चित करावा व त्यासाठीं अगदीं सूर्योदयास विमान कां पाठवावें हा प्रश्न चिकित्सक दृष्टीच्या द्वारें मानवी मनाचें समाधान करूं शकत नाहीं.

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां जना न देखवे ॥

" ज्या थोर महात्म्यांनीं धर्मक्रांति केली, मानवी हिताचे खरे मार्ग दाखविले, स्वतःचे देह परोपकारार्थ झिजविले अशांचा शेवट अखेर कोणत्या मार्गानें झाला आहे हें इतिहास उच्च स्वरानें ग्वाही देऊन सांगत आहे."

फाल्गुन वद्य २ रोजीं सबंध देहू गांव शिमग्याच्या धुळीनें मलीन होईल. सर्वच लहानथोर माणसेकी विसरून वागतील. या विचारानें महाराज सूर्योदयापूर्वीं अंधारांत उठून बाहेर गेले असतील. त्याप्रमाणें ते गांवाजवळील करंजाईच्या बेटाजवळ जाणें शक्य आहे. त्या ठिकाणीं ते कांहीं प्रसंगीं भजनास बसत असत. त्याप्रमाणें त्या दिवशीं ते करंजाईच्या बेटाजवळ गेले असावेत. तेथें गेल्यावर ते नदीकांठी प्रातर्विधीसाठीं अगर स्नानासाठीं जाणें शक्य आहे. अशावेळीं मानवी हिताच्या वैऱ्यांनीं कट करून त्यांना इंद्रायणी नदींतील डोहांत ढकलून बुडविणें शक्य आहे. अशा संधीची ते लोक वाट पाहात असतील. कारण या दिवशीं सबंध गांव शिमग्याच्या सणामुळें बेभान झालेलें. परस्परांच्या अंगावर धूळ राख चिखल पाणी वगैरे टाकून थट्टा मस्करीचा रुढी-हक्क बजावण्यांत दंग, कोण कोणाकडे लक्ष देतो ? शिवाय करंजाईचें बेट हें गांवापासून दोन फर्लांग लांब ! गांवांतील धामधूम सोडून इतक्या दूरवर आपलें दुष्ट कृत्य पाहण्यास कोणास सवड होणार ? कदाचित् झाली व पाहिलेंच तर शिमग्यांतील थट्टामस्करीच्या रुढीखालीं हें दुष्ट कृत्य झांकण्याचा प्रयत्न करतां

येईल. कारण ह्या दिवशीं अंगावर घाण उडविणें, अगर पाणी टाकणें अथवा चिखलांत किंवा पाण्यांत ढकलणें हें हक्काचेंच! शिवाय असें करण्यांत त्या दिवशीं लहान मोठा भेद आडवा येत नसतो.

कांहीं लेखकांचें म्हणणें असें कीं, फाल्गुन व॥ १ ला महाराजांनीं करंजाईच्या बेटाजवळ नांदुरकीच्या झाडापाशीं रात्रीं कीर्तन केलें. नांदुरकीचें झाड आजहि भाविकांस दाखविण्यांत येत आहे. गांवापासून दोन फर्लांगावर जंगलांत त्या दिवशीं तुकोबास कीर्तन करण्याचें कारण दिसत नाहीं. शिवाय कीर्तन करीत असतां ते नाहीसें झाले व नंतर पंचमीस त्यांची टाळ, विणा व गोधडी त्यांच्या कीर्तनाचे जागीं सांपडते हा प्रश्न विचार करण्यासारखा अत्यंत महत्वाचा आहे.

## टाळ व गोधडीचें परत येणें

महाराजांचें अकस्मात नाहीसें होणें हें त्या भागांतील लोकांस विशेष काळजी करण्यासारखे भासलें असेल. त्याबाबत शोधाशोध होणें शक्य होते. या शोधांत कदाचित् खरी गोष्ट उघडकीस येईल म्हणून धूर्तांनीं टाळ–गोधडीनें परत येणें व तेंहि स्वर्गातून येणें या काल्पनिक गोष्टीस महत्त्व देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा हा पद्धतशीर प्रयत्न केला असला पाहिजे. त्यागाची खूण म्हणून गोधडी व भक्तीचा मार्ग शोधून परमेश्वरी दर्शनाचें साधन–टाळ व वीणा ह्या महत्त्वाच्या वस्तु दोन दिवस स्वर्गांत राहिल्यानंतर नदीकांठीं परत आल्या. ज्या साधनांच्या योगानें त्यांना वैकुंठवास घडला असेल, अशा त्या वैकुंठांत त्यांना ह्या संत चिन्हांची जरूरी भासली नाहीं किंवा स्वर्गाच्या वैभवांत त्यांना अशा साधनांची लाज वाटली असेल काय? टाळ व गोधडी स्वर्गातून पाठवली असें धूर्तांनीं लोकांस भासविलें. स्वर्गांत पोहोंचल्याची खूण म्हणून दुसरी एखादी वस्तू त्यांना तेथें मिळाली नाहीं काय? शिवाय या वस्तू परत पाठविणें जरूरच होते, तर त्या स्वतःच्या घरीं त्यांनीं का पाठविल्या नाहींत? ह्या वस्तू देवदुतांच्या हातानें त्यांनीं जर परत केल्या असतील तर देवदुतास महाराजांच्या घरी पोहोंचत्या करण्याची भीति वाटली असेल काय? किंवा घरीं पाठविणें शक्य नव्हतें म्हणून नदीकांठीं

टाकून ते चालते झाले असतील किंवा कसे हा प्रश्न देखील विचार करण्या-सारखा आहे. महाराजास पाण्यांत बुडवितांना ह्या वस्तू तेथेंच राहणें शक्य आहे. त्या तेथेंच बाजूस लपवून ठेवल्या असतील.जनतेचें लक्ष खऱ्या कारणाकडून ओढून घेऊन वैकुंठवास या काल्पनिक गोष्टीकडे लावण्या-साठीं पंचमीस त्या आणून नदीकांठीं नांदुरकीच्या झाडाजवळ टाकल्या व स्वर्गातून महाराजांनीं पाठविल्या असा भाविकांचा समज करून दिला असेल.

## निर्वाणाचे अभंग

महाराजांनीं ह्या लोकीचा त्याग करतांना कांहीं अभंग केल्याचें सांगण्यांत येत आहेत. कांहीं वैकुंठगमनासंबंधीं आहेत. तरी कांहीं यात्रे-हून पुढें गेल्याचें आहेत. त्याकडे संशोधन दृष्टीनें पाहिल्यास ते महारा-जांचे अभंग नाहींत असें दिसून येईल.

## तुकाराम महाराजांचे टाळकरी

तुकाराम महाराजांचे टाळकरी १ महादाजी पंत कुळकर्णी २ गंगा-राम मवाळ ३ संताजी जगनाडे ४ गवर शेट वाणी ५ मालजी नाडे ६ बंधु कान्होबा ७ महार पंत चिखलीकर ८ कोंडोपंत लोहोकरे ९ रामेश्वर भट १० शिवबा कासार ११ नावजी माळी १२ अंबाजी पंत १३ कोंडा पाटील असे होते. तुकोबा स्वर्गास गेले. त्यांचें क्रीयाकर्मांतर करण्याचें कारण नाहीं असा जो निर्णय रामेश्वर भटानें दिला त्याला योग्य असा आधार त्यांनीं सांगितला नाहीं. रामेश्वर भटाशिवाय याबाबत इतर टाळकरी कांहींच सांगत नाहींत. किंवा त्या वेळचा महाराज सदेह वैकुं-ठांत गेले असा कोणताहि खात्रीशीर पुरावा पुढें येत नाहीं.

तुकोबाचे बंधु कान्होबा यांचे कांहीं अभंग याबाबत उपलब्ध आहेत त्यावरून महाराज सदेह वैकुंठास गेल्याचा बोध होत नाहीं. तुकाराम महाराज नाहीसे झाल्यावर पांचवे दिवशीं रामेश्वर भटानेंच सांगितलें कीं, ते सदेह स्वर्गांत गेले, फक्त रामेश्वर भटाच्या म्हणण्यावर पांगारकर व कित्येक पदवीधर हरिभक्त विश्वास ठेवीत असून जनतेसाठीं तसें आज पर्यंत सांगण्यांत येत आहे.

## वैकुंठास जाण्याची त्वरा

वैकुठगमनाचें वेळीं महाराजांचें वय ५० ते ५१ वर्षांचें होतें. पांगारकरांच्या मतानें ते ४०–४१ वर्षांचें होतें. या वयांत त्यांना शरीराचा अगर जीविताचा कंटाळा येण्यासारखें कारण सांपडत नाहीं. त्यांची शरीर प्रकृति उत्कृष्ट होती. आपल्या ध्येयाचा त्यांना कंटाळा येणेंहि शक्य नव्हतें. कारण ते भागवतधर्माचे वारसदार असून धर्मप्रसारक होते, कट्टे कर्ममार्गी होते. तसें त्यांचे परकीय सत्तेनें घातलेला धुमाकूळ त्यांना सहन होत नव्हता. त्या दृष्टीनें त्याचे प्रयत्नहि सुरू होते '**न घडे यावरी ' न धरवे धीर । पीडितां राष्ट्र देखानि ॥**" लोकहित साधणें हेंच त्यांनीं आपलें ध्येय ठरविलें होतें. **तुका म्हणे आतां उरलो उपकारापुरता** ' याच जनहिताच्या दृष्टीनें ते अभंगनिर्मिति करीत असत. कीर्तन द्वारें जनतेंत ते नवचैतन्य निर्माण करीत. जनहिताचे व लोक कल्याणाचे अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यांच्या पुढें समोर उभे होते. त्यासाठी रात्रदिवस कष्ट करीत. त्यांना शरीरधर्माची पर्वा नसे अशा अनेक गोष्टीवरून या लोकीचा त्याग करावा असे त्यांच्या स्वप्नांतहि येणें शक्य दिसत नाहीं. वैकुंठवासाची त्यांनीं चुकूनहि कल्पना केली नसेल.

"मानवी हिताचे वैरी, स्वार्थाचे मूर्तिमंत अवतार, राष्ट्रघाताचे वारसदार व सत्यधर्माचे दुष्मन यांनीं त्यांच्या इच्छेविरुद्ध महात्म्याच्या मरणाचें मूळ शोधून त्यांना जगांतून नाहीसें करणें शक्य आहे."

पांगारकरांसारख्या पदवीधर हरिभक्तानें महाराजास सदेह वैकुंठास पाठविण्याची पद्धतशीर गर्दी केली. त्यांनीं चिकित्सक दृष्टीस मुद्दाम फाटा दिला. अंधश्रद्धेसच विशेष महत्त्व दिलें. भाव्यांच्यासारखा लेखक सुद्धां या महत्वाच्या प्रश्नाबाबत एकांगी ठरतो कारण मंबाजीबोवा व रामेश्वर भट यांचें भूत अंगांत आणून तुकोबाकडे अत्यंत दोषिक दृष्टीनें पाहातो, असा लेखकहि पांगारकराशीं साथ करण्याचा प्रयत्न करतो. त्यां ज्ञानेश्वर एकनाथ यांच्याप्रमाणेंच तुकोबास देहाचा कंटाळा येणें श आहे. व देहाचा त्याग करणें शक्य आहे असें सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु भागवतधर्माचे संस्थापक नामदेव महाराज व चोखोबाराय यांना कोठें देहाचा कंटाळा आला होता. त्यांनीं दीर्घकाळ भागवतधर्माची सेवा

यांनीं सन १७०४ मध्यें छत्रपति शाहू महाराजांस लिहिलें कीं, "तुकोबा गोसावी सत्पुरुष हे मौजे देहू, तालुका हवेली, प्रांत पुणें येथें भगवत कथा करीत असतां अदृश्य झाले ही गोष्ट विख्यात आहे." ते सदेह वैकुंठास गेले असें त्यांच्या कागदपत्रावरून आढळत नाहीं.

## गमनानंतर

तुकाराम महाराज गेल्यानंतर मातोश्री जिजाई गरोदर होत्या त्यांच्या पोटीं नारायण महाराज जन्मास आले. पांगारकर म्हणतात, "महाराजांच्या वैकुंठवासानंतर जिजाबाईनें आपलें घर ब्राह्मणास दान दिलें व ती सकल पाशांतून मुक्त झाली." महाराज हयात असतां जिजाई महाराजांच्या धार्मिक कार्यांत सहमत नसे असें पांगारकर वगैरे लेखक जनतेस आग्रहानें सांगतात. मग जिजाईला एकदम घर दान करण्याची उपरति कां झाली याचें कारण पांगारकरांनीं सांगितलें नाहीं. बहुतेक लेखकांच्या दृष्टीनें महाराजांचा संसार म्हणजे दारिद्र्याचें माहेरघर. गमनापूर्वीं त्यांच्या घरांत देवास नैवेद्य दाखविण्यापुरतें सुद्धां पीठ नव्हतें. किंवा कोणतेंहि धान्य नव्हतें म्हणून त्यांनीं ज्वारीच्या कण्या पातळ शिजवून देवास नैवेद्य केला असें बहुतेकजण म्हणतात. असें असतां जिजाबाईला दान करण्याचें काय कारण घडलें असेल? तिनें ब्राह्मणास घर दान दिलें किंवा ब्राह्मणांनीं तें दान घेतलें.

महाराजांनंतर त्यांचे बंधु कान्होबा यांनीं विशेष हालचाल केली नाहीं. महाराजांचे चिरंजीव महादेव व विठ्ठल हे अज्ञान होते. त्यांचे ठिकाणीं वडिलाचे कोणते गुण दिसून आले नाहींत. ते वयांत आल्या नंतर वडिलार्जित उत्पन्नाकडे विशेष लक्ष देऊं लागले. त्यामुळ त्यांना नवीन शेतवाडी मिळवतां आली. महाराजांनीं शेतवाडीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. त्याचा फायदा मंबाजी गोसाव्यानें घेतला. त्यांची एक जमीन त्यानें बळकावली होती. त्याबाबत मुलांनीं सरकारांत जो अर्ज केला त्या संबंधीचे कागद महाराजांच्या वंशजाकडे आज आहेत. त्याच अर्जांत तुकाराम महाराज यांच्या मुलांनीं आपल्या जातीचा मराठा म्हणून उल्लेख केला आहे. सदरचा कागद आज कोणासहि पाहण्यास मिळेल. तिसरे नारा-

यण महाराज हें वयांत आल्यावर बरेच कर्तबगार निघाले. हे तिघे बंधु कांहीं वर्षें एकत्रित राहिले. त्यांनीं आपला जम बरा बसविला. त्यांच्या-तहि नंतर भाऊबंदकी सुरूं झाली.ते वेगळे राहूं लागले. त्यांच्यांत वाटण्या-झाल्या. महादेव व विठ्ठल यांनीं शेतीवाडी व महाजनकीचें उत्पन्न घेतलें. नारायण महाराज यांनीं देऊळ व देवाच्या उपासनेचे सर्व हक्क घेतले.

तुकाराम महाराज यांनीं भजनासाठीं जागा बांधली होती. त्या लहा-नशा जागेस देऊळ म्हणत. विश्वंभरबाबा मोरे यांना सांपडलेल्या मूर्ति ह्या राहत्या घरांत असत. त्या फक्त एकादशीस देवळांत नेत व परत दुसऱ्या दिवशीं घरीं आणीत. नारायण महाराज यांचेकडे मुर्तींच्या उपा-सनेचे सर्व हक्क आल्यावर त्यांनीं त्याच देवळांत मूर्तींची स्थापना केली. नारायण महाराज हे कर्तबगार होते. त्यांनीं आपली बरीच प्रगति केली. घराण्याच्या लौकिकाकडे लक्ष दिलें. कांहीं दिवसानंतर या भागांत दुष्काळ पडला. त्या वेळीं नारायण महाराजांजवळ नागली धान्य शिल्लक होतें. त्या आधारावर त्यांनीं देवळाचें नवीन बांधकाम सुरूं केलें. खेड तालुक्यांत मरगळ म्हणून एक गांव आहे. त्या गांवचे सखोबा मर-गळकर हे हुशार गृहस्थ होते. त्यांचा नारायण महाराज यांचे ठिकाणीं विशेष लोभ होता. त्यांनीं विनंति केली कीं, देवळाचें बांधकामासाठीं आपण छत्रपतींची मदत मागावी. नारायण महाराजांना त्यांचें म्हणणें पसंत पडलें नाहीं. ते म्हणाले "छत्रपतीनें आपण होऊन पाठविलेली मदत आपल्या वडिलांनीं घेतली नाहीं, तशीच परत पाठविली. त्यामुळें आपण छत्रपतीकडे मदत मागणार नाहीं." सखोबानें याबाबत अनेक प्रयत्न केले तरी नारायण महाराज कबूल होईनात. शेवटीं सखोबा हे नारायण महा-राज यांचे न ऐकतां छत्रपती ताराबाई यांचेकडे गेले. छत्रपति ताराबाई यांनीं निम्मा देहू गांव हा देवळाचें उत्पन्नास दिला. त्यामुळें देवळाचें बांध-काम भव्य प्रमाणावर सुरू झालें. नंतर छत्रपति शाहू महाराज गादीवर आले. त्यांचेकडेहि सखोबा गेले व यासंबंधीं विनंति केली. छत्रपति शाहू महाराजांनीं संबंध देहू गांव इनाम देऊन शिवाय पांच हजार रुपये रोख दिले. या कामीं वेठ-बिगारची मदत करण्यासंबंधीं सेनापती दाभाडे तळे-गांव व फलटणचे नाईक निंबाळकर यांना हुकूम दिले. त्या संबंधीचे कागद

पत्र आजहि पाहण्यास मिळतात. देवळाचें बांधकाम पूर्ण झालें. नंतर छत्रपती शाहू महाराजांनी कुसवडी आणि किनई हीं दोन्हीं गांवें आणखी इनाम दिलीं. परंतु देवळाचें बांधकाम पूर्ण झालें. यापुढें पैशांची जरूर नाहीं, म्हणून नारायण महाराजांनीं सर्व सनदा परत केल्या. छत्रपति त्या सनदा परत घेईनात अशा स्थितींत तो प्रश्न पांच वर्षे तसाच पडून राहिला. त्यामुळें महाराणी सकवारबाई यांनीं छत्रपति शाहू राजास मुद्दाम देहू येथें आणलें. ती पुण्यभूमि पाहून राणी सकवारबाईच्या धार्मिक भावना उचंबळल्या. नारायण महाराजांनीं त्यांचें म्हणणें मान्य केलें नाहीं. कारण आपल्या वडिलांनीं छत्रपतीची चालून आलेली मदत परत केली तर आपण स्वीकारणें बरें नाहीं. साताऱ्यास परत गेले नंतर नारायण महाराज यांचे पुत्र उद्धव बोवा यांच्या नांवानें इनाम गांवच्या सनदा राजशक ५२ व ५६ सालांतील आहेत. त्यांच्या घराण्यांत त्याबाबत पत्रव्यवहार पाहण्यास मिळतो. (राजशक हा छत्रपती शिवाजी महाराजांनीं राज्याभिषेक ज्या वर्षी करून घेतला. त्या वर्षापासून सुरू होता नंतर पेशवाई काळांत तो बंद झाला असावा.)

देहू येथील विठ्ठल मंदीरापुढील दगडी सभामंडप छत्रपतींनीं दिलेल्या पांच हजार रुपयाचे देणगींतून बांधला. लांकडी सभामंडप इंदोरच्या राधाबाई होळकर सरकार यांनीं बांधला. भजनी मंडप सरदार मावजी इंगळे ग्वाल्हेर यांनीं बांधला. रामेश्वर भटानें अभंग बुडविले. त्यावेळीं तुकाराम महाजांनीं ज्या शिळेवर बसून धरणें धरलें होतें. ती शिळा नारायण महाराजांनीं आणली व त्याच शिळेवर तुकाराम मंदिर बांधलें आहे.

नारायण महाराज सर्व दृष्टीनें कर्तबगार होते. घराण्याच्या लौकिकासाठीं त्यांनीं अनेक प्रयत्न केले. त्याप्रमाणें प्रसगोपात हवें तें करण्यास तयार असत. देहूजवळ सांगोडी या नांवाचें खेडें आहे. त्या काळीं तेथें सलमानांची मोठी वस्ती होती. हे मुसलमान देहू येथील देवस्थानास गांवास वरचेवर त्रास देत. त्यांना चाकणच्या मुसलमान सुभेदाराची फूस होती. अशा प्रसंगीं नारायण बाबांनीं स्वतः पुढाकार घेतला. हातांत तरवार घेतली गांवांतील लोकांसहि शस्त्रधारी बनविलें. व त्या मुसलमान लोकांबरोबर सामना देऊन त्यांचा कायमचा बंदोबस्त केला.

नारायण महाराजानंतर या घराण्यांत कोणी कर्तबगार पुरुष निपजला नाहीं. महान त्यागी व धर्मप्रसारक अशा या घराण्यांतील पुढील वारसदार इनामी थाटांत शिरले. या घराण्यांतील सदानंद बोवा या नावाचे पुरुष आपल्या घराण्याच्या मूळ लौकिकास पूर्ण विसरले. ते पक्के इनामी वळणावर गेले. आपली गादी ही त्यागाची आहे याचा त्यांना पूर्ण विसर पडला होता. त्यांचे कारभारी एक ब्राह्मण होते. त्यांनीं यांच्या इस्टेटीस पुण्याचे नातू यांच्या वाड्याचा दरवाजा दाखविला होता. सदानंद बोवा यांच्या कारकीर्दीत अनेक महत्त्वाचें कागदपत्र नाहींसे झाले असें समजतें.

तुकाराम महाराजांनीं अभंगरुपानें महाराष्ट्रास कायमचें ऋणी केलें. ज्या अभंगवाणीचा प्रसार जगभर झाला अशी ती अमोल वाणी जपून ठेवण्याकडे वंशजांचें पाहिजे तसें लक्ष गेलें नाहीं. आज त्यांच्याकडे सुमारें अडीचशें अभंगाचीच एक वही आहे. हल्लीचे वंशज बाबासाहेब सांगतात. 'दुसऱ्या बाजीरावास तुकोबाचे अभंग पाहणें आहे तरी पाठविणें अशा अर्थाचें त्र्यंबकजी डेंगळ्याचें एक पत्र आमचेकडे आहे.' संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्यावर अगर त्यांच्या घराण्यावर कोणी कसलेहि शिंतोडे उडवो त्याकडे व संतांनीं पाहिजे तसें लक्ष दिल्याचें दिसून येत नाहीं. हल्लीचे वंशज बाबासाहेब, त्यांचे बंधू, व श्रीधर बोवा वगैरे चांगल्या प्रकारें जागे झाल्याचें दिसून येत आहे. ते घराण्याच्या लौकिकाकडे व तुकाराम महाराज यांच्या एकंदर कार्याकडे लक्ष देत आहेत. त्यामुळें यापुढें लेखकांच्या लेखणीस सत्याची कांस धरूनच चालणें भाग पडेल'

# अभंग प्रकाशन

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गव्हारें जाणावें हें ॥
तुका म्हणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तोचि जाणें ॥

ज्यांची मराठी मायबोली आहे. अशा लोकांत परमेश्वरभक्तीचा प्रसार व धर्मजागृति संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीमुळें विशेष होत आहे. तुकाराम महाराज यांचें नांव माहीत नाहीं त्यांची कीर्ति जाणत नाहीं किंवा त्यांच्या अभंगाची एखादी दुसरी ओळ पाठ नाहीं, अशी स्त्री अगर पुरुष सबंध महाराष्ट्रांत क्वचितच सांपडणार ! त्यांच्या त्या अमोल अभंगवाणीस महाराज हयात असतांनाच भेसळीची कीड लागली होती. आपली वाणी ही समाजाच्या निरंतरच्या उपयोगासाठीं आहे. ती पूर्णपणें शुद्ध राहिली पाहिजे, म्हणून महाराज त्याबद्दल विशेष काळजी घेत. महाराजांचे अभंगांत सालोमालो या नांवाचे गृहस्थ बरीच फिरवाफिरव करीत ते पाहून महाराजांस अत्यंत खेद वाटत असे. ' सालोमालो हरीचे दास । यांनीं केला अवघा सत्यानाश ॥ असें म्हटलेंच आहे.

## सुरवातीचे विरोधक

मंबाजी गोसावी सुरवातीस त्यांच्या अभंगांना विरोध करीत असे. अप्पाजी गोसावी पुणें यांनीं तर त्यांच्या अभंगाबद्दल सरकारांत अर्ज केला होता. रामेश्वर भटानें त्यांच्या अभंगाच्या वह्या पाण्यांत बुडविण्याचें केलें महाराजांच्यानंतर जे अभंग होते, त्यावर रामेश्वर भटानें हात फिरवला असे अनेक लेखक सांगतात. पांगारकर तर स्पष्ट रीतीनें सांगतात ' महाराजांनंतर रामेश्वरानें अभंगावर हात फिरवला.' महाराजांची वाणी ही देववाणी समजली जात होती. अशा थोर महात्म्याच्या वाणीवर रामेश्वर भटास हात फिरविण्याचा काय अधिकार? कारण परमेश्वरभक्तीनें पवित्र झालेल्या अंतःकरणांतून निघालेल्या वाणीपुढें

विद्वत्तेची किमत नाहीं. शिवाय रामेश्वर भटानें विरोध विसरून तुकाराम महाराजांचे अनुयायीत्व पत्करिलें होतें. ते भागवत धर्मावरील प्रेमामुळें अगर महाराजांचे श्रेष्ठ दर्जाचें साधुत्व यामुळें नाहीं तर याबाबतची आख्यायिका सांगण्यांत येत आहे कीं, भटाच्या अंगाचा दाह सुरू झाला. तो कोणत्याहि उपायानें शमेना. तेव्हां तुकाराम महाराजांची क्षमा मागण्यासंबंधीं दृष्टांत झाला. त्याप्रमाणें केलें. नंतर रामेश्वराचा दाह शांत झाला. शारीरिक त्रास होऊ नये म्हणून ते महाराजाबरोबर राहत होते. त्यांची मुळची कर्मठ वृत्ति समूळ पालटली होती असें सांगतां येत नाहीं. तुकाराम महाराज नाहींसे झाल्यावर लोकांत शंकाकुशंकेचा जो गोंधळ निर्माण झाला होता. त्यावर स्वर्गांत गेल्याचें पद्धतशीर पांघरूण घालण्याचें कार्य रामेश्वर भटानेंच केलें. स्वर्गांत गेल्यामुळें त्यांचे क्रियाकर्मांतर करण्याचें मुळींच कारण नाहीं असा शास्त्रार्थहि त्यांनींच सांगितला. त्या काळच्या एकंदर परिस्थितीवरून पाहतां अभंगाचे मूळ रूप बदलण्याचें पहिलें काम रामेश्वर भटाकडून होणें शक्य आहे.

## घराण्याचें कर्तव्य

महाराजांच्या वंशजाकडे अभंगाची एक वही आहे. तिच्यांत सुमारें दोनशें ते अडीचशें अभंग आहेत. इतर अभंगाचे बाबतींत लेखकानें वंशज बाबासाहेब यांचेकडे चौकशी केली. त्यांनीं सांगितलें, 'महाराजानंतर कान्होबानें कोणत्याहि प्रकारें विशेष अशी हालचाल केली नाहीं. महाराजांचे दोन मुलगे अगदीं तरुण होते त्यांच्यातहि वडिलांचे गुण फारसे नव्हते. महाराजांच्या गमनानंतर सुमारें पंचवीस वर्षांनीं नारायण महाराज विशेष कर्तबगार निघाले. तोंपर्यंत अभंगाच्या अनेक वह्या पांगल्या गेल्या. शिल्लक असलेल्यांची त्यांनीं व्यवस्था केली असेल. कांहींच्या बाबत आमच्या घराण्यांत एक आख्यायिका सांगण्यांत येत आहे. आमच्या हल्लींच्या वाड्यांत एका भागांत महाराज एकांतांत बसत. त्या जागेखालीं तळघर आहे. त्यांत कांहीं वह्या असल्याचे सांगण्यांत येत आहे. त्याबाबत प्रयत्न करण्याचें काम आजपर्यंत कोणी केलें नाहीं. कांहीं वह्या दुसऱ्या बाजीरावानें नेल्याचें सांगण्यांत येत आहे. मुंबईचे गव्हर्नरसाहेब तुकाराम महाराज यांचे अभंग छापणार आहेत.

म्हणून आमच्या घराण्यांतून कांहीं अभंगाच्या वह्या त्यावेळीं गेल्या. त्याकाळीं सरकारांतून वह्या परत मागण्याचें धैर्य आमच्या इनामदार घराण्यास झालें नाहीं. सरकारांतूनहि त्या परत आल्या नाहींत. आमच्या संग्रहांत जे अभंग आहेत त्यांत व इतर गाथ्यांत प्रसिद्ध असलेल्या अभंगांतील चरणांत बरेच फरक आहेत.' त्यापैकीं आम्ही एक फरक मागें स्पष्ट केलाच आहे.

## सोंवळ्यांत अभंगाची वही

तुकोबाचे टाळकऱ्यापैकीं गंगाधर मवाळ (ब्राह्मण) व संताजी जगनाडे (तेली) हे दोघे अभंग लिहिण्याचें काम करीत, असें अनेकांचें मत आहे. गंगाधर मवाळ यांचे वंशज हल्लीं पुणें जिल्ह्यांत कडूस येथें राहतात. त्यांच्या संग्रहांत अभंगाची एक वही आहे. या वहींतील अभंग पाहणें असल्यास त्याबाबत त्यांची अशी एक अट आहे. पाहणारानें सोंवळें नेसूनच अभंग पाहिले पाहिजेत, महाराजांच्या वंशजास आपल्या पूर्वजांची तपश्चर्यारूपी ठेव पाहण्याची कदाचित् इच्छा झाली तर त्यांनासुद्धां तें शक्य नाहीं. मग इतरास कसें शक्य होईल ? सर्वत्र पसरलेला समभाव व सोंवळ्या ओवळ्याचें बंड मोडण्यासाठी ज्या तुकाराम महाराजांनीं अभंग द्वारें प्रयत्न केले तेच अभंग सोंवळ्याचे कोटांत कसें अडकलें गेले हें एक आश्चर्य आहे, ठाण्याचे कै. वि. ल. भावे आपल्या तुकारामबोवाचा अस्सल गाथा या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत पान १० वर लिहितात, ते पुढीलप्रमाणें, "हल्लीचे मालक ही वही दाखविण्यास कबूल आहेत. मात्र ती सोंवळें नेसूनच पाहिली पाहिजे अशी त्यांची इच्छा आहे. हिची नक्कल करूं देण्यास त्यांचें मन वळविलें पाहिजे, या वहींत 'आतां हे विनवणी प्रधान अष्टका प्रभुसी विवेक समजावा' हा व 'दिवटचा छेत्री घोडे इ.' हे अभंग आहेत." या वहींत जे अभंग आहेत ते तुकाराम महाराजांचे असणें शक्य नाहीं. कारण महाराज हयात होते त्यावेळीं शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेस नुकताच आरंभ झाला होता. मग अष्ट प्रधानास व रामदासास उद्देशून ते अभंग करणें शक्य नाहीं. ते अभंग महाराजांच्या नंतर त्या वहींत तुकोबांच्या नांवावर घुसडले गेले. त्यामुळेंच त्या वहीस सोंवळ्याचें साह्य घेणें भाग झालें. कै. भावे यांनीं याबाबत स्पष्ट असा

खुलासा करणें जरूर होतें. कारण त्यांनीं तुकारामबुवांचा अस्सल गाथा छापला, अशा संशोधकानें त्या बनावट अभंगाबाबत कांहीं एक न सांगता उलट त्या वहीची शिफारस करणें हें एक संशोधकाबाबत नवल आहे

## अनेक तुकाराम

कै. पांगारकर आपल्या मराठी वाङमयाचा इतिहास खंड २ पान ६६१ वर लिहितात "तुकाराम नांवाचे पांचसात कवि महाराष्ट्रांत होऊन गेले व बहुतेकांनीं थोडीफार अभंगरचना केली आहे. तुकाराम वाणी, तुकाराम विप्र, तुका सुंदर, तुका वर्दे, तुका नागनाथ, तुका ब्रह्मानंद इत्यादि. तुका विप्र याचा मठ सातारा जिल्ह्यांत असून त्याचेहि दहा हजारावर अभंग आहेत." मुंबईचे सॉलीसिटर परळकर हे आपल्या तुकाराम चरित्रांतहि तुका निजानंदाचे बरेच अभंग असल्याचे सांगतात. श्री संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचेशिवाय इतर सर्व 'कवि' होते. संतांच्या वाणींतील लोकहिताचा व परमेश्वरभक्तीचा जिव्हाळा कवीच्या काव्यांत नसतो. अशांचें काव्य म्हणून केलेले अभंग तुकाराम महाराजांच्या गाथ्यांत घालणें शक्य आहे.

## मुंबई सरकारतर्फे अभंगाचें प्रकाशन

सन १८६९ मध्यें त्या वेळचे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर वार्टल फियरसाहेब यांनीं मे. ग्रांटसाहेब डाक्टरेक्टर यांना संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा गाथा छापून प्रकाशित करण्यास सूचना केली. या कामीं सरकारला सुमारें चोवीस हजार रुपये खर्च आल्याचें समजतें. डायरेक्टर साहेबांनीं कै. रा. ब. शंकर पांडुरंग पंडीत, यांचेंकडे हें काम सोपविलें. त्यांनीं कै विष्णु परशराम शास्त्री पंडीत, कै. रा. ब. गाडगीळ यांचें साह्य घेतलें. त्यांनीं देहू, तळेगांव, पंढरपूर व कडूस येथून तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या वह्या मिळवून अभंगाचा गाथा तयार केला व छापण्यास दिला. सदर गाथा ज्या वह्यावरून तयार केला. त्या मूळ वह्या कोणाकडे परत केल्याचा उल्लेख नाहीं व वहीत असलेल्या मूळ अभंगाप्रमाणेंच अभंग छापले याबाबत जनतेची पूरेपूर खात्री पटवली गेली नाहीं अशी आजपर्यंत अनेकांनीं ओरड केलेली आहे. हल्लीं आपल्या कॉंग्रेस सरकारनें तुकाराम महाराजांच्या गाथ्याचें प्रकाशन केलें व

आणखी करणार आहे. याबद्दल सरकारला जनता खात्रीनें धन्यवाद देईल. परंतु मुंबई सरकारला एक विनंति आहे, त्यांनीं आपल्या सरकारी जुन्या रेकार्डमध्यें मूळ अभंगाच्या वह्यांचा तपास केला तर कदाचित् त्या वेळच्या वह्या सांपडतील. त्या सांपडल्या तर जनतेस त्याचा मोठा फायदा होईल.

## त्या काळची सामाजिक परिस्थिति

सरकारी गाथा प्रकाशनाचें काम पुणें येथें झाल्याचें समजतें. त्या काळीं पुणें शहरांतील सामाजिक परिस्थिति अगदीं निराळी होती. कल्पनेच्या मापानें ती पुरेपूर समजणें अशक्य आहे. कांहीं घडलेल्या गोष्टींच्या आधारानें तिचें अंधुकसें स्वरूप समजूं शकेल. इंग्रजी अम्मल पुणें येथें सन १८१८ पासून सुरू झाला होता. परंतु राज्यकर्ते हे प्रजेच्या हितासाठीं राज्य करीत नसून राज्यरक्षणासाठीं त्यांचे प्रयत्न होते. याची कांहीं गोष्टीवरून स्पष्ट कल्पना होत आहे. पेशवाई काळांतील सामाजिक रीतिरिवाज हे प्रजेस त्रासदायक आहेत. हें त्यांना उघड दिसत असतां त्याकडे ते दुर्लक्ष करीत. पुणें शहरांत पेशव्यांचें राज्य असतांना जैन मंदिर नसे. ती प्रथा सन १८५९ पर्यंत इंग्रजाकडून पाळण्यांत आली.अस्पृश्याबाबत पेशवाईंत जे कडक नियम होते ते सैल करण्याकडे पाहिजे तसें लक्ष दिलें नाहीं. पुणें येथें संगमावर पूल बांधला त्या वेळीं इंग्रजांनीं ब्राह्मणास दक्षणा वांटली, प्रत्येक श्रावण महिन्यांत पेशवे ब्राह्मणास दक्षणा वाटीत. ती चाल बरींच वर्षे इंग्रजांनीं सुरू ठेवली.कांहीं सुधारकांनीं त्याबाबत ओरड केली. त्यानंतर दक्षणेची रक्कम फक्त ब्राह्मण विद्यार्थीस स्कॉलरशीपच्या द्वारें देऊं लागले. अशा अनेक गोष्टीमुळें पेशवाई काळांत वर्णाभिमानाचा जो पूर आला होता तो ओसरण्यास कित्येक वर्षे लागलीं. हें पुढील उदाहरणावरून स्पष्ट होत आहे. पुणें येथें न्हाव्यानें नवीन घर बांधलें. त्या घराची वास्तुशांति कांहीं ब्राह्मणांनीं केली. त्याबद्दल वास्तुशांति करणाऱ्या ब्राह्मणास वाळींत टाकलें. न्हाव्यांनीं वाळींत टाकलेल्या ब्राह्मणांच्या हजामती करण्याचें बंद केलें. तेव्हां कोठें बहिष्कार उठला. महात्मा फुले यांनीं याच सुमारास पुणें शहरीं समाजोद्धाराची गर्जना केली. त्यावेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकरासारखें पदवीधर इतर कर्मठ सर्व वळा-

निशी त्यांच्यावर चवताळून उठले. स्वामी दयानंद सरस्वती यांनीं हिंदु-धर्माच्या उद्धाराचें महान कार्य केलें होतें. त्यांच्या प्रयत्नामुळें हिंदु समाज हा मुसलमान व ख्रिश्चन अशा धर्मांतराच्या कात्रीतून वाचत होता. वेदांचा अधिकार प्रत्येक हिंदु म्हणविणारास आहे या महान तत्त्वांचा जय घोष त्यांनीं सुरू केला होता.असा धर्मप्रवर्तक पुणें शहरीं सन १८७५ सालीं आला. पुण्यांतील कर्मठ वृत्तीच्या सुशिक्षित लोकांनीं त्यांच्या एकंदर धर्म-रक्षणाच्या कार्याकिडे लक्ष दिलें नाहीं.उलट विरोध मात्र केला. न्यायमूर्ति रानडेसारख्या धर्मरक्षकानें पुढाकार घेतला व स्वामीजीची हत्तीवरून मिरवणूक काढली त्या मिरवणूकीवर पुण्यांतील कर्मठांनीं चिखल व धूळ फेकली. एका इसमास गाढवावर बसविलें व त्यास दयानंद संबोधून शंख ध्वनी करीत मिरवणूकीमागून गेले.

सन १८९१ सालांत पंचहौद मिशन प्रकरण पुण्यांत विशेष गाजलें. ख्रिस्ती मिशनरीच्या घरीं लोकमान्य टिळक, रा. ब. रानडे वगैरे मंडळींनीं चहा घेतला. त्याबाबत लोकमान्य टिळक. रा. ब. रानडे, रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे, रा. ब. चिंतामण नारायण भट, रावसाहेब गोविंदराव कानिटकर, सिताराम पंत देवधर, वामनराव भिडे आणि वामनराव परांजपे वगैरे सुशिक्षित व सरकारची रावबहादूर, रावसाहेब पदवी चिक-लेल्यांना नाइलाजास्तव सामाजिक बंधनापुढें मान वांकवावी लागली व विधिपूर्वक प्रायश्चित घ्यावें लागलें व प्रायश्चित घेतलें म्हणून वर्णाभि-मानी लोकांची खात्री पटवून द्यावी लागली.

अशा त्या पुण्याच्या सामाजिक परिस्थितींत सन १८६९ सालांत रावबहादूर पंडिताकडून गाथा प्रकाशनाचें कार्य कितपत निःपक्षपातपणें घडलें असेल अशी शका उभी राहणें शक्य आहे. कारण तुकाराम महा-राज यांचे अभंग हे सामाजिक समता, वृथावर्णाभिमानाचा निषेध पर-मेश्वर प्राप्तीचा सर्वांस समान हक्क, जपजाप्याचा निषेध वगैरे मानव धर्माच्या प्रसाराचे होते.

## कै. भावे यांचें गाथा प्रकाशन

" हिंदुस्थानांतील ब्राह्मणास माझें इतकेंच सांगणें आहे कीं प्रिय बंधूनों, आपण जन्मतःच श्रेष्ठ आहोंत हा तुमचा अभिमान

फुकट आहे. शास्त्रदृष्टीनें खरें ब्राह्मणपण तुमच्या अंगीं उरलें नाहीं तुम्हीं म्लेंच्छ राजांच्या अंमलाखालीं इतका काळ काढला आहे कीं, त्यांत तुमचें ब्राह्मणपण आतां नष्ट झालें आहे."

( स्वामी वि. खं. ५ वा आमचा धर्म )

ठाणें येथील कैं. वि. ल. भावे या गृहस्थानें शके १८३९ मध्यें तुकारामबोवांचा अस्सल गाथा भाग १ ला छापला. गाथा छापण्याचा त्यांचा हेतू पवित्र मुळींच नाही हें त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट होत आहे. तुकाराम महाराजांनीं आपल्या अभंगवाणीनें वर्णाश्रमाच्या तटास इतकें मोठें खिडार पाडलें आहे कीं ते पाहून भाव्यासारखे कित्येक कर्मठ तुकाराम महाराजांच्या नांवानें सारखें ओरडत. आहेत व ते ओरडतांना त्यांना भानहि राहत नाहीं.

ज्याच्या रोमारोमांत तुकाराम महाराजाविषयीं द्वेष भरला आहे. अशा गृहस्थानें गाथा प्रकाशित करण्याचें मुळींच कारण नव्हतें परंतु तुकाराम महाराजांच्या कीर्तीवर द्वेषाचे शितोडे उडविण्यास कांहीतरी कारण पाहिजे होते !

" इंग्रजाच्या मनांत आम्हांविषयीं असलेल्या तिरस्कार बुद्धि हूनही जाती द्वेषापासून उत्पन्न झालेली आमची तिरस्कार बुद्धि अधिक तीव्र असते."

(स्वामी विवेकानंद खंड १० वा)

भावे यांनीं आपल्या गाथ्यास स्वतःची बावीस पानांची विस्तृत प्रस्तावना जोडली. त्यांनीं प्रस्तावनेच्या पान १९ वर लिहिलें कीं, तुकोबासंबंधी लोक आदर दाखवितात ही त्यांची चूक आहे व ती चूक कोणी दाखविण्याचा प्रयत्न केला तरी लोक मानीत नाहींत हें लोकांचें अज्ञान आहे." पान २०वर त्यांनीं असें स्पष्ट मत दिलें कीं, 'तुकोबा पूर्ववयांत थोडेसें वाहवलेलें असावें.' म्हणजे आचरणानें शुद्ध नव्हते. असें भावे सांगतात. स्वतः छापलेल्या गाथ्यांतील अभंगाची एक ओळ घेऊन त्यावर पुढील प्रमाणें लिहितात. " पर स्त्री आतां मज माते समान (अस्सल गाथा पृष्ठ ११९ अ. ६३८) या अभंगाची खोंच लक्षांत घेऊन ती कल्पना दृढ व्हावी

आणि मनुष्य कोणत्याहि वृत्तीचा असला तरी पश्चातापाच्या धगधगीत ज्वालांनीं त्याच्यांतील सर्व हीणकस भाग जळून जाऊन तो पूर्णपणें शुद्ध होऊं शकतो व सर्व जगाला वंद्य ठरून अत्युच्च पदाला जाऊन पोचूं शकतो, हा उत्तम धडा मनानें शिकावा, पण तसें कांहीं होत नाहीं. भक्तीच्या प्रेमाश्रूंनीं भरून गेलेल्या डोळ्यांना या अभंगांत कांहींच दिसूं शकत नाहीं आणि या अभंगापासून हा धडा घडूं शकत नाहीं."

फिरून पान २० वर लिहितात "ज्यांच्या ज्यांच्या शब्दामुळें महाराष्ट्रांतील लोक सुदैवानें अथवा दुर्दैवानें प्रयत्नाच्या वाटेवरून मुरडून दैवाकडे वळले व अंधभक्तींत गढून जाऊन कार्यविन्मुख झाले. त्या सर्वांत तुकारामाचे शब्द या कामीं जास्त लागू पडले. असें मला वारंवार वाटलें."

त्यानंतर पान २१ वर लिहितात. "पोरी लहानपणीं बाहुल्या करतात आणि त्यांना कोणी नांवें ठेवलीं किंवा हंसलें म्हणजे त्या मोडून कुसकरून टाकतात व मुरकुडी मारून बसतात. त्याप्रमाणेंच जरा कोणी वाचाटानें व्र म्हटल्याबरोबर तुकारामानें आपल्या वह्या पाण्यांत बुडवीत सुटावें व खाणेंपिणें टाकून दगडावर मुरकुंडी मारून निजून राहावें हें एक त्याच्या हळुवार स्वभावामुळें होऊं शकेल, पण असें होतांच अजून तुकारामाचें साधुत्व पिकून तयार व्हावयाचें होतें. तोंच सृष्टिक्रम उरफाटा करून त्या वह्या तारून ईश्वरानें याची समजूत घातली हें अजूनही हे लोक बुद्धीला व कल्पनेला विशेष त्रास न पडूं देतां खरें मानू शकतात यांचें आश्चर्य वाटलें आणि लोकांच्यापेक्षां तुकाराम स्वतःच हें खरें मानी व आपल्याकरतां सृष्टीही आपला क्रम बदलते अशी भावना करून घेई, हें तर फारच गमतीचें वाटेल."

या नंतर पान २१ वर लिहितात. "आपले चार दोन अभंग बदलून सालोमालोनें त्यांत आपलें नांव घातल्याचा इतका राग यावा याचा तर मला कधीच उलगडा झाला नाहीं. तुकारामासारख्या परदुःखानें विव्हळ होऊन जाणाऱ्या पुरुषाला, सभोंवतीं लोकांची दुर्दशा उडालेली पाहून अनेक तऱ्हेच्या संकटतापानें जग गांजलेलें दिसत असतां त्यांतून कांहीं मार्ग-उपाय काढण्याकडे त्याचे कुशाग्र व विशाल बुद्धीनें वळू नये, व लाज राखण्यापुरती कंबरेला लंगोटी लावून कदान्न खावें व त्यांतच समा-

धान मानावें हेंच तो लोकांना शिकवीत सुटला याचें फार आश्चर्य वाटे. अशा अडचणीच्या काळींहि उद्योगधंदा न करतां आपल्या पोटाचा भारहि शेजाऱ्यांवरच टाकावा ही त्याची शिकवण लोकांना पटलेली पाहून त्याच्या वाणीचा जोर मात्र नजरेस पडतो."

कै. भावे यांनीं तुकाराम महाराजांविषयीं स्वतःचा अगदीं जळजळीत द्वेष महाराष्ट्र सारस्वत या ग्रंथांत प्रगट केला. त्यांत त्यांचें समाधान झालें नाहीं म्हणून स्वतःचें अंतःकरण हें तुकाराम महाराजाविषयीं किती कठोरतेनें भरलें आहे हें दाखविण्यासाठीच त्यांनीं लिहिलेल्या लहानशा पुस्तकास बावीस पानांची प्रस्तावना स्वतःच देण्याचें कारण नव्हतें. 'संतांच्या अभंगाचें मर्म जाणण्यासाठी स्वतः संत व्हावें लागते.' तेथें वर्णद्वेषाच्या रोगानें माणूसकी विसरलेलें अंतःकरण उपयोगी नाहीं. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पवित्र चारित्र्यावर शिंतोडे उडवितांना या संसारी गृहस्थाचें मन कसें धजलें हा प्रश्न आहे. त्यांच्या त्या हलक्या मनाबद्दल भागवतधर्माचीं वस्त्रें पांघरलेले पदवीधर आजपर्यंत गप्प कां बसले हा त्याहून मोठा प्रश्न आहे.

सालोमालो यानें महाराजांच्या अभंगांत फेरफार केला ही त्यानें चूक केली. हें म्हणण्यास भावे तयार नाहींच उलट तुकाराम महाराजांसच दोष देतात. त्यावरून भावे यांनीं हा गाथा प्रकाशीत करीत असतांना सालोमालोचें खास अनुकरण करणें शक्य आहे. कारण संतवाणींत फरक करणें 'हें महापाप आहे.' ही पवित्र भावना भाव्यांच्या ठिकाणीं मुळींच नव्हती. तुकाराम महाराजांच्या अभंगाचें प्रकाशन आजपर्यंत अनेक कर्मठांनीं केलें. त्या सर्वांच्या अंतःकरणाचा रोख पुरावा देण्याचें खरें काम भावे यांनीं स्वकृतीनें केलें.

असंख्य संत भक्त हे आपल्या पूज्य संताबद्दल कोण काय लिहीत आहेत, याकडें लक्ष देत नाहीं व कोणीं दिलेंच तर त्याचा प्रतिकार संघटीत रीतीनें करीत नाहींत म्हणून आजहि अशा अनेक गोष्टी घडत आहेत.

## महत्वाचा अभंग

महाराजांचीं आजपर्यंत अनेक चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत व अनेकांनीं गाथेहि प्रकाशित केले आहेत. त्या सर्वांनीं एका अभंगास विशेष महत्त्व दिलें आहे.

याती शूद्र वैश्य केला वेवसाय । आदि तो देव कूळ पूज्य ॥

या अभंगांत याती शुद्र वैश्य केला व्यवसाय असें असणें अशक्य आहे. परंतु रामेश्वर भटानें अभंगावर हात फिरविल्याचें जें सांगण्यांत येत आहे. त्यावरून त्यानें शुद्ध या शब्दाचें ऐवजी शूद्र शब्द घालणें शक्य आहे. कारण महाराज शूद्र म्हणून त्यानें त्यांचे अभंग बुडविण्याचें केलें होतें.

कै. पांगारकर आपल्या तुकाराम चरित्रांत पान ९० वर लिहितात लोकांनीं तुकाराम महाराजास प्रश्न केला. महाराज, आपणास वैराग्य कसें प्राप्त झालें. त्यावेळीं त्यांनीं वरील अभंगांत सांगितलें. तुकाराम महाराजांची सात पिढ्यांची माहिती लोकांस होती व त्यांच्या पूर्वजांनीं विठ्ठलास देहूस आणलें ही आख्यायिकाही सर्वांस माहीत होती यावरून लोकांस प्रश्न करण्याचें कारण उरत नाहीं. कदाचित प्रश्नही केला असेल व उत्तरहि दिलें असेल. परंतु त्यांतील महत्त्वाच्या शब्दांत लिहिणारांनीं तर फरक करणें शक्य आहे.

पवित्र ते कूळ पावन तो देश । जेथें हरीचे दास जन्म घेती ॥

× × ×

यातायाती धर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥

× × ×

धन्य देहू गांव पुण्यभूमी ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥

× × ×

महाराज सांगतात. ज्या कुलांत हरिभक्त जन्मतो तें कूल पवित्र व श्रेष्ठ मानलें जातें. इतकेंच नाहीं तर ज्या प्रांतांत त्याचा जन्म होतो तो प्रांतहि पावन होतो. शिवाय विष्णूदास म्हटला म्हणजे जातीची कृत्रिमता त्याच्या ठिकाणीं राहात नाहीं व ती तो मानीत नाहीं. यानंतर महाराजांना आपल्या गांवाबद्दलहि किती आदर होता.कारण या देहू गांवामुळेंच श्री विठ्ठल पंढरीहून येथें आले व त्यासाठी आपल्या सात पिढ्यांनीं त्या " आदि तो देव कूळपूज्य " पूज्य कुलदैवताची भक्ति केली होती. या निःसीम भक्तीमुळें आपलें कूल शुद्ध झालें आहे असा त्यांना आत्मविश्वास

निर्माण झाला असेल म्हणून त्यांनीं " याती शुद्ध वैश्य केला व्यवसाय " असेंच सांगितलें असेल, परंतु कर्मठांनीं त्या ठिकाणीं शुद्र हा शब्द मुद्दाम लिहिणें शक्य आहे.

" हिंदुस्थानांतील लोक कंगाल असतील, अठरा विश्वे दारिद्र त्यांच्या घरींदारीं लोळत असेल, पण जोंपर्यंत परमेश्वराचा विसर त्यास पडला नाहीं आणि आपण ज्ञानवान ऋषींचें वंशज आहोंत याची ओळख ते विसरणार नाहींत तोंपयत ते जिवंत राहावयाचेंच. "

( स्वा. वि. खंड ४ था. )

प्रसिद्ध असलेल्या गाथ्यांतील अभंग परस्पराशीं तपासून पाहतां त्यांत अनेक फरक दिसतात. हस्तलिखितांत व छापलेल्या पुस्तकांतहि फरक दिसतात. महाराजांची अभंगवाणी भंग करून पाहण्याचे जरी अनेक प्रयत्न झाले व होत आहेत. परंतु ती वाणी धार्मिकांच्या मनोभावना सदैव जागृत करीत राहणार. तिच्यांत महाराजांची तपश्चर्या ओतलेली आहे. ती तुका म्हणे या शब्दानेंच आपलें सर्व कार्य करीत राहणार! व महाराष्ट्रीय बहुसंख्य जनता त्यांच्या वाणीच्या आधारानेंच पाऊल टाकणार !

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥१॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥२॥
न लगे मुक्ति धनसंपदा । संत संग देई सदा ॥३॥
तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हासी ॥४॥

# श्री समर्थ रामदास आणि वारकरी संत

अवतार तुम्हां धराया कारण । ताराव्या जन महादोषी ॥
वाढवया सुख, भक्तिभाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥
तुका म्हणें गुण चंदनाचे अंगीं । तैसे तुम्ही जगीं संतजन ॥

श्रीसंत नामदेवमहाराज यांनीं महाराष्ट्रांत भागवतधर्माची स्थापना केली तर समर्थ रामदास स्वामींनीं रामदासी पंथ स्थापला. श्री समर्थ जन्मास येण्यापूर्वी सुमारें तीनशें वर्षे वारकरी संतांनीं आपलें कार्य महाराष्ट्रांत केलें. श्रीसंत तुकोबांनीं सुमारें दोन तपें अगोदर महाराष्ट्रांत जागृति केली. नंतर समर्थ महाराष्ट्रांत स्थायिक झाले. देशाच्या पडत्या काळांत ह्या दोन्ही पंथांनीं सर्व प्रकारें जागृति केली व महाराष्ट्रास खरें साहाय्य दिलें. महाराष्ट्राच्या अस्तित्वास स्थैर्य आणलें. हें इतिहासांत घडलेल्या अनेक महत्वाच्या आधारावरून सांगत आहे.

## मतभेद

विसाव्या शतकांत ह्या दोन्ही पंथाभिमानी लोकांत नसता वाद उत्पन्न होण्याचा रंग दिसत आहे. कारण रामदासी पंथाचे कांहीं अनुयायी हे समर्थांच्या कार्यास धार्मिकतेपेक्षां राजकारणाचें स्वरुप देण्याच्या विशेष भरीस पडत आहेत व तसें करतांना ते वारकरी संतावर निवृत्ती मार्गाचे आरोप करतात. त्यांच्या शिकवणुकीमुळेंच समाज पंगू बनला असें सांगण्याचेंहि ते धाडस करीत आहेत. वारकरी संताबद्दल जनतेंत अप्रियता उत्पन्न व्हावी असेंहि अनेक प्रयत्न सुरू आहेत. हें रामदासाभिमानी कांहीं लेखकांच्या प्रत्यक्ष लिखाणावरून जनतेच्या ध्यानीं येईल.

वारकरी समाज हा समर्थरामदास स्वामी व त्यांचा पंथ याजकडे आदराच्या भावनेनें पाहात आहे. वारकरी पंथ हा भक्ति व धार्मिक भावनेस बांधला गेला आहे. रामदासी पंथ हा बुद्धिवाद व चातुर्वर्ण्याचे कृत्रिम जाळें यांत पूर्णपणें अडकला गेला आहे. त्यामुळें तो संताच्या खऱ्या

कामगिरीकडे मुद्दाम दुर्लक्ष करीत आहे. महाराष्ट्रांतील बहुसंख्य समाजाच्या भावनेची तो पर्वा करीत नाहीं. संताबद्दल तो हवें तें लिहीत आहे व तसें प्रयत्न सतत सुरू आहेत.

### कांहीं प्रयत्न

कै. वि. ल. भावे ठाणें, यांनीं आपच्या *अंतःकरणांत* वर्णाश्रम धर्माच्या समंधास जागा देऊन आपल्या लेखणीस तलवारीचें स्वरूप दिलें. यांनीं संतावर व त्यांच्या एकंदर कामगिरीवर निष्ठूर असें अनेक वार केले. वारकरी पंथाचें मूळ संस्थापक नामदेव महाराज यांचेवर असाच प्रहार करून या पंथाचें मूळ उखडण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. इतर संतास शूद्र अतिशूद्र म्हणून मनाचा उथळपणा दाखविला. श्री संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या कार्यावर व संतपणावर घाव घालतांना या गृहस्थानें मनाची व जनाची भीति सोडली. सत्य परिस्थितीची पर्वा केली नाहीं. इतिहासाच्या खऱ्या सांगण्याकडे मुद्दाम डोळेझांक केली. त्यांनीं महाराष्ट्र सारस्वत या नांवाच्या ग्रंथांत आपलें खरें अंतःकरण ओतलें तें पुढीलप्रमाणें आहे. म. सा. भाग १ पान ३३७।३३८ वर पुढीलप्रमाणें लिहिलें आहे.

" परंतु प्रसंगानुसार निरनिराळ्या वृत्ति मनांत उसळल्यामुळें अभंगांत एकरूपता राहिला नाहीं. थोडाफार विरोध उत्पन्न झाला आहे तसेंच रचनेंत विचारापेक्षां वृत्तीचें आणि विकारांचेंच प्राबल्य जास्त किंबहुना मुख्य असल्यामुळें ज्ञानेश्वराच्या व्याख्यानावरून ज्ञानेश्वराच्या निर्विकल्प मनाची आणि साधुवृत्तीची ओळख पटते तशी तुकोबाच्या अभंगावरून तुकोबांच्या साधुवृत्तीची ओळख पटत नाहीं.

नाम न वदे ज्याची वाचा । तो लेक दो बापाचा ॥
नाम न म्हणे ज्याचें तोंड । तेंचि चर्मकाचें कुंड ॥
तुका म्हणे त्याचे दिवशीं । रांड गेली महारापाशीं ॥

किंवा

बाईले आधीन होय ज्याचें जीणें । तयाच्या अवलोकने पडिजे द्वाड॥
कासया ते जंत जिताती संसारीं । माकडांच्या परी गारोड्यांच्या ॥
तुका म्हणे पेंग्या गाढवाचें जिणें । कुतऱ्याचें खाणें लगलगा ॥

हे असले अभंग ' कुंकवाची उठाठेव । बोडकाबाई कशाला' 'जळो त्यांचें तोंड ', ' मोजून माराव्या पैजारा '; ' त्यांच्या तोंडावरी थुंका ', असल्या शिव्याशाप आणि असले कोरडे कितीहि आवश्यक किंवा उपयोगी असले, तरी शेवटीं हे जाडेभरडेच खरे. यांत आडपडदा मुळींच नाहीं, सौजन्यहि नाहीं. शिंदळीच्या भांडणांत शोभणारे हें शब्द ' वाट कृपेची करितु । दिशाचि स्नेहभरितु । जीवांतलीं आथिरतु । जीव आपुला ॥' अशा भगवद्भक्ताच्या तोंडांत शोभत नाहींत. हें काय जगाला वळण ! ही काय मनाची समता आणि शांति! ज्यांनीं क्रोधाला तीलांजली दिली त्यांनीं असें बोलावें, ज्यांनीं संसारमाया सोडिली त्यांनीं अगदीं शेवटीं वैकुंठास जातांना सभोंवतालच्या मंडळीस माझ्या बायकोला सांभाळा, व माझ्यासाठीं तिचे अपराध पोटीं घाला, अशा एखाद्या संसाऱ्यासारख्या विनवण्या कराव्या, ज्यांनीं कामाचा विटाळ मानला त्याची स्त्री मरणकाळीं गरोदर असावी आणि त्यांना मेल्यावर पुत्र व्हावा हें आम्हां अनधिकाऱ्यांना विसंगत वाटतें ? "

वरीलप्रमाणें भावे तुकाराम महाराजाविषयीं आपल्या ग्रंथांत लिहितात.

## समर्थ रामदास आणि तुकाराम महाराज यांची तुलना

भावे आपल्या अंतःकरणांतील रामदासी पंथाचा ठाव दाखविण्यासाठीं दोन महापुरुषांची तुलना आपल्या मनाच्या मापानें करीत आहेत. ते आपल्या म. सा. भाग १ पान ३५८ ते ३५९ वर पुढीलप्रमाणें लिहीत आहेत.

"(१) तुकाराम संसारांत गुरफटला होता. पोराबाळांचा जंजाळ अखेरपर्यंत त्याला सुटला नाहीं. संसार आणि संतान या वस्तू रामदासांनीं आपणांस कधींच चिकटू दिल्या नाहींत.

(२) आपल्या आयुष्यांतील संकटपरंपरेची कहाणी तुकाराम डौलानें चारचौघांत सांगत सुटतो. रामदास आपल्यावरील संकटाबद्दल ब्रहि काढीत नाहीं.

(३) आपल्या आप्तेष्टांची चिंता तुकाराम अखेरपर्यंत वाहतो व कष्टी होतो. रामदासाला सगळी चिंता महाराष्ट्राची वाटते. तुकारामाला शेवटीं काळजी बायकोची, रामदासाला शिवाजी आणि महाराष्ट्राची.

(४) विद्येची आणि ज्ञानाची महति एकाला फारशी नसे दुसऱ्याला अवश्य वाटे. तुकारामाचें शिक्षण व विद्या बेताबाताचीच होती. रामदास हा त्यांत आचार्य होता.

(५) देशाची आणि राजकारणाची कल्पनाहि तुकोबाला कधीं शिवली नाहीं. देश व राजकारण हीं आमरणांत रामदासाच्या नजरेआड झाली नाहींत.

(६) लाज राखण्यापुरती कंबरेला लंगोटी लावून कदान्नावर उपजीविका करणें हें तुकोबा महंतीचें लक्षण समजे, गरिबाच्या गाढवावर बसणें हें महंताला अयोग्य आहे असें रामदासाला वाटे.

(७) रामदासानें अकराशें मठ स्थापले व हिमालयापासून कन्याकुमारीपर्यन्त आपला पसारा वाढविला. तुकारामानें कोठें मठहि स्थापले नाहींत व पंढरीपलीकडे तो गेलाहि नाहीं.

(८) दैवी चमत्काराचे खुळचट प्रकार तुकोबा कौतुकानें मानी. रामदासाला असला भाबडेपणा तिरस्कारणीय वाटे. एक दैववादी होता व दुसऱ्याची सर्वांत जास्त भिस्त प्रयत्नांवर होती.

(९) तुकाराम परंपरेच्या चाकोरींतून चालत असे पण रामदासाला परंपरेची चाकोरी ठाऊक नव्हती. त्यानें नव्या वाटा पाडल्या व नवे मार्ग चोखाळून रस्ते बांधले.

(१०) तुकारामांच्या शिष्यांवर त्याचा दाब नसे व त्यांना आज्ञा नसत, रामदास आपले शिष्य जबरींत वागवी व त्यांना खरमरीत शासन करी.

(११) तुकाराम जगाला उपदेश करी; रामदासाचा उपदेश महाराष्ट्रापुरताच असे. रामदासाला सारी तळमळ महाराष्ट्राची वाटे, त्यापुढें त्यास जग अल्प दिसे.

(१२) महाराष्ट्रानें रानावनांत दगडावर बसून टाळ बडवावें व नामामृत प्यावें हें तुकोबारायाचें मोठें ध्येय व आग्रहाचें सांगणें. महाराष्ट्रानें आनंदवनांत सिंहासनावर बसून चांडाळ बडवावें व स्वातंत्र्यामृत प्राशन करावें हें श्रीसमर्थ रामदास स्वामीचें ध्येय व आग्रहाचें सांगणें."

कै. भावे यांनीं वरीलप्रमाणें श्रीसमर्थ रामदास स्वामी व संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्यामध्यें बारा कलमी तुलना करून स्वतःच्या ज्ञानाचें बारा वाजवून घेतलें आहेत इतकें जहरी विष स्वतःच्या पुस्तकांत ओकण्याचें कांहींच कारण नव्हतें. एखाद्या परधर्मीय धर्मांधाकडून असलें पाप घडलें असतें तर तें एक वेळ क्षम्यहि ठरलें असतें; परंतु हिंदुधर्म व हिंदुसमाज यांच्या नाशाचे परधर्मीयांकडून आजपर्यंत जेवढे प्रयत्न झाले असतील त्यापेक्षां शतपटीनें जास्त असें आमच्या कर्मठ अशा धर्म बांधवाकडून

झाले आहेत. ज्या तुकाराम महाराजास अखिल हिंदुस्तानांतील धार्मिक स्त्री-पुरुष आदराच्या भावनेनें पाहतात. त्यांचें एकंदर जीवनचरित्र आदर्शवत् मानतात. कित्येक परधर्मीय ह्या श्रेष्ठ संतास आदराच्या दृष्टीनें पाहतात. ज्यांची अभंगवाणी महाराष्ट्रांतील प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या तोंडापुढें निरंतर उभी राहत आहे. त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें आज महाराष्ट्रांतील बहुसंख्य समाज धार्मिक श्रद्धेनें जात आहे. पृथ्वीच्या पाठीवर ज्यांची अभंगवाणी सत्वानें मिरवत आहे; सकल संतांत ज्याला 'संतश्रेष्ठ म्हणून संबोधण्यांत येत आहे, ज्याचें नांव कानावर पडतांच अंतःकरणांत भाव, भक्ति व धर्म एकत्रित होऊन उभा राहतो अशा पुण्यश्रेष्ठ महात्म्यासंबंधीं भावे आपलें एकांगी स्पष्ट मत देऊं शकतात. त्यांच्याकडे भावे कोणत्या दृष्टीनें पाहतात हें जनतारूपी जनार्दनानेंच ठरविणें योग्य होईल. माझ्यासारखा अगदीं सामान्य मनुष्य महाराजांच्या अभंगाबद्दल हवें तें मत देऊन त्यांचें जीवनचरित्र हीन ठरविण्याचा दुष्ट प्रयत्न करतो हें एक महान आश्चर्य ! संताची कामगिरी व त्यांचें चरित्र पाहण्यास शुद्ध अंतःकरणाची अत्यंत जरूरी असते. तेथें विद्वत्तेची अगर कर्मठपणाची जरूर नसते स्वामी विवेकानंद सांगतात. **जेथें बुद्धि पोहोंचू शकत नाहीं तेथें फक्त अंतःकरण पोहोंचू शकतें.**

तुकाराम महाराज यांच्याबद्दल मत कोण देऊं शकेल ? ज्याच्या अंतःकरणांत पूर्ण समाजभाव, भूतदया, अहिंसा, हीनदीनांबद्दल जिवंत कळकळ समाज सुधारणेची खरी तळमळ, परस्त्री व परधन विषासमान, वर्णद्वेषरहित शुद्धांतःकरण व परोपकार वृत्ति अशा गुणापैकीं एकाचीहि ज्याच्या अंतःकरणास ओझरतीसुद्धां ओळख नाहीं अशा कर्मठ अंतःकरणाच्या माणसास असें लिहिण्याचा काय अधिकार ? तो दोन श्रेष्ठ महात्म्यांची कशी तुलना करूं शकेल ? ज्यांनीं गोरगरीबास व अशिक्षित अशा वारली (आदीवासी) मजूरांचे जास्तींत जास्त कष्ट घेऊन पिळणारा धंदा केला असा अगदीं सामान्य संसारी मनुष्य संताबद्दल मनांत येईल तें मत देऊं शकतो. भावे यांची ही कृति म्हणजे भागवतधर्मीयांच्या हृदयावर खोल असा घावच समजला पाहिजे.

## मुख्य ध्येय

भावे यांनीं आपल्या महाराष्ट्र सारस्वत या ग्रंथाच्या पहिल्या भागांत संतावद्दल कठोर असे अनुदार उद्गार काढले. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या तोंडांत वर्णाश्रमधर्म कोंबण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मणाशिवाय इतर जातीच्या संतास शूद्रातिशूद्र ठरविलें. जातीचें व वर्णाश्रमाचें उघड बंड माजविलें हें सर्व त्यांनीं ज्या ध्येयासाठीं केलें तें त्यांनीं आपल्या महाराष्ट्र सारस्वत भाग २ मध्यें पुढीलप्रमाणें अगदीं उघड केलें.

महाराष्ट्र सारस्वत भाग दोनमध्यें पान २ वर पुढीलप्रमाणें लिहिले आहे.

" नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचाराचि बुडाला ॥
वेदशास्त्र ब्राह्मणाला । कोण पुसे ॥
ब्राह्मण बुद्धिपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ॥
गुरुत्व सांडूनि झाले । शिष्य शिष्याचे ॥

इतकेंच काय पण ज्या ब्राह्मणांनीं सर्वांस धर्माचरणाचे धडे द्यावे ते धर्माचे धडे नीचांकडून घेऊं लागले."

यानंतर पान ५ वर म्हणतात.

" गुरुत्व आले नीच याती । कांहीं एक वाढली महती ।
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ॥
हें ब्राह्मणास कळेना । त्याची वृत्तीच वळेना ॥
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥

ज्यांना खेटरापाशीं ठेवावयाचें त्यांचीं खेटरें डोक्यावर घेऊन ब्राह्मण नाचूं लागले, त्याच्या पायाची धूळ अंगारा म्हणून ब्राह्मणच कपाळीं लावूं लागले, म्हणजे इतरांना काय म्हणावे ? धर्म कोठें आणि कसा राहावा ?

" यानंतर पान १८ वर पुढीलप्रमाणें लिहितात. परशुरामाच्या दर्शनास गेले असतां समर्थ विचारतात.

किती येक मागें बहू युद्ध केलें ।
किती वेळ या ब्राह्मणा राज्य दिलें ।
अकस्मात सामर्थ्य तें काय झालें ।
युगा सारिखें काय नेणो त्रिझालें ॥१॥"

## मुंबई युनिव्हर्सिटी

भावे यांच्या महाराष्ट्र सारस्वत भाग १ व २ यांतील एकांगी लिखाणाची समाजास साधारण जाणीव व्हावी म्हणून अशी माहिती येथें देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु या दोन्ही भागांचें खरें अंतरंग पाहण्याचा कोणत्याहि सात्विक भावनेच्या मनुष्यानें प्रयत्न केला तर तो आपले प्रामाणिक मत देईल कीं या दोन्ही भागांतील लिखाण भागवत धर्मास कमी मानणारे संतास हीन लेखणारे समाजऐक्यांत बिघाड आणणारे जातीधर्माचा पुरस्कार करणारे वर्णाश्रमधर्माचें खोटें महत्त्व वाढविणारें, संताच्या एकंदर कार्याचा मुडदा पाडून त्यावर समर्थ रामदासस्वामीचें राजकारण उभे करणारे आहे.

मुंबई युनिव्हर्सिटीनें हे महाराष्ट्र सारस्वताचे दोन्ही भाग कांहीं वर्षांपासून अभ्यासक्रमासाठीं मंजूर केले आहेत. त्याबाबत बोर्डास माझ्या सारखा सामान्य वारकरी व शेतकरी अशी विनंती करीत आहे कीं, जे विद्यार्थी विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडतात त्यांच्याकडे महाराष्ट्रीय जनता आशेच्या दृष्टीनें पाहात असते. अशा विद्वान होणाऱ्या लोकांस असलें वाङ्मय शिकवलें तर त्यांच्याकडून पाहिजे तितकी समाजऐक्याची आशा करतां येणार नाहीं उलट त्यांच्यांत जातीद्वेषच पेटता राहील. तरी महाराष्ट्रांतील बहुसंख्य भागवतधर्मियांसाठीं व त्यांच्या संतासाठीं युनिव्हर्सिटीनें याबाबत लक्ष दिल्यास वारकरी समाजावर मोठेच उपकार होतील कारण पंढरपूर येथें वारकरी समाजानें या दोन्ही पुस्तकाचा दोन वेळा जाहीर निषेध करून सरकारलाहि कळविलें आहे.

## कै. पांगारकर

कै. पांगारकर हे वारकरी संत व त्यांचें वाङ्मय यावर अत्यंत प्रेम दाखवीत होते. ते स्वतःस भागवतधर्मीय समजत होते. ते भागवतधर्मीय समतेची घोंगडी नेहमीं अंगावर बाळगीत. परंतु प्रसंगोपात रामदासी पंथाची वर्णाभिमानी शालहि घोंगडीवरून अंगावर घेत. त्यामुळें त्यांचें वागणें व लिहिणें यांत मेळ बसत नसे. ते आपल्या महाराष्ट्र वाङमयाचा इतिहास खंड ३ पान २६८ वर लिहितात "रामदासस्वामींनीं विशेषतः ब्राह्मणवर्गाच्या तरुणास हाताशीं धरून त्यांना कार्यकर्तृत्वाची दीक्षा दिली." त्याच खंडांत पान ६१५ वर ते लिहितात "अलीकडे माजलेला समाजसत्तावाद व ऐक्याच्या नांवावर सबगोळंकार करणारा देशभक्तांचा मिथ्या ऐक्यवाद हे दोन्ही इतर संताप्रमाणें समर्थांना बिलकुल मान्य नव्हतें. वर्णाश्रमधर्म व जातीभेद ही हिंदुधर्माचीं अंगें आहेत. हें नाकारणें आंधळेपणाचें आहे." त्याच खंडांत पान ६१५ वर ते लिहितात, '**सकट विचार तो अविचार। कित्येक म्हणती एकंकार। एकंकार भ्रष्टकार। करूं नयें**' (द. र. स. ७) त्याच खंडांत पान ५५४ वर ते लिहितात "एकदा समर्थ केशवस्वामींच्या भेटीस भागानगरास आले. त्यांची ती पहिलीच भेट होती. परस्परांस ते कीर्तिरूपानें श्रुत होते. समर्थांच्याबरोबर शेंपन्नास शिष्य होते. केशवस्वामींचाहि शिष्यसांप्रदाय बराच होता. ते 'अंत्यत्यागी व बहिःसंगी' होते. उभयतां गाढ आलिंगनपूर्वक एकमेकांस भेटले. केशवस्वामी समर्थांस विनोदानें म्हणाले 'अरे साधु झालास आणि रांडेला भिऊन पळालास !' मायेला संसारांत भ्यालास यांत काय मिळविलेस ?" पांगारकरांनीं केलेली अशी परस्पर विरोधी अनेक विधानें त्यांच्या पुस्तकांत सांपडतात.

## कै. भास्कर वामन भट धुळें

कै. भास्कर वामन भट धुळें हे रामदासी पंथाचे कट्टर भक्त होते. 'त्यांनीं समर्थ रामदास स्वामी आणि छत्रपति शिवाजी महाराज यांचा अन्योन्य संबंध' हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत प्रतापगडावरील देवीच्या मूर्तीच्या स्थापनेची हकिगत पान ७२ वर व पुढील

प्रमाणें देतात, श्री देवीची स्थापना करायचा मुहूर्त पाहून मोठे शिष्ट ब्राह्मण व रामदास स्वामी असे सहित येऊन मुहूर्ताची सिद्धता म्हणजे नेम केला. श्री रामदास स्वामींनीं देवीची मूर्ति पाहून शिवाजी राजे यांस स्वामीनें पुसिलेकी, देवीची स्थापना कोणाच्या हातून करवितां? ते समयीं शिवाजीराजे यांनीं स्वामींस विनंति केली कीं, स्थापना करण्यास मलाच सर्व मंडळीचें म्हणणें आहे. त्यावरून समर्थाची आज्ञा जाहली, 'कीं हें देवीचें मूर्तिचें ध्यान अति अपूर्व जाहलें आहे. शिवबा तुम्ही क्षत्रिय, तुमच्या हातून स्थापना जाहली असतां, ब्राह्मण लोक दर्शन घेण्यास योग्य नाहींत." याच पुस्तकांत भट लिहितात, "स्वामींनीं अनेक ब्राह्मण शिष्य निर्माण केले होते व ते श्रुतिप्रणित धर्माप्रमाणें वागणारे होते" वरील हकीकतीवरून हें सिद्ध होतें कीं, समर्थ हे वर्णाश्रमधर्माचे कडवे अभिमानी होते. समर्थ शिवाजी महाराजास क्षत्रिय म्हणत. परंतु महाराजांच्या राज्याभिषेकाचे समयीं महाराष्ट्रांतील कर्मठ ब्राह्मणांनीं कडवा विरोध केला. त्या समयीं समर्थ व त्यांचे श्रुतिप्रणित धर्म पाळणारे ब्राह्मणशिष्य गप्प कां बसले? त्यांनीं कांहींच हालचाल केल्याचें इतिहास सांगत नाहीं. समर्थांचे श्रुतिप्रणित धर्मामुळें महाराष्ट्रांत वजन होतें. मग शास्त्री पंडीतांस अधिकारवाणीनें त्यांनीं कां सांगितलें नाहीं. त्यांचा विरोध कां वाढू दिला? गागा भट्टास काशीहून आणण्याची पाळी कां आली? गागाभट्ट आले तरी समर्थ व त्यांचे शिष्य यांनीं कांहींच केल्याचे कोठेंहि दिसत नाहीं. यावरून हेंच स्पष्ट होत आहे कीं समर्थांचा शिवाजी महाराजांचा तोंपर्यंत दृढ परिचय झाला नसेल अगर त्यावेळीं समर्थांस परशुरामाची भीति खास वाटली असेल.

## इतिहासाचार्य राजवाडे

कै. राजवाडे हे संतास 'संताळे' म्हणून त्यांचा उपमर्द करून त्यांच्या कार्यावर निष्कारण शितोडे उडवीत. तुकाराम महाराजाबद्दल अनादर दाखवीत. त्यांनीं तुकाराम महाराज यांच्या जन्म शकासंबधीं वाद काढून हट्टच धरला. ते महाराजांचा जन्म शके १४९० मध्यें झाल्याचें सांगतात. म्हणजे महाराजांचे निर्याणसमयीं वय ८१ होते त्यावेळीं त्यांचे कुटूंब गरोदर होते हें दाखविण्याचा त्यांचा मुख्य हेतु. त्यासाठीं त्यांनीं कांहीं दुराग्रहि पुरावे देण्याचाहि प्रयत्न केला.

## सत्याचे कांहीं भोक्ते

"आमच्या राष्ट्राचें धर्माशीं इतकें ऐक्य होऊन गेलें कीं, त्याला सोडून तुम्ही कोणतीहि गोष्ट करूं लागला कीं, तुमच्या कार्याचा खुर्दा झालाच."

(स्वामी विवेकानंद खंड ५ वा.)

संतांनीं महाराष्ट्रासाठीं केलेल्या कामगिरीचा खून पाडून इतिहासाच्या खऱ्या स्वरूपास पक्षांधतेसाठीं विद्रूप करण्याचे प्रयत्न पाहून अनेक नामवंत विद्वानांनीं हृचा महत्वाच्या बाबीकडे लक्ष पुरविलें व महाराष्ट्रास सत्य परिस्थिति दाखविण्याचें नैतिक व धार्मिक कार्य केलें व करीत आहेत.

कै. न्यायमूर्ति रानडे, कै. चिंतामणराव वैद्य, कै. केळुस्कर कै. आबासाहेब चांदोरकर प्रो. गो. चि. भाटे, प्रो. न. र. फाटक, श्री. खं. स. त्रिलोकेकर कै. ल. वि. परळकर (सॉलीसिटर) रा. ब. सरदेसाई, प्रि. सोनोपंत दांडेकर, श्री. ब. ना. कुंभार, श्री. भा. पं. बहिरट एम. ए. वगैरे महाभागांनीं याबाबत सत्य परिस्थिति प्रकाशांत आणण्याचें कार्य केलें.

## कै. न्यायमूर्ति रानडे

कै. न्या. रानडे सत्याचे भोक्ते होते. त्यांनीं इतिहासाच्या आधारावर हेंच स्पष्ट केलें कीं, महाराष्ट्रांत मराठ्यांची सत्ता स्थापन होण्यास महाराष्ट्रीय वारकरी संत हेच मुख्यतः कारणीभूत आहेत. याबाबत त्यांनीं वारकरी संतांच्या कामगिरीचें मोजमाप अगदीं बरोबर केलें आहे.

## कै. चांदोरकर

कै. चांदोरकर धुळें, यांनीं या महत्त्वाच्या बाबतींत विशेष संशोधन केलें. इतिहासाचे अनेक आधार दिले. परिस्थितीची सत्य कल्पना करून दिली. त्या सगळ्या गोष्टीवरून त्यांनीं हेंच सिद्ध केलें कीं, समर्थ रामदास स्वामी यांचा शिवाजी महाराजांच्या राज्यस्थापनेशी कांहींच संबंध पोहोंचत नाहीं.

पत्र लिहिलें. लेखकांनीं त्यांची मुद्दाम भेट घेतली. व हा महत्वाचा मुद्दा त्यांचेकडून स्पष्ट करून घेतला होता. ते प्रो. फाटक यांच्या मतास पूर्ण सहमत आहेत. त्याप्रमाणें श्री. त्रिलोकेकर हेहि फाटकास सहमत आहेत.

## प्रिन्सिपाल दांडेकर, पुणें

हरिभक्त परायण शं. वा. दांडेकर हे वारकरी आहेत, संतांच्या कामगिरीचे ते खरे वारसदार आहेत. संतांच्या कामगिरीवर होणारे हल्ले ते विद्वत्ता, हरिभक्ति व ऐतिहासिक पुरावे यांच्या आधारावर परतवितात. त्यांनीं अनेक लेख, प्रवचनें व संभाषणें करून महाराष्ट्राच्या उद्धाराचें कार्य संतांनीं केलें हें सिद्ध केलें. व रामदास पंथाभिमानी जे अकारण खोटे आरोप करतात ते खोडून काढतात. ते एका लेखांत म्हणतात "समर्थांनीं राजकारणांत भाग घेतला म्हणजे काय केलें? दासबोधांत कांहीं स्थळें सोडून राजकारणांत म्हणजे उत्तम व्यवहार सांगितला आहे. शीख गुरु ज्याप्रमाणें स्वत: कृपाण घेऊन लढले असें समर्थ लढायांवर गेले नाहींत. एका इतिहासाकारानें लिहिलें कीं, तुकाराम महाराजावर रामदासाचा वचक होता व जो कोणी उपदेश घ्यायला त्यांच्याकडे येईल त्याला ते रामदासाकडे पाठवीत;" इतिहासाचार्यांचे हें म्हणणें त्यांनीं सन १९३० च्या शिवाजी निबंधावलींत सप्रमाण खोडून काढून शिवाजी महाराजांचे वेळीं संतांची कामगिरी किती श्रेष्ठ दर्जाची होती व राष्ट्रहिताची होती हें स्पष्ट केलें.

हरिभक्त दांडेकरांचे वारकरी समाजांत मोठें वजन आहे. वारकरी समाजांत त्यांनीं प्रयत्न केला असतां तर भावे, राजवाडे व त्यांना मतांचे हल्लीचे लेखक यांचें लिखाणास वेळींच पायबंद बसला असता.

## श्री. ब. ना. कुंभार, जळगांव (पूर्व खानदेश.)

श्री. कुंभार हे बहुजनसमाजांतील सुप्रसिद्ध लेखक आहेत. त्यांच्या शिवाजी महाराज व रामदासस्वामी यांचा सांप्रदायिक राजकीय संबंध हें पुस्तक लिहिलें. ते म्हणतात, "दास विश्राम धाम ग्रंथराज ह्या ग्रंथास सन १७७८ पूर्वी सुरवात होऊन तो सन १८१९ नंतर पूर्ण झाला असावा." असें वरील पुस्तकांतच दिलें आहे. (पान १३)

या 'दास विश्रामधाम ग्रंथांत' रामदास औरंगजेबाची एकांतांत भेट घेतात. झोळींतून डुकराचीं पिलें काढून दाखवितात. लगेच स्वस्थानीं येतात. शिवाजीचें सैन्य औरंगजेबाच्या सैन्याचा फडशा पाडतें याला कारण समर्थांचें दैवी सामर्थ्य, दैवी चमत्कार मंत्रताईताच्या गोष्टी वगैरे ओवीबद्ध असलेल्या प्रसंगावर त्यांनीं अत्यंत समर्पक उत्तरें देऊन समर्थ रामदासस्वामी व शिवाजी महाराज यांचा राजकीय संबंध नव्हता हें सिद्ध केलें.

### श्री. पांडुरंग वामन काणे, मुंबई.

या थोर व अधिकारी पुरुषानें सन १९३० मध्यें शिवाजी निबंधावलीमध्यें 'श्री शिवछत्रपति आणि गागाभट्ट' असा लेख दिला आहे.त्यांत दासविश्राम या ग्रंथाबद्दल त्यांनीं स्पष्ट मत दिलें कारण या ग्रंथास रामदासी सांप्रदायाचा विश्वकोष असे त्या सांप्रदायाचें अनेक अनुयायी समजतात. ह्या ग्रंथांत समर्थांचें चरित्र व प्रताप वर्णन केला आहे. ते आपल्या लेखांत पान २१ वर "रामदास स्वामींचीं चरित्रें त्यांच्या शिष्य प्रशिष्यांनीं लिहिलेलीं आहेत." पान २२ व २३ वर "गागाभट्टापुढें काशींत कोणी पंडित टिकला नाहीं. तेव्हां त्यानें दिवसा मशाल पेटविली व जयपत्र घेत गेला. दासबोध लिहिणाऱ्या दासाला जिंकून जयपत्र घेऊन जाईन असे तो म्हणाला (प्रकरण ७६, १३, १७) अशा प्रकारें गागाभट्ट व रामदासस्वामी यांच्यामध्यें चुरस होती असें वर्णन करून दासविश्राधामकारानें शेवटीं सांगून टाकिलें आहे कीं, काशीकर पंडित कुंठित झाल्यावर त्याला स्वामींनीं अभय देऊन याज्ञवल्क्यादि वेद पढवून तो विसरला असतां खुणेनें सुचवून श्रुति अवगत केल्या. (प्रकरण ७८, ४४) तो मग काशीकर पंडितास अभय देऊन याज्ञवल्क्यादि वेद पढवोन। विसरोन जाताहि सुचवोन। खुणे श्रुत्या अवगत केल्या ॥' या गोष्टींत ऐतिहासिक सत्य आहे. असें मानण्याच्या भानगडींत कोणी पडूं नये हें बरें. आपल्या गुरूंचे किंवा परंपरेंतील आद्य पुरुषाचें चरित्र लिहितांना त्याच्याबद्दल संभाव्य किंवा असंभाव्य गोष्टी सांगण्याची व त्याच्या काळीं किंवा मागेपुढें झालेल्या मोठ्या व्यक्तीशीं त्याचा येनकेन प्रकारेण संबंध आणून चरित्रनायकानें त्याच्यावर वरचढपणा केला. हें दाखविण्याची पद्धत फार प्राचीन काळा-

दासून पडली आहे. आद्य शंकराचार्यांचीं जीं चरित्रें आहेत त्यांत मंडनमिश्रापासून तों आचार्यांचे मागून कित्येक पिढयांनीं झालेल्या अभिनव गुप्ताचार्यापर्यंत सर्वांचा त्यांनीं पराजय केला. हें वर्णन असतें तीच स्थिति रामदासस्वामींच्या चरित्रकारांची. शिवाजीमहाराजांचा व गागापंडिताचा संबंध आला. गागाभट्टाचे सर्व भरतखंडभर नांव गाजलें. त्यालाहि रामदासस्वामीनीं फजीत केलें असें वर्णन केलें नाहीं तर स्वामींच्या परंपरेंतील अतिशयोक्ति करणारीं असल्या भावनेनें बहुतेक चरित्रें लिहिलेलीं असल्यामुळें त्यांतील विधानें निर्भेळ सत्य म्हणून आजच्या चिकित्सक दृष्टीच्या इतिहासकारांनीं मानतां कामा नये."

## श्री. भा. पं. बहिरट एम. ए., पंढरपूर.

श्री. बहिरट हे जन्मानें ब्राह्मण आहेत, परंतु त्यांच्या रोमारोमांत भागवतपंथाचा समतावर्म स्पष्ट उमटलेला दिसतो. ते पायीं वारी करतात. संत वाङमयाचा त्यांचा व्यासंग दांडगा आहे. हजारों रुपये खर्च करून अत्यंत उपयुक्त असा ग्रंथसंग्रह त्यांनीं बाळगला आहे. त्यांनीं सन १९४५ मध्यें "भागवतधर्म व रामदासी पंथ" असा स्वतंत्र लेख प्रसिद्ध केला. त्यांतील महत्त्वाचा कांहीं भाग पुढीलप्रमाणें आहे.

"पूर्वापार धार्मिक समजुतीच्या दृढ बंधनांतून सकल जीवमात्राना आपल्या कृपादृष्टीनें सोडून प्रत्येकाच्या जीवनांत प्रेमभक्तीचा सुकाळ करणाऱ्या श्रीपंढरीशाच्या थोरवीचा ठसा रामदासांच्या अंतःकरणावर उमटला नाहीं हें कशाचें द्योतक समजावयाचें ? याचें कारण एकच कीं, त्यांच्या अंतःकरणावर पूर्वीच्या वर्णाश्रमधर्माचीं असंख्य पुटें होतीं."

"रामदासी वाङमयांतील मुख्य गोष्ट प्रामुख्यानें डोळयापुढें उभी राहते. ती ही कीं, त्यांत वारकरी सांप्रदायाचें अध्वर्यू संत व देवता या विषयीं आदराचा पूर्ण अभाव आहे. अशा स्थितींत वारकरी कीर्तनकारांनीं आपल्या देवतेविषयीं व आपल्या संतमायबापाविषयीं अनादर असणाऱ्या व्यक्तीचीं वचनें काय म्हणून वापरावीत ? तशा दृष्टीनें कोणी शिकवूं लागल्यास तें निखालस चुकीचेंच ठरणार आहे."

"वारकरी सांप्रदायांत जातिनिष्ठता नाहीं. भक्ति ही सर्वांस साध्य व सुलभ आहे. तो कोणत्याहि जातीचा असो त्याचा

सिद्धांत आहे. याच्या उलट रामदासी पंथांत जातिभेदास अत्यंत महत्व आहे. 'स्वधर्म रक्षण याचा अर्थ गो–ब्राम्हण रक्षण' त्यांनीं केला आहे."

"तीर्थे क्षेत्रें ते मोडिली । ब्राम्हणे स्थानभ्रष्ट झाली । सकळ पृथ्वी आंदोळिली धर्म गेला ॥ देवधर्म गो–ब्राम्हण करावया रक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं तुम्हांकारितां ॥ ७–८–१० यांतील 'महाराष्ट्रधर्म' हा शब्द गो–ब्राह्मण रक्षणाचा धर्म याअर्थी वापरला आहे हें उघड आहे."

"याच्याउलट श्रीतुकोबारायांचा पुढील अभंग पहा.

हरि ॐ तत्सदिती सूत्रांचे सार । कृपेचा सागर पांडुरंग । हरि ॐ सहित अनुदित । प्रचुरीश्वरासहित पांडुरंग ॥ गोब्राम्हणाहुनी निराळें । वेदांचें तें मूळ तुका म्हणे ॥

या अभंगामध्यें कृपासागर पांडुरंग हा गो ब्राम्हणहिताच्या धर्माहून निराळा धर्म जागविणारा आहे. असें स्पष्ट म्हटलें आहे. यावरून वारकरी धर्म हा रामदासी धर्माप्रमाणें संकुचित व कोत्या दृष्टीचा नसून विशाल व करुणार्द्र दृष्टीनें ओथंबलेला व "गुण दोष याती न विचारी कांहीं। ठाव दिला पायीं आपुलीया ॥" या ब्रीदाचा आहे हें दिसून येतें.

गुरु करावयाचा असेल, तर स्वयातीचाच पाहिजे असा रामदासांचा दंडक आहे. 'आतां असो हा विचारु । स्वयातीचा पाहिजे गुरु । नाहीं तर भ्रष्टाकार । नेमस्त घडे॥ स्वयातीचा याचा अर्थ ब्राह्मण यातीचा. 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' हें रामदासांचें ब्रीद वाक्यच आहे. "गुरु तो सकळासी ब्राम्हण । जऱ्ही तो झाला

क्रिया हीन । तरी तयासीच शरण । अनन्य भावें असावें ॥ ब्राह्मण कसल्याहि भ्रष्टाचाराचा असो तो गुरु म्हणून चालतो, पण इतर जातीची व्यक्ति जगद्वंद्य असली तरी गुरुत्वास नालायकच ठरते. वर्णश्रेष्ठतेची ही कल्पना रामदासी पंथाच्या हाडींमासी खिळलेली आहे. समर्थांच्या राजकारणाचा पायाहि तोच.

" वारकरी धर्मांत पाहिल्यास अगोदर गुरुत्वाची कल्पनाच भिन्न आहे. त्यांत गुरु हा शब्द संत या अर्थी वापरला आहे. संत गुरु शिष्य संबंध न राखतां मेघवृष्टीप्रमाणें सर्वांवर सारखी प्रेमवृष्टि करणारे आहेत. जीवनाचें ध्येय कैवल्य नसून प्रेमभक्तींत आहे, असा बोध देऊन हृदयांत प्रेमाची ज्योत लावणारे ते महात्मे होत. त्यामुळें तेथें गुह्य मंत्र व जातीभेद यांचें नांवसुद्धां आढळणार नाहीं. ' या रे या रे लहान थोर याति भलते नारीनर । करावा विचार न लगे चिंता कोणासी॥' असा तेथें प्रकार आहे. जातीवरून जीवन श्रेष्ठ ठरत नसून भगवद्भक्तीवरून जीवनाची श्रेष्ठता ठरते हें तर वारकरी धर्माचें आद्यतत्त्व आहे."

" रामदासीपंथांत ब्राह्मण हा कसाही बुद्धिहीन असला तरी वंद्य होय, व त्यास तृप्त केल्यानें देव संतृप्त होतात, अशी समजूत आहे.

जरी ब्राह्मण मठपती तरी तो जगद्वंद्य॥ दासबोध ५-१-१५ नरदेही विशेषे ब्राह्मण ॥ २-४-२ वास घे वास ना देवो ॥ स्थूळवीण खातां नये। म्हणोनि ब्राह्मणा द्यावे । विप्रमुखेंसंतृप्ता ॥ प. मा. २-२३ आषाढी कार्तिकी आवळींची बनें । घालावीं भोजनें ब्राम्हणासी ॥ स्फु. ओ.५-७ ब्राह्मणाच्या तीर्थें पातक्षय होतो । जन उद्धरतो विप्रवाक्यें ॥ वारकरी धर्मांत आषाढी कार्तिकी पंढरीस टाळ दिंडी घेऊन नाचत जाऊन प्रेम-

सुखाच्या अमूप राशी लुटण्याच्या पर्वणी होत या समयीं रामदासस्वामीं आवळीच्या वनांत ब्राह्मण भोजनें घालण्याचा उपदेश केला आहे. वारक धर्मदृष्टचा नामधारक सर्वांत श्रेष्ठ श्री नाथरायांचा ' गावढे सहस्त्रब्राह्म ह्या अभंग जरूर पाहणें. त्याचें जोडलेलें कोष्टक पाहण्यासारखें आहे. त्यां नामधारक कोणत्याही जातीचा असो त्याला भोजन दिल्यानें जे पुण्य मिळतें तें लाखों ब्राह्मणास अन्नदान केल्यांने मिळत नाहीं असें एकनाथ महाराजांनीं सांगितलें आहे. (ओळीचे अभंग पान ५४वर)

" श्री समर्थांचें बहुतेक वाङमय ब्राह्मणांना उद्देशून आहे. ब्राह्मणवर्ग मनांत आणून त्याला त्यांनीं उपदेश केला आहे. कांहीं विशिष्ट प्रसंग सोडून बाकीचा त्यांची सारी कविता ब्राह्मणापुरती आहे." (श्री. देवकृत-समर्थ चरित्र खंड ३ रा समर्थ संप्रदाय पान १४३) याचें कारणहि सदर लेखकच देतात कीं, "वर्ण आणि चारी आश्रम ब्राह्मणाधीन असल्यामुळें एका ब्राह्मणाचें रक्षण झालें म्हणजे वैदिक धर्माचेंच रक्षण झालें असें समजावें असें शंकराचार्याप्रमाणें समर्थांचें मत होतें.(पान १४०)रामदास हे चार्तुवर्ण्य व्यवस्थेचें अत्यंत अभिमानी व पुरस्कर्ते होते ही गोष्ट देवांनींच मांडली आहे. (पान १४३)"

" रामदासी सांप्रदायाची धार्मिक कामगिरी ही गतानुगतिक असल्यामुळें उत्तरोत्तर या सांप्रदायाचा ऱ्हासच होत गेला ही गोष्ट रा. देवासारख्या कट्टया रामदासाभिमानी लेखकानें कबूल केली. (समर्थ चरित्र स. ३ चे शेवटचें प्रकरण)"

हरिभक्त बहिरट यांनीं साधार अशी सत्य परिस्थिति मांडण्याचें धाडस केलें.त्यांचा हा संबंध लेख वाचला तर कोणीहि सांगेल कीं,रामदासी

त्याचें काम हें ब्राह्मणापुरतें होते, इतरांसाठीं नव्हतें. श्री. बहिरट यांच्याप्रमाणें कित्येक विद्वान् ब्राह्मण संताच्या कामगिरीचें महत्त्व समाजाला पटविण्याचें कार्य करीत आहेत.

## श्री समर्थ रामदास स्वामी

श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनीं शुभमंगलप्रसंगीं लग्नाची बेडी कायमची तोडण्याचें महान धाडस केलें. समाजाचें मांगल्य साधण्यासाठीं उभें आयुष्य त्यागाच्या ज्वाळांनीं त्यांनीं तापतें ठेवलें. त्यांचें धार्मिक कार्य हें एखाद्या मौल्यवान वस्त्राप्रमाणें महत्वाचें आहे. परंतु त्या वस्त्रावर राजकारण, वर्णाश्रम, जातीधर्म व ब्राह्मण्य वगैरे अनेक ठिगळें चढविण्याचें प्रयत्न झाले. त्यामुळें त्याचें खरें स्वरूप झांकलें गेलें. या महात्म्याची कारकीर्द व एकंदर कार्य हें समाजाच्या चर्चेचा नसता विषय झाला. त्याला मूळ कारण समर्थाचें शिष्य–प्रशिष्य व अलीकडचे पंथाभिमानी लोक हे होत. या मंडळींनीं भावनेस अंधश्रद्धेची पंथाभिमानाची व जातीधर्माची दृष्टि ठेवल्यानें त्या मूळ किंमती वस्त्रास एखाद्या गोधडीचें स्वरूप प्राप्त झालें.

कै. राजवाडे यांनीं आपली खरी बुद्धिमत्ता वर्णाश्रमधर्मासाठीं खर्च केली. इतिहासाच्या नांवाखाली संतावर निष्कारण शितोडे उडविले व रामदास स्वामीस राजकारणाच्या मुख्य रस्त्यावर उभें केलें.

कै. भावे यांनीं वर्णाश्रमाच्या कैफाच्या जोरावर मनास येईल तसें लिखाण केलें. संताच्या खऱ्या कामगिरीकडे मुद्दाम दुर्लक्ष केलें. तुकाराम महाराजांस अगदीं सामान्य ठरविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या साधुत्वाबद्दल शंका प्रदर्शित केली. ज्या अभंगामुळें महाराष्ट्र हा अभंग राहिला त्या संतवाणीस दोष दिला. त्यांच्या त्यागावर, प्रखर वैराग्यावर व संतपणावर संसार आणि माया यांचें पांघरून घालण्याचा प्रयत्न केला. इतकें करूनहि समाधान झालें नाहीं, म्हणून संत तुकाराम महाराज व समर्थ रामदास स्वामी यांच्यांत त्यांनीं बारा कलमी तुलना केली. ती करतांना सत्य परिस्थितीचा त्यांनीं खून केला. स्वतःचा राष्ट्रघातकी हेतु त्यांनींच आपल्या लेखणीनें उघड केला. श्री समर्थ चिपळूण येथें परशुरामाच्या दर्श-

पास गेले असतां त्यांनीं केलेली प्रार्थना श्री. भावे यांनीं प्रसिद्ध केली. ह्या एकाच गोष्टीवरून भावे यांचे सर्व हेतु धुळीत गेले. कारण महाराष्ट्रांतील कोणीहि समजंस त्या प्रार्थनेच्या आधारानें हेंच सांगेल कीं, समर्थांची खरी इच्छा, परशुरामानें फिरून अवतार घ्यावा, क्षत्रियांचा नायनाट करावा, व त्यांचीं राज्यें ब्राह्मणास द्यावीत. शिवाजी महाराज ब्राह्मण नव्हते. त्यामुळें समर्थांनीं शिवाजीस राज्यप्राप्ति व्हावी म्हणून प्रयत्न केला नसेल. हें भाव्यांच्या लिखाणावरून स्पष्ट होत आहे.

कै. पांगारकर स्पष्ट शब्दांत सांगतात, "समर्थांचें कार्य हे पांढर-पेशा– विशेषतः ब्राह्मण तरुणासाठीं– होते." म्हणजे सर्व समाजासाठीं नव्हतें असें ठरतें. स्वराज्याची स्थापना ही नुसत्या ब्राह्मण तरुणांकडून होणें शक्य नाहीं. त्यासाठीं महाराष्ट्रांतील सर्वच जातींच्या तरुणांनीं आपल्या गरम रक्ताचें रंगण केलें; असंख्य स्त्रियांनीं आपलीं कपाळें पांढरी फटफटीत करून घेतलीं. अगणित मातापित्यांनीं आपल्या पोटच्या गोळ्यांच्या मायेसाठीं अंतःकरणें कोरडी ठणठणीत करून डोळ्यांतून वात्सल्याचा पाऊस पाडला व स्वातंत्र्याची भावना ओली ठेवली. एकट्या शिवाजीमहाराजांनीं अगर त्यांच्या जातभाई मावळ्यांनींच स्वराज्य मिळ-विलें नाहीं. पांगारकर आपल्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड ३ मध्यें मोठ्या अभिमानानें सांगतात, रामदास स्वामीच्या शाखेंत बहात्तर त्र्याहत्तर शिष्य होते. ते एकजात ब्राह्मण होते. शिवाय सतरा अठरा शिष्यिणी होत्या. त्या सर्व ब्राह्मण जातीच्याच ! वेणाबाई, अक्काबाई ह्या बालविधवा असल्यानें त्यांनीं समर्थांचें शिष्यत्व पत्करूं नये म्हणून त्यांच्या घरच्या वडीलमंडळींनीं विरोध केला. त्यासाठीं समर्थांस आपल्या दैवी चमत्काराचे प्रयोग त्यांना करून दाखवावे लागले. त्याचेंहि रसभरीत वर्णन पांगारकर करतात. पांगारकरांच्या लिखाणावरूनच दिसतें कीं, समर्थ फक्त ब्राह्मण शिष्य करीत होते. मग शिवाजी महाराज अगर दुसऱ्या कोणासहि शिष्य करणें शक्य नाहीं. त्यांचे सगळे प्रयत्न ब्राह्मण समाजा-साठीं होते.

धुळ्याचे कै. भट हे आपल्या पुस्तकांत लिहितात, समर्थांचे सर्व शिष्य ब्राह्मण असून ते श्रुतिप्रणित धर्म पाळणारे होते. त्या काळी श्रुति–धर्माचा

नुसता उच्चारहि इतर जातीच्या कानावर जाऊं देणें ब्राह्मण हें पाप समजत होतें. मग महार–मांगापासून तों सर्व जातीच्या लोकात त्यांनीं जागृति कोणत्या आधारावर केली असेल? याच्या उलट त्या काळीं तुकाराम महाराजांनीं जातपात याकडे लक्ष न देतां संतवाणीच्या आधारावर धार्मिक, सामाजिक जागृति केलेली आहे.त्यांचे खालील उद्‌गार विचार करण्यासारखे

सांडोनिया रामराम । ब्राह्मण करिती दोम दोम ॥
संता नाहीं मान । देव मानी मुसलमान ॥
न घडे यावरी न धरवे धीर । पीडितां हें राष्ट्र देखोनि जग॥

## इसवी सन १६७०

पुणें येथें भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थेतर्फे सन १९३० मध्यें शिवाजी निबंधावली १ या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यांत यवतमाळ येथील श्री. यशवंत खुशाल देशपांडे यांनीं ‘शिवकालीन विदर्भ’ असा लेख प्रसिद्ध केला. त्यांत पान ९८ वर पुढीलप्रमाणें आहे. "औरंगजेब हा स्वत: दिल्लीस राहिल्यामुळें शिवाजीस राज्यसंवर्धनास अनुकूल परिस्थिति निर्माण झाली. या सर्व राजकारणांत वऱ्हाडांतील मोंगलांचे हिंदु सरदार शिवाजी विरूद्ध असत. शाहिस्तेखान यास शिवाजीवर पाठविलें तेव्हां त्याच्या मदतीस जे सरदार देण्यांत आले होते त्यामध्यें राजे उदाराम यांच्या घराण्यांतील कर्तबगार बाई जगजीवनराव यांची पत्नी ही होती. या बाईस तिच्या शूरत्वावरून औरंगजेबानें ‘रायबागन’ म्हणजे शूर व्याघ्री हा किताब दिला होता. करतलखान रायबागन आणि अमरसिंग हे तीन सरदार आपापलें लष्कर घेऊन शिवाजीवर कल्याण, पनवेल ओलांडून पलीकडे गेले होते. ही बाई देशस्थ ब्राह्मण असून हिचें माहेर हैद्राबाद येथें होतें. हिचें वंशज वऱ्हाडांत व माहूर येथें राजे उदाराम या नांवानें प्रसिद्ध आहेत." पान ९९ वर पुढीलप्रमाणें आहे. "(१६७०) शिवाजीनें सुरत लुटल्यावर औरंगजेबानें मोहबतखान व दाऊदखान यास

८–१० हजार सैन्य देऊन शिवाजीवर पाठविलें त्यांच्या मदतीस रा बागन हिलाहि ५००० लष्कर देऊन पाठविलें."

स्वराज्यरुपी इमारत कळस गांठीत आहे. अशा वेळीं इ. स. १६५ मध्यें एक ब्राह्मण स्त्री मुसलमान बादशाहाच्या वतीनें मुसलमान स... बरोबर पांच हजार लष्कर घेऊन स्वातंत्र्याचा प्राण घेण्यासाठीं शि महाराजावर येऊं शकते यावरून समर्थांच्या राजकारणाच्या सहा कल्पना करावी.

शिवाजी निबंधावली १ यांत श्री. शिवराम काशिनाथ ओक यार, यांनीं शिवाजी महाराजांची कौटुंबिक माहिती हा लेख प्रसिद्ध केला त्यांत त्यांनीं रायगडावर समर्थांचे रात्रीचे वेळीं अचानक येण्याच्या प्रसंगाची माहिती दिली. ती पान २२१ वर अशी आहे. "समर्थ जाण्यास निघाले महाराज रात्रीचा समय, येणें कसें झालें आणि जाण्याचें कोठें ? बाहेर ये, दाखवितो, म्हणोन महाराजांचा हात धरून किल्ल्याच्या तटावर आले. खालीं एक पाय वरती एक पाय असा चढून आलों, असा उतरून जातों. विद्युलतेसारखा प्रकाश पडून स्वामी अदृश्य झालें." या विसाव्या शतकांत एक इतिहास तज्ञ असे गृहस्थ चमत्काराच्या कथा प्रसिद्ध करतात व त्याहि भारत-इतिहासंशोधक मंडळातर्फे हें नवल आहे. दास विश्राम धाम या ग्रथांत ज्या अद्‌भूत कथा त्याकाळीं लिहिल्या गेल्या असतील त्या अशाच भावनेच्या भरांत व त्याच काल्पनिक कथांचा आज इतिहास म्हणून ठरविण्याचे अनेक प्रयत्न सुरू आहेत. ज्या समर्थाजवळ असें सामर्थ्य होतें. त्या सामर्थ्याचा उपयोग शिवाजो महाराजांच्या मृत्यू-नंतर समर्थांनीं का केला नाहीं. रक्तांच्या चिखलानें व हाडाच्या दगडांनीं बांधलेले किल्ले औरंगजेब एकामागून एक घेत होता. महाराष्ट्रास त्राहीं भगवान् म्हणण्याची पाळी आली होती त्यावेळीं हें सामर्थ्य कोठें गेलें होतें. संभाजीच्या मृत्यूनंतर समर्थांच्या शिष्यांनीं धनाजी, संताजी यांना मदत केल्याचेंहि कोठें दिसत नाहीं.

शिवाजी महाराजांनीं तुकाराम महाराजाकडे धनद्रव्य व कारडालत्ता पाठविल्याची आख्यायिका आहे. परंतु त्यांनीं त्यांना स्पर्श तर केलाच

नाहीं परंतु आपली नजरसुद्धां त्या द्रव्यामुळें विटाळूं दिली नाहीं. तें सव आग्रहानें परत केलें. समर्थांनीं शिवाजी महाराजांची भेट होण्यापूर्वी आपल्या संस्थानाकरितां मुसलमान बादशाहाकडून इनाम मिळविलें होतें असें सांगण्यांत येत आहे. शिवाजी महाराजांनीं आपल्या संस्थानास ...न उत्पन्न द्यावें अशी मागणी समर्थांनीं केल्याचें आढळून येतें. सर्व-...त्याग करणारे समर्थ मरतांना आपल्या भावाचा मुलगा (पुतण्या) आपल्या गादीवर बसावा असे प्रयत्न करूं लागले त्यावेळीं शिष्य मंडळींत केवढा कलह पेटला होता याचीहि हकीगत कांहीं ठिकाणीं आढळते या महत्त्वाच्या गोष्टीकडे भावे यांनीं मुद्दाम दुर्लक्ष केलें आहे.

रामदासी पंथांत वर्णाभिमानाचें महत्व विशेष मानलें जातें. जाति ह्या परमेश्वरानें निर्माण केल्या ही समाजघातक भावना उराशी बाळगण्यांत येत आहे. धार्मिक बाबतींत सर्वांस समान हक्क नाहींत. धार्मिक बाबतींत पूर्वपरंपरेस महत्त्व दिलें.नाना देवता व व्रतवैकल्याचें स्तोम माजविण्यांत आलें. योग याग, जप तप वगैरे बाबींस विशेष महत्त्व दिलें गेलें. त्यामुळें समाजाचा पाया असा जो बहुजन समाज त्याच्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष केलें गेलें. महाराष्ट्राच्या त्या पडत्या काळांत या पंथाकडून राष्ट्र जागृति व धर्म जागृति कितपत होऊं शकली असेल हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. वारकरी सांप्रदायांत धार्मिक बाबतींत उच्चनीचतेस थारा नाहीं भक्ति व सत्याचरण या जोरावर हवा तो मनुष्य उच्चकोटीप्रत पोहोंचू शकतो. वर्णाश्रम हा जातीवर नसून कृतीवर आहे. परधर्मांत गेलेल्या कोणाहि व्यक्तीस भागवतधर्माचीं दारें उघडीं ठेवलीं. नाना दैवतें, व्रत जपजाप्य, होमहवन यांचा निषेध केला. सर्वांस सोयिस्कर व सोपा अस भक्तिमार्ग दाखविला. त्यामुळें महाराष्ट्राच्या त्या काळीं धार्मिक व राज कीय अवनतीस वारकरी संतानींच सांवरणें शक्य आहे.

तुकाराम महाराजानंतर वारकरी सांप्रदायांत प्रसिद्ध असा संत झाला नाहीं. तुकोबारायानंतर समर्थ सुमारें ३६ वर्षे हयात होते. त्यांचे सर्वच शिष्य वर्णाश्रमधर्माचे कट्टे पुरस्कर्ते होते.समर्थानंतर त्यांनीं लेखणी व बुद्धि यांच्या जोरावर महाराष्ट्रभर जातीधर्माचा प्रसार केला. त्याचें प्रत्यक्ष

प्रत्यंतर पेशवाईकाळांत दिसूं लागलें. ब्राह्मण्यास विशेष महत्व कर्मठपणानें कळस गांठला. महारमांगादि अस्पृश्य लोकांस रस्त्याव चालण्याची पंचाइत त्यांना रस्त्यावर थुंकण्याची मनाई असे. जातीजाती मध्यें उच्चनीच भेदभाव वाढले त्यामुळें हिंदुधर्म व हिंदुसमाज यांत ऐक्य राहिलें नाहीं. जैनधर्माचें पुण्यांत देऊळ नसे. पेशवाईचा बळी घेण्यासाठीं व मराठी राज्यांचे प्राण सहज हरण करण्यासाठीं इंग्रजास जीं सोयीची साधनें मिळालीं त्यांत कर्मठपणा हें मुख्य होतें.

इंग्रजाच्या असलांत महाराष्ट्रांत सुशिक्षित म्हणून जो वर्ग पुढें आला त्यांत विशेषेंकरून रामदास पंथाचे अभिमानी. त्यामुळें शाळें- तील क्रमिक पुस्तकांत, वर्तमानपत्रांत, व्याख्यानांत नाटकांत सिनेमांत व इतर पुस्तकांत समर्थ रामदास व त्यांच्या पंथांस विशेष महत्त्व देण्यांत आलें व तसे प्रयत्न सध्यांहि सुरूं आहेत. सुशिक्षित वर्गांपैकीं पांच दहाहि उदार मनाचे पदवीधर संताची खरी बाजू घेणारे सांपडणार नाहींत. तरी सत्य हें आपल्या सत्वानें तळपत असतें. सज्जनगडावर उत्सवप्रसंगीं जेवढे ब्राह्मण जमतात त्यांपेक्षां किती मोठ्या संख्येनें प्रतिवर्षी पंढरपुरास येतात व ज्ञानोबा–तुकाराम या संतांच्या नांवानें जयघोष करतात. महाराष्ट्राच्या दऱ्या–खोऱ्यांत इतकेंच नाहीं तर ज्या ज्या ठिकाणीं मनुष्य प्राणी आहे. त्या प्रत्येक ठिकाणीं संताचें नांव त्यांचें कार्य पसरलें आहे. संतास जाणत नाहीं असा मनुष्य सांपडणें अशक्य आहे. महाराष्ट्राच्या नसानसांत वारकरी संतांचें कार्य मुरलें आहे.

श्रीसमर्थ रामदास स्वामी व संतश्रेष्ठ तुकाराम महाराज हे सम- कालांत महान् श्रेष्ठ महात्मे होऊन गेले. त्यांचें जीवन व एकंदर कार्य हें अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें असून त्यांचा महाराष्ट्रास सदैव उपयोग होणार ! समाज त्यांच्या एकंदर ऋणांतून कधीहि मुक्त होणार नाहीं. त्यांचें कार्य व संतपणा कोणाहि मानवी प्राण्यास कोणत्याहि काळीं नष्ट करणें शक्य नाहीं. असें असतां कांहीं लोक नसत्या अभिमानास बळी पडतात व नसत्या वादास जन्म देतात. त्यामुळें समाजाचें ऐक्य भंग पावण्याच्या पंथास लागतें. कलहाचें बीज पेरलें जाऊन समाजघाताचीं फळें त्यास

हीं पण. तुकारामादि भागवतधर्मीय संतावर अनेक रामदासी पंथाच्या आग्रहकांनीं निष्कारण शितोडे उडविण्याचें पाप केलें. यापुढील काळ हा वाढत्या जागृतीचा व चिकित्सकतेचा आहे. काळाचीं पावलें ओळखून तरी यापुढें विद्वान आपली बुद्धिमत्ता महाराष्ट्राच्या ऐक्यास व धार्मिक स्वास्थ्यास मदत व्हावी या हेतूनें खर्च करतील अशी वारकरी सांप्रदायास आशा आहे.

देवा सांगों सुख दुःख । देव निवारील भूक ॥
देवासीच घालूं भार । देव सुखाचें सार ॥